
# काशीवाराणशीदर्शन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.



लेखक :

डॉ. भास्कर गोविंद घाणेकर

REFBK-0010799
REFBK-0010799

★

मूल्य ३ रुपये

# काशीवाराणशीदर्शन

लेखक :

आयुर्वेदाचार्य श्री. भास्कर गोविंद घाणेकर,

बी. एस्सी., एम्. बी., बी. एस्.

सेवानिवृत्त चिकित्साधिकारी, विकृतिवैज्ञानिक व व्याख्याता, काशी हिन्दु विश्वविद्यालय; स्वास्थ्यशिक्षापाठावलि, स्वास्थ्यविज्ञान, जीवाणुविज्ञान, जीवनरसायनचिकित्सा, औपसर्गिक रोग ( भाग २ ), रक्तके रोग, मूत्रवे ... श्रुतटीका), Comparati ... urvedic Noso ... वक.

REFBK 0010799

REFBK-0010799

* *

प्रस्तावनालेखक :

डॉ. नृसिंह नारायण गोडबोले,

एम्. ए., बी. एस्सी., पीएच्. डी. ( बर्लिन )

सेवानिवृत्त प्राचार्य, प्रौद्योगिकी महाविद्यालय, काशी हिन्दु विश्वविद्यालय.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत.
अनुक्रम 27008 ...... दि: ......
क्रमांक 2-7-2 ...... नों: दि: 24/...
मूल्य ... रुपये

प्रकाशक :
**भास्कर गोविंद घाणेकर,**
भिडे वाडा, शेवडे बोळ,
पुणें २.

( सर्व हक्क स्वाधीन )

मुद्रक :
**श्रीपाद जगन्नाथ गानू,**
राजगुरु प्रेस,
४०१ नारायण पेठ, पुणें २.

त्वदीयं वस्तु गोविन्द तुभ्यमेव समर्पये ।



ज्यांच्यामुळें लेखकाची काशीवासाची अभिलाषा परिपूर्ण होऊन
त्यास आपल्या आयुष्याचीं अडीच तपें अत्यन्त आनंदानें
व सुखासमाधानानें शास्त्रसेवेंत घालवितां आलीं;
त्या भारतभूषण, धर्मभास्कर, हिंदुत्वप्राण
महामना पंडित मालवीयांच्या
दिव्य ज्योतीस त्यांच्या आवडत्या
काशी नगरीचें हें दर्शन
लेखकानें अत्यंत आदरानें
अर्पण केलें आहे.

# प्रस्तावना

प्रा. आयुर्वेदाचार्य डॉ. घाणेकर यांनीं जेव्हां मला आपल्या "काशी-वाराणशीदर्शन" या पुस्तकाकरितां प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली तेव्हां तिला मान्यता देणें हें क्रमप्राप्तच होतें. एखाद्या पुस्तकाची प्रस्तावना लिहिणें म्हणजे एखाद्या उत्तम वक्त्याच्या व्याख्यानप्रसंगीं अध्यक्षत्व स्वीकारण्याइतकेंच महत्त्वाचें असतें. व्याख्यानाच्या सुरवातीला व्याख्यात्याची ओळख करून देणें व व्याख्यानाच्या शेवटीं समारोप करून व्याख्यात्याचें कौतुक करणें हीं कामें फार अभिमानाचीं असतात. त्याशिवाय डॉ. घाणेकरांच्याप्रमाणेंच प्रस्तावनालेखकाचीं सुद्धां ३० वर्षे त्याच काशी नगरींत व त्याच काशी विश्वविद्यालयांत त्याच महान् पुरुषाच्या म्हणजे कै. मदन मोहन मालवीयांच्या निकट सहवासांत गेलीं असल्यामुळें, त्यास प्रस्तावना लिहिण्याचा व पुस्तकाचें मार्मिक समालोचन व निरीक्षण करण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्याकारणानें हें काम करण्याचें त्यानें फार आनंदानें पत्करलें आहे.

डॉ. घाणेकर यांनीं हें पुस्तक लिहिण्याचें काम फारच परिश्रमानें व दीर्घोद्योगानें केलें आहे. या पुस्तकांत एकंदर प्रकरणें (परिशिष्टांसहित) ६ असून, अजमासें १९० पानांचा मजकूर उपयुक्त माहितीनें भरला आहे. त्याशिवाय उपयुक्त नकाशे व फोटोही दिले आहेत. सुशिक्षित अशा वाचकवर्गाला— केवळ "Tourist" (टूरिस्ट) यांनाच नव्हे – उपयोगी पडणारी प्रवासाची माहिती पूर्णपणें दिली असून, प्रत्येक ठिकाणीं ऐतिहासिक, धार्मिक, राजकीय व सामाजिक अशी उपयुक्त माहिती अतिशय सोप्या भाषेंत व मार्मिक विवेचन करून दिली आहे. लेखक महाराष्ट्रीय असल्यानें जागोजागीं महाराष्ट्रीय अशी स्वतंत्र व चिकित्सक विचारसरणीही वाचावयास मिळते. आपले स्वतंत्र विचार मांडून सुद्धां वाचकवर्गाचें मतस्वातंत्र्य लेखकानें कोठेंही हिरावून घेतलें नाहीं ही एक ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे.

प्रत्येक प्रकरणांत अनुक्रमणिकेंत दिल्याप्रमाणें सर्व विषयांची योग्य ती माहिती व चर्चा केली आहे. त्यासंबंधीं प्रस्तावनेंत पुनरुच्चार करण्याची जरुरी नाहीं.

काशी नगरीचें वर्णन, तेथील चालीरीती, खाणेंपिणें, बाजार, उद्योगधंदे, काशींतील जगप्रख्यात घाट, काशींतील महाराष्ट्रीय लोकवस्ती व त्यांचें जीवन इ. विषयांसंबंधीं माहिती सविस्तर व मार्मिक रीतीनें दिलेली आहे. काशी-प्रवास-वर्णनें बाजारांत बरींच आहेत, परंतु ज्या प्रकारें डॉ. घाणेकरांनीं ती माहिती सुशिक्षित वाचकांकरितां दिली आहे, अशी क्वचितच दुसऱ्या पुस्तकांत मिळेल. हिंदु विश्वविद्यालयासंबंधानें जी माहिती दिली आहे ती तर फारच उपयुक्त व सुबोध आहे. पहिल्या प्रकरणांत दिलेलें "पायीं प्रवास – वर्णन" हें तर क्वचितच कोणत्याही गाइडमध्यें न मिळणारें असें वाचनसाहित्य आहे.

या पुस्तकांतील कांहीं ठळक गोष्टी —काशीवाराणशीवर्णनाव्यतिरिक्त— नमूद करण्याजोग्या असून त्या ग्रंथकर्त्याच्या चारित्र्यावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. काशी विश्वविद्यालयांत बरेच नामांकित महाराष्ट्रीय प्राध्यापक होते, आहेत व होतीलही. परंतु प्रस्तुत लेखकानें स्वयंस्फूर्तीनें व स्वखर्चानें केलेल्या कायम टिकणाऱ्या अशा कांहीं गोष्टी नमूद करणें हें अगत्याचें आहे.

डॉ. घाणेकरांनीं केलेलें महत्त्वाचें कार्य म्हणजे आयुर्वेदाची व हिन्दी भाषेची निःस्वार्थ ( Dis-interested ) अशी सेवा. पानें ८८–८९ ( प्रकरण ४ ) वर दिल्याप्रमाणें ग्रंथलेखकानें केलेली सुश्रुतावरची हिन्दी टीका ही त्या सेवेंतील एक फार मोठा टप्पाच ( Land-mark ) आहे. कलकत्त्याचे श्री. गणनाथ सेन व डॉ. म्हस्कर यांसारख्या विद्वानांनीं दिलेल्या उत्तम अभिप्रायांपेक्षां जास्त महत्त्वाची शिफारस काय असूं शकेल ? लेखकानें पहिल्याच पानावर नोंदलेली कामगिरी हेंच त्याच्या अफाट ज्ञानाचें व दीर्घ व्यासंगाचें निदर्शक आहे. याशिवाय पानें १०८–०९ वर दिल्याप्रमाणें हिन्दी भाषेची सेवा वाखाणण्याजोगी आहे. काशी विश्वविद्यालयांत डॉ. घाणेकरांचें नांव कायमचें राहील अशीं आणखी दोन कामें खालीलप्रमाणें आहेत व त्यांचें निदर्शन करणें अगदीं जरुरीचें आहे.

विश्वविद्यालयांत शारीरिक शिक्षणाकरितां एक मोठा विस्तीर्ण हॉल कै. मालवीयजींच्या हयातींत साठ हजार रुपये ( ६०,००० रु. ) खर्चून बांधला गेला. त्याच्या उद्घाटनाचा समारंभ पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें केला गेला व त्याचें नांव शिवाजी हॉल असें ठेवलें गेलें. परंतु हॉलच्या

नांवाशिवाय शिवाजीची द्योतक अशी एकही खूण नव्हती. म्हणजे Hamlet without the Prince of Denmark अशी ही एक संस्था होती. पुढें कांहीं वर्षांनंतर थोड्याशा वर्गण्या गोळा करून त्या ठिकाणीं शिवाजीच्या मूर्तीची स्थापना लोकनायक श्री. अणे हे गव्हर्नर असतांना त्यांच्या हस्तें झाली. परंतु मौज ही कीं, ती शिवाजीची संगमरवराची मूर्ति अगदीं मोकळी अशी एका छत्राखालीं बरींच वर्षें ठेवली गेली. कोणाही गुराख्यानें दिवसां-रात्रीं येऊन त्या मूर्तीशीं खेळावें अशा प्रकारची तिची परिस्थिति होती. विश्वविद्यालयांतील अधिकाऱ्यांना त्या शिवाजीच्या मूर्तीचें रक्षण करावें हें कसें सुचलें नाहीं याचें राहून राहून आश्चर्य वाटतें. शिवाजीच्या पगडीवरचा तुरा ( दगडी ) एका वेळीं कांहीं लोकांनीं काढून खालीं ठेवला होता. अशी अनास्था झालेली डॉ. घाणेकरांना पाहवली नाहीं. याची पानें ९९–१००–१०१ यांवर दिलेली हकीकत वाचनीय आहे. या कार्याकरितां डॉ. घाणेकरांनीं स्वतःचे दोन हजार रुपये ( २००० रु. ) खर्चून त्या मूर्तीच्या स्थापनेला एक कायमचें स्वरूप दिलें ( चित्र नं. ४ ).

लेखकाच्या ह्या महाराष्ट्रीयपणाबद्दल कोणत्या हिंदवासीयाला अभिमान वाटणार नाहीं ? अशाच प्रकारें प्राध्यापकांच्या राहण्याकरितां बांधलेल्या बंगल्यांच्या एका चक्रांत एक लहानसें मारुतीचें देवालय आलें. तिथें भाविक पुरुष व बायका मंगळवारीं व शनिवारीं दर्शनाकरितां जात. पण त्या जागेच्या व मंदिराच्या उद्धाराची कल्पना कोणालाही सुचली नाहीं. ज्या विश्वविद्यालयाचा वार्षिक खर्च रु. ३०–५० लाखांपर्यंत आहे त्याला शिवाजीची मूर्ति किंवा मारुतीचें देवालय सुधारण्याची बुद्धि किंवा इच्छा नसावी हें आश्चर्याचें नव्हे काय ? डॉ. घाणेकर हे श्रद्धावान् मारुति-उपासक आहेत. पानें १०१–०२–०३ वर दिल्याप्रमाणें स्वतःचे पैसे खर्च करून त्यांनीं हें देवालय एक रम्य स्थान केलें आहे. याबद्दल लेखक सार्वजनिक धन्यवादास पात्र आहे.

काशी – विश्वविद्यालयाच्या क्लबाकरितां डॉ. घाणेकरांनीं एक नमुनेदार उदाहरण घालून दिलें आहे. होळीच्या दिवशीं रंग खेळण्यापासून इतर बीभत्स प्रकारांचे प्रसंग सर्वांच्या परिचयाचे आहेत. होळीच्या दिवशीं डॉ. घाणेकर बहुतेक विश्वविद्यालयापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या देवळांत जाऊन मुक्काम करीत व संध्याकाळीं परत येत. यासंबंधाचे त्यांचे मननीय विचार

त्यांनीं पानें ११५–१२० वर दिले आहेत. अश्लील प्रकार होणाऱ्या होळीच्या सणाला त्यांनीं आपल्या खर्चानें एक सामाजिक नमुनेदार संमेलनाचें स्वरूप दिलं आहे. व मागील ५–६ वर्षांपासून हें सामाजिक संमेलन भरण्याची काळजी पण ते स्वतः घेत आले आहेत. अशा प्रकारें सर्व दर्जाच्या लोकांना एकत्रित करण्याची कामगिरी एका ध्येयवादी महाराष्ट्रीयानें घडवून आणली याबद्दल कौतुक व अभिमान कां वाटणार नाहीं ?

सरतेशेवटीं आणखी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते. या पुस्तकाच्या शेवटीं एक परिशिष्ट जोडलें असून त्यांत एक मारुतिरायाचा पाळणा व त्याचा इतिहास जोडला आहे. धार्मिक वृत्तीचे एक मारुतिभक्त – Plain living and high thinking —साधें जीवन व उच्च विचार असलेले एक ध्येयवादी यांना ईश्वरश्रद्धेचा प्रत्यक्ष आलेल्या अनुभवाचा वृत्तान्त या परिशिष्टांत दिलेला आहे. ही हकीकत वाचतांना त्यांच्याशीं समरस होणें जरूर आहे व त्यानंतरच त्याची चिकित्सा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. वाचकांनीं या गोष्टीचा विचार करून आपले स्वतंत्र विचार ठरवावे लागतात. असो.

आतां प्रस्तावना पुरे झाली. ग्रंथकर्त्यानें किती महत्प्रयासानें सर्व साहित्य गोळा केलें आहे हें सुशिक्षित वाचकवर्ग ठरवीलच. सुरुवातीस लिहिल्याप्रमाणें प्रस्तावना–लेखकाला जो अधिकार पोंचतो त्याचा मीं पूर्ण उपयोग करून कांहीं महत्त्वाचे प्रसंग वाचकांपुढें मांडले आहेत. हें पुस्तक वाचतांना सारखें वाचत राहावें व खालीं ठेवूं नये असें वाटतें ; हेंच लेखकाचें मर्म आहे. प्रस्तावना-लेखक हाही तीस वर्षे याच विश्वविद्यालयांत राहिला आहे व त्यालाही या पुस्तकांत किती तरी नवी व उपयुक्त माहिती मिळाली आहे हें नमूद करण्यांत एक प्रकारचा अभिमानच वाटतो.

महाराष्ट्रांतील विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी, विश्वविद्यालयें व सर्व सुशिक्षितवर्ग या पुस्तकाचा सत्कार करतील, अशी आशा बाळगून प्रस्तावना संपवितों.

‘उद्योग’, पुरंदरे कॉलनी, पुणें नं. २.

— **एन्. एन्. गोडबोले,**
एम्.ए., बी.एस्‌सी., पीएच्. डी. ( बर्लिन ).

# निवेदन

सर्वतीर्थांमध्यें कासी। गति होते पूर्वजांसी।
धन्य धन्य ते पंचक्रोशी रे रे रे रे। अमर इच्छिती मरणासी रे॥
—श्रीसमर्थकृत तीर्थावळी

लेखकानें आयुष्याचीं तीस वर्षें काशी नगरीच्या छायाछत्रांत व तेथील समाजाच्या सहवासांत अत्यन्त आनंदानें, सुखासमाधानानें व गुण्यागोविंदानें घालविलीं आहेत. एवढेंच नव्हे तर त्या कालाचें स्मरण काशी सोडल्यावर सुद्धां त्याला सुखसमाधान देण्यास समर्थ आहे. तेव्हां तिचें व तेथील समाजाचें गुणवर्णन करून त्यांच्या ऋणांतून अंशतः उतराई व्हावें ह्या उद्देशानें हें पुस्तक लिहिलें आहे. लेखकानें हिंदीमध्यें हजारों पानें व अनेक ग्रंथ लिहिले आहेत व राष्ट्रभाषेची एवढी मोठी सेवा आपल्याकडून होऊं शकली याबद्दल त्याला धन्यता पण वाटत आहे. परंतु गाडाभर अन्न खाऊन सुद्धां मातेचे दोन घांस नसले कीं भीम जसा असंतुष्ट राही तसा मातृभाषेंत ग्रंथलेखन न झाल्यानें तो असंतुष्ट होता. तेवढ्याकरितां त्यानें सेवानिवृत्ती-नंतर 'आत्मनिवेदन आणि आठवणी' रूप कांहीं लिखाण मातृभाषेंतून करण्याचें योजलें होतें. त्या योजनेपैकीं हा प्रथम प्रयत्न आहे. तात्पर्य, 'स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथाभाषानिबंधमतिमञ्जुलमातनोति' ह्यांत तुलसीदासांनीं म्हटल्याप्रमाणें हें काशीवाराणशीदर्शन केवळ स्वात्म-सुखाकरितां रचलें गेलें आहे. असें असलें तरी काशी पहाणारास, काशीस जाणारास, काशींत रहाणारास, बाजारहाट करणारास, समाजांत वावरणारास हें दर्शन सर्व दृष्टीनें मार्गदर्शक व्हावें याविषयीं पूर्ण लक्ष दिलें गेलें आहे.

ग्रंथोद्देशानंतर ग्रंथाच्या विषयासंबंधीं थोडेंसें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. लेखक १९२० सालीं पायीं काशीस गेला होता. पहिल्या प्रकरणांत त्याची माहिती दिली आहे. लोकसमाजसंस्कृतीवर एक स्वतंत्र प्रकरण लिहिलें आहे. यामध्यें काशींतील लोकांच्या चालीरीती, सणवार, राहणी–वागणी, बोलणीं–चालणीं, खाणीं–पिणीं, श्रद्धा–विश्वास इत्यादिकांची सविस्तर माहिती दिली आहे. प्रत्येक प्रांतामध्यें घेण्यासारख्या जशा अनेक वस्तु असतात, तशा चालीरीती, शिष्टाचार इत्यादि राहणी–वागणीच्या पण अनेक गोष्टी घेण्यासारख्या असतात. ज्याला जी ग्रहणयोग्य वाटेल ती त्यानें घेऊन संपन्न व्हावें. जी पसंत नसेल ती घेऊं नये. कोणतीच पसंत नसल्यास कांहीं

घेऊं नये. मात्र ज्या गोष्टी आपल्याला पसंत नाहींत, सार्वजनिकरीत्या त्यांची निंदा–नालस्ती, नाचक्की, निर्भत्सना करूं नये. या बाबतीमध्यें ' गुणदोषौ बुधो गृह्णन्निन्दुक्ष्वेडाविवेश्वरः। शिरसा श्लाघते पूर्वं परं कण्ठे नियच्छति ' म्हणजे चन्द्र ' डोक्यावर घेऊन ' व विष कण्ठांत ( गुपचुप ) ठेवून काशीच्या विश्वनाथानें आमच्यापुढें फार मोठें व्यावहारिक उदाहरण ठेवलें आहे. भारताची एकता टिकविण्याकरितां, प्रांतांप्रांतांतील सलोखा वाढण्याकरितां काशीविश्वनाथाचें हें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून त्याप्रमाणें प्रत्येकानें व्यवहार करणें अत्यन्त आवश्यक आहे.

मारुतिरायाचा पाळणा परिशिष्ट म्हणून ह्याच पुस्तकांत दिला आहे. हा पाळणा आरत्या-भूपाळ्यांच्या नित्य पाठाच्या पुस्तकांत देण्याच्याऐवजीं ह्या पुस्तकांत कां दिला ? असा कोणी प्रश्न करील. पाळण्यापुरता विचार केल्यास तो अशाच पुस्तकांत जाणें इष्ट आहे. प्रकाशकांनीं तो आपल्या पुस्तकांतून प्रकाशित करावा. लेखक त्यांचा सदैव ऋणी राहील. पण पाळण्यामागें छोटासाच असला तरी अत्यंत हृदयस्पर्शी असा इतिहास आहे. मारुतिरायाला पाळणा म्हणणें ही नवीनच प्रारंभ होणारी प्रथा असल्यामुळें तिच्यासंबंधानें विवेचन आहे. पाळणा प्रकाशित होऊन भक्तजनांच्या हातांत पडल्यावर त्यांच्याकडून प्रकट झालेले विचार आहेत. ह्या सर्वांचें प्रकाशन वरीलसारख्या नित्य पाठाच्या पुस्तकांत होणें शक्य नव्हतें. अन्यत्र कोठें तरी करणें आवश्यक होतें. तेव्हां पाळण्याचा इतिहास काशींतच घडल्यामुळें, लेखन काशींतच झाल्यामुळें व अधिष्ठात्री देवता काशींतच असल्यामुळें त्या सर्वांचा परिशिष्ट प्रकरण म्हणून ह्यांत समावेश केला आहे. लेखक हा काशीचा नुसता प्रवासी नसून आयुष्याचीं अडीच तपें तिच्या जीवनाशीं समरस होऊन राहिलेला तिचा निवासीच असल्यामुळें तिच्या वर्णनांत त्याच्या अनेक कार्यांचें, जीवनांतील अनेक घटनांचें तसेंच विचारसरणीचें थोडेंफार वर्णन येणें क्रमप्राप्तच आहे.

ज्यांच्याकडून ग्रंथरचनेची प्रेरणा मिळाली, तसेंच ज्यांच्या कृपेनें ग्रंथरचना शेवटास गेली त्या श्रीकाशीविश्वनाथाचे आभार किती व कसे मानणार ! म्हणून त्यांचें अंतःकरणपूर्वक स्मरणच केलें जात आहे. त्याचप्रमाणें ज्यांनीं आपले वचनरूप विविध अमोलिक अलंकार भाषावधूस आपादमस्तक अलंकृत करण्याकरितां अगदीं फुकट वापरण्यास देऊन तिला थोडीशी आकर्षक करण्यास

सहाय्यता केली त्या सर्व ऋषिमुनिसंतकवि यांचें पण श्रीविश्वनाथाप्रमाणें स्मरणच करणें भाग आहे.

या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्यास महाराष्ट्राच्या परिचयाचे तसेंच काशी हिंदु-विश्वविद्यालयांतील प्रौद्योगिकी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. नृसिंह नारायण गोडबोले, एम्. ए., पीएच्. डी. यांना लेखकानें विनंति केली. त्या विनंतीस मान देऊन त्यांनीं प्रस्तावना लिहिली – याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत ऋणी आहे. काशीची माहिती देण्यांत कै. भाऊशास्त्री वझे यांच्या ' काशीतिहास ' या संस्कृत, श्री. विश्वनाथ मुकर्जी यांच्या ' काशी अतीत और वर्तमान ' या हिंदी, डॉ. आळतेकरांच्या Benares Past and Present व मेजर एच्. ए. न्यूवेल यांच्या Benares, The Hindus' Holy City या इंग्रजी पुस्तकांचा फार उपयोग झाला. याबद्दल लेखक या पुस्तकांच्या लेखकांचा व प्रकाशकांचा फार आभारी आहे. सहधर्मचारिणीनें सुद्धां प्रथमपासून पुस्तकाच्या लेखनांत लक्ष घालून अनेक उपयुक्त सूचना केल्या, तसेंच समाजाच्या चालीरीती व स्त्रियांच्या राहणीवागणीसंबंधीं पुष्कळ माहिती पुरवली, हें पण येथें नमूद करणें अत्यावश्यक आहे. हिंदु विश्वविद्यालयाच्या मुद्रणाविभागाचे प्रमुख श्री. रामकृष्णदास यांनीं अर्पण-पत्रिकेकरितां आवश्यक असलेला पंडितजींच्या चित्राचा ठोकळा मागणी करतांच पाठविला याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे. राजगुरु प्रेसचे व्यवस्थापक श्री. गानू यांनीं पुस्तकप्रकाशनाचे बाबतीमध्यें आपुलकीनें सर्व प्रकारें मदत केली याबद्दल लेखक त्यांचा पण आभारी आहे.

पुस्तक संपलें. झालें. फार काय, त्याचें निवेदन पण संपलें. काशी सोडल्या-पासून आजतागायत ह्या पुस्तकाचें चिंतन व लेखन यांमध्यें लेखकास काशी-वासच घडत होता. पुष्कळ वेळेला प्रत्यक्षापेक्षां स्मरण अधिक सुखदायक असतें ह्याचा अनुभव ह्या काशीवासांत लेखकास आला. तें सुख आज संपलें. म्हणून मनाला थोडें दुःख होत आहे. त्याजबरोबर हातीं घेतलेलें कार्य हाता-वेगळें होत आहे म्हणून दुःखांत थोडें सुख पण होत आहे. अशा सुखदुःख-मिश्र स्थितीमध्यें श्रीकाशीविश्वनाथाचें पुन्हां एकदां स्मरण करून सध्यांपुरती तरी लेखक आपली लेखणी खालीं ठेवीत आहे.

**क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।**

महाशिवरात्र, शके १८८० **भास्कर गोविंद घाणेकर**

# अनुक्रमणिका


प्रकरण — पृष्ठें

१. **पार्यीप्रवासदर्शन** — १–१९
पार्यीप्रवासमहत्त्व – कल्पनेचा उदय – पूर्वसिद्धता – प्रवासवर्णन – मुक्काम – प्रासंगिक विचार.

२. **नगरी – नागरिक – जलवायुदर्शन** — १९–५८
वास्तु – नगररचना – घाट – मंदिरें – काशींतील महाराष्ट्र – लोकवस्ती – स्थानकें – वाहनें – राहण्याच्या सोई – हवापाणी – पंचक्रोशी.


३. **कला – कृषि – व्यापारदर्शन** — ५८–७८
वस्त्र – भांडीं – लांकडी खेळणीं – मन्दिर – मूर्ति व्यवसाय – काशी व सारनाथ – मातीचीं भांडीं – सुगंधी द्रव्यें – शेती – दूधदुभतें – चारा घालण्याची पद्धति – बाजार – भाजीफळफूल बाजार.

४. **योगधर्मविद्यादर्शन** — ७९–१०९
योगपरंपरा – धर्मपरंपरा – विद्यापरंपरा – विद्येंतील महाराष्ट्र – वेदविद्या – महाराष्ट्रीय वैदिक – क्वीन्स कॉलेज – थिओसोफिकल सोसायटी – ऋषिव्हॅलीट्रस्ट – हिन्दु विश्वविद्यालय – काशी विद्यापीठ – भारतमाता मन्दिर – हिंदी व महाराष्ट्रीय.

५. **लोकसमाजसंस्कृतिदर्शन** — ११०–१६४
यात्रामेळे – दुर्गापूजा – रामलीला – दिवाळी – होळी – दंगली – वनभोजन – समाजजीवन – सणवार – प्राचीन संस्कार – काश्यां मरणान्मुक्तिः – पंडितजींचा कायाकल्प व स्वर्गवास – शिष्टाचार – देवदर्शन – खानपान – स्त्रियांची राहाणी – काशीवासांतील विघ्नें.


६. **परिशिष्ट – मारुतिरायाचा पाळणा** — १६५–१८९
पूर्वपीठिका – प्रार्थनेचें तत्त्व – प्रार्थना व प्रयत्न – महती – देवताद्वेषा – पाळण्याची आवड – अभाव – विरोध – प्रेरणा – रूपरेषा – विचित्र अनुभव – प्रकाशन प्रचार – मारुतिराय व बालक.

**विषयसूची**


काशी नगरी

# काशी नगरी

१ बनारस छावणी स्थानक व सिकरोल
२ ,, सिटी ,, व अलईपूर
३ काशी ,, व राजघाट
४ वरुणा नदी व ऋषि व्हॅली ट्रस्ट संस्था
५ मालवीय पूल
६ मछोदरी मोहल्ला
७ मणिकर्णिका व जलाशयी घाट
८ दशाश्वमेध व शीतला घाट
९ हरिश्चन्द्र घाट
१० अस्सी घाट व अस्सी नदी
११ नगवा – रामनगर मार्ग
१२ लंकाचौमुहानी
१३ भेलूपुरा वॉटर वर्क्स व कमच्छा
१४ रामनगर घाट
१५ रामनगर
१६ रामबाग व दुर्गामन्दिर ( रामनगर )
१७ दुर्गामन्दिर व कुंड
१८ हिन्दु विश्वविद्यालय
१९ विश्वनाथ–अन्नपूर्णा मन्दिरें
२० मोगलसराई लोहमार्ग व सडक



काशी हिंदू विश्वविद्यालय

# काशी हिन्दु विश्वविद्यालय

१ विश्वविद्यालय महाद्वार
२ स्त्रियांचें विद्यालय व वसतिगृह
३ सर सुंदरलाल चिकित्सालय
४ मालवीयजींचा बंगला
५ उपकुलपतींचा ,,
६ रुइया छात्रावास
७ बिर्ला ,,
८ भरुचा ,,
९ सी. पी. रामस्वामी ,,
१० राधाकृष्णन् ,,
११ गुर्तु ,,
१२ भगवानदास ,,
१३ मोर्वी ,,
१४ धनराजगिरी ,,
१५ राजपुताना ,,
१६ लिमडी ,,
१७ डे ,,
१८ अध्यापक बंगले
१९ अध्यापक बंगले
२० आयुर्वेद महाविद्यालय
२१ संस्कृत महाविद्यालय
२२ कलाभुवन
२३ आर्ट महाविद्यालय
२४ भारती महाविद्यालय
२५ सायन्स ,,
२६ सायन्स ,,
२७ मायनिंग ,,
२८ गायकवाड ग्रंथालय
२८ शेतकी महाविद्यालय
२९ विश्वनाथ मन्दिर
३० इंजिनिअरिंग महाविद्यालय
३१ टेक्नॉलजी ,,
३२ मुद्रणालय
३३ मंडलाकार सभागृह
३४ केन्द्रीय कार्यालयें
३५ शिवाजी व्यायामशाळा
३६ हरिश्चन्द्र मार्ग

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २० | २४ | वारणशीची | वाराणशीची |
| २५ | १४ | डॉ. ध्रुव : | डॉ. ध्रुव |
| ४८ | ११ | संपात्ति | संपत्ति |
| ८९ | ८ | कातनसंस्था | कीर्तनसंस्था |
| ९४ | ११ | बसी है गंगके | बसी है गंगाके |
| १५९ | ५ | किमिष्टं | किं मिष्टं |
| ,, | ६ | इष्टतरं | मिष्टतरं |
| १६९ | ११ | चवात्र | चैवात्र |

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २४००८ वि: ३६.५५५५
क्रमांक २७२ नों: दि: २४।५।५५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९०७-८८

# प्रथम प्रकरण

## पायीं प्रवासदर्शन

सहावीं शीत–ऊष्णादि, पहावीं स्थानें स्थळें ।
—श्रीसमर्थ.

प्राचीन काळीं सर्वच प्रवास मुख्यतया पायीं किंवा बैलगाडीनें करावा लागे. लेखकाचे पणजोबा शंभर वर्षांपूर्वी बैलगाडीनें सहकुटुंब काशीस गेले होते. सध्यां आगगाडी, मोटार, विमान यांसारखीं शीघ्र गतीचीं व वेळ वांचविणारीं वाहनें उपलब्ध असल्यामुळें पायीं प्रवास करण्याचें कांहीं कारण राहिलें नाहीं तो केवळ कालापव्यय आहे असें वाटणें साहजिक आहे; परंतु तें ठीक नाहीं. कारण वरील वाहनांनीं केलेल्या प्रवासामध्यें भूप्रदेशाची माहिती, जनतासंपर्क, धाडसी वृत्ति, अंगांत काटकपणा आणण्याची शक्ति इत्यादि पायीं प्रवासाचे गुण नसल्यामुळें प्रत्येकानें आपल्या आयुष्यास प्रारंभ करण्यापूर्वी थोडाबहुत पायीं प्रवास करणें श्रेयस्करच नव्हे तर आवश्यक आहे. अर्थात् कोणीं कोणचा व किती प्रवास पायीं करावा हें प्रत्येकाच्या आवडीसवडीवर सोडण्यास हरकत नाहीं.

## कल्पनेचा उदय

लेखकाला स्वभावतः प्रवासाची–विशेषतः पायीं प्रवासाची–फार आवड. त्यामुळें विद्यार्जनाच्या काळांत, सुट्टीच्या दिवसांत कुठें तरी पायीं चक्कर मारण्याचा त्याचा क्रम असे. त्यामुळें त्या कालावधींत त्यानें महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व प्रसिद्ध देवस्थानें, तीर्थक्षेत्रें, ऐतिहासिक किल्ले, लेणीं इत्यादि स्थळें पायांखालीं घातलीं. १९१८ सालीं त्यानें उन्हाळ्याच्या सुट्टीमध्यें छत्रपति शिवाजीमहाराजांच्या रायगडीं श्रीसमर्थांनीं स्थापलेल्या मारुतीचा जन्मोत्सव साजरा करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सातआठ मित्रमंडळी बरोबर घेऊन तो वाई, महाबळेश्वर, प्रतापगड, महाडवरून ठीक चैत्री पौर्णिमेस सुप्रभातीं राय-

गडावर गेला व एक दिवस राहून नंतर बोचाघोळीच्या घाटानें घाटमाथ्यावर चढून तोरणा, राजगड, सिंहगड करून परत पुण्यास आला. हा २५०-३०० मैलांचा प्रवास १५ दिवसांत झाला. त्या कालापर्यंत केलेल्या प्रवासांत हा सर्वांत लांब पल्ल्याचा प्रवास होता. त्यामुळें लांब प्रवास करण्याचा आत्मविश्वास वाढला व पुढें याहीपेक्षां अधिक लांबचा प्रवास करण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. हिंडावयास जावयाचें तर कोठेंतरी जाण्यापेक्षां एखाद्या देवाच्या दर्शनास जावें अशा स्वार्थाबरोबर परमार्थ साधण्याच्या मनोवृत्तीमुळें पुढें काशीचा पायीं प्रवास करावा असें त्याच वेळीं त्याच्या मनानें घेतलें व विद्याभ्यास पूर्ण झाल्यावर तें कृतींत आणण्याचें त्यानें ठरविलें. १९१९ सालीं लेखक बी. एस्सी. झाला व त्या वेळेपुरतें त्याचें विद्यार्जन संपलें. परंतु त्याचे अखण्ड प्रवासी मित्र श्री. साठे एक वर्ष मागें असल्यामुळें त्या वर्षी प्रवासाचा बेत रहित करून त्यानें सांगलीस नव्यानेंच सुरू होणाऱ्या वेलिंग्डन महाविद्यालयांत अध्यापकाची नोकरी पतकरली व पुढच्या वर्षी श्री. साठे बी. एस्सी. झाल्यावर प्रवासास जाण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें १९१९ मार्चअखेर श्री. साठे परीक्षा संपवून मुंबईहून व लेखक नौकरी संपवून सांगलीहून पुण्यास आले.

## पूर्वसिद्धता

( १ ) **सार्थी** — सांगलीस असतांना लेखकानें सातारा ते बेंगरूळपर्यंत अनेक ठिकाणें एकट्यानेंच बघितलीं होतीं. एकट्याचा प्रवास इतर दृष्टीनें ठीक असला तरी थोडा कंटाळवाणा होतो. म्हणून लेखकानें रायगडच्या प्रवासाचे मित्र काशीच्या प्रवासास मिळविण्याचा प्रयत्न करून बघितला. परंतु कांहीं ना कांहीं कारणानें त्या वर्षी येण्यास कोणीच तयार झाले नाहींत, पुढील वर्षी येऊं असें म्हणूं लागले. आम्ही त्यास तयार नव्हतों. मात्र ऐन वेळीं श्री. साठे यांचे चुलत बंधु यावयास तयार झाले. अशा रीतीनें आम्ही तिघेच जण काशीस जाण्यास तयार झालों. परंतु थोड्याच दिवसांत ( पृष्ठ ११ ) ' न गच्छेत् ब्राह्मणत्रयम् ' ह्या सुभाषितांतील अनुभवाचा आम्हांस प्रत्यय आला.

( २ ) **चालण्याची संवय** -- इतक्या लांबच्या प्रवासास चालण्याची संवय असल्याशिवाय निघणें इष्टच नव्हतें. लेखकाला ती संवय प्रथमपासूनच

होती. कॉलेजमध्यें असतांना खोखो, आट्यापाट्या, हुतुतु, सिंगलबार, डबलबार, मल्लखांब हे त्याचे आवडते खेळ असले तरी पळणें हाच त्याचा नित्याचा व्यायाम होता. रोज पहाटे चाराला उठून शौचमुखमार्जन झाल्यावर गार पाण्यानें स्नान करावयाचें व संध्यास्तोत्रपाठ झाल्यावर हातांत काठी घेऊन पर्वती किंवा चतुःशृंगीकडे पांचचार मैलांची दौड मारावयाची हा त्याचा नित्यक्रम असे. १९१७ सालीं फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वार्षिक खेळांत ५ मैल पळण्याबद्दल त्याला व श्री. साठे यांना पहिलें बक्षीस मिळालें होतें. साठे हे रोजच्या सकाळच्या पळण्यांत नेहमीं त्याच्याबरोबर असत. सांगलीस असतांना रोज पहाटे स्नान केल्यावर तो हरिपुरास कृष्णाकांठच्या श्रीशंकराच्या दर्शनास पळत जाऊन येत असे. दुसऱ्या सहामाहींत मिरजेस स्थानकाजवळील मिरजकरांच्या सुखनिवास बंगल्यांत रहात असतांना तो तीन मैल कृष्णाबाईवर स्नानास पळत जाऊन येत असे व पौर्णिमेस तसाच पुढें ६ मैल नरसोबाच्या वाडीस श्रीदत्तात्रेयाच्या दर्शनास जाऊन येई. म्हणजे वाडीची रपेट जवळजवळ २० मैल होत असे. मिरजेस कृष्णाबाईवर किंवा वाडीस पळतांना तो हातांत भलें मोठें लोखंडी चाक ( चकारी ) फिरवीत जाई.

( ३ ) **वाटेची माहिती** — सांगलीच्या महाविद्यालयास मिरजकरांनीं देऊं केलेल्या ग्रंथांमध्यें ग्याझीटिअर व हिंदुस्थानचे विस्तृत स्थानीय नकाशे होते. त्यांच्या आधारावर लेखकानें काशीचा सर्वांत जवळचा मार्ग शोधून काढला व मार्गावरील गांवें व त्यांचीं अंतरें ह्यांचें टांचण करून घेतलें. श्रीज्ञानेश्वरमहाराजांची पालखी नुकतीच काशीस जाऊन आली होती; म्हणून पुण्यास आल्यावर कै. साखरेमहाराजांस भेटून त्यांच्याकडून लेखकानें पालखीच्या मुक्कामांचीं छापील पत्रकें घेतलीं व त्याशिवाय त्यांना वाटेची माहिती विचारली. परंतु ज्या प्रकारच्या माहितीची आवश्यकता होती ती त्यांच्याकडून आम्हांस मिळूं शकली नाहीं, कारण ते शेंकडों माणसें घेऊन बैलगाडीनें गेले होते व आम्ही तीन माणसें पायीं जाणार होतों.

( ४ ) **पाथेय** — वाटेनें आपले अडूं नये, व थोडेंफार बिघडल्यास उपचार करतां यावा या दृष्टीनें आम्हीं खालील सामान बरोबर घेतलें होतें — २ धोतरें, पंचा, पांढरा व खाकी सदरा, अर्धी खाकी विजार, हरिकेन, निजण्यास

सतरंजी, दिवा, काड्याची पेटी, पूर्वी विजेचे हातदिवे नसल्यानें दीपवाळींतील विजेच्या तारा, सुंठ, बिब्बा, लवंगा, पाणकणीस, व्हॅसलीन, मेंथाल, तपकीर, रस्सी, लोटा, पाणी पिण्याचें भांडें, मोठा चाकू (सुरीवजा), सोटा (लाठी), नाचकण, सुईदोरा, चार दिवस पुरेल इतका शिधा (पृष्ठ ८), पायांमध्यें नेहमींप्रमाणें आमच्या चांभाराकडून करवून घेतलेल्या मोठ्या मजबूत वाहणा.

(५) **परिचयपत्र** — परमुलखामध्यें हिंडावयाचें म्हणजे आपण कोण, कुठले, कशाकरितां हिंडत आहोंत यासंबंधीं एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीचें परिचयपत्र असणें इष्ट असतें. लेखकाचे पणजोबा काशीस गेले त्या वेळीं त्यांनीं घेतलेलें परिचयपत्र एक नमूना म्हणून खालीं दिलें जात आहे —

The magistrate
मॅजिस्ट्रेट
झीला, पुणें.
The zilla of Poona.

सन १८६० आक्ट ३१, कलम ३२ रकाना ४ अन्वयें

आलेक्झेंडरसाहेब इस्कायेर पुणें डिस्ट्रिक्टचे माजीस्ट्रेट यांजकडून दाखला

मेहेरबान रामचंद्र काशिनाथ घाणेकर रावबहादूर माजी दप्तरदार, जिल्हा सातारा, हाली पेनशनर वस्ती राजुरी, ता. शिवनेर, जि. पुणें याजला तरवार एक, गाड्या दोन, चाकर माणसें ३, बायका माणसें ४, पुरुष खासी मंडळी ५, आणि मूल १ याप्रमाणें आपल्याबरोबर राजुरी, ता. शिवनेर, जि. पुणें येथून कासीस – नाशिक – मथुरा, वृन्दावन मार्गें जाते व परत येतेसमयीं बरोबर बाळगणे वी. देण्यांत आला आहे. सदरहू हत्यार वगैरे त्यांचे खाजगी उपयोगास आणणेविषयीं आहे असें आम्हांस वाटत असून हा दाखला ता. २५ आक्टंबर स. १८६३ पासून १ वर्षपर्यंत चालेल.

तारीख ८ आक्टंबर सन १८६३ — सही

इसवी मुकाम पुणें — **आक्टींग डि. म्याजिस्ट्रेट**

**बाळकृष्ण रामचंद्र चिटणीस**

लेखकानें आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. र. पु. परांजपे किंवा आपले गुरु प्रा. जी. बी. कोल्हटकर यांचेकडून परिचयपत्र घेण्याचें योजलें होतें. पण ते दोघेही बाहेर गेल्यामुळें डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे त्या वेळेचे सेक्रेटरी डॉ. के. के. जोशी यांचेकडून त्यानें परिचयपत्र घेतलें.

Fergusson College,
Poona city.

Messrs. B. G. Ghanekar and W. G. Sathe who are going on a vacation trip are demonstrators in the Fergusson College, Poona. They intend visiting places from here to Allahabad.

20-4-20
F. College

(Sd.) K. K. Joshi,
Prof., Fergusson College.

**(६) वडिलांचे आशीर्वाद**—कोणतेंही महत्त्वाचें काम करण्यापूर्वी वडिलांची संमति व शुभेच्छा प्राप्त करून घेणें हें लहान मंडळींचें कर्तव्य आहे. काशीचा पायीं प्रवास हें खरोखरच फार मोठें व जबाबदारीचें काम होतें. त्याकरितां वडीलधाऱ्या माणसांच्या आशीर्वादाची फार आवश्यकता होती. लेखकाचे मातापिता तो म्याट्रिकमध्यें असतांनाच निवर्तले होते. तेव्हां इतर वडीलमंडळीकडून त्यानें ते प्राप्त केले. त्या मंडळीमध्यें कै. गणेश श्रीधर ऊर्फ दादा साठे यांचा उल्लेख करणें लेखक आपलें कर्तव्य समजतो. ते श्री. साठे यांचे पिता असले तरी त्यांचा व लेखकाचा पितापुत्रासारखाच प्रेमाचा संबंध होता. सहा फूट उंचीची नित्य व्यायामानें कमावलेली दणकट भव्य शरीरयष्टि, स्नान-संध्या-पूजास्तोत्रपाठादि धार्मिक आचारांनीं प्राप्त केलेला शुचिर्भूतपणा, प्राचीन परंपरेंतील कर्मठ, करारी व स्वाभिमानी वृत्तीबरोबरच दृष्टीचा उदारपणा, वागणुकींतील प्रेमळपणा व समजूतदारपणा अशा गुणसमुच्चयामुळें ते त्या वेळच्या पुण्यांतील अत्यंत आदरणीय व वंदनीय पुरुषांपैकीं एक होते. 'जें जें आपणांसि ठावें। तें तें इतरां शिकवावें' ह्या समर्थोक्तीप्रमाणें त्यांनीं आपला सेवानिवृत्तीचा काल वैदिक नित्यकर्म, कुस्ती, मल्लखांब व लघुलेखन लोकांना शिकविण्यांत घालविला. काशीप्रवासाचा संकल्प त्यांना कळविल्यावर त्यांनीं

नुसता शुभाशीर्वाद दिला नाहीं, तर उत्साहवर्धक व मार्गदर्शक अशा अनेक गोष्टी आम्हांस सांगितल्या.

आम्हीं तारीख २१ एप्रिल १९२० रोजीं अक्षततृतीयेच्या शुभमुहूर्तावर निघण्याचें ठरविलें होतें. त्या वेळीं शिवाजी मन्दिरांत छत्रपतींचा उत्सव होता. द्वितीयेच्या रात्रीं पोवाड्यांचा कार्यक्रम झाला. लेखकाला पोवाड्यांची फार आवड. चित्रशाळेमार्फत श्री. शालिग्राम यांनीं प्रसिद्ध केलेलें ऐतिहासिक पोवाड्यांचें पुस्तक त्याच्या पठनीय पुस्तकांपैकीं एक होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं लवकर यात्रेस प्रस्थान करावयाचें होतें तरी पोवाड्यांच्या आवडीमुळें, तसेंच त्यांच्यापासून उत्साह व स्फूर्ति प्राप्त करण्याच्या उद्देशानें, आम्ही बरीच रात्रपर्यंत पोवाडे ऐकत बसलों. नंतर पहाटे उठून स्नान, भोजन केलें व देवांना व वडील मंडळींना नमस्कार करून साताऱ्या गाडीनें नगरास गेलों.

## प्रवासवर्णन

आम्ही अक्षततृतीया ता. २१ एप्रिल १९२० रोजीं दुपारीं नगरहून दरकूच दरमजल करीत औरंगाबाद, जालना, खामगांव, अकोला, उमरावती, नागपूर, जबलपूर, कटनी, मैहार, रीवा व प्रयागवरून ज्येष्ठी पौर्णिमा, १ जून १९२० रोजीं सकाळीं १० वाजतां काशीस पोंचलों. वाटेंत आम्हीं औरंगाबाद, उमरावती, नागपूर, जबलपूर या ठिकाणीं एक एक दिवस अधिक राहून तीं ठिकाणें त्याचप्रमाणें वेरूळचीं लेणीं, रामटेक, भेडाघाट ( मार्बल रॉक्स ) हीं जवळचीं ठिकाणें बघितलीं. या सर्व प्रवासास ४० दिवस लागले व जवळजवळ हजार मैल आमची चाल झाली. दिवस उन्हाळ्याचे व प्रदेश अपरिचित असल्यामुळें चालण्याचें काम सकाळीं ४–८ व दुपारीं ४–७ पर्यंत आम्ही करीत होतों. शक्यतोंवर सूर्यास्तानंतर फार वेळ आम्हीं प्रवास करीत नव्हतों. काशीचा मार्ग नागपूर – जबलपूरमधील सातपुड्याचा कांहीं भाग सोडल्यास अत्यंत उष्ण प्रदेशांतून गेलेला आहे. त्यांतच कॉलेज न बुडवितां प्रवास करण्याचें आम्हीं योजिल्यामुळें उन्हाळ्याची भर पडली. पुणें – साताऱ्याकडे कायम राहणाऱ्या माणसाला उत्तर हिंदुस्थानांतला उन्हाळा म्हणजे खरोखर अग्निदिव्य आहे. जालन्याला तास दीडतास उन्हांत उघडें बसण्याचा प्रसंग पडल्यानें आमच्या पाठी करपून गेल्या व त्याचीं पुढें सालडीं गेलीं. काशीच्या प्रवासाच्या तयारीचा वर जो

उल्लेख केला आहे तो केवळ चालण्याचा आहे. पुणें–सातान्यास राहून उत्तर हिंदुस्थानचा उन्हाळा सहन करण्याचा अभ्यास होऊंच शकत नाहीं. अशा स्थितींत शक्य तितकें ऊन टाळून व उन्हापासून बचाव करून चालण्याशिवाय आम्हांस गत्यन्तरच नव्हतें. सकाळ–संध्याकाळची वेळ आम्हीं ऊन टाळण्याच्या दृष्टीनें पसंत केली होती. तरीसुद्धां सकाळीं ८ पूर्वी व संध्याकाळीं चारानंतर कांहीं वेळ ऊन असह्य होत असे. कारण वाटेंत कित्येक ठिकाणीं सडकेला अजीबात झाडें नसत व कित्येक ठिकाणीं असलेलीं झाडें उन्हाळ्यामुळें खराट्यासारखीं झालेलीं असत. त्यांतच कढत वाऱ्याची भर पडत असे. अशा वेळीं आम्ही अंग पुसण्याचा पंचा ओलाचिंब करून डोक्यावर घेऊन प्रवास करीत होतों. या योगानें डोकें थंड राहून झळीचे कढत वारे वाळ्याच्या पडद्यांतून येणाऱ्या वाऱ्याप्रमाणें थंड होऊन शरिराला व डोक्याला लागत. उन्हाळ्यांत उन्हापासून व झळीपासून मेंदूला बचावण्याचें हें सर्वोत्तम साधन आहे यांत शंका नाहीं. मात्र डोक्यावरील पंचा कोरडा होऊं न देण्याची काळजी घेतली पाहिजे. नाहीं तर झळ (लू) लागण्याची फार भीति असते. आमच्यापाशीं विहिरींतून पाणी काढण्याकरितां रस्सी–लोटा ठेवला होता त्यानें आम्ही ठिकठिकाणीं पाणी काढून आमचा पंचा ओला करीत होतों व त्याशिवाय एक लोटाभर पाणीपण जवळ बाळगीत होतों. दिवसां मुक्काम प्रायः नदीच्या, ओढ्याच्या किंवा विहिरीच्या कांठीं झाडाखालीं व रात्रीचा मुक्काम एखाद्या मंदिरांत, दिवसां सूर्यतापानें तप्त झालेल्या उघड्या स्थानीं किंवा वाळवंटावर करण्याचा आमचा रिवाज होता. गांवापासून दूर अशा उघड्या स्थानीं निजल्यावर कित्येक वेळेला रखवालदार आम्हांला गांवांत जाऊन निजण्याकरितां उठवीत, परंतु वेळ मारून आम्ही तेथेंच निजत होतों. जेथें मुक्कामाच्याजवळ लोहमार्गाचें स्थानक असे तेथें आम्ही त्यावरच मुक्काम करीत होतों; कारण तेथें करमणुकीबरोबर पुष्कळशा सोयी पण होत असत. औरंगाबाद ते जालना, खामगांव ते उमरावती व जबलपूर ते मैहार ह्यांमधले पुष्कळसे मुक्काम आम्हीं स्थानकावरच केले. महाराष्ट्रांतील बहुतेक धर्मशाळा वडारांच्या लायकीच्या असल्यामुळें आम्ही तेथें मुक्काम करीत नव्हतों; परंतु उत्तर हिंदुस्थानांतील धर्मशाळा तशा नसल्यामुळें जबलपूर, प्रयाग इत्यादि ठिकाणीं आम्हीं धर्मशाळांतूनच मुक्काम केला. मन्सर, देऊळगांवपठार, वर्धा नदी इत्यादि

ठिकाणीं आम्हीं रहदारी बंगल्यांत मुक्काम केला. उमरावती, नागपूर, रीवा इत्यादि ठिकाणीं जेथें आमचे मित्र किंवा नातलग होते तेथें आम्ही त्यांच्याकडे उतरलों.

आमचे बहुतेक मुक्काम आडरानांत किंवा खेड्यांतच व्हावयाचे असल्यानें खाण्यापिण्याची व्यवस्था आमची आम्हांसच करणें जरूर होतें. त्याकरितां आम्हीं बरोबर २ ताटें, २ वाट्या, २ पातेलीं, पळी, तवा हीं भांडीं व तांदूळ, कणीक, डाळीचें पीठ, तिखट, मीठ, तेल असा तीनचार दिवस पुरेल इतका शिधा घेतला होता, व वाटेंत ज्या ज्या ठिकाणीं शिधा मिळत असे तेथें तो विकत घेऊन ३-४ दिवसांची बेगमी करून ठेवीत होतों. सकाळीं मुक्काम केल्यावर स्नान करून आम्ही भात पिठलें व मीठ आणि पुष्कळसें तेल घालून कणकीचे गाकर करीत होतों. हे गाकर आम्हांला संध्याकाळीं, सकाळीं किंवा केव्हांही वाटेंत भूक लागल्यास उपयोगी पडत. मोठ्या शहरांतली तयार पुरी-तरकारी व खेड्यांतलें दूध व फुटाणे यांचापण आम्ही उपयोग करीत होतों. याशिवाय मुक्कामाचे ठिकाणीं कोणीं आदरातिथ्य करण्याचा घाट घातलाच तर आम्ही सर्व प्रकारें त्याला सहायता करीत होतों. यामुळें प्रवासांत आम्हांला खाण्यापिण्याची फारशी पंचाईत पडली नाहीं.

जितक्या उत्साहानें व धडाडीनें आम्हीं हा प्रवास करण्याचें योजिलें तितक्याच उत्साहानें व धडाडीनें आम्हीं तो पार पाडला. ह्याचें श्रेय दैवास किंवा श्रीविश्वनाथाच्या कृपेसच दिलें पाहिजे, कारण बहुतेक सर्व प्रवास अत्यंत उष्ण, निर्जन किंवा जंगली प्रदेशांतून असल्यामुळें रोगराई, विंचूकांटा, चोर-चिलट किंवा हिंस्र श्वापद ह्यांची कृपादृष्टि होणें केव्हांही शक्य होतें. परंतु यांपैकीं एकाचीसुद्धां आमची दृष्टादृष्ट झाली नाहीं. स्वसंरक्षणाच्या दृष्टीनें आम्हीं कांहीं किरकोळ औषधें, लाठी, दिवा, सुरा इत्यादि साधनें ठेवलीं होतीं, परंतु प्रसंग पडल्यावर हीं कितपत उपयोगी पडलीं असतीं व त्यांतून आम्ही कितपत सहीसलामत पार पडलों असतों हें सांगणें कठिण आहे. असो. ज्या काळीं आम्हीं हा प्रवास केला त्या काळीं खरोखरच तो अभूतपूर्व असाच होता. महात्मा गांधींनीं असहकार पुकारल्यावर कित्येकांनीं आगगाडी-वर बहिष्कार घालून पायीं राष्ट्रीय सभेस उपस्थित राहाण्याचें कार्य केलें. पण तें नंतरचें आहे. तेव्हां पदवीधरांमध्यें हौशीखातर अशा प्रकारचा व इतक्या लांबीचा

प्रथमच प्रवास करण्याचें श्रेय आम्हीं घेतल्यास तें अगदींच अस्थानीं होईल असें म्हणतां येणार नाहीं.

## प्रवासांतील मुक्काम

| दिनांक | | वेळ | मुक्काम | अंतर मैल |
|---|---|---|---|---|
| २१ | एप्रिल | सकाळ | अहमदनगर | |
| | | रात्र | जेऊर | १० |
| २२ | ,, | सकाळ | घोडेगांव | ११ |
| | | रात्र | बाभुळवाडी | ९ |
| २३ | ,, | सकाळ | कायगांव-टोकें | १२ |
| | | रात्र | सय्यदपूर | ८ |
| २४ | ,, | सकाळ | **औरंगाबाद** | १९ |
| २६ | ,, | रात्र | चिखलठाणें | ६ |
| २७ | ,, | सकाळ | शेकटें | १३ |
| | | रात्र | शेलगांव | १० |
| २८ | ,, | सकाळ | **जालना** | ११ |
| | | रात्र | न्हावें मठ | ८ |
| २९ | ,, | सकाळ | शिंदखेड | ८ |
| | | रात्र | देऊळगांवराजा | ९ |
| ३० | ,, | सकाळ | देऊळगांवपठाण | १४ |
| | | रात्र | मेरे | १३ |
| १ | मे | सकाळ | चिखली | ८ |
| | | रात्र | अमडापूर | १४ |
| २ | ,, | सकाळ | एका झाडाखालीं | १६ |
| | | रात्र | **खामगांव** | ८ |
| ३ | ,, | सकाळ | बाळापूर | १४ |
| | | रात्र | व्याळें | ९ |
| ४ | ,, | सकाळ | **अकोला** | ९ |
| | | रात्र | यावलखेड | ५ |

| दिनांक | | वेळ | मुक्काम | अंतर मैल |
|---|---|---|---|---|
| ५ | मे | सकाळ | काटेपूर्णा | १२ |
| | | रात्र | मान | १४ |
| ६ | ,, | सकाळ | उमरावती | २२ |
| ८ | ,, | रात्र | नांदगांवपेठ | ८ |
| ९ | ,, | सकाळ | मोझरी | १३ |
| | | रात्र | बिसनूरवर्धा | १० |
| १० | ,, | सकाळ | कारंजें | १९ |
| | | रात्र | जुनेपाणीनाका | १० |
| ११ | ,, | सकाळ | बाजारगांव. | १३ |
| | | रात्र | गोंडखेरी | ९ |
| १२ | ,, | सकाळ | नागपूर | १२ |
| १३ | ,, | रात्र | कह्मान | १२ |
| १४ | ,, | सकाळ | रामटेक | १८ |
| | | रात्र | मन्सर | ५ |
| १५ | ,, | सकाळ | देऊळपार | १५ |
| | | रात्र | खावसा | १० |
| १६ | ,, | सकाळ | मोहोगांव | १२ |
| | | रात्र | शिवणी | १७ |
| १७ | ,, | सकाळ | छपरा | २० |
| | | रात्र | घुणाई | ५ |
| १८ | ,, | सकाळ | नदीवर | १७ |
| | | रात्र | वंजारी | १३ |
| १९ | ,, | सकाळ | बरगी | १६ |
| | | रात्र | जबलपूर | १४ |
| २१ | ,, | रात्र | पनागरदेउरी | ११ |
| २२ | ,, | सकाळ | शिहोरा | १३ |
| | | रात्र | सलीमनाबाद | १६ |
| २३ | ,, | सकाळ | कटनी | १७ |

अनुक्रम २४००८ ... वि: ... क्रमांक २४२ नों: दि: ...

| दिनांक | | वेळ | मुक्काम | अंतर मैल |
|---|---|---|---|---|
| २३ | मे | रात्र | जुखेही | १० |
| २४ | ,, | सकाळ | आमडारा | १३ |
| | | रात्र | मैहार | १६ |
| २५ | ,, | सकाळ | अमरपाटण | १० |
| | | रात्र | एक खेडें | १० |
| २६ | ,, | सकाळ | रीवा | १२ |
| २७ | ,, | रात्र | रामपूर | १० |
| २८ | ,, | सकाळ | झाडाखालीं | १६ |
| | | रात्र | लादी | १५ |
| २९ | ,, | सकाळ | झाडाखालीं | २० |
| | | रात्र | प्रयाग | १७ |
| ३० | ,, | रात्र | दीन | १८ |
| ३१ | ,, | सकाळ | गोपीगंज | २० |
| | | रात्र | झाडाखालीं | १९ |
| १ | जून | सकाळ | काशी | २० |

## प्रासंगिक विचार

( १ ) ऊनतहान, स्वयंपाक करणें, 'कभी घी घना, कभी मुठ्ठीभर चना, कभी वह भी मना' अशा प्रकारचें वेळीं-अवेळीं मिळणारें भोजन, असे कष्ट सोसण्याचा व चालण्याचा अभ्यास असल्याशिवाय इतका लांबचा प्रवास होणें शक्य नाहीं हें पूर्णपणें ओळखून आम्हीं दोघांनीं तयारी केली होती. आमच्या मुंबईकर जोडीदाराची यांपैकीं कोणचीच तयारी नव्हती. हें जाणून आम्हीं प्रारंभीं थोडीच म्हणजे रोज २० मैल मजल सुरू केली. पण तितकीही त्याच्याच्यानें झेपेना. एकदोन मुक्कामांतच त्याची दमछकी व्हावयास लागली. कांहीं दिवस त्यानें आपलें दुखणें आमच्यापासून लपविण्याचा प्रयत्न केला, परंतु जेथें रोज वीस वीस मैल चालून झाल्यावर स्वयंपाकाचें काम करावें लागे तेथें असल्या लपंडावानें फार दिवस काम भागण्यासारखें नव्हतें. शेवटीं जालन्याच्या पुढें सिंदखेड मुक्कामीं त्याला फणफणून ताप आला.

तेव्हां परत जालनामार्गें त्याची मुंबईस रवानगी करून आम्ही पुढील मार्गास लागलों. कोणचेंहि साहस करण्यापूर्वी तें करण्याची आपल्यामध्यें पात्रता आहे किंवा नाहीं याचा प्रत्येकानें विचार करावयास पाहिजे व पात्रता नसल्यास ती आणण्याचा प्रयत्न करून मग तें काम हातीं घ्यावयास पाहिजे. अशा प्रकारचा विचार आमच्या मुंबईकर मित्रानें न केल्यामुळें हुरळून लांडग्यामागें लागलेल्या मेंढराप्रमाणें त्याची दुर्दशा झाली-सहसा विद्धीत न क्रियाम-विवेकः परमापदां पदम् ॥ **किरातार्जुनीय** ॥

( २ ) पदवीधर असूनसुद्धां आम्ही पायीं काशी करीत आहोंत हें बघून पुष्कळ लोकांत आमच्याबद्दल आदर, आश्चर्य व कौतुक उत्पन्न झालेलें आमच्या दृष्टीस पडलें. जालन्याजवळच्या न्हावें मठांत आम्हीं रात्रीं मुक्काम केला. मठाधिपति आत्मारामबोवांनीं आमचा कार्यक्रम ऐकून प्रोत्साहनपर आशीर्वाद दिला, व तेथील इतर मंडळींनीं 'आमच्यानें जाणें होत नाहीं, आपण जात आहां, आम्हांला आपणच काशीविश्वनाथ आहां, आम्ही आपल्याच पायां पडतों' म्हणून आमच्या पायांवर लोटांगण घातलें. तेव्हां लेखकास तुकाराम-महाराजांच्या खालील अभंगाचें स्मरण झालें.

**लोक म्हणती मज देव । परि हा अधर्म उपाव ॥**
**आतां कळेल तें करी । सीस तुझे हातीं सुरी ॥**
**अधिकार नाहीं । पूजा करिती तैसा कांहीं ॥**
**मन जाणे पापा । तुका म्हणे मायबापा ॥**

( ३ ) रामटेकपाशीं मन्सरला संध्याकाळीं आम्हीं डाकबंगल्यावरच्या ओसरी-वर पथारी पसरली. खानसामा आम्हांला तेथून बाहेर काढूं लागला. आम्हीं त्याला पुष्कळ समजावण्याचा प्रयत्न केला, पण ऐकेना. त्याला कदाचित् थोडीशी चिरीमिरी दिली असती तर काम भागलें असतें. पण आम्ही त्याला कांहींही देण्यास तयार नव्हतों. हलण्यास त्याहून तयार नव्हतों. बाचाबाची सुरू झाली. ती सडकेच्या पलीकडील बंगल्यांत राहणाऱ्या अधिदर्शकानें ऐकून आम्हांला बोलावणें पाठविलें. तेथें जाऊन आम्हीं त्यास आमची सर्व हकीकत सांगितली. त्याला मोठें कौतुक वाटलें व आमच्यासारखीं सुशिक्षित माणसें भेटल्याबद्दल आनंद झाला. बराच वेळ गप्पा मारल्यावर त्यानें स्वतः येऊन

डाकबंगला उघडून देऊन आमची सर्व व्यवस्था करून दिली व खानसाम्यास आम्हांस सर्व प्रकारानें मदत करण्यास सांगितलें. पात्रापात्रविवेक नसल्यामुळें हलक्या दर्जाचीं माणसें अधिकार प्राप्त झाल्यानंतर समाजाला उपकारक व्हावयाच्या ऐवजीं अपकारकच होतात. सातपुड्यांत प्रवाशांच्या मदतीकरितां सरकारनें ठिकठिकाणीं पोलीस–चौक्या ठेवल्या आहेत. तेथेंपण आम्हांला पोलिसांकडून मदत व्हावयाच्या ऐवजीं त्रासच झाला. एवढ्याकरितां सुभाषित-कार लिहितात–अन्यस्माल्लब्धपदः प्रायो नीचोऽपि दुःसहो भवति। रविरपि न दहति तादृग्यादृग्दहति वालुकानिकरः ॥

(४) जबलपुरास मुक्कामाकरितां स्टेशनजवळील राजा गोकुळदासांच्या प्रशस्त धर्मशाळेंत आम्ही गेलों. तेथें चौकांत बसलेल्या एका मुसलमानास आम्हीं धर्मशाळेच्या कारकुनाचा ठावठिकाणा विचारला. त्यानें आमचा थाट बघून आमची चौकशी केली. जेव्हां आम्हीं त्याला आमचा प्रवासवृत्तान्त सांगितला तेव्हां आश्चर्यानें तो इंग्रजींत म्हणाला, ‘दक्षिणी लोक अशक्त असतात असें आम्ही समजत होतों, परंतु तुम्हांला बघून आमची कल्पना चूक ठरली. तुमच्यासारखे शिकलेले दोन टक्के जरी लोक मिळाले तरी होमरूल मिळण्यास वेळ लागणार नाहीं.’ त्या वेळीं स्वराज्य शब्दाऐवजीं होमरूल शब्दाचा प्रयोग होत होता. ‘Home rule is my birth–right’ ही लो॰ टिळकांची उक्ति प्रसिद्धच आहे. तो केवळ इतकेंच बोलून थांबला नाहीं, त्यानें कारकुनास आम्हांस एक उत्तम खोली देण्यास सांगून बजावलें कीं, ‘आजवर तूं पुष्कळ प्रवासी बघितलेस, पण हे प्रवासी कांहीं और आहेत. ह्यांची नीट व्यवस्था लाव म्हणजे तुला पुण्य लागेल.’ त्याच्या सांगण्याप्रमाणें त्या कारकुनानें आम्हांस एक उत्तम खोली दिली. आमचें काम साधलें म्हणूनच नव्हे तर त्या मुसलमानाची उदार किंवा भारतीय दृष्टि बघून आम्हीं त्याचे मनापासून आभार मानले. तेथें दोन दिवस राहून आम्हीं जबलपूर व भेडाघाट बघितले.

(५) उमरावतीचा मुक्काम जरा लांब पडल्यामुळें सकाळीं आम्ही जरा उशीरां पोंचलों. तहान लागली होती. एक देऊळ बघून आंत शिरलों व आंतील आडावर असलेल्या पोहऱ्यानें पाणी काढून त्यानेंच दुरून पिऊं लागलों तों ‘ओ बम्मन् आपने क्या किया’ असें आंतून पुजारी आमच्यावर जोरानें खेकसला. आम्ही एकदम चपापलों व थोडें ओशाळल्यासारखें झालों. दुरून

पाणी प्यायलें तरी भांडें उष्टें होतें असें हिंदुस्थानी लोक समजतात. आम्हांस या रूढीची तितकीशी जाणीव नव्हती. तसेंच हें मन्दिर हिंदुस्थानी पुजाऱ्याचें असेल अशी पण कल्पना नव्हती. त्यामुळें आमच्याकडून हें उल्लंघन झालें. कायद्याचें उल्लंघन झाल्यावर त्याच्या कचाट्यांतून सुटण्यास त्याचें अज्ञान जर निमित्त म्हणून पुढें करतां येत नाहीं तर रूढीचें उल्लंघन झाल्यावर तिचें अज्ञान त्याच दृष्टीनें पुढें करणें इष्ट नाहीं म्हणून आम्हीं त्या पुजाऱ्याचें बोलणें मुकाट्यानें ऐकून घेतलें व माफी मागून तसेंच देवाला नमस्कार करून तेथून पाय काढला.

(६) रीवा व प्रयाग यांच्यामध्यें सोहागीचा घाट आहे. ह्या घाटाच्या पायथ्याशीं सोहागी गांव आहे. आम्हांला खाण्यापिण्याच्या वस्तूंची जरुरी होती म्हणून आम्हीं गांवाकडे मोर्चा फिरवला. वाटेंत आम्हांला एक मनुष्य भेटला. आम्हांला बघून तो थोडासा प्रसन्न झाल्यासारखा दिसला. आम्हीं गांवांत कांहीं मिळेल का म्हणून त्याचेपाशीं चौकशी केली. त्यानें खटपट करून आम्हांस कणीक, दूध, मिठाई इत्यादि जिन्नस मिळवून दिले व परत सडकेपर्यंत आम्हांस पोचविलें. त्याचा तो आपुलकीचा व्यवहार बघून 'तूं कोण, कुठला' म्हणून आम्हीं त्यांस विचारलें. त्यावर त्यानें सांगितलें कीं, मी ७–८ वर्षें उमरावतीस नौकरीकरितां राहिलों होतों. तेव्हां तिकडील कोणी भेटल्यास मला आनंद होतो व मी त्याला शक्य ती मदत करतों. त्याचें तें बोलणें ऐकून आम्हांला कौतुक वाटलें. एका प्रांतांतील मनुष्य दुसऱ्या प्रांतांत राहिल्यास त्याला त्या प्रांतांतील माणसांबद्दल आपलेपणा कसा उत्पन्न होतो हें दाखविण्याकरितां हा अनुभव येथें दिला आहे. या दृष्टीनें प्रत्येक महाराष्ट्रीयास अशी सूचना आहे कीं, नौकरी, धंदा किंवा अन्य कारणानें परप्रांतांत जाण्याचा योग आल्यास तो सोडूं नये व परप्रांतीं तेथल्या लोकांशीं समरस होऊन महाराष्ट्राचा अन्य प्रांतांशीं सलोखा वाढविण्यास मदत करावी.

(७) औरंगाबादेहून आम्हीं वेरुळास घृष्णेश्वराचें ज्योतिर्लिंग व लेणीं बघण्यास गेलों. तेथील कैलासमंदिर जगांतील एक आश्चर्य आहे. तें आंतून बघून झाल्यावर वरून बघण्याच्या दृष्टीनें आम्ही त्याच्या भोंवतालच्या कड्यावर गेलों. एके ठिकाणीं लेखकाचा पाय लचकून तो पडला. थोडें चुकलें, नाहीं तर तत्काळ खरोखरीच कैलासदर्शन व्हावयाचें. परंतु दैवाची तशी इच्छा

नव्हती. प्रत्येक मनुष्याच्या जीवनांत ज्या अनेक घटना घडतात त्या प्रत्येक घटनेचे कर्मविभाग (प्रयत्न) व फळविभाग असे दोन विभाग पडतात. कर्मविभाग मनुष्याच्या (कर्त्याच्या) व फळविभाग दैवाच्या ताब्यांत असतो. अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्। विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥ गीता ॥ मनुष्याचा अधिकार केवळ कर्मविभागापुरता मर्यादित आहे. फळविभागावर त्याचें मुळींच नियंत्रण नाहीं. तेव्हां अमुक कर्माबद्दल मला अमुक फळ मिळालें पाहिजे अशी आशा बाळगणें ही अनधिकार चेष्टा अर्थात् मूर्खता आहे— कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥ गीता ॥ आपल्या मनासारखें कित्येक वेळीं मनुष्याला फळ मिळत नाहीं त्या वेळीं ही अधिकारविभागणी मनुष्यांना पसंत पडत नाहीं. पण मनुष्याच्या स्वभावाचें सूक्ष्म अवलोकन केलें म्हणजे त्याच्या हातांत फळाधिकार न देण्यांत परमेश्वराचें दूरदर्शित्वच दिसून येतें. कर्त्याच्या हातांत फळाधिकार देणें हें शासन खात्याकडे न्यायाधिकार देण्यासारखें किंवा वानराच्या हातांत कोलीत देण्यासारखें आहे.

(८) खामगांव व अकोला यांच्यामध्यें बाळापूर म्हणून गांव आहे. त्या-गांवीं शंकराचें हेमाडपंती मंदिर आहे. आम्ही संध्याकाळीं तेथें पोंचलों व मंदिरांत मुक्काम केला. पुजारी मंदिरांतच राहात होता. तो एकटा व गरीब होता. गरीब असल्यास नवल नाहीं. खेडेगांवांतल्या देवांना उत्पन्न असें नसतेंच. त्यामुळें पुजाऱ्यांना भीक मागून पोट भरावें लागतें. त्या पुजाऱ्यानें आमची विचारपूस करून रात्रीं भोजनाचें निमंत्रण दिलें. आदरातिथ्यास नाहीं म्हणावयाचें नाहीं असा जरी सोईस्कर दण्डक आम्हीं प्रवासांत ठेवला होता तरी त्याची स्थिति बघून आम्हीं एकदम नकार दिला. परंतु त्याचा विशेष आग्रह बघून आम्हांला पडतें घ्यावें लागलें. त्यानें ताबडतोब गांवांतून शिधा-सामग्री आणवून व स्वयंपाक करून मोठ्या प्रेमानें आम्हांला जेवावयास घातलें. त्याच्या पोळ्या मोठेपणांत सज्जनगडावरील दासनवमीच्या उत्सवांतील पोळ्यांनाही लाजविणाऱ्या होत्या, परंतु त्यांत प्रेमाचें अमोप मोहन असल्यामुळें तोंडी लावण्यास काकवी नसतांनासुद्धां त्या अत्यन्त रुचकर लागत होत्या. पन्नास वर्षांपूर्वी दासनवमीच्या उत्सवांत प्रसादाला जाड पोळ्या व तशीच जाड काकवी असे. त्याचें तें आदरातिथ्य बघून लेखकाला ‘चल जाऊं विदुरा वरीं। उंच उंच माड्या काय कामाच्या। साधूचि झोपडी बरी’ ह्या पदाची

आठवण झाली. खरोखर त्या ब्राह्मणानें प्रेमळपणानें जो आमचा आतिथि-सत्कार केला त्याची सर राजवाड्यांतल्या डामडौली सत्कारालासुद्धां येणें शक्य नाहीं. तेव्हां त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्याकरितां दुसऱ्या दिवशीं प्रस्थान करण्यापूर्वी 'फूल नाहीं फुलाची पाकळी' म्हणून देवापुढें रौप्यमुद्रा ठेवून आम्हीं जड अन्तःकरणानें त्याचा निरोप घेतला.

शिंदखेडला आमचे तिसरे मित्र आजारी पडल्यावर आम्ही तो रस्ता सोडून परत देऊळगांवराजाला आलों. तेथें सडकेवरील एका कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या कारखान्यांतील विहिरीवर मुक्काम केला. त्याचे मालक श्री. जोशी होते. त्यांनीं रात्रीं आमची भोजनाची व्यवस्था करून दुसऱ्या दिवशीं आमच्या मित्राला जालना स्थानकावर पाठविण्याचीपण व्यवस्था केली.

शिवणीस आम्ही सोमवारीं संध्याकाळीं पोंचलों व नेहेमीप्रमाणें स्थानकावर उतरलों. तेथील मालबाबू दक्षिणी ब्राह्मण होते व काम संपवून सोमवारचा उपास सोडण्याच्या विचारांत होते. आम्हांला बघितल्यावर त्यांनीं आमची चौकशी केली व आम्ही पायीं काशीस जात आहोंत हें ऐकून मोठ्या भक्तिभावानें आम्हांस काशीविश्वनाथ समजून भोजनास बोलावलें. आदरातिथ्य करणारे जसे कांहीं भेटले तसे साध्या प्रश्नाचें उत्तर न देणारे पण कांहीं भेटले, मग आदरातिथ्याचें नांवच कशाला. अर्थात् त्यांचा विचार करण्याचें कारण नाहीं. येवढें मात्र खरें कीं, पैशानें गरीब, राहाणींत साध्या व भाषणांत सरळ अशा व्यक्तीनें केलेलें आदरातिथ्य पैशानें सधन, राहणींत अमीरी व भाषणांत दरबारी अशा व्यक्तीनें केलेल्या आदरातिथ्याइतकें चट्कन् डोळ्यांत भरत नाहीं. परंतु तेवढ्यानें एक निकृष्ट व दुसरें उत्कृष्ट ठरत नाहीं. ज्याप्रमाणें दानामध्यें धनराशीपेक्षां दानबुद्धीलाच अधिक महत्त्व आहे त्याप्रमाणें आदरातिथ्यामध्यें आडंबरापेक्षां हेतूलाच अधिक महत्त्व आहे. 'तृणानि भूमिरुदकं वाक्चतुर्थी च सूनृता' अशीं सत्काराचीं अगदीं साधीं साधनें मनूनें सांगितलीं आहेत व महाभारतकारांनीं युधिष्ठिराच्या यज्ञांतील मुंगसाच्या कथेमध्यें हेंच तत्त्व प्रतिपादन केलें आहे.

( ९ ) लोकमान्य स्वराज्याच्या चळवळीचे जनक असले तरी त्यांच्या काळीं चळवळीचें लोण म. गांधींच्या काळाइतकें देशव्यापी व खालच्या स्तरापर्यंत पोंचलें नव्हतें. असें असून आम्हांस महाराष्ट्राबाहेरील प्रवासांत लोकमान्यांचें

नांव खेडोपाडीं खेडुतांपर्यंत पोंचल्याचें आढळून आलें—गुणाः कुर्वन्ति दूतत्वं दूरेऽपि वसतां सताम् ।

( १० ) आमच्या मुक्काम करण्याच्या नियमाप्रमाणें शिवणीस लोहमार्गाचें स्थानक असल्यामुळें आम्हीं स्थानकावर पथारी पसरली. तेथें समजलें कीं, स्थानकाधिप पुण्याचे दिवेकर म्हणून महाराष्ट्रीय आहेत. रात्रीं जेवण झाल्यावर आम्ही त्यांना भेटलों. तेव्हां ते ओंकारेश्वराकडील परिचित दिवेकरांपैकीं निघाले. मग काय, रात्रीं १०-११ वाजेपर्यंत आम्ही गप्पा मारीत बसलों. नियमाप्रमाणें आम्हीं पहाटे चाराला पुढचा मार्ग धरला तेव्हां गांवांतून जातांना आरक्षकानें हटकलें व मुसाफीरखान्यांत निजलों नाहीं म्हणून फौजदारसाहेबांकडे नेलें. फौजदारसाहेब झोंपेंतून डोळे चोळीतच उठले. शिपायानें त्यांना आम्हांस आणण्याचें कारण सांगितलें. तेव्हां त्यांना आम्ही कोण, कोठले, कोठें जात आहोंत तें तोंडानें सांगून परिचयपत्र दाखविलें. व श्री. दिवेकरांचा हवालापण दिला. तरी साहेबांनीं 'ह्यांना सकाळपर्यंत मुसाफीरखान्यांत बसवून ठेवा' म्हणून फर्माविलें. तें ऐकतांच 'आम्ही मुसाफीरखान्यांत जाणार नाहीं, आमचा मार्ग चालूं लागूं, तुम्हीं जाऊं दिलें नाहीं व जबरदस्तीनें मुसाफीरखान्यांत नेलेंत तर ह्या बेजबाबदार कृत्याबद्दल पोलीस सुपरिंटेंडेंट व कलेक्टरकडे तक्रार करूं व तुमचा जाब घेऊन पुढें जाऊं. मग याकरितां एक दिवस लागो कीं चार दिवस लागोत.' सगळ्या प्रवासांत आपल्यावरील संशय दूर करण्याकरितां परिचय देण्याचा व परिचयपत्र दाखविण्याचा येवढाच प्रसंग आला. आमचें वरील निर्वाणीचें भाषण ऐकून दोन मिनिटांत स्वारी शिपायास म्हणाली, 'अच्छा, जाने दो' व घरांत गेली. 'धटासी आणावा धट । उद्धटासी उद्धट । खटनटासी खटनट । अगत्यें करी' हेंच खरें.

प्रवासाला निघतांना रोज २५ मैल चालून ज्येष्ठी पौर्णिमेस काशीस पोंचावयाचें असें आम्हीं योजून ठेविलें होतें. परंतु तिसऱ्या जोडीदाराच्या कमकुवतपणामुळें प्रारंभीं चाल कमी पडली व त्याच्या आजारीपणामुळें थोडा खोळंबा झाला. तेव्हां त्याला परत पाठविल्यावर आम्हीं चाल वाढविली व प्रयाग ते काशीचा शेवटचा ८० मैलांचा टप्पा २ दिवसांत उरकून ठरल्याप्रमाणें आम्ही ज्येष्ठी पौर्णिमेस सकाळीं काशीस पोंचलों.

काशीस आम्ही ६ दिवस होतों. तेवढ्या अवधीमध्यें आम्हीं तेथील सर्व प्रेक्षणीय व दर्शनीय स्थळें बघितलीं. एक दिवस सारनाथास गेलों व एक दिवस हिंदु विश्वविद्यालय हिंडलों. तें नुकतेंच स्थापन झालें होतें व बांधकामें जोरांत चाललीं होतीं. पं. मालवीयांचा संबंध, उत्तम नगररचना, प्रशांत वातावरण इत्यादि बघून लेखकाच्या मनामध्यें विश्वविद्यालयाची सेवा करून काशीवास करावा अशी उत्कट अभिलाषा उत्पन्न झाली.

काशीनंतर गयेस जाऊन त्रिस्थळीं यात्रा पुरी करण्याचा आमचा विचार होता. परंतु त्याच सुमारास गांवच्या मंडळींबरोबर लेखकाची चुलती यात्रेस निघून काशींत आल्यावर आजारी पडली होती. लेखकास पत्ता लागल्यावर तो तिला भेटला व घरीं जाण्याबद्दल तिनें विशेष आग्रह केल्यामुळें तो तिला घेऊन परतला. ह्या चुलतीचा लेखकाला लहानपणीं आईसारखा लळा होता व तिचें पण त्याच्यावर आपल्या मुलासारखें प्रेम होतें. आणि विचित्र योग असा कीं, ती वाटेंत गाडीमध्यें एकाएकीं वारल्यामुळें नाशकास उतरून त्याला तिचा अग्निसंस्कार करावा लागला व घरीं आल्यावर पहातो तों मुलगा (श्री. दत्तात्रेय केशव घाणेकर) नवज्वरानें आजारी असल्यामुळें उत्तरक्रिया पण त्याच्याच वांट्याला आली.

पुढें लेखकानें डॉक्टरी शिक्षण घेण्याचें ठरवून मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें प्रवेश मिळविला व १९२५ सालीं एम्. बी., बी. एस्. होऊन तो आपल्या जन्मभूमि राजुरी गांवीं चिकित्सेचा व्यवसाय करूं लागला. तीन वर्षांनंतर एका रात्रीं त्याला विश्वविद्यालयांत नोकरी मिळाल्याचें स्वप्न दिसलें. तेव्हां काशीस पायीं गेल्या वेळीं काशीवास करून विश्वविद्यालयाची सेवा करण्याच्या मनांत उत्पन्न झालेल्या अभिलाषेचें त्यास स्मरण झालें. त्याजबरोबर ती अभिलाषा निःस्वार्थबुद्धीनें व भक्तियुक्त अंतःकरणानें उत्पन्न झालेली असल्यामुळें 'भक्त्योपपन्नेषु हि तद्विधानां प्रसादचिन्हानि पुरः फलानि' ह्या कालिदासोक्तीच्या आधारावर दिसलेलें स्वप्न हें विश्वविद्यालयांत मिळणाऱ्या नोकरीचें प्रसादचिन्ह आहे असें त्याच्या मनानें पक्कें घेतलें व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्यानंतर थोड्याच दिवसांत महामना मालवीयजींच्याकडून वैद्यपंचानन श्री. कवडेशास्त्री यांच्याकडे खालील तार धडकली—

Benares Hindu University Date hour min.
Vaidya Krishnasastri Kavade, 1 11 30
Sadashiv Peth Poona.
Please request Ghanekar come for interview
– Malaviya

त्यांच्या इच्छेप्रमाणें लेखक काशीस त्यांच्या भेटीस गेला व त्या भेटींत त्यांचा संतोष झाल्यामुळें आयुर्वेदविद्यालयामध्यें त्यांनीं तत्काळ त्याची नेमणूक केली. नोकरीच्या काळांत लेखकास मानधनाच्या दृष्टीनें उच्च अशीं अनेक स्थानें मिळत होतीं. परंतु काशी व हिंदु विश्वविद्यालय यांच्यावरील निःस्वार्थ-प्रेमामुळें त्यानें त्यांच्याकडे ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं व जवळजवळ तीस वर्षें विश्वविद्यालयाची एकनिष्ठपणें सेवा करून तो १९५७ सालीं सेवानिवृत्त झाला व ५८ सालीं आपल्या मायदेशीं परत आला.

---

# द्वितीय प्रकरण

## नगरी - नागरिक - जलवायुदर्शन

**मरणं मंगलं यत्र विभूतिश्च विभूषणम् ।**
**कौपीनं यत्र कौशेयं सा काशी केन मीयते ॥**

—भोजप्रबंध

काशी ही जगांतील सर्वांत प्राचीन नगरी नसली तरी सर्वांत प्राचीन नगरींपैकीं एक आहे, येवढेंच नव्हे तर मध्यंतरींच्या मुसलमानी अमदानीच्या व स्वाऱ्यांच्या काळांत तिच्यावर अनेक आपत्ति आल्या असतांनासुद्धां बुद्धांच्या तीर्थक्षेत्र-विद्यापीठांप्रमाणें नष्ट न होतां तिनें आपलें केवळ अस्तित्वच नव्हे तर वैभव सुद्धां टिकवून धरलेलें आहे. असें असलें तरी प्राचीन काळापासून आतांपर्यंत ती एकाच वास्तूवर टिकून आहे असें मात्र नव्हे. संशोधकांचें असें म्हणणें

आहे कीं, एके काळीं काशी वरुणेच्या पलीकडे गोमतीच्या तटावर होती. तेथून सरकत सरकत ती वरुणा व अस्सी यांच्यामध्यें येऊन वाराणशी बनली. ह्याला सुद्धां शेकडों वर्षें झालीं. ह्या वास्तूवर पूर्वीपासून स्मशानवासी शंकराचें वास्तव्य होतें. व तिचा उपयोग कित्येक मैल दूर असलेल्या काशीस तसेंच अन्य स्थानांस स्मशानासारखा होत होता. काशीच्या धर्मसंकल्पामध्यें केवळ काशी-क्षेत्रे' असा शब्दप्रयोग नसून 'काशीक्षेत्रे महास्मशाने' असा शब्दप्रयोग आहे. हा प्रयोग बहुधा काशीनगरी महास्मशानामध्यें येऊन बसल्यापासून प्रारंभ झाला असावा असें मानण्यास हरकत नाहीं. काशीचा व विश्वनाथाचा घनिष्ठ संबंध काशी 'वाराणशी' बनल्यापासूनचा असावा असें शंकराच्या स्तोत्रांतील 'वाराणस्यां तु विश्वेशं', 'वाराणसीपुरपति भज विश्वनाथं', 'वाराणसीपुरपते मणिकर्णिकेश' अशांसारख्या वचनांवरून म्हणावेंसें वाटतें.

काशी वरुणेपासून अस्सीपर्यंत तीनचार मैल गंगेच्या उत्तर तटावर बसलेली आहे. हिंदु विश्वविद्यालय स्थापन झाल्यानंतर ती अस्सीच्या पलीकडे वाढत जाऊन विश्वविद्यालयाला भिडली. गंगेच्या ज्या तटांवर काशी वसली आहे तो चुनखडीचा मजबूत व चांगला उंच असा आहे. त्यामुळें गंगेनें समोरच्या तटावर व आसपासच्या भागावर जलप्रलय मांडला तरी काशीवर त्याचा कांहींच परिणाम होण्यासारखा नाहीं. १९४८ सालीं गंगेस महापूर आला होता. असा पूर ७५ वर्षांपूर्वी आला होता असें कांहीं लेखांवरून व वृद्धांच्या आठवणीवरून सिद्ध झालें. त्या वेळीं आसपास पाण्याचा वेढा पडला होता, पण जुनी काशी पूर्ण सुरक्षित होती. वास्तु बदलण्याची राजकीय किंवा अन्य कारणें असतील, परंतु मधूनमधून येणाऱ्या महापुराची आपत्ति पूर्वीच्या वास्तु बदलण्याचें व हल्लींच्या भक्कम व उंच वास्तूवर येण्याचें एक कारण असलें पाहिजे असें गंगाकांठचा विचार करतां म्हटल्याशिवाय रहावत नाहीं.

वारणशीची वास्तु पूर्वी अनेक लहानमोठ्या पवित्र जलाशयांनीं व्याप्त होती. काशीनगरी तेथं येऊन बसल्यानंतर तिच्या वाढीबरोबर यांपैकीं अनेक जलाशय भरले जाऊन त्या जागीं वस्ती झाली. जैसें, मत्स्योदरी तीर्थाचा 'मछोदरी मोहल्ला', मन्दाकिनीचा 'मैदागिन', बुलानाल्याचा 'बुलानाला', अस्थिनिक्षेप तडागाचा 'हड्डा' मोहल्ला, गोदावरी तीर्थाचा 'गोदोलिया', सागरचा 'सिगरा', ब्रह्मनाल्याचा 'ब्रह्मनाल' मोहल्ला इत्यादि. असें असलें तरी

ज्ञानवापी, अगस्त्यकुण्ड, लक्ष्मीकुंड, सूर्यकुंड, मणिकर्णिका, लोलार्क, कुरुक्षेत्र, पिशाचमोचन, बकरिया इत्यादि अनेक तीर्थें व कुण्डें अजून राहिलीं आहेत.

## नगररचना

काशीनगरीचे जुनी व नवी वस्ती असे दोन विभाग करतां येतील. नवी म्हणजे नवीन पद्धतीनें आंखलेली नसून जुन्या वस्तीच्या बाहेर वाढलेली येवढाच त्याचा अर्थ आहे. सुधारणेची आवश्यकता दोन्हींना आहे. काशीमध्यें सध्यां शहरसुधारणासमिति स्थापन झाली आहे. तिनें नव्या वस्तींतील रस्तारुंदीचें काम जोरांत सुरू केलें आहे. विश्वविद्यालयासमोरील रस्ता एके काळीं १० फूट होता तो आतां ८० फूट रुंद व दुहेरी केला गेला आहे, यावरून तिच्या कामाची कल्पना येईल. जुन्या वस्तीला अजून हात लागला नाहीं व कधीं काळीं लागेल का नाहीं सांगतां येत नाहीं. ही जुनी वस्ती राजघाटापासून मछोदरी, बिसेसर गंज, मैदागिन, चौक, गोदोलिया, सोनारपुरा, भदैनीवरून अस्सी घाटाकडे जाणाऱ्या सडकेच्या व गंगेच्या मध्यें आहे. काशींतील मुख्य घाट, देवतांचीं मंदिरें, तीर्थें, उपाध्यायांची वस्ती हे सर्व ह्या जुन्या वस्तीमध्यें आहेत. त्यामुळें काशीक्षेत्राच्या दृष्टीनें हाच भाग सर्वांत महत्त्वाचा आहे. कांहीं जुना भाग वरील रेषेच्या बाहेर आहे, पण तो वरील कारणामुळें महत्त्वाचा नाहीं. इतर शहरांत जुनी वस्ती असली तरी तिची सर काशीच्या जुन्या वस्तीस येणें शक्य नाहीं. म्हणून नगररचनेच्या वर्णनांत तिचाच प्रामुख्यानें विचार केला आहे.

**रस्ते**— वाल्मीकि रामायणांत 'सुविभक्त महापथा। राजमार्गेण महता सुविभक्तेन शोभिता' असें अयोध्यानगरीच्या रस्त्यांचें वर्णन आहे. या बाबतीमध्यें ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट म्हणजे तेथील केवळ राजमार्गच नव्हे तर इतर मार्गसुद्धां सुविभक्त म्हणजे आंखलेले व रुंद होते ही होय. भारत वर्षांतील कांहीं जुन्या नगरींतून राजवाड्याच्या, देवस्थानाच्या ( जसें, विजयानगर येथील हंपी विरूपाक्ष मंदिराच्या )समोरील किंवा बाजारांतील एक रस्ता भरपूर रुंद ठेवलेला आढळून येतो, पण इतर रस्ते तसे नसतात. काशी अयोध्येसारखी प्राचीन नगरी असली तरी धर्मांध मुसलमानांनीं तिचा अनेक वेळां विध्वंस केल्यामुळें तिच्या त्या वेळेच्या मार्गरचनेबद्दल कांहींच लिहितां

येत नाहीं. सध्यां तरी इतके निरुंद व वेडेवांकडे रस्ते असलेली येवढी मोठी वस्ती भारतवर्षांत अन्यत्र नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. एक लठ्ठ सांड किंवा दोन माणसें शेजारीं शेजारीं चालली तर त्यांच्याजवळून पुढें जाणें कठीण होईल अशा स्वरूपाच्या निरुंद बोळकुंड्यांचा जुनी काशी म्हणजे भला मोठा चक्रव्यूहच आहे. यात्रेकरू किंवा नवीन मनुष्य एकदां त्यांत सांपडला कीं त्याला त्यांतून बाहेर पडणें किंवा घर गांठणें प्रथम तरी जवळजवळ अशक्यप्राय म्हणून समजावें.

**वाडे** :— बोळ अत्यंत निरुंद असले तरी दोन्ही बाजूंचे वाडे चिरेबंदी, प्रायः तीनचार मजली क्वचित् पांच मजली उंच, भव्य व प्रशस्त असे आहेत. रस्ते निरुंद, वाडे उंच व एकमेकांस लागलेले, त्यामुळें आंत प्रकाश यावा व हवा खेळावी म्हणून वाड्यांमधून एक क्वचित् दोन चौक ठेवलेले आहेत. काशींत उन्हाळा फार त्याचा त्रास कमी व्हावा म्हणून बहुधा प्रत्येक वाड्यावर रात्रीं निजण्याकरितां खुलें छत असतें. जेथें समोरासमोरचे वाडे एकाच्या मालकीचे आहेत तेथें एका वाड्यांतून दुसऱ्या वाड्यांत जाण्याकरितां दुसऱ्या–तिसऱ्या मजल्यावर सज्जेपण केलेले आहेत.

दिल्ली हिंदुस्थानची राजधानी असल्यामुळें ज्याप्रमाणें संपूर्ण हिंदुस्थानांतील अनेक राजेरजवाड्यांनीं राजकारण करण्याकरितां तेथें आपापले वाडे बांधले त्याप्रमाणें काशी हिंदुस्थानची धार्मिक राजधानी असल्यामुळें धर्मकारण करण्याकरितां पूर्वींच्या राजेरजवाड्यांनीं तेथें आपले वाडे बांधून ठेवले आहेत. याशिवाय धर्मकृत्यांच्या रूपानें त्यांनीं बांधलेल्या घाट, मंदिरें, धर्मशाळा, अन्नछत्रें इत्यादि वास्तु पण तेथें आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काशी-नगरीचें वैभव पूर्वींच्या हिंदु राजेरजवाड्यांच्या धार्मिक मनोवृत्तीचें दृश्यरूप आहे.

घनदाट वस्ती व निरुंद रस्ते यांमुळें रस्त्यावर पुष्कळ ठिकाणीं केरकचऱ्याची घाण पडलेली असते. याशिवाय कोठें कोठें दगड तर कोठें कोठें फरश्या तुटल्या-मुळें उघड्या मोऱ्या पण असतात. हिंडतां फिरतांना खालीं लक्ष न दिल्यास घाणींतून चालण्याचा किंवा घसरण्याचा, दगडाला ठोकर लागण्याचा किंवा पडण्याचा व मोरींत जाण्याचा किंवा पाय मुरगळण्याचा प्रसंग येतो. बोळांतून हिंडतांना केवळ खालींच लक्ष देऊन भागत नाहीं. कारण कधीं कधीं वरून डोक्या-वर सुद्धां केरकचरा पडण्याचा संभव असतो. या बाबतीमध्यें लेखकाला विद्यार्थि-

दर्शेतील चर्नी रोडवरून गोरेगांवकरांच्या चाळीकडे जाणाऱ्या बोळाची आठवण होत असे. तेथें कधीं कधीं कचऱ्याच्या जोडीला सडकीं अंडींसुद्धां येऊन पडत.

वरीलसारखे कांहीं दोष असले तरी काशीच्या बोळांत कांहीं गुण पण दृष्टीस पडतात. त्यांच्यामध्यें सर्वत्र फरशी आहे. यामुळें उन्हाळ्यांत धूळ व पावसाळ्यांत चिखल यांपैकीं तेथें कशाचाच त्रास होत नाहीं. रस्त्यांत थोडा-फार केरकचरा असला तरी शेतखान्यांची दुर्गंधि व घाण त्याचप्रमाणें मैल्याच्या पाट्या डोक्यावरून नेत असल्याचें घृणित दृश्य हींपण तेथें आढळत नाहींत. काशींत फार पूर्वींपासून पाण्याचे शेतखाने आहेत म्हणजे घरांतल्या सांडपाण्यानें शेतखान्यांतील मैला वाहून नेण्याची तेथें प्रत्येक घरांत व्यवस्था केलेली आहे. यामुळें काशीच्या वाड्यांतून प्रत्येक मजल्यावर शेतखाने आहेत. ही व्यवस्था किती प्राचीन आहे हें जरी सांगतां आलें नाहीं तरी अशी व्यवस्था असलेलें काशी हें हिंदुस्थानांतलें पहिलें नगर आहे असें म्हणण्याइतकी ती व्यवस्था प्राचीन आहे. उत्तर हिंदुस्थानांत उन्हाळ्यामध्यें ऊन फार कडक असतें, घरें व रस्ते तापतात, कढत वारे चालतात व झळ (लू) लागण्याची भीति असते, त्यामुळें दुपारीं घराबाहेर निघून व्यवहार करूं नये असें वाटतें. काशीच्या जुन्या वस्तीच्या बोळांत ऊन लागत नाहीं, वाडे व रस्ते तापत नाहींत, तसेंच कढत वारे वाहात नाहींत. त्यामुळें मोठ्या रस्त्यांवरून बोळांत शिरलें कीं हायसें वाटतें व भर दुपारीं सर्व व्यवहार उन्हाळ्याचा कोणताच त्रास न होतां सुखानें करतां येतो.

## काशींतील घाट

आपल्याकडे नदीवर स्नान करण्याचा रिवाज असल्यामुळें बहुधा प्रत्येक नदीवर एखादा तरी घाट असतोच. पवित्र मानल्या गेलेल्या नद्यांवर अधिक लोक स्नानास जात असल्यामुळें अधिक घाट दृष्टीस पडतात. गंगा ही सर्वांत अधिक पवित्र नदी व तिच्या कांठीं फार मोठमोठीं नगरें. त्यामुळें तिच्यावर सर्वांत अधिक घाट असावयास पाहिजेत. परंतु बदलता प्रवाह व धर नसलेला तट त्यामुळें वस्तुस्थिति अगदीं उलट आहे. प्रयाग तीर्थराज असल्यामुळें तेथें सर्वांत अधिक लोक स्नान करतात. पण वरील कारणामुळें तेथें एकहि पक्का घाट नाहीं. काशी मात्र अपवाद आहे. तेथें गंगेस फार मोठा डोह आहे.

पाणी भरपूर आहे, पात्र व प्रवाह प्रशस्त नि प्रशान्त आहे, तसेंच तटाला घर आहे. त्यामुळें तेथें एकदोन नाहीं तर पन्नासपाऊणशें पक्के बांधलेले व प्रवाह स्थिर असल्यामुळें सदैव स्नानास उपयोगी पडणारे घाट आहेत. यांच्या योगानें काशीनगरीच्या वास्तूची पुरी किल्लेबंदी म्हणजे रक्षणाची व्यवस्था झाली आहे. काशीस गंगेचा किनारा चंद्रकोरीप्रमाणें वळणदार आहे. त्यामुळें गंगेचा प्रवाह घाटांच्या पायांना किंवा धरांना हळूहळू पोखरीत किंवा खात असतो. तेणेंकरून हे घाट पुष्कळ वर्षांनीं धर पोकळ झाल्यानें मोडकळीस येतात व पडतात. सध्यां काशीच्या घाटांपैकीं अनेक घाट पार पडून गेले आहेत व अनेक मोडकळीस आले आहेत ते याच कारणानें. तरीसुद्धां अजून अनेक घाट व त्यांवरील प्रासादतुल्य इमारती चांगल्या स्थितीमध्यें आहेत. परंतु येवढयावर संतोष करतां येत नाहीं. कारण पडलेल्या घाटांपासून चांगल्या घाटांना व त्याजबरोबर काशीच्या वास्तूला धोका आहे. काशीच्या संपूर्ण घाटांची किल्लेबंदी अक्षुण्ण ठेवणें हें काशीनगरीच्या शोभेच्या दृष्टीनें जसें इष्ट आहे तसें काशीच्या वास्तूच्या रक्षणाच्या दृष्टीनें अत्यावश्यक आहे. पूर्वी राजे-रजवाडे, जमीनदार नवीन घाट बांधीत व जुन्यांचा जीर्णोद्धार करीत आले. त्यामुळें काशीची वास्तु आजपर्यंत टिकून राहिली. आतां ते नष्ट झाल्यामुळें हें काम होणें शक्य नाहीं हें सरकारच्या लक्षांत आल्यानें सरकारनें हीं कामें, तसेंच सर्वच घाटांची प्रवाहाच्या पोखरण्यापासून रक्षा करणें यांची योजना करून कामास प्रारंभ केला आहे.

प्रशस्तपणा, पायऱ्यांचा प्रमाणबद्ध चढाव, पार्श्वभूमीला सुंदर मंदिरें व भवनें हीं काशीच्या घाटांची शोभा वाढविण्याचीं कारणें आहेत. भारतवर्षांत अनेक नद्यांच्यावर घाट बांधलेले आहेत. परंतु महेश्वरचा देवी अहल्याबाईचा, हुशंगाबादचा शेठजीचा अशासारखे कांहीं एकटे दुकटे घाट सोडले तर काशींतील घाटांसारखे पुष्कळ, प्रशस्त व प्रेक्षणीय घाट जगांत अन्यत्र कोठेंहि दृष्टीस पडत नाहींत. म्हणून त्यांना आन्तरराष्ट्रीय ख्याति प्राप्त झाली आहे. घाटांच्या जीर्णोद्धाराकडे सरकारचें लक्ष जाण्याचें हेंच मुख्य कारण आहे.

**घाटांचें दृश्य** — घाटांची किल्लेबंदी ही केवळ काशीलाच नव्हे तर भारताला ललामभूत झालेली वास्तु आहे. सध्यां तिचे कांहीं दगड पडलेले व कांहीं

खिळखिळे झालेले असले तरी तिच्या एकंदर स्वरूपांत फारसें अंतर पडलेलें नाहीं. तिच्या मागील बाजूचे भव्य प्रासाद, सुंदर मंदिरें, त्यांचे सोनेरी कळस, घाटावरील घाट्यांच्या चौक्या व त्यावरील उन्हापासून रक्षण करण्याकरितां उभारलेल्या अजस्र छत्र्या, घाटावर स्नानाकरितां जमलेले, गंगेंत स्नान करीत असलेले व गंगेवरील लांकडी मंचावर संध्याजपजाप्य करीत बसलेले असंख्य भाविकजन, गंगेंत यात्रेकरूंना घेऊन सुरकुंड्या मारणाऱ्या असंख्य नावा या सर्वांचें सूर्योदयाचे वेळीं सूर्यनारायणाच्या कोमल किरणांत दिसणारें दृश्य कांहीं और आहे. काशीमध्यें गंगा वळण घेऊन वाहात असल्यामुळें घाटांची किल्लेबंदी अर्धचन्द्राकार बनली आहे. या योगानें सुद्धां तिची शोभा वाढली आहे. स्नानपर्वाच्या प्रसंगीं ही शोभा आणखी अनेक पटींनीं वाढते. काशींतील लौकिक दृष्ट्या प्रेक्षणीय स्थानांमध्यें घाट हें प्रथम स्थान आहे. त्याची बघण्याची मजा नावेंतून असल्यामुळें तेथें जाणारानें नावपर्यटन करण्यास चुकूं नये. सूर्योदयाप्रमाणें चांदण्यांतसुद्धां घाट बघण्याची मजा असते. हिंदु विश्वविद्यालयाचे प्र-उपकुलपति स्वर्गवासी डॉ. ध्रुव यांना चांदण्याची सफर फार प्रिय होती. ते प्रतिवर्षं चैत्री पौर्णिमेच्या सुमारास आपल्या सहयोग्यांना घेऊन नावपर्यटन करण्यास चुकत नसत. तेव्हां हौशी लोकांनीं तें पण करावें. परदेशचे लोक काशीस आले कीं गंगेंतून नावपर्यटन करणें व नावेंतून घाटांचीं छायाचित्रें घेणें हा त्यांचा अत्यंत आवडीचा कार्यक्रम असतो.

**दशाश्वमेध घाट**— ह्या घाटावर येण्यास उत्तमपैकीं रुंद असा रस्ता आहे. ह्या ठिकाणीं ब्रह्मदेवानें दहा अश्वमेध केले म्हणून याला दशाश्वमेध नांव पडलें. धार्मिक दृष्ट्या सर्वश्रेष्ठ घाटांपैकीं हा एक आहे. पंचतीर्थीपैकीं एक श्राद्ध या घाटावर करतात. गंगास्नानाच्या दृष्टीनें सुद्धां हा घाट श्रेष्ठ मानला जातो. त्यामुळें नेहमींच इतर घाटांपेक्षां ह्या घाटावर स्नानाला अधिक गर्दी असते. स्नानपर्वाच्या वेळीं तर ह्यावर तोबा गर्दी असते. ह्या घाटाच्या वरच्या बाजूस दशाश्वमेधेश्वराचें सुंदर मंदिर आहे. नवविवाहित वधुवरांची गंगाभेट, मुलांचीं जावळें अशासारखे धार्मिक संस्कार वाजंत्रीं लावून ह्या घाटावर नेहमीं होत असतात. विजया दशमीस दुर्गेची प्रचंड मिरवणूक विसर्जनाकरितां याच घाटावर येते. येथें नेहमींच रात्रीं बाराएक वाजेपर्यंत कथा, प्रवचनें, भजनें चालू असतात. धार्मिक दृष्ट्या ह्या घाटाचें अशा प्रकारचें महत्त्व असल्यामुळें स्वर्गीय

महामना मालवीयजींनीं अस्पृश्यांना मंत्रदीक्षा देण्याचें काम ह्याच घाटावर केलें. आधुनिक, विविध राजकीय व सामाजिक पक्षोपपक्षांनीं पण हा घाट आपला आखाडा बनविला आहे. त्यामुळें त्यांचीं पण व्याख्यानें मधून मधून होत असतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काशींत अनेक घाट असले तरी ह्या घाटाची सर दुसऱ्या कोणासच येण्यासारखी नाहीं. म्हणून याला घाटांचा राजा म्हणावयास हरकत नाहीं.

**शीतला घाट** — दशाश्वमेधाच्या दक्षिणेस त्याला लागूनच हा घाट आहे, त्यामुळें धार्मिक, सामाजिक, राजकीय दृष्टीनें वर दशाश्वमेधासंबंधीं जें लिहिलें आहे तें अंशतः याला पण लागू आहे. ह्या घाटावर शीतला देवीचें मंदिर आहे, म्हणून यास शीतला घाट म्हणतात. दुर्गा घाटाच्या पलीकडे पण दुसरा शीतला घाट आहे. मुलांना देवी, गोवर, कांजिण्यांसारखे रोग झाले कीं स्त्रिया वाजत गाजत, गाणीं म्हणत या देवीच्या पूजेस येतात. व मुलें बरीं झालीं कीं, त्यांना पायां पडण्यास आणतात. त्यामुळें ह्या मंदिरामध्यें स्त्रियांचीच गर्दी जास्त असते. पण या घाटाची विशेषता स्त्रियांच्या स्नानाच्या दृष्टीनें आहे. उत्तर हिंदुस्थानांत नद्यांच्यावर स्त्रियांकरितां स्वतंत्र घाट राखून ठेवण्याची रीति आहे व मोकळेपणानें स्नान करण्याच्या दृष्टीनें ती पद्धति उचित आहे. काशींत इतके अधिक घाट असले तरी स्त्रियांकरितां एकही घाट राखून ठेवलेला नाहीं. ही उणीव दूर करण्याकरितां बिर्ला शेटजींनीं नावेवर चारी बाजूंनीं बंद व वरून उघडें असें तरंगतें पत्र्याचें स्नानगृह तयार करून ह्या-वर लावून ठेवलें आहे. मिश्र समाजांत उघड्यावर स्नान करणें ज्या स्त्रियांना उचित वाटत नसेल त्यांनीं काशींत ह्या सोयीचा फायदा घ्यावा. लेखक यामुळें दूर पडत असतांना सुद्धां स्नानाकरितां मंडळींना या घाटावर घेऊन येत असे.

**मणिकर्णिका घाट** — हा काशींतला सर्वांत पवित्र घाट आहे. ह्यावर मणिकर्णिका कुण्ड आहे. हें विष्णूनें आपल्या चक्रानें तयार केलें, म्हणून यास 'चक्रपुष्करणी' असें नांव पडलें. पुढें यामध्यें शंकराच्या कानांतला मणि पडला. त्यामुळें 'मणिकर्णिका' असें म्हणूं लागले व तेंच नांव अधिक प्रचालित झालें. ह्या कुण्डाला जिवंत झरा नाहीं. परंतु कुण्डांत स्नान करणें गंगास्नाना-पेक्षां अधिक पवित्र मानलें जात असल्यामुळें ह्यामध्यें यात्रेकरूंची स्नानाची गर्दी असते. घाटाच्या खालीं गंगेंत अर्धवट बुडलेलें असं तारकेश्वराचें मंदिर आहे.

काशींत प्राणोत्क्रमणाचे वेळीं कानांत मंत्र सांगणारे हेच ते तारकेश्वर महादेव. पंचतीर्थींपैकीं एक श्राद्ध या घाटावर केलें जातें.

**मानमंदिर घाट**—राजा मानसिंगानें बांधलेला हा घाट दशाश्वमेधाजवळच आहे. ह्या घाटावर सवाई जयसिंहानें बांधलेली वेधशाळा आहे. हिलाच 'जंतरमंतर' म्हणतात. वेध घेण्याकरितां ह्या वेधशाळेंत भित्तियन्त्र, चक्रयन्त्र, दिगंशयन्त्र, सम्राटयन्त्र इत्यादि अनेक यंत्रें तयार केलेलीं आहेत. हीं सर्व यन्त्रें दगड-चुन्याचीं आहेत हें ध्यानांत धरण्यासारखें आहे असें असून सुद्धां ज्या काळीं ही वेधशाळा बांधली गेली त्या काळीं येथील वेध युरोपमधील कोणत्याही वेधशाळेंतल्या वेधापेक्षां अधिक सूक्ष्म असत असें म्हणतात—'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे'. त्यानें दिल्ली, मथुरा, जयपूर व उज्जैन येथें अशाच वेधशाळा बांधल्या आहेत.

**पंचगंगा घाट**—ह्या घाटापाशीं किरण, सरस्वति, यमुना व धूतपाप अशा चार नद्या गंगेस येऊन मिळाल्या आहेत अशी कल्पना आहे, म्हणून यास पंचगंगा घाट म्हणतात. काशींतील उंच व चढण्यास कठीण घाटांपैकीं हा एक घाट आहे. पंचतीर्थींपैकीं एक श्राद्ध येथें करतात. ह्या घाटावर कार्तिक महिन्यांत आकाशदिवे लावण्याची पद्धति आहे. त्यामुळें शेंकडों आकाशदिवे टांगल्याचें दृश्य येथें दृष्टीस पडतें. याच घाटावर जगन्नाथ पंडितांनीं गंगालहरी रचून गंगेला प्रसन्न केलें व गंगेनें यवनपत्नीसह त्यांना पुनीत करून आपणांत विलीन करून घेतलें अशी आख्यायिका आहे. जगन्नाथ पंडितांनीं गंगालहरी रचली ही गोष्ट खरी आहे, परंतु त्यांनीं यवन स्त्रीशीं लग्न केलें व पुढें पश्चात्तापदग्ध होऊन त्यांनीं यवनपत्नी घेऊन ह्या घाटावर गंगालहरी रचली ह्या सर्व आख्यायिका आहेत असें विद्वानांचें मत आहे.

**स्मशान घाट**—वाराणशीचे उत्तरेकडील ओंकारेश्वर, दक्षिणेकडील केदारेश्वर व मधले विश्वेश्वर असे तीन खण्ड कल्पिलेले आहेत. काशीचें महास्मशान हें विश्वेश्वर खण्डांतल्या फार मोठ्या भूभागावर पसरलेलें होतें. त्याची खालची मर्यादा गंगा व वरची मर्यादा चौकांतील भादोमल कोठीच्या जवळील स्मशानविनायक असें म्हणावयास हरकत नाहीं. हरिश्चन्द्राची पौराणिक घटना याच स्मशानावर झाली. त्याच्या स्मरणार्थ हरिश्चन्द्रेश्वरलिंग ह्याच भूभागांत आहे.

'महास्मशानदग्धानां पुनर्जन्म न विद्यते' हें कथन ह्या स्मशानांत दहन झालेल्यांनाच लागू आहे. पुढें काशीनगरी ह्या भूमागांत वाढत चालली तेव्हां मुसलमानी अमदानींत स्मशान ह्या भूमागांतून पलीकडील निर्जन अशा केदारखण्डांत केदारेश्वराच्या पलीकडे गंगातटाकीं हलविण्यांत आलें. हें नवीन स्मशान लोकप्रिय व्हावें म्हणून केदारखण्डांत मरण आल्यास यमयातना भोगाव्या लागत नाहींत अशा तऱ्हेची कल्पना पोथ्यांच्यामधून जनतेमध्यें प्रसृत केली गेली व स्मशानांत हरिश्चन्द्रेश्वरलिंग व हरिश्चन्द्राची मूर्ति स्थापून त्याचें मंदिर बांधण्यांत आलें. हें स्मशान 'हरिश्चन्द्र घाट' म्हणून प्रसिद्ध आहे.

**हरिश्चंद्र घाट**—हा घाट दशाश्वमेध व अस्सी यांच्यामध्यें आहे. घाटावर येण्यास चांगली सडक आहे. घाट कच्चाच आहे. घाटाचें नांव हरिश्चंद्र व घाटावर हरिश्चन्द्राचें मंदिर असलें तरी हरिश्चन्द्राचा ह्या घाटाशीं कांहीं संबंध नाहीं. मात्र हरिश्चन्द्र ज्या डोंबाला विकला होता त्याचे आम्ही सरळ वंशज आहोंत असें जें येथील डोंब म्हणतो तें खरें मानण्यास हरकत नाहीं. ज्या वेळीं काशींत हीच एक स्मशानभूमि होती त्या वेळची गोष्ट सोडली तर मणिकर्णिकेजवळील खालीं वर्णन केलेली दुसरी स्मशानभूमि झाल्यानंतर ह्या स्मशानाची लोकप्रियता कमी झाली व येथें केवळ गरीब व कमी भाविक लोकच प्रेतें आणावयास लागले. त्यामुळें येथें प्रेतांची रांग लागत नाहीं व चितांचा नन्दादीप जळत नाहीं.

**जलशायी घाट**— १७७५ सालीं लाला काश्मीरीमल नांवाचा अयोध्येच्या नबाबाचा एक मोठा अधिकारी आपल्या म्हाताऱ्या आईला घेऊन काशीस आला. आई वारल्यानंतर हरिश्चन्द्र घाटावर तो आईच्या अग्निसंस्काराकरितां गेला असतांना तेथें त्याची घाटाच्या डोंबाशीं बाचाबाची झाली. काशींत स्मशानावर डोंबाचा अधिकार असतो. तेव्हां त्यानें मणिकर्णिका घाटाशेजारीं दहनाकरितां जागा विकत घेऊन तेथें तिचा अग्निसंस्कार केला व आणखी जागा घेऊन सर्वांकरितांच स्मशान बनविलें. तेव्हांपासून हें दुसरें स्मशान तयार झालें. ह्यालाच 'मणिकर्णिका घाट' म्हणतात. पण तें चूक आहे. हें स्मशान पुन्हां पूर्वीच्या महास्मशानाच्या सीमेमध्यें बनल्यामुळें साहजिकच हरिश्चन्द्रापेक्षां लोकप्रिय झालें. तेथें केवळ काशींतीलच नव्हे तर आसपासच्या १०-५ कोसांवरील लोक खांद्यावरून, उंटावरून, रिक्शांतून, एक्क्यावरून, नावेंतून प्रेतें आणून जाळतात.

त्यामुळें तेथें प्रेत जळत नाहीं असा एकही क्षण असूं शकत नाहीं. ही स्मशान-भूमि इतकी आकुंचित आहे कीं, एका वेळीं पांच-सातांपेक्षां अधिक चिता तेथें लागूंच शकत नाहींत व त्याही दोनतीन ठिकाणीं मिळून. त्यामुळें अनेकदां प्रेतांना गंगेंत उभें किंवा बसून नव्हे तर निजून रहावें लागतें. अशा दाटीच्या वेळीं जळत असलेल्या प्रेतांना पूर्णपणें जळण्यास वेळ दिला जात नाहीं व डोंबाकडून अर्धवट जळलेल्या चिता गंगेंत लोटून दिल्या जातात. ही गोष्ट मनाला लागूं नये म्हणून डोंबाची लाथ लागली कीं मुक्ति मिळते अशा प्रकारची लोकांची समजूत करून दिली आहे. पण याला शास्त्रांत आधार नाहीं. ह्या घाटाशेजारीं 'चरण पादुका' म्हणून स्थान आहे. तेथं विष्णूच्या पादुका आहेत. त्याच्याजवळ मोठ्या लोकांचें दहन सरकारी अनुज्ञेनें करतां येतें. पं. मालवीयांचा अग्निसंस्कार तेथेंच केला होता. ह्या घाटास 'जलशायी घाट' म्हणतात.

ही स्मशानभूमि काशीच्या मध्यावर, जवळपास घनदाट वस्ती, जागा अपुरी, प्रेतें जाळण्याची पद्धति वरच्यासारखी, प्रेतांचा धूर चोवीस तास व तो निषिद्ध नि अनारोग्यकर ( बालातपःप्रेतधूमो वर्ज्यः । मनु ). तेव्हां हें स्मशान शहराबाहेर न्यावें अशाबद्दल लोकांनीं ओरड चालविली आहे. पण जनता भाविक व प्रवाहपतित त्यामुळें त्याला अजून यश आलें नाहीं.

**अस्सी घाट** — हा घाट अस्सी-गंगा संगमावर आहे. घाट कच्चाच आहे. पंचतीर्थींपैकीं एक श्राद्ध येथें केलें जातें. घाटावर जाण्यास चांगली सडक आहे. विश्वविद्यालयाला हा घाट जवळचा व सोयीचा पडतो. म्हणून तेथील लोक ह्याच घाटावर बहुधा स्नानास येतात.

**शिवाला घाट** — ह्यालाच चेतसिंग घाट म्हणतात. हा घाट व वरील सुंदर इमारत महाराज बनारसद्वारा बांधली गेली आहे. हा बनारसच्या उत्तम घाटांपैकीं एक घाट आहे. वॉरन हेस्टिंग्जनें ज्या वेळीं चेतसिंहाला या वाड्यांत घेरला त्या वेळीं पागोट्याच्या साहाय्यानें चेतसिंह वरील इमारतीच्या खिडकींतून खालीं घाटावर उतरला व गंगापार करून रामनगरला गेला.

**मुन्शी घाट** — अहिल्याबाईचा घाट बांधणाऱ्या वास्तुविद्याकुशल मुन्शी श्रीधरनें हा घाट बांधला. पुढें ह्याचा कांहीं भाग दरभंगा महाराजांनीं विकत

घेऊन त्यावर अत्यंत उंच, भव्य व सुंदर असा वाडा बांधला. त्यामुळें हा दरभंगा घाट म्हणूनसुद्धां प्रसिद्ध आहे. हा काशींतील अत्युत्तम घाटांपैकीं एक घाट आहे.

**रामनगर घाट**—हा काशीचा घाट नसून काशीनरेशांची काशीपासून दीड मैल गंगापार गंगेच्या तटावर वसलेल्या रामनगर राजधानीचा घाट आहे. तेथें नावेंतून जावें लागतें. सडकेनेंसुद्धां जातां येतें; पण तो फार मोठा वळसा पडतो. घाट प्रशस्त, भव्य व सुंदर आहे. घाटावर मागल्या बाजूस बनारस महाराजांचा प्रशस्त व प्रेक्षणीय राजवाडा आहे. हा घाट व राजवाडा महाराज बलवंतसिंगानें १७५४ त बांधला. वाड्यामध्यें मोठमोठे पुतळे व भिंतींवर मोठमोठीं सुंदर चित्रें आहेत. परवानगी घेऊन हा वाडा बघतां येतो. घाटावर वेदव्यासांची मूर्ति आहे. म्हणून रामनगरास 'व्यासकाशी' पण म्हणतात. पण ही नवी व्यासकाशी आहे. जुनी व्यासकाशी तेथून कोस दीड कोस आहे. किल्ल्यापासून एक मैलावर दुर्गेचें मंदिर आहे. मंदिरासमोर प्रशस्त चारी बाजूंनीं बांधलेला व घाट असलेला असा तलाव आहे. जवळच महाराजांची रामबाग आहे. यामध्यें संगमरवराचा एक मंडप आहे जो पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें मोडून कुठेंही उभा करतां येतो. आश्विनामध्यें या बागेंत काशींतील सर्वांत प्रसिद्ध रामलीला होते. मंदिर, तलाव व बाग सर्वच प्रेक्षणीय आहेत.

रामनगरचा घाट व राजवाडा यांचें दृश्य काशीकडून विशेषतः अस्सीवरून फार चांगलें दिसतें. परंतु रामनगरहून दिसणाऱ्या काशीच्या घाटांची मजा कांहीं और आहे. नावपर्यटन हें काशीनगरीचें वैभव बघण्याचें उत्तम साधन आहे; परंतु रामनगर त्याहीपेक्षां उत्तम आहे. रामनगरचा सुंदर घाट, बनारस महाराजांचा मागील प्रशस्त राजवाडा, घाटासमोरून वाहणारा गंगेचा स्वच्छ प्रवाह (काशीस डोह असल्यामुळें घाटांसमोर पाण्याला प्रवाह नाहीं व घाण सांठलेली) हें बघितलें कीं मन प्रसन्न होतें. त्यांतच समोर अस्सीपासून आगगाडीच्या मालवीय पुलापर्यंत दोनतीन मैल पसरलेलें गंगेचें अर्धचंद्राकार पात्र, त्यावरील घाट, वाडे व मंदिरें दृष्टीस पडलीं कीं समोरील गंगेच्या प्रवाहाची व काशीच्या घाटांची शोभा बघत कांहीं काळ घाटावर बसावें असेंच वाटतें. नावपर्यटनानें जवळून तर रामनगरहून विमानांतून घाटांचें

दृश्य बघण्याचें सौख्य अनुभवतां येतें. तेव्हां काशीस येणारांनीं आपलें नाव-पर्यटन काशीपुरतें मर्यादित न ठेवतां रामनगरपर्यंत भिडवावें व तेथें रामनगरी बघून नंतर तेथून काशीनगरीचें वैभव अवलोकन करावें. काशीस मोगल-सराईहून येतांना किंवा काशीहून मोगलसराईस जातांना मालवीय पुलावरून व त्याच्या थोडेंसें पलीकडून काशीच्या घाटांचें भव्य दृश्य दिसतें. हें दृश्य मध्यम म्हणजे नावेंतून व रामनगर घाटावरून दिसणाऱ्या दृश्याच्या मध्यें बसणारें असें आहे. तेव्हां काशी सोडणाऱ्या यात्रेकरूनें किंवा प्रवाशानें पुलावरून 'गंगामाई'ला पैसा अर्पण करावा, काशीनगरीचें छायाचित्र आपल्या अंतःपटलावर उठवावें व दोघांनाही शेवटचा 'रामराम' करून पुढचा मार्ग धरावा.

## काशींतील मन्दिरें

**विश्वेशं माधवं ढुंढिं दण्डपाणिं च भैरवम्।**
**वन्दे काशीं गुहां गंगां भवानीं मणिकर्णिकाम्॥**


ह्या श्लोकामध्यें तीर्थयात्रेच्या दृष्टीनें मुख्य मुख्य मन्दिरांचा उल्लेख केला आहे. परंतु काशीनगरींत विशेषतः जुन्या वस्तीमध्यें गल्लीकुचींतून, काना-कोपऱ्यांतून, घरादारांतून, घाटावरून जिकडें पहावें तिकडे मंदिरेंच मंदिरें आहेत. एक हजार वर्षांपूर्वीं काशींत निदान एक हजार तरी मंदिरें होतीं (पुढं पहा) असा पुरावा सांपडतो व आज काशींत असलेल्या मंदिरांची संख्या आंकडेशास्त्रज्ञांनीं ५००० वर नेऊन ठेवली आहे.

काशीनगरी प्राचीन असली तरी तिच्यांतील विद्यमान् मंदिरें मात्र प्राचीन नाहींत. कारण हिंदुधर्मद्वेष्टे मुसलमान राजे, बादशाहा, नबाब वेळोवेळीं हिंदु-धर्माच्या ह्या सर्वश्रेष्ठ नगरीवर आक्रमण करून त्या वेळीं विद्यमान् असलेल्या सर्व देवळांचा विध्वंस करीत आले आहेत. काशीवर सर्वप्रथम मुसलमानांचें आक्रमण गझनीच्या महंमदाच्या मुलाचा सेनापति अहंमद नियालतगीन ह्यानें इ. स. १०३३ त केलें. परंतु त्या वेळीं त्यानें मंदिरांचा विध्वंस न करितां केवळ लूटपाट केली. पुढें इ. स. ११९४ त महंमद घोरीच्या सेनापतीनें काशीवर आक्रमण करून लूटपाटीशिवाय हजार मंदिरांचा विध्वंस केला. त्यानंतर अल्लाउद्दीन खिलजी, इब्राहिम लोदी, शिकंदर लोदी, शहाजहान

इत्यादि अनेक मुसलमान राजांनीं मधून मधून बांधल्या जाणाऱ्या मंदिरांची वासलात लावण्याची, मंदिरें बांधूं न देण्याची परंपरा जारी ठेवली ह्या परंपरेंत शेवटचा परंतु सर्वश्रेष्ठ औरंगजेब होता. त्यानें केवळ मंदिरांचा विध्वंस करून संतोष केला नाहीं तर मंदिरविध्वंसाचें शल्य हिंदूंच्या मनांत सतत सलत रहावें म्हणून महत्त्वाच्या मंदिरांच्या जागीं मशिदी ( सन १६६९ ) बांधल्या. त्यांपैकीं विश्वनाथ मंदिराच्या जागेवर बांधलेल्या मशिदीच्या पश्चिमेकडील भिंतीपाशीं तसेंच पुढील पटांगणाच्या खालीं जुन्या मंदिराचे फार मोठे भग्नावशेष तसेच ठेवलेले आहेत. बिंदुमाधवाच्या मंदिराच्या जागेवर बांधलेल्या मशिदीवर शिलालेख आहे. त्यामध्यें ' वेणीमाधवाचें मंदिर आला हजरत औरंगजेबाच्या हुकुमानें तोडलें गेलें व त्याच्या जागीं त्याच्याच मसाल्यानें मशीद बांधली गेली आहे ' असें साफ लिहिलेलें आहे. मंदिरें तोडून जेथें जेथें मशिदी बांधल्या गेल्या तेथें तेथें मंदिरांच्याच मसाल्याचा उपयोग केला गेला आहे हें भारतवर्षांत सर्वत्र दिसून येतें. तें बघून कोणाच्याही मनांत कालवाकालव झाल्याशिवाय रहाणें शक्य नाहीं. काशीवर अयोध्येच्या नबाबाचें राज्य होतें तोंपर्यंत पुन्हां मंदिरें बनूं शकलीं नाहींत. १७२५ त काशी व त्याच्या आसपासचा बराच प्रदेश नबाबाकडून मनसाराम नांवाच्या गृहस्थाकडे जमीनदारीच्या रूपानें आला. वर्तमानकालीन काशीच्या गादीचा हाच संस्थापक होय. ह्याचा मुलगा बळवंतसिंग हा मोठा महत्त्वाकांक्षी होता. नबाबाशीं भांडून तो स्वतंत्र झाला. तेव्हांपासून काशींत मंदिरें बांधण्यास सुरवात झाली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काशींतील सध्यांचें कोणतेंही मंदिर दोनशें वर्षांपेक्षां प्राचीन नाहीं, असें म्हणावयास हरकत नाहीं. काशीचीं मंदिरें जशीं प्राचीन नाहींत तशीं फार मोठींपण नाहींत. मोठीं देवळें नेपाळ, उडीसा व फार मोठीं देवळें मद्रास, केरळ, कर्नाटक, या प्रदेशांमध्यें आहेत. काशींतील प्राचीन देवळें मात्र वर्तमान-कालीन देवळांप्रमाणें छोटीं नसून मद्रासकडील देवळांप्रमाणेंच भव्य, प्रशस्त व उंच होतीं. पुढें विश्वनाथ व बिंदुमाधव मंदिरांचें वर्णन पहा.

काशीचीं मंदिरें खालपासून वरपर्यंत दगडांचीं आहेत. शिखरें गोल नसून चौकोनी आहेत व प्रत्येक बाजूस अनेक पोटशिखरें दाखविलीं आहेत. लहान-मोठ्या सर्व शिखरांवर सुळकेदार कळस असले तरी मुख्य कळस साधारणपणें शंकराच्या देवळांवर त्रिशूळधारी व इतर देवळांवर चक्रधारी असतो. प्रत्येक


चित्र नं. १



देवी श्रीअहिल्याबाईनें बांधलेलें व पंजाबच्या रणजितसिंहानें सोन्याचा पत्रा चढविलेलें श्रीकाशी विश्वनाथाचें मंदिर. पलीकडे नारायणभट्टानें बांधलेल्या विश्वनाथ मंदिरावर औरंगजेबानें उभारलेल्या मशिदीचे घुमट व मनोरे दिसत आहेत.

( पृ. ३३ व ४४ पहा ).

चित्र नं. २
घाटांचें दृश्य. पृष्ठ २४



देवळावर कळसाप्रमाणें सोन्याचें पाणी दिलेली पितळी पताका असते. मंदिरें नक्षीकामानें भरलेलीं आहेत. काशीचा दगड घडणीस फार सफाईदार व मजबूत असतो. त्यामुळें त्याच्यावरचें नक्षीकाम सीमेंट किंवा चुन्यापेक्षां अधिक साफ व सुंदर दिसतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भव्य, प्रशस्त व मोठीं नसलीं तरी काशीचीं मंदिरें बांधकामाच्या विशिष्ट पद्धतीमुळें तसेंच कलाकुसरीमुळें प्रेक्षणीय खात्रीनेंच आहेत.

**विश्वनाथ मन्दिर :**—शंकर हा काशींतील सर्वांत मुख्य देव असून तो 'विश्वेश', 'विश्वनाथ' या नांवानें प्रसिद्ध आहे. फार प्राचीन काळच्या ग्रंथांतून व लेखांतून अन्य नांवांनीं त्याचा उल्लेख सांपडतो. विश्वनाथ हें नांव गत एक सहस्र वर्षांतील आहे. सातव्या शतकांतल्या ह्वेनसांग या चिनी प्रवाशानें महेश्वर या नांवानें त्याचा उल्लेख केला आहे व त्याचें देऊळ मोठें प्रशस्त व शिखर १०० फूट उंच होतें असें लिहिलें आहे. हें देऊळ कोठें होतें ह्याचें नीट ज्ञान नाहीं; पण राजघाटापाशीं सध्यां झालेल्या खोदाईवरून तें तेथें असावें असें अनुमान केलें जातें. हें देऊळ ११९४ त तोडलें गेलें. त्यानंतर तें बांधलें गेलें का नाहीं याचें ज्ञान नाहीं. पण बांधलें गेलें असलें तरी तें १४९४ त पुन्हां तोडलें गेलें यांत शंका नाहीं. त्यानंतर ८६ वर्षांनीं १५८० त हल्लींच्या ज्ञानवापी मशिदीच्या ठिकाणीं नारायणभट्टानें राजा तोडरमलाची साहाय्यता घेऊन मोठें प्रशस्त मंदिर बांधलें. त्याचे ध्वंसावशेष मशिदीच्यामागें अजून दृष्टीस पडतात. १६६९ त औरंगजेबानें तें मंदिर तोडून त्याचाच मागला भाग ठेवून व त्याचेच दगड वापरून सध्यांची मशीद बांधली. त्यानंतर ११८ वर्षें विश्वनाथाला मंदिर नव्हतें. तें १७७७ त बांधलें गेलें व तेंच सध्यांचें मंदिर आहे. मंदिरापर्यंत गाडीरस्ता नाहीं. गोदोलियावरून दशाश्वमेध घाटाकडे जातांना विश्वनाथगल्लीपाशीं किंवा चौकाकडे जातांना बांस फाटकापाशीं व चौकाकडून आलें तर ज्ञानवापी मशिदीपाशीं पायऱ्या उतरून अर्धा फर्लांग पायीं चालत जावें लागतें. मंदिर लहान असून तें मशीद व ज्ञानवापी मंडपाच्या पश्चिमेस ५० फूट लांबरुंद प्राकाराच्या आंत बांधलेलें आहे. हें जोड-देऊळ आहे. म्हणजे दोन्ही बाजूंला ९–१० फूट चौरसीचे दोन गाभारे आहेत व त्यावर ३० फूट उंचीचीं सारखीं दोन शिखरें आहेत. दोहोंच्यामध्यें १६ फूट

का....३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 24008 वि: 25-5-77
नों. कि. 26/7/58

चौरसीचा दोन्ही देवळांचा समाईक असा सभामंडप आहे. त्याच्यावर मशिदी-वजा घुमट आहे. ह्या घुमटावर व एका मंदिराच्या शिखरावर पंजाबच्या महाराजा रणजितसिंगानें सोन्याचा पत्रा चढविला आहे. त्यामुळें परदेशी लोकांमध्यें व काशीवर्णनाच्या इंग्रजी पुस्तकामध्यें हें 'स्वर्णमंदिर' म्हणून प्रसिद्ध आहे. येथील दोन्ही मंदिरांत व सभामंडपांत शंकराच्याच पिंड्या आहेत. त्यामुळें खरा विश्वनाथ समजण्यास नवख्या माणसास पंचाईत पडते व कधीं कधीं तो फसतो. एकदां एक पुण्याचे प्राध्यापकमित्र लेखकाकडे आले होते. पुण्यांतील त्यांच्या दोन तीन नातेवाईक स्त्रियांनीं विश्वनाथापुढें ठेवण्याकरितां सव्वा सव्वा रुपया दिला होता. ते गांवांत गेले तेव्हां वरील कार्य करण्याकरितां विश्वनाथ मंदिरांत गेले. मंदिरापाशीं यात्रेकरूंना देवदर्शन करविण्याकरितां नेहमीं ब्राह्मण - पण्डे उभे असतात. ते नवखा मनुष्य ओळखून त्याच्याबरोबर देवळांत जाऊन दर्शन करवितात. प्रथम बहुधा अन्य. देवतांचें दर्शन करविलें जातें. त्याशिवाय त्या देवांना उत्पन्न होत नाहीं. ह्यांना ब्राह्मण प्रथम विश्वनाथासमोरच्या शंकराकडे घेऊन गेला व विश्वनाथ समजून त्यांनीं आपली ठेव त्याच्यापुढें ठेवली., पुढें दोन दिवसांनीं लेखकांबरोबर जेव्हां ते दर्शनास आले त्या वेळीं त्यांना आपली चूक समजली व ती त्यांनीं लेखकापाशीं बोलून दाखविली. महाद्वारांतून आंत गेलें कीं उजवीकडच्या गाभाऱ्यामध्यें ईशान्य कोपऱ्यांत खोलामध्यें विश्वनाथ आहे. त्याची केवळ पिंडी व तिचाहि केवळ वरचा हिस्सा दृष्टीस पडतो. विश्वनाथाच्या शिखरावर सोन्याचा पत्रा आहे ही त्याची सर्वांत मोठी खूण समजावी.

पंढरीच्या विठोबाप्रमाणें काशीविश्वनाथाच्या दर्शनस्पर्शनास सवर्ण हिंदु स्त्री-पुरुषांस कधींच आडकाठी नसल्यामुळें प्रातःकाळीं गंगाजल व फूल चढविण्याकरितां गाभाऱ्यांत भाविक भक्तांची नेहमींच गर्दी असते. देव खोलांत असल्यामुळें वरील चार बोटें भाग सोडला तर बाकी सर्व देव बेलफूलजलामध्यें बुडलेला असतो. देव खोलांत असल्यामुळें पुष्कळ वेळां मागील लोकांचा धक्का लागून दर्शनस्पर्शन करतांना देवावर पडण्याचा किंवा सकाळीं मागील भक्तांनीं चढविलेल्या गंगाजलफुलांनीं भिजण्याचा प्रसंग येतो हें ध्यानांत ठेवावें. याकरितां सर्व पर्वांचे वेळीं देवाभोंवतीं छातीभर उंचीचा कठडा लावला जातो. दुपारीं ११-१२ वा. महापूजा होते व रात्रीं आठानंतर आरती असते. त्या वेळीं आंत जाऊन

दर्शन करतां येत नाहीं. महापूजेच्या वेळीं दुधाचा अभिषेक असतो. महापूजा व आरती दोन्ही बघण्यासारखीं असतात. दिवाळी, कार्तिकी पौर्णिमा, शिवरात्र, शृंगारी एकादशी, होळी इत्यादि सणपर्वांच्या वेळीं विश्वनाथाला चांदीसोन्याचे जडाऊ अलंकार चढविले जातात व शृंगार करतात. त्या सर्वच वेळीं विश्वनाथ प्रेक्षणीय असतो.

पूर्वी अस्पृश्यांना विश्वनाथदर्शनाची सोय भिंतीमधील एका खिडकींतून केली होती. अस्पृश्यांच्या मंदिर–प्रवेशाच्या चळवळीच्या वेळीं देवाचा गाभारा दर्शन - स्पर्शन - पूजन - अभिषेक इत्यादि सर्व कार्यांकरितां सर्वांनाच बंद झाला होता. आतां तो पुन्हां मोकळा झाला आहे.

**अन्नपूर्णा मंदिर :—** विश्वनाथावरून बांसफाटकाकडे किंवा दशाश्वमेधाकडे जावयास लागलें कीं लगेच डाव्या बाजूस शनीचें छोटेंसें मंदिर व २५ पावलें पुढें गेले कीं त्याच बाजूस अन्नपूर्णेचें मंदिर लागतें. म्हणजे विश्वनाथगल्ली-कडून किंवा बांसफाटकाकडून यावयास लागलें कीं प्रथम अन्नपूर्णा लागते. ह्या मंदिरापर्यंत वाहनें येत नाहींत हें सांगणें नकोच. विश्वनाथमंदिरापेक्षां हें मंदिर सर्व दृष्टींनीं अधिक प्रशस्त आहे. देवळांभोंवतीं मोठमोठ्या ओवऱ्या आहेत. त्यामध्यें अनेक देवतांचीं मंदिरें आहेत. मागील बाजूच्या ओवऱ्यांमध्यें मोठ-मोठ्या गाई बांधलेल्या असतात. विश्वनाथाप्रमाणें अन्नपूर्णामंदिरांत भक्तांची गर्दी असली तरी त्यामध्यें बायकांची संख्या जास्त असते.

अन्नपूर्णेच्या मंदिरांत नित्य शेंपन्नास ब्राह्मण पूजा–पाठ करीत बसलेले असतात. हें दृश्य काशींत अन्यत्र कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. अन्नपूर्णा म्हणजे पार्वतीच. तिच्या घरीं कधीं अन्नाचा तुटवडा पडत नाहीं म्हणून तिला अन्नपूर्णा हें गुणवाचक नांव दिलें गेलें. ‘स्वयं पंचमुखः, पुत्रौ गजानन-षडाननौ। दिगंबरः कथं जीवेदन्नपूर्णा न चेद्गृहे’ ह्या श्लोकांत जगन्नाथ पंडितानें तिच्या ह्या गुणाचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. शंकर तिचा हा गुण ओळखून होते. त्यामुळें एकदां जेव्हां पार्वती काशीस आली त्या वेळीं आपल्या नगरींत कोणी उपाशी राहूं नये अशी व्यवस्था तूं ठेव म्हणून शंकरांनीं तिला सांगितलें व त्याप्रमाणें तिनें व्यवस्था चालू ठेवली. यामुळें म्हणा कीं कसेंहि म्हणा, केवळ तिच्या मंदिरांत बसणारे भिक्षुकच नव्हेत तर नगरींतील सर्व साधु,

संन्याशी, बैरागी, याचक कोणीहि काशीमध्यें उपाशी राहात नाहींत अशी काशीची प्रसिद्धि आहे. दीपवाळींतील पाडव्यास अन्नपूर्णेच्या मंदिरांत मोठा प्रेक्षणीय अन्नकोट होतो. त्याच वेळीं वर्षभर बघावयास न मिळणारी सोन्याची अन्नपूर्णा पण बाहेर ठेविली जाते. त्यामुळें अन्नकोट बघण्यास भयंकर गर्दी होते.

**धुंढिराज व साक्षी विनायक :—** अन्नपूर्णेवरून तसेंच १० पावलें पुढें गेलें कीं एका कमानीखालीं कोनाड्यांत धुंढिराज विनायकाची मूर्ति लागते. तेथून जरा पुढें जाऊन दशाश्वमेधाकडे जाणाऱ्या विश्वनाथगल्लींत गेलें कीं अर्ध्या वाटेंत साक्षी विनायकाचें मंदिर लागतें. विनायकाची मूर्ति भव्य आहे. काशींत येणारे यात्रेकरू यात्रा संपल्यावर आपल्या यात्रेची साक्ष ठेवण्याकरितां या गणपतीचें दर्शन करतात. म्हणून या गणपतीस साक्षी विनायक हें नांव पडलें आहे.

**काळभैरव :—** नारायणभट्टानें बांधलेल्या विश्वनाथमंदिरांत पूर्वेकडील दारांतून आंत गेल्यावर उजवीकडील कोपऱ्यांत भैरव होते. तें मंदिर तुटून तेथें मशीद बनल्यावर जेव्हां पुन्हां मंदिरें बांधलीं गेलीं त्या वेळीं विश्वनाथ मंदिरापाशीं जागा न मिळाल्यामुळें हें बिसेसर गंजांत हल्लींच्या जागीं सन १८१७ मध्यें बांधलें गेलें. हें स्थान विश्वनाथमंदिरापासून अर्धा पाऊण मैल आहे. विश्वनाथ किंवा अन्नपूर्णा मंदिरापेक्षां भैरवनाथ वाहनें थांबतात त्या ठिकाणाहून फार जवळ पडतो. त्यामुळें वाहनें थांबण्याच्या ठिकाणास नुसतें 'भैरवनाथ' किंवा 'भैरवनाथ स्टॅण्ड' म्हणतात. याचें महत्त्व केवळ भैरवनाथ दर्शनापुरतेंच मर्यादित नाहीं तर कोठूनहि काशींतील महाराष्ट्रीय वस्तीमध्यें पोंचण्याच्या तसेंच महाराष्ट्रीय वस्तींतून वाहन करून कोठेंहि जाण्याच्या दृष्टीनें आहे. या ठिकाणीं नेहमीं कुली किंवा मजूर असतात. ते आपण ज्याच्याकडे सांगूं त्याच्याकडे नेमकें पोंचवून देतात.

भैरवाचें मंदिर छोटेंसेंच आहे. गाभाऱ्यासमोर छोटासा सभामंडप आहे. चारी बाजूंना ओवऱ्या किंवा सोपे आहेत. ह्या देवळास पुढून तसेंच मागून असे दोन दरवाजे आहेत. मूर्ति चतुर्भुज आहे. तिचें वाहन कुत्रा आहे. त्याची दगडी मूर्ति दरवाजाच्या आंत कोनाड्यामध्यें आहे. काशींतील इतर देवतांच्यापेक्षां भैरवनाथाच्या अनेक विशेषता आहेत.

भैरवनाथ हा काशीखंडाचा कोतवाल मानला जातो. त्याचा अधिकार काशीनगरीपुरता मर्यादित नसून पंचक्रोशीवर सुद्धां चालतो. त्यामुळें शासनाच्या दृष्टीनें इतर सर्व देवतांपेक्षां तो वरिष्ठ समजला जातो. स्वराज्य-प्राप्तीच्या चळवळीच्या काळांत काशींतील चळवळे लोक विनोदाखातर तेथील सरकारी अधिकाऱ्यांना या कारणानें भैरवनाथाच्या सहीच्या सूचना पाठवीत असत.

भैरवनाथ हें जागृत दैवत आहे व भूतबाधा दूर करतें अशा प्रकारची तिकडील लोकांची श्रद्धा असल्यामुळें केव्हांहि देवाच्या दर्शनास जा, देवळांतील भक्तगण अंगारा–धुपारा व झांडफूक करतांना दृष्टीस पडतात. झांडफूक करून घेणाऱ्यांमध्यें स्त्रिया व मुलें यांचाच भरणा जास्त असतो.

सोटा व गंडा ही भैरवनाथाची तिसरी विशेषता आहे. देवाचें दर्शन केलें कीं पुजारी पाठीवर मोराच्या पिसांचा जुडगा फिरवतो व हातांत गंडा बांधतो. नंतर बरीचशी दक्षिणा उपटतो. मोराच्या पिसाच्या जुडग्यास भैरवाचा सोटा म्हणतात. हातांत बांधण्याचा गंडा दोडदमडीचा असतो. परंतु त्याकरितां तेथील पुजारी किंवा भक्तगण भरपूर दक्षिणा मागतात या वरूनच 'गंडा घालणें' ( फसविणें वाजवीपेक्षां अधिक किंमत घेणें ) हा वाक्प्रचार मराठीमध्यें प्रचलित झाला. काशीहून यात्रेकरू ज्या अनेक वस्तु घेऊन जातो त्यामध्यें गंडे असतात व मावंद्याच्या वेळीं गंगाजलाबरोबर निमंत्रितांना ते दिले जातात. गंडे हातांतले व गळ्यांतले तसेंच खऱ्या व खोट्या ( केळीच्या ) रेशमाचे मिळतात. गळ्यांतील गंडा गोऱ्या व अंगा-पिंडानें बऱ्या अशा लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच विशेषतः पहिलवानांना शोभूनहि दिसतो.

**दण्डपाणी :—** भैरवाच्या देवळाबाहेर नवग्रहांचें व जवळच दण्डपाणीचें मंदिर आहे. ह्यामध्यें कोणतीहि देवता नसून जो दण्डा हातांत घेऊन भैरव पाप्यांना शिक्षा करतो, तो चार फूट उंच दगडाच्या खांबाच्या रूपानें ठेवला आहे. त्यावर चांदीचा मुखवटा चढविला जातो.

**बिन्दुमाधव :—** गाडी - घोड्यासारख्या वाहनापासून हें सर्वांत दूर मंदिर आहे. चौकांत उतरून ठठेरी बाजारांतून हें सर्वांत लांब पडतें. भैरवनाथ

अड्ड्यावर उतरून हें अर्धा मैल दूर पडतें. जुन्या वस्तींत महाराष्ट्रीय उपाध्यायांचेकडे उतरणाराला हें लांब पडत नाहीं. तेव्हां बाहेर राहणारांनीं दशाश्वमेधावर नांव करून सरळ बिन्दुमाधव घाटावर उतरणें हा सर्वोत्तम व सोईस्कर मार्ग आहे.

बिंदुमाधव घाट हा पंचगंगा घाटाला लागून आहे. त्यामुळें पंचतीर्थी श्राद्ध सोडलें तर त्या घाटासंबंधानें जें लिहिलें आहे ( पृष्ठ २७ ) तें सर्व ह्या घाटाला लागू आहे. ठीक ह्या घाटावर मिर्झा राजा जयसिंहानें आपल्या काशीयात्रेच्या स्मृत्यर्थ १६४२ त पूर्वीचें बिन्दुमाधवाचें मंदिर बांधलें होतें. हें मंदिर काशींतील मंदिरांत सर्व दृष्टींनीं सर्वोत्तम होतें. ह्याचें महाद्वार गंगाभिमुख होतें. बिन्दुमाधवाची मूर्ति पुरुषभर उंचीची होती. चारी कोपऱ्यावर चार देवता होत्या. देवळाच्या गच्चीवर चारी बाजूंनीं बघण्यास सज्जे होते. बिंदुमाधवाच्या वरील शिखर २०० फूट उंच व इतर देवतांवरील शिखरें थोडीं कमी उंच होतीं. प्रत्येक शिखरास चढण्यास पायऱ्या व बघण्यास खिडक्या ठेवल्या होत्या. त्यामुळें सर्वांत उंच शिखरावरून गंगा, घाट, काशीनगरी एवढ्यांचीच नव्हे तर १०–५ मैलांतील भूप्रदेशाची शोभा बघतां येत होती. सारांश बिंदुमाधवाचें मंदिर काशीच्या किल्लेबंदीचा ( पृष्ठ २४ ) बालेकिल्ला व मंदिरांचा मुकुटमणि होतें. ह्याच्या उंच शिखरामुळें यास ' माधवरावका धरहरा किंवा धौरहरा ' ( हिंदीमध्यें मनोऱ्यासारख्या आंतून पायऱ्या असलेल्या इमारतीस धौरहरा म्हणतात. ) हें नांव पडलें. पुढें औरंगजेबानें विश्वनाथ मंदिरानंतर ह्या मंदिराचा विध्वंस करून दोन्ही ठिकाणीं मशिदी बांधल्या. त्यांत बिन्दुमाधवाच्या मशिदीला त्यानें पूर्वीच्या मंदिराच्या शिखराशीं टक्कर देण्याच्या हेतूनें २०० फूट उंचीचें आंतून पायऱ्यानें वर जाऊन वरून बघण्यासाठीं सोय केलेले दोन मनोरे बांधले. ह्यामुळें ह्या मशिदीलासुद्धां 'माधवरावका धरहरा' हें पूर्वीच्या मंदिराचेंच नांव चालू राहिलें. पुढें हे फार उंच मनोरे पडण्याची शक्यता लक्षांत आल्यावर ते ५० फूट कमी केले गेले. ह्यांपैकीं गंगेकडील मनोरा १९४९ च्या गंगेच्या पुरांत कोसळला. आतां फक्त एकच राहिला आहे.

हल्लींचें बिंदुमाधवाचें स्थान मशिदीजवळच आहे. मूर्ति लहानशी पण चांगली आहे. ती ज्या ठिकाणीं आहे तें ठिकाण मंदिर नसून घर आहे. व देव सार्वजनिक असला तरी स्थान खाजगी आहे. बिंदुमाधव हा काशींतील

महत्त्वाचा देव असला तरी त्याचें महत्त्व कार्तिक महिन्यांत विशेष. त्या वेळीं देवाला तुळशीचें सहस्रनाम वाहाण्याचें विशेष पुण्य मानलें जातें. पूर्वी तेथें आंत जाऊन देवाची पूजा-अर्चा, तुळशी वाहणें हीं कामें करतां येत असत. अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाच्या चळवळीपासून स्थान खाजगी असलें तरी पुजाऱ्यांनीं आंत जाऊन पूजा करूं देण्याचें बंद केलें. येथील पुजारी दक्षिणी ब्राह्मण व व्यवस्था पंतप्रतिनिधींची आहे.

**केदारनाथ :—** ही काशींतील महत्त्वाची देवता आहे. वाराणशीच्या ज्या भूभागामध्यें केदारनाथाचें वास्तव्य आहे त्याला 'केदारखण्ड' (पृष्ठ २७) म्हणतात. केदाराचें मंदिर हरिश्चंद्र घाटाजवळ ( पृष्ठ २८ ) गंगातटाकीं असून समोर केदार नांवाचाच घाट आहे. हा काशींतील उत्तम तसाच उंच घाटांपैकीं घाट आहे. घाटावर गौरीकुण्ड नांवाचें चौकोनी कुण्ड आहे. मंदिर बोळांत असलें तरी देवळापर्यंत वाहनें जाऊं शकतात. पायानें किंवा वाहनानें मनुष्य देवळाच्या मागच्या बाजूस पोंचतो व तेथेंच देवळाचें महाद्वार आहे. देऊळ गंगाभिमुख आहे. देवळाच्या चारी बाजूंस देवता आहेत. पश्चिम द्वार व पूर्व द्वार सोडलें तर हें देऊळ सर्व बाजूंनीं बंद आहे. देवळाच्या भिंतीवर प्रदक्षिणेच्या वाटेवर जिकडे पहावें तिकडे आपल्या प्रिय माणसांच्या प्रीत्यर्थ लावलेले शिलालेखच शिलालेख दृष्टीस पडतात. यावरून देवतेची लोकप्रियता समजून येते. इतके शिलालेख काशींत अन्यत्र दृष्टीस पडत नाहींत. देवळाच्या आसपास बंगाली वस्ती जास्त आहे. काशींत विश्वनाथानंतर शंकराच्या देवळांत हेंच देऊळ महत्त्वाचें मानलें जातें. त्यामुळें विश्वनाथाच्या देवळासारखीच येथें रोज दर्शनाची गर्दी असते व शिवरात्रीचा पण मेळा लागतो.

**दुर्गादेवी :—** काशीनगरीच्या दक्षिण टोकावर हिचें देऊळ आहे. येथें नगरपालिकेची सीमा संपत असे. आतां ती सीमा विश्वविद्यालयापर्यंत वाढविली गेली आहे. देऊळ पश्चिमाभिमुख असून त्याकडे येणारी सडक पुढें संकटमोचन लंका यावरून सरळ रामनगरकडे व उजव्या बाजूनें विश्वविद्यालयाकडे जाते. देवळाला लागून दुर्गेच्याच नांवाचें एक मोठें चारी बाजूंनीं उत्तम प्रकारें बांधलेलें असें कुंड आहे. या योगानें देवळाला चांगली शोभा आली आहे. कुंडावरून एक रस्ता अस्सी घाटाकडे जातो. त्याला प्रथम

उजवीकडे भास्करानंदाची समाधि लागते व पुढें अस्सीपाशीं डावीकडे कुरुक्षेत्र कुंड व लोलार्क कुंड लागतात.

ह्या देवळांत तसेंच देवळाच्या आसपास माकडांची गर्दी असते. त्यामुळें परदेशी लोकांमध्यें व काशीच्या वर्णनाच्या इंग्रजी पुस्तकामध्यें तें 'मर्कट मंदिर' ( Monkey Temple ) म्हणून उल्लेखिलें जातें. परंतु माकडांचा मंदिराच्या देवतेशीं कांहींहि संबंध नाहीं. एक गोष्ट खरी कीं, काशींत ह्या मंदिरांत जेवढीं, माकडें आढळतात तेवढीं दुसऱ्या कोणत्याच देवळांत आढळत नाहींत. तेव्हां दर्शनास जाणारांनीं हातांतले जिन्नस संभाळून न्यावेत, नाहींतर तीं ओढून घेतल्याशिवाय कधींच राहत नाहींत. हें देऊळ अगदीं सडकेवर आहे. सडकेला लागून देवळाचा नगारखाना आहे. तेथून आंत गेलें कीं मोकळी जागा आहे तेथें देवीचे बळी दिले जातात. पुढें देवळाचा दरवाजा आहे. देऊळ चांगलें प्रशस्त आहे. आंत चोहोबाजूंनीं मोठाले सोपे आहेत. नवरात्राच्या दिवसांत हे सोपे होमहवन पूजापाठ करणाऱ्या भक्तजनांनीं भरलेले असतात. हें देऊळ काशींतील नक्षीदार देवळाचा एक उत्तम नमुना म्हणून दाखवितां येईल. सभामंडपाच्या कमानी आंतील व बाहेरील अशा दुहेरी दाखविलेल्या आहेत. बाहेरील कमानींवरून पक्ष्यांवर बसलेले व हातांत वीणा घेतलेले पुतळे दाखविलेले आहेत व आंतील कमानीवरून दुर्गादेवीच्या मूर्ति दाखविल्या आहेत. देवळाच्या पुढील अंगास बाहेरील कमानीवर जे पुतळे आहेत त्यांचीं वाहनें सिंह आहेत. देवळाच्या दरवाजांतून आंत शिरलें कीं दोही बाजूंना दोन मोठे सिंह एकमेकांसमोर आहेत. आणि सगळ्यांत विशेष म्हणजे बळी द्यावयाच्या जागेपाशीं छोट्याशा दगडी जोत्यावर १०–१२ फूट उंचीच्या दगडी खांबावर एक मोठा सिंहच आहे. दुर्गा ही दुर्गांचा वध करणारी पार्वती किंवा गौरी आहे. तेव्हां तिच्या आक्राळविक्राळ स्वरूपाचा व हिंस्र प्रकृतीचा परिचय करून देण्याच्या दृष्टीनें तिच्या देवळांत ठिकठिकाणीं सिंहांच्या मूर्ति बसविणें हें योग्यच आहे. सडकेच्या पलीकडे गौबाईचें देऊळ आहे. काशीमध्यें जितके दिवस यात्रेकरू राहतात तितक्या कवड्या तिला वाहण्याचा रिवाज आहे. यामुळें तिला 'कवडादेवी 'सुद्धां म्हणतात. दुर्गेचा वार मंगळवार असल्यामुळें इतर वारांपेक्षां त्या दिवशीं अधिक लोक दर्शनास येतात. प्रत्येक श्रावणी मंगळवारीं मेळा व बाजार भरतो व शेवटच्या

मंगळवारीं तर दर्शनास व मेळा ववण्यास तुफान गर्दी असते. रामनवमी व दसरा हीं दोन्ही नवरात्रें दुर्गेच्या देवळांत पाळलीं जातात. दोन्हींमध्यें नऊ दिवस लोक दर्शनास येतात व सोप्यांत बसून पूजापाठ व होमहवन करतात.

**संकटमोचन :**—हें काशीच्या प्राचीन परंपरेंतील देवस्थान नसून गोस्वामी तुळशीदासांनीं स्थापलेल्या मारुतीपैकीं एक स्थान आहे. या ठिकाणीं कांहीं काळ गोस्वामींचें वास्तव्य होतें. येथेंच मारुतिरायांनीं एका कोड्याच्या रूपानें त्यांना दर्शन दिलें. मंदिरासमोरचा वटवृक्ष त्यांनींच लावलेला आहे. तो फार मोठा झाला होता. कांहीं वर्षांपूर्वीं त्याच्या बऱ्याच फांद्या कुजून गेल्यामुळें पडल्या. तरी अजून दोनतीन मोठ्या फांद्या शिल्लक आहेत. मारुतिरायाची मूर्ति स्वयंभू असून पुरुषभर उंचीची उजवीकडे किंचित् मान वांकडी केलेली आहे. मुकुट चढविलेल्या, डोळे लाविलेल्या, शेंदरांनीं माखलेल्या, माळा-फुलांनीं लादलेल्या मारुतिरायाच्या त्या भव्य मूर्तींमध्यें भाविक मनाचा ठाव घेण्याची शक्ति आहे, यांत मुळींच शंका नाहीं. समोरच मर्यादापुरुषोत्तम भगवान् रामचंद्र, सीतामाई, लक्ष्मण यांच्या मूर्ति आहेत. दोघांचीं मंदिरें स्वतंत्र असून मध्यें विहीर आहे.

संकटमोचन हें पुण्यांतील भिकारदास मारुतीप्रमाणें काशींतील मारुती-भक्तांचें आवडतें मंदिर आहे. दर मंगळवारीं व शनिवारीं शहरांतून दर्शना-करितां येणाऱ्या लोकांच्या वाहनांची मंदिरासमोर नुसती खेचाखेच होते. श्रावणाच्या मंगळवारीं, दसऱ्याच्या व रामनवमीच्या नवरात्रामध्यें तर याहीपेक्षां अधिक गर्दी होते. चैत्री पौर्णिमेस तेथें रामचरितमानससंमेलन भरतें. हें मारुतिरायाच्या जन्मानिमित्त नसून मन्दिराच्या वार्षिकोत्सवानिमित्त असतें. काशीकडे मारुतिजन्म माघी पौर्णिमेस झाला असें मानतात, पण तो आपल्याकडल्यासारखा साजरा केला जात नाहीं. संमेलनापूर्वीं कित्येक दिवसांपासून तेथें रामचरितमानसाच्या प्रकाण्ड पंडितांचीं प्रवचनें, कीर्तनें, भजनें चालू होतात, त्यामुळें त्या दिवसांत मन्दिराला मेळ्याचें स्वरूप प्राप्त होतें. संकटमोचन हें मोठें जागृत व नवसाला पावणारें दैवत आहे अशी तिकडे लोकांची श्रद्धा असल्यामुळें दर्शनाला येणाऱ्या लोकांमध्यें आर्त व अर्थार्थी लोकांचा फार मोठा भरणा असतो. विश्वविद्यालयाला हें मन्दिर जवळ पडत असल्यामुळें तेथील सर्व प्रकारचे लोक ह्याच ठिकाणीं जातात.

ह्याबाबतीमध्यें विशेषरूपानें नजरेंत भरणारी गोष्ट म्हणजे परीक्षेच्या दिवसांत विश्वविद्यालयांतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची दर्शनाकरितां होणारी अलोट गर्दी ही होय. विश्वविद्यालयांतील मारुतिमन्दिर सांपडण्यापूर्वी लेखक रोज संकटमोचनाचेंच दर्शन घेत असे. पुढें मोठ्या सणापर्वांना व तो फक्त शनिवारीं दर्शनास जाई. लेखकाच्या लहानपणीं भिकारदास मारुती हें संकट-मोचनप्रमाणेंच पण त्यापेक्षां थोडेंकमी असें एक नैसर्गिक रमणीय व प्रशान्त देवस्थान होतें. परंतु शहराच्या वाढीबरोबर त्याच्या आसपासच्या बागा तुटल्यामुळें, जवळपास घरें बनल्यामुळें व सगळ्यांत विशेष म्हणजे त्याच्या-समोर नाट्यगृह बनल्यामुळें त्या देवस्थानची नैसर्गिक रमणीयता व शांतता पुष्कळच कमी झाली आहे. काशीनगरी दुर्गेपासून विश्वविद्यालयापर्यंत वाढली असली तरी संकटमोचनावर ही आपत्ति आली नाहीं व पुढें पण लवकर येण्याची फारशी भीति नाहीं. कारण तें देवस्थान रहदारीच्या रस्त्यापासून फार दूर आहे, त्याचें आपले चारी बाजूंनीं भिंतीनें घेरलेलें असें कैक बिघ्यांचें आवार आहे. त्या आवारामध्यें शेंकडों झाडेंझुडपें आहेत, एक भाग जंगल-वजा आहे व त्यामध्यें तलाव व उत्तमपैकीं बांधलेली विहीर आहे. यामुळें शहराच्या घनदाट वस्तींत, कुंद हवेंत, अंधेऱ्या जागेंत राहणाऱ्या काशीकरांचें संकटमोचन हें नुसतें देवदर्शनाचेंच नव्हे तर वनभोजनाचेंसुद्धां फार आवडतें स्थान आहे. तेथील शुद्ध वातावरणानें व पाय मोकळे होण्यानें त्यांना केवळ शारीरिक सुखच मिळत नाहीं तर मारुतिरायाच्या दर्शनानें व चढविलेला भोग प्रसाद म्हणून सेवन करण्यानें मानसिक सुख पण प्राप्त होतें. मारुतिराय आखाड्याची देवता असल्यामुळें तेथें एक आखाडा पण आहे. त्याकरितां अनेक व्यायामप्रिय मंडळी तेथें येतात.

**संकटहरण :**—हें संकटमोचनला लागूनच त्याच्यापलीकडे असलेलें श्रीमारुतिरायाचें दुसरें निसर्गरमणीय व एकान्त असें देवस्थान आहे. दोन्ही मारुतिरायांचींच देवस्थानें असलीं तरी एका स्थानचे मारुतिराय भक्तजनांनीं सदा वेढलेले असतात तर दुसऱ्या स्थानचे बद्रीनारायणासमोर ( संकटहरण मारुतिरायासमोर रामचंद्राचें मंदिर नसून बद्रीनारायणाचें आहे ) एकान्तांत बसलेले दिसतात. ‘ तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि ’ असें नारदभक्तिसूत्र आहे. त्याचा अर्थ साधुसंत पाण्याला तीर्थत्व, स्थानाला क्षेत्रत्व व दगडाला देवत्व आणतात.

शेजारीं शेजारीं एकाच देवतेचीं वरील दोन देवस्थानें बघून वरील सूत्राची सत्यता चटकन् लक्षांत येते.

**नेपाळी मंदिर:**— ह्या मंदिराचें खरें महत्त्व नेपाळी मंदिराचा नमुना म्हणून आहे. नेपाळी मंदिराची विशेषता त्याच्या शिखरांत आहे. शिखर चौकोनी असून अनेक मजली असतें. प्रत्येक मजल्याच्या माथ्यावरून चारी बाजूंना ढाळदार छत सोडलेलें असतें व त्याला मजल्याच्या तळापासून तिरप्या खांबांचा आधार दिलेला असतो. शिखराचा प्रत्येक मजला त्याचे छतासुद्धां चौरसीमध्यें खालच्या मजल्यापेक्षां व छतापेक्षां लहान लहान होत जातो. मंदिराचे दरवाजे, चौकटी, खिडक्या, छत, खांब ह्यांच्या बांधकामामध्यें लांकडांचा उपयोग केलेला असतो व त्यांच्यावर सुंदर नक्षीकाम तसेंच माणसें व जनावरें यांच्या मूर्ति कोरलेल्या असतात.

हें मंदिर पशुपतेश्वराचें असून नेपाळच्या महाराजांनीं बांधलें आहे व त्यांच्याच मार्फत त्याची पूजाअर्चा इत्यादिकाची व्यवस्था चालू आहे. काशी क्षेत्राच्या किंवा तीर्थविधीच्या कोणत्याहि देवतेशीं याचा संबंध नाहीं. नेपाळी मंदिराचा नमुना म्हणून हें बघण्यासारखें आहे. मानमंदिराच्या पलीकडे दोन घाट सोडून हें मंदिर आहे. ह्याच्या घाटाला नेपाळी घाट म्हणतात. काटमाण्डुजवळील प्रसिद्ध पशुपतेश्वराच्या मंदिराप्रमाणें हे केवळ दुमजली बांधलें आहे. भाद्गांव (नेपाळ) येथें अशा प्रकारचें सर्वांत भव्य मंदिर पांच मजली आहे. या मंदिरावर जगन्नाथ-पुरी किंवा भुवनेश्वर येथील मंदिराप्रमाणें अश्लील चित्रें कोरलेलीं आहेत. तेवढ्याकारितां पुष्कळ वेळां ह्या मंदिराचा उल्लेख केला जातो व त्यामुळें ह्या मंदिरांत स्त्रिया बहुधा जात नाहींत.

**बडा गणेश:**— काशींतील गणपतीमध्यें हा सर्वांत प्रसिद्ध व नांवाप्रमाणें खरोखरच फार मोठा गणपति आहे. याला बघून वाईच्या ढोल्या गणपतीची किंवा विजयानगरच्या (हंपी) बड्या गणपतीची आठवण होते. काशीस गणपति उत्सव आपल्याकडच्याप्रमाणें भाद्रपदांत नसून गणेशजयंतीच्या दिवशीं म्हणजे फाल्गुन शु. ४ स केला जातो. त्या दिवशीं ह्या गणपतीच्या दर्शनास तोबा गर्दी असते व मंदिराबाहेरच्या गल्ल्यांतून लहान मोठे मातीचे हजारों गणपति विकण्यास ठेवलेले असतात. गणपतीला सिंदूर लावीत असले

तरी त्याच्या हातापायांवर चांदीचा पत्रा कायमचाच मढविलेला आहे ही त्याची विशेषता आहे.

## काशींतील महाराष्ट्र

**बुडाला औरंग्या पापी। म्लेंच्छ संहार जाहला।**
**मोडलीं मांडलीं क्षेत्रें। आनंदवनभूवनीं ॥** श्रीसमर्थ.

मराठ्यांचें साम्राज्य महाराष्ट्राबाहेर वाढावयास लागल्यानंतर त्यांना काशी आपल्या ताब्यांत यावी व पूर्वीच्या स्थानीं विश्वनाथाची स्थापना करावी अशी महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली व त्या दिशेनें त्यांनीं प्रयत्न चालविले. अयोध्येच्या नबाबास रोहिल्यांच्याविरुद्ध मदत करण्याचा जेव्हां प्रश्न आला तेव्हां मथुरा, प्रयाग, काशी, गया हीं पुण्यक्षेत्रें आपल्या ताब्यांत देण्याच्या अटीवरच त्यांनीं मदत देऊन रोहिल्यांचा पराभव केला. परंतु त्यानंतर ते अन्यत्र गुंतले गेल्यामुळें क्षेत्रें ताब्यांत घ्यावयाचें काम तसेंच राहिलें व तेवढ्यांत इंग्रजांनीं काशीवर आपलें अधिपत्य स्थापलें. यामुळें काशीवर राज्य करण्याची मराठ्यांची महत्त्वाकांक्षा विफल झाली. पुढें नाना फडणविसांनीं मुसलमानांना नुकसानभरपाई देऊन मुसलमानांची मशीद तेथून हलवून त्या जागीं मंदिर बांधून देण्याबद्दल इंग्रजांना अनेक वेळां लिहिलें. परंतु इंग्रज त्यास तयार झाले नाहींत. त्यामुळें मराठ्यांची ही पण महत्त्वाकांक्षा हवेंतच राहिली. शेवटीं नाइलाजानें ज्ञानवापीच्या दक्षिणेस जी थोडीशी जागा मिळाली त्या जागीं देवी श्रीअहल्याबाईनें सध्यांचें मंदिर बांधलें व सन १७७७ च्या गोकुळअष्टमीस ११८ वर्षें निर्वासिताप्रमाणें दिवस कंठीत असलेल्या विश्वनाथास स्वतःच्या मंदिरांत पुनर्वासित केलें.

स्वराज्यप्राप्तीनंतर सरकारनें इंग्रजांचीं अपमानकारक स्मृतिचिन्हें नष्ट करण्याचें काम सुरू केलें. ह्या दिशेनें केलेल्या प्रयत्नांत सार्वजनिक ठिकाणीं असलेल्या परकीय राज्यकर्त्यांचे पुतळे हालविणें याचा निर्देश करण्यासारखा आहे. पण ह्याहीपेक्षां भारतीयांच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचें कार्य म्हणजे सौराष्ट्रांतील मुसल्मानांनीं विध्वंस केलेल्या सोमनाथाच्या मंदिराचें पुनर्निर्माण व सोमनाथाची पुनः प्रतिष्ठापना हें होय. तेव्हां त्यानंतर काशींतील विश्वनाथाच्या

मंदिराची पाळी येईल अशी जर लोकांची कल्पना झाली असली तर त्यांत गैर किंवा अराष्ट्रीय असें कांहींच नव्हतें. खरें म्हटलें तर सौराष्ट्रांतील जखम साधीच होती, परंतु काशींतील जखमांमध्यें कायम सलणारीं शल्यें होतीं. त्यामुळें सौराष्ट्रांतील जखमेपेक्षां काशींतील जखमांची प्रथम चिकित्सा व्हावयास पाहिजे होती. अर्थात् त्याकरितां तेथील शल्यें काढणें जरूर होतें.

सध्यां आपण सार्वजनिक ठिकाणीं असलेले इंग्रजांचे पुतळे हालविण्यास सुरवात केली आहे. खरोखरी विचार केल्यास इंग्रजांनीं आमच्या महापुरुषांचे किंवा देवतांचे पुतळे हालवून त्या ठिकाणीं आपले पुतळे बसविले नव्हते. असें असतांना त्यांचे पुतळे हालविणें आम्हांस केवळ न्यायाचेंच नव्हे तर राष्ट्रीय प्रतिष्ठेचें वाटतें. मग जेथें पूर्वी मंदिरें होतीं हें केवळ ऐतिहासिक सत्यच नव्हे तर स्वतः विध्वंसकानें मशिदीवर लावलेल्या शिलालेखानें व मशिदीखालीं ठेवलेल्या मंदिरांच्या ध्वसांवशेषानें भौतिक सत्य आहे तेथें मशीद हालवून त्या जागीं पुन्हां पूर्वीचें मंदिर उभारल्यास तो कोणालाच अन्याय वाटण्याचें कारण नाहीं. त्यांतून मशिदीची नुकसानभरपाई दिल्यास किंवा अन्य ठिकाणीं मशिदी बांधून दिल्यास तें कृत्य नुसतें न्यायाचेंच नव्हे तर बन्धुभावाचें मानावयास पाहिजे. परंतु मुसलमान गुण्यागोविंदानें म्हणजे शस्त्रकर्म केल्याशिवाय शल्य काढूं देण्यास तयार नाहींत व शस्त्रकर्म करण्यास आवश्यक असलेले 'शौर्यमाशुक्रिया शस्त्रतैक्ष्ण्यमस्वेदवेपथु । असंमोहश्च' हे गुण सरकारांत नाहींत. त्यामुळें काशींतीलच काय इतर ठिकाणच्या सुद्धां सशल्य जखमा तशाच चिघळत राहणार आहेत. सौराष्ट्रांतील जखमेची चिकित्सा झाली ही उत्तम गोष्ट झाली यांत शंका नाहीं. पण वरील कारणाकरितां त्याबद्दल कोणाला घमेंड मारण्याचें कांहींही कारण नाहीं.

स्वतन्त्र भारताचें सरकार निधर्मी आहे असें सांगितलें जातें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत तें हिंदुधर्मी नाहीं हें जसें दिसून येतें तसें तें निधर्मी आहे असें दिसून येत नाहीं. कारण तें हिंदुधर्मियांच्या विरोधाची पर्वा करतांना दिसत नाहीं, त्यांनीं विरोध करावयाचें ठरविल्यास सर्व शक्ति एकवटून 'वज्रादपि कठोर' होतांना दिसते. याच्या उलट इतर धर्मियांनीं विरोध करण्यापर्यंत ते पाळीच येऊं देत नाहीं. व त्यांनीं विरोध केल्यास तें 'कुसुमादपि मृदु' असा 'लोकोत्तर' व्यवहार करतांना दिसतें.

देवी श्रीअहिल्याबाईनें विश्वनाथ मंदिराशिवाय मणिकर्णिका घाटाजवळील तारकेश्वर, गौतमेश्वर व अस्सीजवळील लोलार्क कुण्ड ह्या वास्तु बांधल्या. मणिकर्णिका, दशाश्वमेध, शीतला व त्यापलीकडील तिच्या नांवानें प्रसिद्ध असलेला घाट हे तिनेंच बांधले. या घाटावर तिनें एक मोठी कोठी बांधली व अन्नछत्र उघडलें. या शिवाय आपल्या वाड्याच्या आसपास ( ब्रह्मपुरी ) तिनें अनेक वाडे बांधले. ते सर्व तेथें राहणाऱ्या लोकांनीं वहिवाटीच्या जोरावर गिळंकृत केले. शीतलादेवीच्या पुजाऱ्यानें नुकतेंच कांहीं वर्षांपूर्वी शीतला घाटावर अतिक्रमण करून घाटाचा अधिक भाग आपल्या ताब्यांत घेतला. तेव्हां होळकर सरकारतर्फे त्याच्यावर न्यायालयांत केलेली फिर्याद लेखकाला व्यवस्थापकाकडून माहीत झाली होती.

बायजाबाई शिंदे यांनीं विश्वनाथाच्या मंदिराजवळील ज्ञानवापीचा मंडप सन १८२८ त बांधला. ह्याशिवाय त्यांनीं मणिकर्णिका घाटाजवळ गंगेला पण घाट बांधला. तो खरोखरच अप्रतीम होता. परंतु पाया थोडा कच्चा झाल्यामुळें म्हणा, वरील रचनेचा बोजा अधिक झाला म्हणून म्हणा, गंगेनें खालून पाया पोखरला म्हणून म्हणा, घाटाच्या अद्वितियतेबद्दल कर्त्याला फार अभिमान झाला म्हणून म्हणा किंवा लोकापवादाप्रमाणें घाटाच्या पायामध्यें सांपडलेल्या समाधींतील संन्याशाच्या शापानें म्हणा तो घाट पूर्ण झाल्यावर थोड्याच काळांत झुकला व तशाच स्थितीमध्यें जवळजवळ ११० वर्षें राहिला. मध्यन्तरीं कै. माधवराव शिंदे काशीस आले त्या वेळीं त्यांनीं तो घाट बघितला व लोकांनीं विनंति केल्यावरून तो पुन्हां बांधून काढण्याचें त्यांनीं कबूल केलें. त्याप्रमाणें १९४० सालीं त्यांचे पश्चात् तो बांधला गेला. सध्यांचा शिंदे घाट हा काशींतील अत्यंत साध्या व रुंद घाटांपैकीं आहे. वरुणा संगमापाशीं आदिकेशवादिकांचीं देवळें शिंद्यांच्या दिवाणानें बांधलीं असें म्हणतात.

सन १७५५ त बिंदुमाधवाचें मंदिर औंधच्या प्रतिनिधींनीं बांधलें आहे व त्याच्या पूजेअर्चेची व्यवस्था पण त्यांचेकडेच आहे.

सन १८१७ त सरदार विंचूरकर यांनीं काळभैरवाचें व वक्रतुंडाचें मंदिर बांधलें. सरदार चन्द्रचूड यांनीं साक्षीविनायकाचें मंदिर बांधलें.

सन १७९५ त नागपूरकर भोसले यांनीं शिंद्यांच्या पलीकडे गंगेस एक घाट बांधला. तो काशींतील एक सुंदर घाट आहे. घाटाच्या मागें त्यांनीं

तीन-चार मजली चांगल्यापैकीं इमारत बांधली आहे. तिच्या गच्चीवरून व सज्जांतून गंगेचा व काशीच्या घाटांचा सुंदर देखावा दिसतो. ह्या इमारती-मध्यें त्यांनीं लक्ष्मीनारायणाचें देवस्थान पण स्थापलें आहे.

बाजीराव घाट, अमृतरावघाट, लक्ष्मणवाला घाट, गणेशमंदिर, अग्नीश्वर व त्रिलोचनेश्वर मंदिरें, ब्रह्माघाटाचा जीर्णोद्धार इत्यादि गोष्टी शेवटचे बाजीराव, अमृतराव पेशवे यांनीं केल्या.

याशिवाय नाना फडणवीस, जमखंडीकर, सांगलीकर, विशाळगडकर, ग्वाल्हेरचे रावराजे राजवाडे, गायकवाड, भोरचे पंतसचिव, आंग्रे इत्यादि मराठी सरदारांनीं काशींत वाडे व मंदिरें बांधलीं आहेत. अन्नपूर्णेचें मंदिर पण मराठ्यांनींच बांधलें असें सांगितलें जातें. यावरून हें स्पष्ट होईल कीं, काशी साम्राज्यामध्यें आली नाहीं म्हणून कांहीं मराठ्यांनीं आपलें कर्तव्य करण्यास कुचराई केली नाहीं, तर साम्राज्यांतील जवळ जवळ सर्व घटकांनीं आपआपल्यापरीं प्रयत्न व पैसा यांनीं जेवढें करण्यासारखें होतें तेवढें करून औरंगजेबानें नष्टभ्रष्ट केलेल्या ह्या भारताच्या ललामभूत क्षेत्राचें पुनरुज्जीवन केलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे औरंगजेबानें काशीचा विध्वंस केल्या-नंतर तिला पुन्हां वैभव प्राप्त करून देण्यांत भारतांत महाराष्ट्रच अग्रेसर राहिला असें म्हटल्यास त्यांत फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं.

अशा प्रकारें काशीनगरीच्या वैभवावर महाराष्ट्राची छाप असली तरी ती पुढें टिकून राहील अशी परिस्थिति आतां राहिली नाहीं. भारतवर्ष स्वतंत्र झाल्यावर राज्य निधर्मी केलें गेल्यामुळें ज्याप्रमाणें हिंदूंचें कायमचें अपरिमित नुकसान झालें आहे त्याप्रमाणें संस्थानें विलीन केलीं गेल्यामुळें महाराष्ट्राचें कायमचें अपरिमित नुकसान झालें आहे. कारण संस्थानिकांमध्यें महाराष्ट्रीय संस्थानिकांची फार मोठी संख्या होती व त्यांच्यामध्यें कांहीं संस्थानिक खरोखर सर्वच दृष्टींनीं मोठे होते. काशीवरील महाराष्ट्राची छाप या संस्थानिकांच्या पूर्वजांच्या धर्मप्रवृत्तीचें फळ होतें. जोंपर्यंत संस्थानिक स्थानापन्न होते तोंपर्यंत त्यांच्या पूर्वजांनीं बांधलेल्या मंदिरांतील पूजा-अर्चा, दानधर्म, उत्सव, अन्न-छत्र सर्व कांहीं चालू होतें; त्यांच्या मंदिरांची, वाड्यांची, घाटांची थोडीफार डागडुजी होत होती; वेळ आल्यास जीर्णोद्धार होण्याची आशा ( वर शिंदे


घाट पहा) होती व ते अधूनमधून काशीस आले कीं त्यांची देखरेख पण होत होती.

महाराष्ट्रांत वैश्यवृत्ति नाहीं त्यामुळें महाराष्ट्रापाशीं पैसा पण नाहीं. महाराष्ट्राची ही लंगडी बाजू पूर्वीच्या काळीं क्षात्रवृत्तीनें मिळविलेल्या राज्यांचे हे वारसदार पुष्कळशी सावरून धरीत होते. आतां राज्यहीन झाल्यामुळें ते हें काम करूं शकणार नाहींत. व महाराष्ट्राला आपली निर्धनता कांहीं काळ तरी जाणवल्याशिवाय राहाणार नाहीं. काशींत तर संस्थानें नष्ट झाल्याबरोबर त्यांच्यामार्फत चाललेलीं बहुतेक सर्व कामें जवळजवळ संपुष्टांत आलीं. आतां तर त्याची स्थावर संपत्ति, फार काय मंदिरेंसुद्धां, विकावयास येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. महाराष्ट्रापाशीं आपल्याच प्रांतांत वापरण्यास पुरेसा पैसा नसल्यामुळें तो असली 'अनर्थकर' संपत्ति विकत घेण्यास परप्रांतांत कोठून पैसा खर्च करणार ? तेव्हां महाराष्ट्रीय वैभवाचीं काशींतील चिन्हें विक्रीस निघाल्यावर तीं परप्रांतीय घेणार हें निश्चित. ते भारतीयच असले तरी ही कल्पना काळजाला घर पाडल्याशिवाय राहात नाहीं— कालाय तस्मै नमः ॥

## लोकवस्ती


काशी हें प्राचीन काळींसुद्धां भरपूर लोकवस्तीचें नगर होतें व आजही तसेंच आहे. पण काशीच्या लोकवस्तीचें महत्त्व तिच्या संख्येपेक्षां भारताच्या विभिन्न प्रांतांच्या प्रतिनिधित्वामध्यें आहे. 'नऊ खंड पृथ्वी व दहावा खंड काशी' अशी जी मराठीमध्यें म्हण आहे तिचा अर्थ 'तीर्थान्यस्वामिकान्याहुः' ह्या स्मृतिवचनानुसार निराळा होत असला 'तरी विस्तार व विविधता हे जे खंडाचे विशेष ते काशीमध्यें आहेत. तेव्हां काशी एक निराळा खंड समजावा असा सुद्धां त्याचा अर्थ करावयास हरकत नाहीं. आणि आज काशीच्या लोकवस्तीचें कोणी सूक्ष्म अवलोकन केल्यास त्याला काशीमध्यें संपूर्ण भरतखंडाचें प्रतिनिधित्व दिसून येईल. यात्रेकरितां, क्षेत्रवासाकरितां, विद्यार्जनाकरितां, 'काश्यां मरणान्मुक्तिः' ह्या वचनानुसार मरणाकरितां काशींत येऊन राहणें हें लोकवस्तीमध्यें निखिल भारतवर्षीय प्रतिनिधित्व येण्याचीं कारणें आहेत. काशीमध्यें एकभाषी किंवा एकप्रांतीय लोक प्रथमपासून एका मोहल्ल्यांत किंवा

चित्र नं. ३




काशी हिन्दु विश्वविद्यालयाचें महाद्वार. ( पृ. ९४ पहा )

चित्र नं. ४



काशी हिन्दु विश्वविद्यालयांत महाराष्ट्र मंडळानें स्थापलेला छत्रपतींचा अर्धपुतळा व लेखकानें त्याभोंवतीं उभारलेला लोखंडी कठडा.

( पृ. ९९ पहा. )



चित्र नं. ५

लेखकानें जीर्णोद्धार केलेलें हिंदु विश्वविद्यालयांतील हनुमान् मंदिर.

(पृ. १०१ पहा.)



चित्र नं. ६

प्राणदात्याच्या दर्शनार्थ चि. चंद्रशेखर केशव दात्ये. वय दीड वर्ष.

(पृ. १७९ पहा.)

घाटावर रहात आले आहेत. जसें— दुर्गाघाट, ब्रह्मघाट यांचे आसपास महाराष्ट्रीय; बंगाली टोला, दशाश्वमेध व केदार यांचे आसपास बंगाली; केदार, हनुमान् यांचे आसपास मद्रासी; गोपालमंदिराचे आसपास (चौखंबा) गुजराथी; नेपाळी मंदिराचे आसपास नेपाळी इत्यादि. ह्या ठिकाणीं तत्तत्प्रांतीय लोक हजारोंच्या संख्येनें राहात असल्यामुळें भाषा, चालीरीती, विशिष्ट खाद्य पदार्थ, सणवार, उपाध्याय, वाचनालय, ग्रंथालय, उपहारगृह इत्यादि सर्व कांहीं प्रांतानुकूल असतें किंवा मिळूं शकतें. त्यामुळें बाहेरील यात्रेकरू आपल्या प्रांतविशिष्ट वस्तींत उतरला कीं त्याला आपण परप्रांतामध्यें आलों आहोंत असें जरासुद्धां वाटत नाहीं.

**बंगाली समाज :—** बंगालनंतर लवकरच काशीवर इंग्रजांचें राज्य झाल्यामुळें बंगाल्यांतील सेवानिवृत्त बंगाली अधिक संख्येनें काशीमध्यें येऊन राहूं लागले. त्यामुळें हिंदी लोकांनंतर काशीमध्यें सर्वांत अधिक संख्या बंगाली लोकांचीच आहे. ह्या लोकांनीं इंग्रजी शिक्षणांत हिंदी लोकांपेक्षां प्रथम आघाडी मारली होती. त्यामुळें त्यांनीं तेथें अनेक विद्यालयें, महाविद्यालयें स्थापलीं आहेत; डॉक्टरी, वैद्यकी, लोखंड, रंग, औषधि, उपहारगृह, हॉटेलें इत्यादि आधुनिक व्यवसाय सुरू केले आहेत व केन्द्रीय तसेंच उत्तर प्रदेशीय सरकारी नोकऱ्यांमध्यें पुष्कळच प्रवेश मिळविला आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे काशीमध्यें शिक्षण, सरकारी नोकरी, आधुनिक व्यापारउदीम ह्यांच्यामध्यें बंगाली जितके प्रामुख्यानें दृष्टीस पडतात तितके अन्य प्रांतीय दृष्टीस पडत नाहींत.

**महाराष्ट्रीय समाज :—** काशींतील महाराष्ट्रीय समाज निदान ८०० वर्षांचा तरी जुना आहे. तो तीर्थोपाध्ये, वैदिक, याज्ञिक, पंडित अशा स्वरूपाचा मुख्यतया आहे. मध्यंतरीं मराठ्यांनीं महाराष्ट्राबाहेर आपलीं राज्यें स्थापलीं व काशीमध्यें अनेक वाडे, मंदिरें, घाट इत्यादि बांधले तरी काशीवर त्यांचें राज्य न झाल्यामुळें तेथील महाराष्ट्रीय समाजाच्या स्वरूपांत कांहीं अंतर पडलें नाहीं. केवळ त्यामुळें अधिक लोक काशीस येऊं जाऊं लागले एवढेंच. काशीमध्यें प्रत्येक प्रांताचे तीर्थोपाध्ये असल्यामुळें प्रत्येक प्रांताचे यात्रेकरू त्यांच्याकडे उतरण्याचा प्रयत्न करतात. परंतु कांहीं हिंदुस्थानी पंडे दूरदूरपर्यंत

आपले दलाल पाठवून इतर प्रांतीय यात्रा आपल्याकडे खोट्याच थापा मारून ओढीत असतात. त्यामध्यें कांहीं महाराष्ट्रीय यात्रेकरूसुद्धां फसतात. याच्या उलट आपले तीर्थोपाध्ये दलाल पाठवावयाचें तर लांबच राहिलें, पत्र पाठविल्याशिवाय नुसते स्थानकावर हजरसुद्धां नसतात. त्यामुळें त्यांच्या वांट्याला इकडे तिकडे फसून गेल्यावर उरलेले केवळ महाराष्ट्रीय यात्रेकरूच येतात. जोंपर्यंत महाराष्ट्रीय भरपूर संख्येनें यात्रा करण्याकरितां काशीस येत होते तोंपर्यंत त्यांचा योगक्षेम ठीक चालला. पण यात्रा करणारांची संख्या जसजशी कमी पडत चालली तसतशी त्यांची स्थिति खालावत जाऊं लागली. दिवसेंदिवस काशींतील महाराष्ट्रीय मंडळींच्या मालकीच्या वाड्यांची संख्या कमी होत जाणें व समाजामार्फत पुष्कळ वर्षें चालू असलेली प्राथमिक मराठी शाळा बंद पडणें ह्या दोन घटनांवरून काशींतील महाराष्ट्रीय समाजाच्या खालावत चाललेल्या स्थितीचें स्वरूप ध्यानांत येईल. हल्लीं सभा-संमेलनें यांच्या निमित्तानें तसेंच प्रवासाच्या सोयीसवलतींमुळें पूर्वीपेक्षां अधिक महाराष्ट्रीय काशींत येऊं लागले आहेत. परंतु संख्या वाढत असली तरी तीमध्यें तीर्थविधि, पूजाअर्चा, ब्राह्मणभोजन इत्यादि करणारे दिवसेंदिवस कमीच होत चालले आहेत. त्यामुळें चांगली स्थिति पुन्हां येण्याच्या बाबतीमध्यें निराश होऊन अनेक जुन्या उपाध्यायांनीं आपल्या मुलांना वेदविद्या शिकविण्याचें बंद केलें व त्यांना इतर शिक्षण देऊन नोकरी किंवा छोट्या धंद्यांत गुंतविलें. त्याचप्रमाणें अनेकांनीं काशींतून पाय काढला. पुण्यामध्यें अनेक काशीकर भिक्षुक कायमचे राहिलेले किंवा लग्नसराईच्या मोसमांत येणारे पुष्कळांना माहिती असतील. काशींतील उपाध्यायांची जेथें ही स्थिति तेथें बाहेरून कोणी येऊन तेथें राहील व हा धंदा करील हें शक्यच नाहीं. तेव्हां पन्नास-पाऊणशें वर्षांनंतर काशींत महाराष्ट्रीय तीर्थोपाध्ये मिळतात किंवा राहतात का नाहीं ही भीति वाटणें साहजिक आहे. परंतु आर्थिक परिस्थितीमुळें अनेकांना हल्लींचें महागडे शिक्षण स्वतःला घेणें किंवा मुलांना देणें परवडण्यांतलें नाहीं. ते साहजिकच काशींत घरीं बसून सर्व प्रकारें फुकट मिळणारें संस्कृत, वैदिक, याज्ञिक शिक्षण घेणार व पुढें पौरोहित्य करणार. तेव्हां काशींतील महाराष्ट्रीय पौरोहित्याची परंपरा बंद पडण्याची भीति नसली तरी त्यांची स्थिति सुधारण्याची मात्र फारशी आशा वाटत नाहीं.

ग्रंथ संग्रहालय ... दा. क्र. ७०७९९

# लोहमार्गांचीं स्थानकें

काशीनगरीमध्यें वाराणशी छावणी, काशी, बनारस (वाराणशी) सिटी अशीं तीन स्थानकें आहेत. याशिवाय मोगलसराईहून पण काशीस येतां येतें.

**वाराणशी छावणी** (क्यान्टोन्मेन्ट):—हें काशींतील सर्वांत मोठें लोहमार्गाचें स्थानक आहे. येथें छोटे (उत्तर-पूर्व) व बडे (उत्तरी) लोहमार्ग व बऱ्या लोहमार्गाच्या अनेक शाखा एके ठिकाणीं मिळतात. येथें सर्व गाड्या पुष्कळ वेळ थांबतात. काशीहून निघणाऱ्या गाड्या येथूनच निघतात व येथेंच थांबतात. काशी एक्स्प्रेस येथेंच थांबते व येथूनच निघते. स्थानक मोठें असल्यामुळें स्नान, भोजन, विश्राम इत्यादि सर्व सुखसोयी येथें आहेत. वेळीं अवेळीं केव्हांही आलें तरी स्थानकावर सर्व प्रकारचीं वाहनें मिळतात. काशीनगरीच्या कोणत्याही भागांत जावयाचें असलें तरी हें स्थानक मध्यवर्ती पडतें. तेव्हां काशीला जाणाऱ्यांनीं शक्यतोंवर येथेंच उतरावें व काशी सोडतांना येथून निघावें. थिऑसॉफिकल सोसायटी (कमच्छा) मध्यें जाणारास हें सर्वांत जवळचें स्थानक आहे. हिन्दु विश्वविद्यालयांत जाणारांना हें स्थानक सर्वोत्तम आहे. कारण येथून तेथील माहीतगार रिक्शावाले किंवा टॅक्सीवाले मिळतात. काशीमध्यें हें स्थानक 'सिकरौल' म्हणून प्रसिद्ध आहे.

**काशी**:—ह्याला 'राजघाट' पण म्हणतात. मोगलसराईवरून सडकेनें किंवा आगगाडीनें गंगेचा मालवीय पूल ओलांडला कीं हें स्थानक लागतें. ह्याच्यापुढें वाराणशी छावणी स्थानक येतें. मछोदरी, बिसेसरगंज, भैरवनाथ, मैदागीन त्याचप्रमाणें जुन्या काशींतील राजघाट, गायघाट, दुर्गाघाट, ब्रह्माघाट, पंचगंगा—वेणीमाधव घाटांपर्यंत कोठेंही जावयास हें स्थानक जवळचें पडतें. ऋषि व्हॅली ट्रस्ट (थिऑसॉफिकल सोसायटी) मध्यें जाण्यास हेंच सर्वोत्तम स्थानक आहे. कारण हें ठिकाण स्थानकाच्या पलीकडेच आहे.

**बनारस सिटी**:—हे छोट्या (उत्तर-पूर्व) लोहमार्गाचें स्थानक आहे. ह्याला 'अलईपूर' पण म्हणतात. महाराष्ट्रीय प्रवाशांना याचें कांहींच महत्त्व नाहीं, कारण काशीला येतांना किंवा काशींतून परततांना याचा संबंध येत नाहीं. शहराच्या दृष्टीनें याचें महत्त्व काशी स्थानकासारखें आहे.

**मोगलसराई :—** कलकत्ता मेलनें काशीला येणारास येथें उतरावें लागतें. येथून काशी स्थानक ७ मैल आहे. येथें काशीस जाण्यास रिक्शा, टॅक्सी व सरकारी बस मिळतात: बस सकाळीं ६ पासून रात्रीं ९ पर्यंत अर्ध्या अर्ध्या तासानें असते. तीमध्यें पैसे देऊन सामानसुद्धां घेतात. पहाटें ५ पासून रात्रीं ९ पर्यंत केव्हांही कोणत्याही वाहनानें मोगलसराईस जाण्यास किंवा तेथून येण्यास हरकत नाहीं. पण अपरात्रीं टॅक्सीनेंसुद्धां जाऊं येऊं नये, कारण वाटमारी होण्याचा संभव असतो. मोगलसराईहून काशीस वाहनानें येण्याचें फारसें कारण नसतें. पण सकाळीं मोगलसराईस मुंबईला जाणाऱ्या कलकत्ता मेलला जोडणारी गाडी फार लवकर किंवा बेभरंवशी असल्यामुळें काशीहून बसनें जाणेंच सोईस्कर पडतें. काशींत बस गोदोलियावरून अर्ध्या अर्ध्या तासानें सकाळीं ६ वाजल्यापासून रात्रीं ९॥ पर्यंत सुटत असतात.

## वाहनें

**एक्का :—** हें काशींतीलच नव्हे तर उत्तर हिंदुस्थानांतील प्राचीन पद्धतीचें वाहन आहे. हें शहरांत, खेडेगांवांत सगळीकडे आढळतें. हें एक घोड्याचें, दोन चाकांचें, चाकांवर व आंखांवर किंचित् लांबट चौकोनी लांकडाची बैठक बसविलेलें, आंखांवरील चौकोनी बैठकीच्या चारी बाजूंस चार खांब लावून त्यांच्यावर घुमटासारखी मेघडंबरी असलेलें असें रथासारखें वाहन आहे. मेघडंबरीखालीं एक व दोन्ही बाजूंच्या चाकांवरील फळ्यावर जय-विजयांसारखीं दोन अशीं तीन माणसें बसतात. बसणारांना दोन्ही हातांनीं खांब धरून बसणें जरूर असतें. अन्यथा एकमेकांवर किंवा खांबावर डोकीं आपटण्याची किंवा एक्क्यांतून खालीं फेकले जाण्याची भीति असते. कांहीं एक्के मेघडंबरीशिवाय म्हणजे खुले असतात. त्यांच्यांत धरण्याकरितां खांबांच्याऐवजीं खुंट्या असतात. रिक्शा झाल्यापासून भाड्याचे एक्के जवळजवळ नाहींसे झाल्यासारखेच आहेत.

**रिक्शा :—** मुंबई प्रदेशाप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत माणसानें चालविण्याच्या रिक्शांवर प्रतिबंध नसल्यामुळें काशीमध्यें सध्यां तेंच मुख्य वाहन आहे. ह्यांची संख्या तीनचार हजार तरी असेल. अधिक सामान असल्यास एकास व कमी सामान असल्यास दोघांस ह्या सोईच्या पडतात. ह्या फार जलद चालतात. जेथें बस आहे तेथें ह्या तितक्याच भाड्यांत मिळतात व जेथें बस नाहीं

तेथें सुद्धां ह्या फार महाग पडत नाहींत. उदाहरणार्थ, वाराणशी स्थानकापासून विश्वविद्यालय पांचसहा मैल दूर पडतें. तेथें ह्या एक रुपयात येतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इतकें जलद व स्वस्त वाहन अन्यत्र क्वचितच मिळेल.

**टांगे :—** रिक्शांमुळें एक्क्याप्रमाणें टांगेसुद्धां मागें पडले. पण ते भरपूर सामान व पांच–सहा माणसें घेऊं शकतात व रिक्शांपेक्षां सुद्धां स्वस्त पडतात म्हणून टिकाव धरून राहिले आहेत. यात्रेकरूंना येवढ्याकरितां रिक्शापेक्षां टांगेच करणें चांगलें. मात्र हे रिक्शांपेक्षां सावकाश चालतात.

**टॅक्सी :—** काशीमध्यें वाराणशी छावणी स्थानक, मैदागिन व गोदोलिया येथें भाड्याच्या टॅक्सी मिळतात. पण तेथें त्यांना अंतरमापक व क्रयदर्शक लावलेला नसल्यामुळें त्या महागच पडतात. सारनाथासारख्या जाण्या-येण्याच्या ठिकाणाकरितांच यांचा उपयोग परवडतो. इतर ठिकाणीं अत्यावश्यकता पडल्यास किंवा वेळ वांचवावयाचा असल्यास त्यांचा उपयोग करावा.

**बस :—** गेल्या कित्येक वर्षांपासून काशींत बसची सोय झाली आहे. हिचा मुख्य अड्डा गोदोलियावर आहे. तेथून विश्वविद्यालय, वाराणशी छावणी, कचेरी ( न्यायालय ), मोगलसराई इत्यादि ठिकाणीं गाड्या सुटतात.

**पालखी, मेणा, डोली :—** वरील वाहनें जुन्या वस्तींतील बोळांत जाऊं शकत नसल्यामुळें तेथें अशक्त, आजारी, पंगु, वृद्ध अशा व्यक्तींना स्नान, दर्शन इत्यादिकांकरितां ह्या वाहनांचा उपयोग केला जातो. हीं वाहनें पादचारी माणसांना चैनीखातर बसण्यासारखीं शोभिवंत नसलीं तरी वरीलसारख्या व्यक्तींना फार आरामशीर असतात. जुन्या काशींत होणाऱ्या लग्नमुंजींत नवरदेव व मुंजामुलगा यांना बसण्याकरितां चांदीचा किंवा सोन्याचा मुलामा केलेलें तामजान नांवाचें वाहन वापरतात.

## उतरण्याच्या सोई

**हॉटेलें :—** बनारस छावणी विभागांत क्लार्क, सिसिल, प्याराडाइज, हॉटेल डी प्यारीस व शहरांत मैदागिनमध्यें ग्रॅंड हॉटेल हीं विलायती पद्धतीचीं

व दशाश्वमेध रस्त्यावर सेंट्रल हॉटेल, बनारस लॉज इत्यादि देशी पद्धतीचीं हॉटेलें आहेत.

**धर्मशाळा :**— काशी हें फार मोठें क्षेत्र व यात्रेचें ठिकाण असल्यामुळें त्यामध्यें सार्वजनिक तसेंच विविध जमातींच्या अशा ५० पेक्षां सुद्धां अधिक धर्मशाळा आहेत. पैकीं वाराणशी छावणी स्थानकाजवळील श्रीकृष्ण धर्मशाळा, काशी स्थानकाजवळील मिर्झापुर धर्मशाळा, ज्ञानवापीजवळील राधाकृष्ण धर्मशाळा, गोदोलियांतील हरसुंदरी व पाण्डे धर्मशाळा ह्या कोणालाही उतरण्यास सोईच्या आहेत. महाराष्ट्रीयांच्याकरितां जुन्या काशींत चौंडेमहाराजांची व नवीनच उघडलेली तनपुरेमहाराजांची धर्मशाळा आहे. या शिवाय उपाध्यायांच्याकडेसुद्धां उतरण्याची सोय होते.

ज्यांना काशींत धर्मकृत्यें करावयाचीं नाहींत त्यांना हॉटेल किंवा धर्मशाळा यांमध्यें व ज्यांना तीर्थविधि करावयाचा आहे त्यांना उपाध्यायाकडे उतरणें सोयीचें होतें. काशीस जाण्यापूर्वी त्यांना पत्र पाठवावें म्हणजे ते स्थानकावर येतात. वाटेनें भुसावळपासून काशीप्रयागच्या पंड्यांचे दलाल हिंडत असतात त्यांना कसलाही थांगपत्ता लागूं देऊं नये. नाहींतर ज्यांच्याकडे आपणास जावयाचें आहे त्यांचेच आपण दलाल आहोंत असें ते त्यांची नांवगांव, खूणपत्ता देऊन भासवतात व आपणांस भलतीकडेच नेतात. अशी पुष्कळ फसलेली मंडळी लेखकाला माहीत आहेत. कांहीं मंडळी विश्वविद्यालयांतील आपल्या मित्रांकडे उतरतात. काशीस जातांना पंड्यांनीं किंवा दलालांनीं हटकल्यास विश्वविद्यालयांत जावयाचें म्हणून सांगणें हें सुद्धां त्यांच्या तावडींतून सुटण्याला एक उत्तम निमित्त आहे. ज्यांना तीर्थविधि करावयाचा नाहीं त्यांना विश्वविद्यालयांत उतरणें ठीक आहे. परंतु ज्यांना तीर्थविधि, देवब्राह्मण करावयाचा आहे त्यांनीं दोन दिवस गांवांत उपाध्यायाकडे जाऊन राहणेंच श्रेयस्कर असतें. तसें न केल्यास ते व त्यांचे मित्र दोघांनाही त्रास होतो किंवा गैरसोय सोसावी लागते.

## हवापाणी

काशीकडे ८ महिने उन्हाळा व ४ महिने हिंवाळा असतो. त्यांत एप्रिल ते जुलैपर्यंत कोरडा उन्हाळा व जुलै ते नवंबरपर्यंत ओला उन्हाळा असतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
हवापाणी क्रम २५००८ ... वि: ...
क्रमांक ...२७२...

पहिल्यांत ११५-११६ पर्यंत ताप वाढत जातो, घरें तप्त होतात, कढत वारे वाहावयास लागतात. त्यामुळें दिवसा घराबाहेर निघणें कठिण होतें, निघाल्यास लू (झळ) लागण्याची भीति असते व रात्रीं घरांत निजणें कठिण होतें. दुसऱ्यांत पाऊस सुरू होतो, पाऊस मुंबई-सारखा जोरांत पडतो, ताप कमी होऊन घाम सुरू होतो. इतका कीं, बाहेर पावसाच्या धारा पडत असतांना अंगांतून घामाच्या धारा वाहात असतात. वारा नसल्यामुळें उकाडयाचा फार त्रास होतो. माती चिकणी त्यामुळें घाटांच्या पायऱ्यांवर व कच्च्या रस्त्यावर पाय घसरून पडण्याची व हातपाय मोडण्याची कायमचीच भीति असते. याशिवाय गंगेचें पाणी गढूळ असतें. प्रयागला तर घाट नसल्यामुळें नुसत्या गढूळ पाण्यांतच नाहींतर चिखलांत स्नान करावें लागतें. काशीस नोव्हेंबर ते मार्च हिंवाळा असतो. ह्यामध्यें हवापाणी छान व खाण्यापिण्याची मजा, त्यामुळें ८ महिन्यांच्या उन्हाळ्याची कसर निघून जाते. काशीकडे नाताळ, संक्रातीच्या सुमारास पाऊस पडतो. हा गहूं-हरबऱ्यांच्या पिकांच्या दृष्टीनें फार उपयोगी होतो. कारण तिकडे गहूं-हरबरा सर्रास पेरला जातो, आपल्याकडल्यासारखा विहिरीवर नाहीं. पाऊस पडत असतांना थंडी झोंबरी होते व पडून गेल्या-वर ती पूर्वीपेक्षां जोरावते. त्यामुळें डिसेंबर-जानेवारी हे महिने तिकडे कडाक्याच्या थंडीचे असतात. ह्या दिवसांत आकाश निरभ्र असतांना तास दोन तासांत पाऊस पडूं लागणें ही एक सामान्य गोष्ट आहे. आपल्याकडे आठ आठ दिवस आकाश अभ्राच्छादित असतांना पावसाचा थेंब न पडलेला ज्यांनीं पाहिलेला आहे त्यांना तिकडील पावसाचा हा चमत्कार चांगलाच लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं. पावसाळ्यांत ह्याचें कांहीं वाटत नाहीं. कारण पावसाळा समजून सर्व व्यवहार केले जातात. पण इतर ऋतूंमध्यें या योगानें त्रास होतो, अनेक वेळेला नुकसान होतें, अनेक वेळेला कार्यक्रम बदलावा लागतो व अनेक वेळेला कार्यक्रमाचा विरस होतो.

**काशीस येण्यास उत्तम दिवस** :—हिंवाळ्यांत अधिक थंडी, लहान दिवस (संध्याकाळीं साडेचारास संध्याकाळ व सकाळीं आठाला चांगलें उजाडणें) व पावसाची भीति; उन्हाळ्यांत कडक ऊन, कढत वारे व लू लागण्याची भीति; पावसाळ्यांत अधिक पाऊस, पाणी गढूळ व पाय घसरून

पडण्याची भीति. त्यामुळें काशीस जाण्यास ऋतुसंधीच सोईचे पडतात. म्हणून आश्विन-कार्तिक किंवा माघ-फाल्गुन या महिन्यांत त्रिपुरीपौर्णिमा किंवा महाशिवरात्र यांचे आसपास प्रवाशांनीं काशीस जावें.

## पंचक्रोशी

असीवरुणयोर्मध्ये पंचक्रोशी महत्फलम् ।
अमरामृत्युमिच्छन्ति का कथा इतरे जनाः ॥

पंचक्रोशी वाराणशीच्या प्रदक्षिणेचा मार्ग आहे. या मार्गावरील पंचक्षेत्रांमध्यें तीर्थविधि करीत प्रदक्षिणा घालणें याला पंचक्रोशीची यात्रा म्हणतात. ‘न घडो काशी पण, घडो पंचक्रोशी’ या म्हणीमध्यें पंचक्रोशीच्या यात्रेचें महत्त्व वर्णन केलें आहे. ‘अन्य क्षेत्रे कृतं पापं पुण्य क्षेत्रे विनश्यति । पुण्य क्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति ॥’ अशी आपली श्रद्धा असल्यामुळें काशीसारख्या महाक्षेत्रामध्यें केलेल्या पापाची कोठेंच निष्कृति व्हावयाची नाहीं. पण पंचक्रोशीच्या यात्रेमध्यें त्यांचें क्षालन करण्याची शक्ति आहे. ‘घडे काशी पण न घडे पंचक्रोशी’ अशी दुसरी म्हण आहे. याचा अर्थ पंचक्रोशीची यात्रा काशीयात्रेपेक्षां अधिक कष्टाची व दगदगीची असल्यामुळें काशीयात्रा घडेल, पण ही घडणें कठिण आहे. पहिल्या म्हणीचा अनुभव कोणाला येवो न येवो, दुसरीचा अनुभव यथाशास्त्र यात्रा करणाराला आल्याशिवाय रहात नाहीं. पंचक्रोशीमार्ग जवळजवळ पन्नास मैल लांब आहे. रस्ता चांगलाच रुंद असून दोन्ही बाजूंला छायेकरितां वृक्ष लावलेले आहेत. ही सर्व यात्रा पायीं अनवाणी करावी असें सांगितलें आहे. पक्की सडक अनवाणी चालणाराला बोचते म्हणून पंचक्रोशीची सर्व सडक कच्चीच ठेवली आहे. ह्या सडकेचा प्रारंभींचा कांहीं भाग हिन्दु विश्वविद्यालयाच्या भिंतीला लागून आहे. हवा किंवा रस्त्यावरून मोटारींसारखीं वाहनें चाललीं कीं जवळच्या घरांना धुळीचा त्रास होत असे. तेव्हां सडक पक्की करावी म्हणून अनेक वेळेला अनेक वर्षें बोर्डाला लिहिलें गेलें. परंतु यात्रेकरूंना चालतांना पक्क्या सडकेवर खड्यांचा त्रास होतो (आणि ही गोष्ट खरी आहे). म्हणून बोर्डानें अनेक वर्षें ती पक्की करण्याचें टाळलें. पण शेवटीं विश्वविद्यालयानें फारच लकडा लावला तेव्हां त्याच्या शेजारची अर्धा मैल सडक पक्की केली गेली. वाटेंत काशीपासून

६ मैलांवर कर्दमेश्वर, तेथून ६ मैलांवर भीमचंडी, तेथून १४ मैलांवर रामेश्वर, तेथून ८ मैलांवर शिवपूर व तेथून ६ मैलांवर कपिलधारा असे पांच मुक्काम आहेत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणीं तीर्थ किंवा कुंड, देवालय, प्रशस्त धर्मशाळा, धर्मशाळांना लागून खाण्यापिण्यास व स्वयंपाकास लागणाऱ्या वस्तूंचीं दुकानें आहेत. यात्रेचा प्रारंभ मणिकर्णिका घाटापासून होतो. व यात्रेकरू गंगेच्या कांठाकांठानें अस्सीसंगमापर्यंत आल्यावर तेथील जगन्नाथाचें दर्शन करून पंचक्रोशीच्या रस्त्याला लागतो. प्रत्येक मुक्कामीं स्नान, तीर्थविधि, श्राद्ध व भोजन करून दिवस काढला जातो. व पहाटे उठून पुढचा मुक्काम गांठला जातो. अशा रीतीनें ६ दिवसांत पंचक्रोशीची यात्रा केली जाते.

**कर्दमेश्वर** :—यालाच तेथें कंद्वा म्हणतात. हा पंचक्रोशीचा पहिला मुक्काम आहे. ह्याला जातांना प्रारंभींच डाव्या बाजूला हिंदु विश्वविद्यालय लागतें. हें पंचक्रोशीच्या मर्यादेबाहेर आहे. कर्दमेश्वरास कर्दमेश्वर महादेवाचें देवालय आहे. तें एका मोठ्या पक्क्या तलावाच्या कांठीं पण थोडेंसें आंत असें आहे. तलावाला स्नानाकरितां चारी बाजूंनीं घाट आहेत. तलावाच्या चारी बाजूंनीं आंब्याचे व बकुळीचे मोठे मोठे वृक्ष आहेत. प्रत्यक्ष देवालयावर व आसपास वडाच्या व आंब्याच्या झाडांची छाया आहे. एकंदर हें ठिकाण मोठें रम्य आहे. शंकराशिवाय तलावाच्या कांठीं हनुमान, गणपति इत्यादिकांचीं पण देवळं आहेत. हें ठिकाण विश्वविद्यालयापासून दोन-अडीच मैल आहे. महाशिवरात्रीस विश्वनाथाच्या दर्शनास नुसती ठेचाठेंच असते. म्हणून लेखक त्या दिवशीं विश्वनाथदर्शनास न जातां सहकुटुंब सहपरिवार पायीं कर्दमेश्वरासच जात असे.

**रामेश्वर** :— हा तिसरा मुक्काम आहे. हें ठिकाण वरुणेच्या कांठीं आहे. येथें वरुणेवर घाट व सडकेला पूल आहे. हेंही ठिकाण रमणीय आहे. येथें फार मोठी गोशाळा व पांजरापोळ आहे.

**शिवपूर** :— हें बनारस-अयोध्या लोहमार्गावर पहिलेंच स्थानक आहे. ह्याला बनारसचें उपनगर समजावयास हरकत नाहीं. येथें गिरण्या व कारखाने आहेत. त्यामुळें वस्ती बरीच आहे. पंचक्रोशीच्या मुक्कामांत हेंच एकटें शहरवजा ठिकाण आहे, बाकी सर्व खेडवळ व शांत अशीं ठिकाणें आहेत. येथें पांच पांडव व द्रौपदी यांचीं मंदिरें आहेत.

पडण्याची भीति. त्यामुळें काशीस जाण्यास ऋतुसंधीच सोईचे पडतात. म्हणून आश्विन-कार्तिक किंवा माघ-फाल्गुन या महिन्यांत त्रिपुरीपौर्णिमा किंवा महाशिवरात्र यांचे आसपास प्रवाशांनीं काशीस जावें.

## पंचक्रोशी

असीवरुणयोर्मध्ये पंचक्रोशी महत्फलम् ।
अमरामृत्युमिच्छन्ति का कथा इतरे जनाः ॥

पंचक्रोशी वाराणशीच्या प्रदक्षिणेचा मार्ग आहे. या मार्गावरील पंचक्षेत्रांमध्यें तीर्थविधि करीत प्रदक्षिणा घालणें याला पंचक्रोशीची यात्रा म्हणतात. 'न घडो काशी पण, घडो पंचक्रोशी' या म्हणीमध्यें पंचक्रोशीच्या यात्रेचें महत्त्व वर्णन केलें आहे. 'अन्य क्षेत्रे कृतं पापं पुण्य क्षेत्रे विनश्यति । पुण्य क्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति ॥' अशी आपली श्रद्धा असल्यामुळें काशीसारख्या महाक्षेत्रामध्यें केलेल्या पापाची कोठेंच निष्कृति व्हावयाची नाहीं. पण पंचक्रोशीच्या यात्रेमध्यें त्यांचें क्षालन करण्याची शक्ति आहे. 'घडे काशी पण न घडे पंचक्रोशी' अशी दुसरी म्हण आहे. याचा अर्थ पंचक्रोशीची यात्रा काशीयात्रेपेक्षां अधिक कष्टाची व दगदगीची असल्यामुळें काशीयात्रा घडेल, पण ही घडणें कठिण आहे. पहिल्या म्हणीचा अनुभव कोणाला येवो न येवो, दुसरीचा अनुभव यथाशास्त्र यात्रा करणाराला आल्याशिवाय रहात नाहीं. पंचक्रोशीमार्ग जवळजवळ पन्नास मैल लांब आहे. रस्ता चांगलाच रुंद असून दोन्ही बाजूंला छायेकरितां वृक्ष लावलेले आहेत. ही सर्व यात्रा पायीं अनवाणी करावी असें सांगितलें आहे. पक्की सडक अनवाणी चालणाराला बोचते म्हणून पंचक्रोशीची सर्व सडक कच्चीच ठेवली आहे. ह्या सडकेचा प्रारंभींचा कांहीं भाग हिन्दु विश्वविद्यालयाच्या भिंतीला लागून आहे. हवा किंवा रस्त्यावरून मोटारींसारखीं वाहनें चाललीं कीं जवळच्या घरांना धुळीचा त्रास होत असे. तेव्हां सडक पक्की करावी म्हणून अनेक वेळेला अनेक वर्षें बोर्डाला लिहिलें गेलें. परंतु यात्रेकरूंना चालतांना पक्क्या सडकेवर खडयांचा त्रास होतो (आणि ही गोष्ट खरी आहे). म्हणून बोर्डानें अनेक वर्षें ती पक्की करण्याचें टाळलें. पण शेवटीं विश्वविद्यालयानें फारच लकडा लावला तेव्हां त्याच्या शेजारची अर्धा मैल सडक पक्की केली गेली. वाटेंत काशीपासून

६ मैलांवर कर्दमेश्वर, तेथून ६ मैलांवर भीमचंडी, तेथून १४ मैलांवर रामेश्वर, तेथून ८ मैलांवर शिवपूर व तेथून ६ मैलांवर कपिलधारा असे पांच मुक्काम आहेत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणीं तीर्थ किंवा कुंड, देवालय, प्रशस्त धर्मशाळा, धर्मशाळांना लागून खाण्यापिण्यास व स्वयंपाकास लागणाऱ्या वस्तूंचीं दुकानें आहेत. यात्रेचा प्रारंभ मणिकर्णिका घाटापासून होतो. व यात्रेकरू गंगेच्या कांठाकांठानें अस्सीसंगमापर्यंत आल्यावर तेथील जगन्नाथाचें दर्शन करून पंचक्रोशीच्या रस्त्याला लागतो. प्रत्येक मुक्कामीं स्नान, तीर्थविधि, श्राद्ध व भोजन करून दिवस काढला जातो. व पहाटे उठून पुढचा मुक्काम गांठला जातो. अशा रीतीनें ६ दिवसांत पंचक्रोशीची यात्रा केली जाते.

**कर्दमेश्वर :**—यालाच तेथें कंदवा म्हणतात. हा पंचक्रोशीचा पहिला मुक्काम आहे. ह्याला जातांना प्रारंभींच डाव्या बाजूला हिंदु विश्वविद्यालय लागतें. हें पंचक्रोशीच्या मर्यादेबाहेर आहे. कर्दमेश्वरास कर्दमेश्वर महादेवाचें देवालय आहे. तें एका मोठ्या पक्कया तलावाच्या कांठीं पण थोडेंसें आंत असें आहे. तलावाला स्नानाकरितां चारी बाजूंनीं घाट आहेत. तलावाच्या चारी बाजूंनीं आंब्याचे व बकुळीचे मोठे मोठे वृक्ष आहेत. प्रत्यक्ष देवालयावर व आसपास वडाच्या व आंब्याच्या झाडांची छाया आहे. एकंदर हें ठिकाण मोठें रम्य आहे. शंकराशिवाय तलावाच्या कांठीं हनुमान, गणपति इत्यादिकांचीं पण देवळें आहेत. हें ठिकाण विश्वविद्यालयापासून दोन-अडीच मैल आहे. महाशिवरात्रीस विश्वनाथाच्या दर्शनास नुसती ठेचाठेंच असते. म्हणून लेखक त्या दिवशीं विश्वनाथदर्शनास न जातां सहकुटुंब सहपरिवार पायीं कर्दमेश्वरासच जात असे.

**रामेश्वर :**— हा तिसरा मुक्काम आहे. हें ठिकाण वरुणेच्या कांठीं आहे. येथें वरुणेवर घाट व सडकेला पूल आहे. हेंही ठिकाण रमणीय आहे. येथें फार मोठी गोशाळा व पांजरापोळ आहे.

**शिवपूर :**— हें बनारस-अयोध्या लोहमार्गावर पहिलेंच स्थानक आहे. ह्याला बनारसचें उपनगर समजावयास हरकत नाहीं. येथें गिरण्या व कारखाने आहेत. त्यामुळें वस्ती बरीच आहे. पंचक्रोशीच्या मुक्कामांत हेंच एकटें शहरवजा ठिकाण आहे, बाकी सर्व खेडवळ व शांत अशीं ठिकाणें आहेत. येथें पांच पांडव व द्रौपदी यांचीं मंदिरें आहेत.

त्या प्रांतांतील जनता प्रतिवर्षे कार्तिकाच्या महिन्यांत शेंकडोंच्या संख्येनें व तीन वर्षांनीं येणाऱ्या अधिक मासांत त्याहीपेक्षां अधिक संख्येनें अनवाणी पायीं पंचक्रोशीची यात्रा करतांना दृष्टीस पडते. काशीला येणारे आपले यात्रेकरू पूर्वी पायीं किंवा बैलगाडीनें पंचक्रोशीची यात्रा करीत असत. हल्लीं पायीं पंचक्रोशीची यात्रा करणारे आपल्याकडील यात्रेकरू जवळजवळ नाहींसारखेच झाले आहेत. जर कोणीं केली तर दहावीसजण मिळून मोटार करून एका दिवसांत पांची ठिकाणचीं देवदर्शनें करून यात्रा संपवितात.

---

# तृतीय प्रकरण

## कला–कृषि–व्यापारदर्शन

**काशी हू की कला जाती, मथुरा मसीद होती।**
**शिवाजी न हो तो सुनती सबकी होती ॥**

— भूषण

**वस्त्रव्यवसाय :—** काशी प्राचीन काळीं कलाकौशल्याच्या अनेक व्यवसायांबद्दल प्रसिद्ध होती. त्यामध्यें वस्त्रव्यवसाय सर्वांत महत्त्वाचा होता. तो आजतागायत तसाच टिकून आहे. सध्यांच्या विज्ञानयुगांत जुने व्यवसाय यापुढें कितपत टिकाव धरतील याबद्दल शंका येते, पण या व्यवसायाबद्दल मात्र तसें वाटत नाहीं.

शेले, शालू, साड्या, पैठण्या, कद यांसारखीं विविध रंगरूपांचीं रेशमी व जरीचीं सुंदर सुंदर वस्त्रें विणण्यांत काशीच्या विणकरांचा हात धरणारे भारत वर्षांतच नव्हे, जगांत सुद्धां कोणी असतील असें वाटत नाहीं. त्यामुळें अरबस्तानचे राजे इब्न सौद ज्या वेळीं हिंदुस्थानच्या दौऱ्यावर असतांना काशीस आले त्या वेळीं त्यांनीं तसेंच त्यांच्याबरोबरच्या मंडळींनीं लाख दोन लाख रुपयांचीं वरील-सारखीं वस्त्रें खरेदी करून नेलीं. तीं त्यांनीं स्वस्त भावांत सोनें देऊन विकत

घेतल्यामुळें त्यांतून एक नवीनच प्रकरण उद्भवल्याचें पुष्कळांना स्मरत असेल. हे विणकर शें-पन्नास रुपयांपासून हजार-पांचशें रुपयांपर्यंत आपल्या कल्पकतेनें निरनिराळ्या रंगरूपांचीं वरीलसारखीं नवीन नवीन वस्त्रें काढीत असतात. याशिवाय अधिक भारी किंमतीचीं किंवा विशिष्ट रंगरूपांचीं वस्त्रें कोणीं सांगितल्यास काढून देतात.

परळीवरील श्रीसमर्थांच्या समाधीचें पूर्वीचें रामनामी महावस्त्र अत्यंत जीर्ण झाल्यामुळें त्याबरहुकूम नवीन रेशमी भरजरी रामनामी (रु. २५०) काशींतील ह्या विणकरांकडून काढून घेण्याचें समर्थ सेवा मंडळानें ठरविलें. लेखकानें ती रामनामी ३५० वर्षांच्या उत्सवानिमित्त तसेंच आपल्या काशीवासाचें स्मारक म्हणून श्रीसमर्थांना अर्पण करण्याचा आपला मनोदय मंडळाच्या व्यवस्थापकांना कळविला. त्यांनीं त्याचा स्वीकार करून ती ठीक बनत आहे हें बघण्याचें व बनल्यावर पुण्यास घेऊन येण्याचें काम लेखकाकडे सोंपविलें व त्याप्रमाणें त्यानें तें केलें. त्या वेळीं त्या विणकरांचीं हातमाग लावलेलीं गलिच्छ घरें व तशाच स्वरूपाची भोंवतालची परिस्थिति लेखकास अनायासें बघावयास सांपडली. ती बघून उकिरड्याच्या जागीं सुंदर वनस्पति निर्माण करणाऱ्या सृष्टिकर्त्याची लेखकास आठवण झाली व पुढें जेव्हां 'श्रीराम जयराम जयजयराम' ह्या त्रयोदशाक्षरी मंत्रानें अक्षरशः भरलेली श्रीसमर्थांची भरजरी रामनामी डोळे भरून बघितली तेव्हां समर्थांनीं ज्याप्रमाणें उत्तम कवींना 'कीं हे शब्दसृष्टीचे ईश्वर' असें म्हटलें आहे त्याप्रमाणें ह्या विणकरांना 'कीं हे वस्त्रसृष्टीचे ईश्वर' म्हणावयास हरकत नाहीं असें लेखकास वाटलें.

हे सर्व विणकर मुसलमान असून ह्यांची मुख्य वस्ती मदनपुरा व कांहीं मछोदरी मोहल्ल्यामध्यें आहे. विणकर मुसलमान म्हणून कला मुसलमानी किंवा मुसलमानांच्याबरोबर मुसलमानी देशांतून आलेली असें मात्र नव्हे. काशी बुद्धपूर्व कालापासून सुंदर तलम रेशमी वस्त्रव्यवसायाबद्दल प्रसिद्ध असल्याच्या ऐतिहासिक पुराव्यावरून तसेंच नुकतेच राजे इब्न सौद यांनीं अरबस्तानांत काशीहून नेलेल्या हजारों रुपयांच्या वस्त्रांवरून वरील विधानाची सत्यता लक्षांत येईल. ह्या वस्त्रांचे मुख्य ग्राहक हिन्दूच असल्यामुळें दुकानदार मुख्यतया

हिन्दूच असून त्यांचीं ठोक दुकानें चौकाजवळील कुंज गल्लींत व किरकोळ दुकानें विश्वनाथ गल्लींत आहेत. महाराष्ट्रीय वस्तींत कांहीं मराठी दुकानें पण आहेत. मदनपुऱ्यांत विणकरांनीं सध्यां आपल्या कांहीं अडती पण उघडल्या आहेत.

**भांड्यांचा व्यवसाय :—** हा काशींतील दुसरा मोठा धंदा आहे. यात्रेकरूंच्याकडून होणारी भांड्यांची खरेदी हें त्याचें एक मुख्य कारण आहे. काशीच्या भांड्यांत महाराष्ट्रीय मनाला पटणारी व स्वयंपाकाला उपयुक्त अशी भांडीं फार थोडीं. त्यामुळें आपले यात्रेकरू वरणाकरितां गुंड, भाताकरितां जड बुडाचे गंज, मुदीकरितां वाकड्या दांड्याच्या पळ्या, गंगेकरितां गंगाजळ्या अशासारखीं कांहीं भांडीं घेतात. पूर्वीं तेथें लहानमोठीं नक्षीची ओगराळीं मिळत. तीं पण आपले लोक घेत. आतां तीं मिळत नाहींत. भांड्यांच्या दुकानांत फार मोठमोठीं पातेलीं, घागरी, हंडे, पराती अशासारखीं भांडीं दृष्टीस पडतात. तीं लग्नांत देण्याकरितां घेतलीं जातात. काशीच्या भांड्यांमध्यें ठोकीवइतकींच जवळजवळ ओतीव भांडीं असतात. ओतीव भांडीं तयार करणें हा तिकडे जुना ग्रामोद्योग आहे. विश्वविद्यालयाच्या आसपास हा उद्योग जोरदार चालत असल्यामुळें तेथें रात्रीं खरकट्या भांड्यांच्या व पितळी नळांच्या नेहेमीं चोऱ्या होत. काशींत ओतीव भांड्यांकरितां तांब्यापितळ्याइतकें कासें व जर्मन-सिल्वर पण वापरलें जातें व गंगाजळीसारखीं कांहीं भांडीं गंगाजमुनी म्हणजे अर्धीं तांब्याचीं व अर्धीं पितळेचीं पण केलीं जातात. भांड्यांच्या दुकानांत संसारोपयोगी भांड्यांशिवाय देवळांचे कळस, पितळी पताका, घंटा, पंचारत्या, अभिषेकपात्रें, कमंडलु व देवता इत्यादि देवपूजेचीं व देवळांचीं भांडीं असतात. पुष्कळ मंडळी काशीहून वरील भांड्यांशिवाय कमंडलूची झारी, अन्नपूर्णा इत्यादि घेऊन जातात. भांड्यांचीं दुकानें ठठेरी (ठोकून भांडीं करणारास 'ठठेरा' म्हणतात) बाजारांत व विश्वनाथ गल्लींत आहेत.

**लांकडी खेळण्यांचा व्यवसाय :—** पशु, पक्षी, वाहनें, देवता, मुलांचीं खेळणीं इत्यादि असंख्य लांकडी रंगीत वस्तु बनविण्याचा काशींत फार मोठा व्यवसाय आहे. कलेच्या दृष्टीनें सर्वच जिन्नस उत्तम नसले तरी कांहीं खरोखरच उत्तम असतात व किंमतीचा विचार केला कीं इतके सुंदर, स्वस्त जिन्नस

दुसरीकडे मिळणें शक्य नाहीं असें म्हणावें लागतें. त्यामुळेंच यात्रेकरू कांहीं ना कांहीं तरी घेतल्याशिवाय रहात नाहींत.

**करंडे :—** ही काशींतील घेण्यासारखी एक नमुनेदार लांकडी वस्तु आहे. आपल्याकडे चैत्री व संक्राति हळदीकुंकवाचे प्रसंगीं सवाष्णींना देण्याकरितां एखादी वस्तु लुटण्याची चाल आहे. लेखकाची पत्नी मधून मधून त्याकरितां हे करण्डे वापरीत असे, इकडे आणून आपल्या आप्तेष्ट-मैत्रिणींना काशीचा प्रसाद म्हणून देत असे व कोणी मागितल्यास त्यांना आणून पण देत असे. हे लहानमोठे, अनेक आकारांचे, साधे, रंगविलेले किंवा अक्षर-चित्रांनीं चित्रित केलेले असे मिळतात.

**लांकडी छाप :—** हे दोन प्रकारचे मिळतात. एक संक्रान्तीच्या तिळकुटाच्या वड्या बनविण्याकरितां. हे विटाळयासारखे असून बदामासारख्या, किलवरासारख्या किंवा चारी बाजूंला किलवरासारख्या वड्या बनवितात. दुसरे मिठाईकरितां आहेत. हे श्रीखंडाच्या वड्या, पेढे बनविण्यास फार छान पडतात. हे अनेक प्रकारांचे व नक्षीदार असतात. मिठाईचे दुकानदार अनेक प्रसंगीं आपल्या मिठायांकरितां ह्या छापांचा उपयोग करतात. लांकडाच्या वस्तूंचीं दुकानें ज्ञानवापीपासून दशाश्वमेधाकडे येणाऱ्या गल्लींत आहेत.

**मन्दिर-मूर्ति व्यवसाय :—** मन्दिर बांधणें व मूर्ति बनविणें हा काशींतील प्राचीन व्यवसाय आहे. हजार वर्षांपूर्वीं काशींत निदान हजार तरी मंदिरें असल्याचा पुरावा ( पृष्ठ ३१ ) मिळतो. तीं मन्दिरें महंमद घोरीनें ११९४ त नष्ट केलीं. त्यानंतर पांचशें वर्षेपर्यंत मुसलमान वेळोवेळीं काशीवर आक्रमण करून मधून मधून बांधल्या जाणाऱ्या मंदिरांचा विध्वंस करीत आले. औरंगजेबानंतर मंदिरांचा विध्वंस बंद झाला. त्यामुळें प्राचीन काळापासून औरंगजेबानंतर दोनशें वर्षेपर्यंत हा व्यवसाय टिकून राहिला. आतां काळ पालटल्यामुळें, लोकांची मनोवृत्ति बदलल्यामुळें व स्थानाभावामुळें हा धंदा पुढें फारसा टिकून राहणें शक्य नाहीं.

प्राचीन व मध्यंतरींच्या काळांत काशींत बांधलीं गेलेलीं सर्व मंदिरें धर्मांध मुसलमानांनीं नष्ट केल्यामुळें त्यांच्या कला-कौशल्याबद्दल कांहींच लिहिणें शक्य नाहीं. सध्यां काशींत असलेलीं मंदिरें गेल्या दोनशें वर्षांतील आहेत. तीं फार

प्रशस्त व भव्य नसलीं तरी कलेच्या दृष्टीनें उत्तम आहेत हें काशींतील अनेक मंदिरें बघून कोणाच्याही लक्षांत येईल.

काशीमध्यें मूर्ति तयार करण्याचा धंदापण जुनाच आहे. त्या काळीं येथील कारागीर सुंदर मूर्ति बनविण्याबद्दल फार प्रसिद्ध होते व त्यांनीं बनविलेल्या मूर्ति दूर दूर जात होत्या. त्यांची परंपरा अजून चालू आहे. पण त्यामध्यें प्राचीन काळची सुंदरता आतां राहिली नाहीं. ह्यांचीं दुकानें ज्ञानवापी मशिदीकडे जाण्यास पायऱ्या उतरल्यानंतर डावीकडील गल्लीमध्यें आहेत.

**काशी व सारनाथ :—** काशींतील हिंदूंचीं मंदिरें अनेक वेळेला नामशेष होऊन सुद्धां आज त्यांची संख्या पांच हजारांच्यावर आहे. यावरून या बाबतींतली हिंदूची चिकाटी लक्षांत येईल. सारनाथास बुद्धांची काशी म्हणावयास हरकत नाहीं. तें स्थान काशीजवळच आहे. अशोकापासून त्याची सारखी वाढच होत गेली. सातव्या शतकांत भारतांत आलेल्या व्हेनसांग ह्या चिनी प्रवाशानें सारनाथामध्यें १५०० भिक्षु होते असें लिहिलें आहे. १२ व्या शतकांत काशीबरोबर मुसल्मानांनीं सारनाथचा पण विध्वंस केला. त्यानंतर सातशें वर्षें सारनाथ जगांतून उठलें, त्याचें अस्तित्व बुद्धजग विसरून गेलें, मग मठमंदिरादिकांच्या जीर्णोद्धाराची व पुनर्निर्माणाची गोष्टच कशाला विचारतां ! पुढें इंग्रजी राज्य झाल्यावर आकस्मिक रीत्या ( पुढील प्रकरण पहा ) त्याचा पत्ता लागला. आज सारनाथला जी ऊर्जितावस्था आली आहे ती हिंदूंच्याचमुळें आहे.

हिंदुस्थानाला स्वराज्यप्राप्ति झाल्यानंतर ज्या ज्या वेळीं हिंदुत्वाभिमानी लोक अधिकारारूढ पक्षा ( सरकार ) ला, पूर्वी मुसलमानांनीं हिंदूंच्यावर केलेल्या अन्यायाचें परिमार्जन व हिंदुधर्मावलंबियांचें संरक्षण करण्याच्या दृष्टीनें प्रश्न करीत आले त्या त्या वेळीं अधिकारारूढ पक्ष आपला भेकडपणा लपविण्या-करितां तसेंच परस्पर दुसऱ्याचे बळी देऊन जगांत आपल्या उदारतेचा डांगोरा पिटण्याकरितां ' तुमच्या पूर्वजांनीं हें कां नाहीं केलें ? त्यांनीं असला मूर्खपणा केला, तसला मूर्खपणा केला, अशा प्रकारचीं उडवाउडवीचीं उत्तरें देत आला. ह्या बाबतीमध्यें एक गोष्ट निक्षून सांगावीशी वाटते ती ही कीं, काशीवर जर मराठ्यांचें राज्य झालें असतें तर त्यांच्या धन्वन्तऱ्यांनीं हिंदूंच्या मर्मस्थानीं सलत असलेलीं काशींतील शल्यें (पृष्ठ ३२) काढून टाकलीं असतीं.

राहिला प्रश्न पूर्वजांच्या मूर्खपणाच्या आचारविचाराचा. या बाबतीमध्यें नम्रपणें असें सुचवावेंसें वाटतें कीं, ज्यांनीं भारताचा जवळजवळ तिसरा हिस्सा धर्माच्या नांवावर मुसलमानांना बहाल केला, हिन्दुमुसलमानांत संख्येची अदलाबदल न करून तेथील आपल्या करोडों धर्मबांधवांवर निर्वासित होण्याचा किंवा तेथें अपमानाचें जीवित जगण्याचा किंवा मुसलमान होण्याचा प्रसंग आणला, भारताला आर्थिक व राजकीय दृष्ट्या कायमचा कमजोर बनविला व त्यानंतर सुद्धां पुन्हां पाकिस्तान होण्यास व हिन्दूंची गळती जारी राहण्यास अनुकूल अशीं कृत्यें किंवा कारणें चालूच ठेविलीं त्यांनीं स्कॉटच्या खालील उपदेशाचा विचार करून तरी आपल्या पूर्वजांना त्यांच्या धार्मिक आचारविचार-रूढीबद्दल नांवें ठेवण्याचें सोडून द्यावें.

We call our fathers fool so wise we grow
Our wiser sons no doubt would call us so.

**मातीच्या भांड्यांचा व्यवसाय :**—गंगाकांठची जमीन फार चिकणी. तींत औषधालासुद्धां खडा सांपडावयाचा नाहीं. कोरडी माती दगडासारखी कडक पण भिजली कीं झाली लोण्यासारखी मऊ. चुली-शेगड्या घालण्या-सारवण्यास फारच छान. कुंभारकामास पण ती फार उत्तम. विशेष मेहनत करावी लागत नाहीं. त्यामुळें तिकडे मातीचीं भांडीं करण्याचा फार मोठा धंदा आहे. हीं मातीचीं भांडीं फार सुंदर, सुबक, सफाईदार व स्वस्त असतात. काशींत सर्व प्रकारचीं मातीचीं भांडीं होतात व तीं भरपूर वापरलीं पण जातात. जुन्या वाण्याच्या दुकानांत जवळजवळ सर्वच जिन्नस मातीच्या रांजणांत ठेवलेले आढळतील. दहींवाल्यांचें दहीं मातीच्या भांड्यांत विरजलेलें दिसेल. दहीं, दूध, तेल, तूप विकणारांच्या दुकानीं तुमच्यापाशीं भांडें नसल्यास मातीच्या भांड्यांतच वरील वस्तु मिळतील. शहरांतील तसेंच स्थानकावरील पेयविक्रेते मातीच्या पुर्व्यांतूनच तुम्हांस पेय देतील. ही पद्धति विकणाराच्या दृष्टीनें जशी सोईस्कर तशी पिणाराच्या दृष्टीनें सुरक्षित. विक्रेत्यानें पेय द्यावें, पैसे घ्यावे, पुढें चालू लागावें व पिणारानें पेय घ्यावें, सावकाश प्यावें, भांडें फेकून द्यावें. एका बादलींत सर्वांचीं उष्टीं भांडीं ठेवून त्यांच्यांतून दुसऱ्यास पेय पिण्यास देण्याच्या घाणेरड्या पद्धतीपेक्षां ही पद्धति अधिक स्वच्छ व

हितकर आहे याबद्दल कोणाचाच मतभेद होणार नाहीं. लग्नसमारंभ, सभा-संमेलनें, वार्षिकोत्सव इत्यादि प्रसंगीं होणाऱ्या जलपानाकरितां काशींत बहुधा मातीचीं भांडींच वापरतात. स्वच्छता, काटकसर, स्वतंत्रता, निष्काळजीपणा ह्या दृष्टीनें मातीचीं भांडीं खरोखरच सोईचीं पडतात. धातूंच्या भांड्यास हात लावावयाचा नाहीं असा जर कोणी संन्यासी, बैरागी, विरक्त ह्यांनीं नियम केला तर काशींत तरी मातीच्या भांड्यांमुळें त्याला कसलीच अडचण पडणार नाहीं.

मातीच्या भांड्यांप्रमाणेंच काशीस मातीचीं चित्रें व खेळणीं यांचा फार मोठा धंदा आहे. इतकीं सुंदर व स्वस्त खेळणीं तशींच चित्रें अन्यत्र मिळणें कठिण. यांचा स्वतंत्र बाजार नसून सण, पर्व, मेळा असेल त्या वेळीं सडकेवर यांचीं दुकानें लागतात. तीं बघितलीं कीं आज कोणचा तरी मेळा आहे असें समजावें.

**बांगड्या :—** लाखेच्या व जडाऊ स्वरूपाच्या कांहीं बांगड्या काशींत बनत असल्या तरी बांगड्यांच्या उत्पादनाचें काशी हें स्थान नसून फिरोजपूर आहे. पण काशी हें सर्वांत मोठें क्षेत्र असल्यामुळें तेथें त्यांचा फार मोठा खप होतो. काशींत कांचेच्या, कचकड्याच्या, रबराच्या, लाखेच्या, लाखेवर जडाऊ काम केलेल्या सुतापासून आंगठ्यायेवढ्या जाडीच्या, नाजूक, मजबूत, असंख्य रंगरूपाच्या विविध प्रकारच्या बांगड्या मिळतात. तेथल्याइतक्या विविध प्रकारच्या बांगड्या अन्यत्र मिळणें कठिण. हीं बांगड्यांचीं दुकानें ज्ञानवापीकडे उतरावयाच्या पायऱ्यांपासून सुरू होऊन उजवीकडील गल्लींतून दशाश्वमेध रस्त्यापर्यंत पसरलीं आहेत. ह्या दुकानांतून वरील सर्व प्रकारच्या बांगड्या लहानमोठ्या अडण्यांवरून उत्तम रीतीनें सजवून ठेवलेल्या असतात. त्यामुळें काशींतील बांगड्यांचीं कांहीं दुकानें रात्रीं विजेच्या चमचमाटांत जवाहिऱ्यांच्या दुकानासारखीं आकर्षक दिसतात.

**काचेचे डोल्हारे :—** काशींत घेण्यासारखी ही वस्तु आहे. लांकडी डोल्हाऱ्यावर विविध रंगरूपाच्या काचा लाखेनें चिकटवून हे बनविले जातात. नवरात्रांत, चैत्रमासांत विशेषतः हळदीकुंकवाच्या दिवशीं देवी बसविण्यास हे

फारच उपयुक्त आहेत. ज्ञानवापी मशिदीकडच्या पायऱ्या उतरून उजवीकडे जाणाऱ्या बोळांतील दुकानांत हे मिळतात.

**गोटा बादला :—** काशींत झीगच्या फार सुंदर वस्तु मिळतात. त्यांमध्यें गळ्यांतील हार निर्देश करण्यासारखे आहेत. हे तिकडे लग्नाच्या वेळीं वधूवरांच्या, सभा - संमेलनांत अध्यक्षांच्या व सन्मान करण्याच्या वेळीं सन्माननीय व्यक्तींच्या गळ्यांत घालण्यास वापरतात. सेवानिवृत्तीच्या वेळीं मिळालेला हार लेखकानें त्याचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून आपल्यापाशीं ठेवला आहे. ह्याचीं दुकानें चौकांतील कोतवालीच्या मागें आहेत.

**देवांचे वस्त्रालंकार :—** देवांच्या मूर्तींप्रमाणेंच देवांचे किरीट, कुण्डलें, शेले इत्यादि वस्त्रालंकार काशींत बनविण्याचा धंदा आहे. ह्या वस्तु चोखंबामधील गोपालमंदिरांतील दुकानांत मिळतात.

**सुगंधी द्रव्यें :—** काशी हजारों वर्षांपूर्वीपासून सुगंधी द्रव्यांविषयीं प्रसिद्ध होती व त्या वेळीं त्या द्रव्यांचा तेथें फार मोठा व्यापार चालत असे. आज सुद्धां काशी तेलें, अत्तरें, अर्क, जल, उटणें इत्यादि विविध प्रकारच्या सुगंधी द्रव्यांचें फार मोठें व्यापारी केंद्र आहे. या सुगंधी द्रव्यांच्या ठोक व्यापाऱ्यांचीं दुकानें चौकामध्यें व किरकोळ व्यापाऱ्यांचीं दुकानें शहरभर आहेत. मेवामिठाई, शरबत यांसारख्या खाण्यापिण्याच्या द्रव्यांकरितां, तसेंच अंगाला लावण्याकरितां तिकडे सुगंधी द्रव्यें वापरण्याचा फार रिवाज आहे. त्यामुळें खुद्द शहरांत रोज या द्रव्यांचा भरपूर खप होतो. याशिवाय तेथून बाहेर माल जातो तो वेगळाच.

आयुर्वेदांत स्वस्थ मनुष्यानें 'अभ्यंगमाचरेन्नित्यं' रोज मालिश करावें व त्याकरितां 'सार्षपं गंधतैलं च यत्तैलं पुष्पवासितम्' सरसोंचें (मोहरीचें) किंवा सुगंधी तेल वापरावें म्हणून सांगितलें आहे. आपल्याकडे वासाचें तेल दिपवाळीकरितां व मालिश पहिलवानांकरितां, रोग्यांकरितां किंवा बाळंतिणीकरितां हें ठरून गेलेलें आहे. बाळंतपणाच्या नवीन पद्धतीमध्यें तेंही नाहींसें झालें आहे. तिकडे रोज मालिश करणारे किंवा करून घेणारे व त्याकरितां सरसोंचें किंवा वासाचें तेल वापरणारे हजारों स्त्री-पुरुष आहेत. पं. मालवीय नित्यनियमानें मालिश करून घेत असत. कितीहि कामें असोत, मालिश

चुकावयाचें नाहीं. गांठीभेटी मालिश होतांना येत. मालिशच्या रिवाजामुळें तिकडे उत्तम मालिश करणारे स्त्री-पुरुष मिळतात. तेल लावल्यावर ऊन पाण्यानें स्नान केलें पाहिजे अशी तिकडे समजूत नाहीं. आठ महिने उन्हाळा असल्यामुळें तिकडे ऊन पाण्यानें स्नान करण्याचा रिवाज नाहीं. हिवाळ्यात दुपारीं स्नान करतील किंवा खालचा वर्ग स्नान करणार नाहीं. पण स्नानाला ऊन पाणी कोणी घेणार नाहीं. त्यामुळेंच घाटावर फुटकळ सुगंधी तेलें विकणारे नेहमीं बसलेले असतात व लोक त्यांच्याकडून दोन-चार पैशांचें तेल विकत घेऊन तेथेंच मालिश करून गंगास्नान करतांना दृष्टीस पडतात. बनारसी शौकीन लोक घाटावर उन्हांत तास अर्धा तास मालिश करून मग गंगेंत डुंबतात.

**शेती :—** काशीकडील नांगर इतका हलका व आटोपशीर असतो कीं, शेतकरी त्याला बलरामाप्रमाणें खांद्यावर टाकून शेतावर नेत असतो. त्याचे बैल इतके लहान व दुबळे असतात कीं, कामाच्या वेळीं त्यांना मधून मधून खाण्यास देणें जरूर असतें. त्याची मोट इतकी हलकी असते कीं, भरून वर आल्यावर त्याची बायको ती थारोळ्यांत ओतून रिचवूं शकते व तिला सोंड नसल्यामुळें ती रिचवावी पण लागते. त्याची पेरणी इतकी वेडीवांकडी असते कीं, ती पुढें नांगर चालवून त्याच्या फाळांत मागून हातानें बी पसरवीत केली जाते व त्याच्यापाशीं पाभार नसल्यामुळें त्याला ती तशी करावी पण लागते. सारांश, तिकडील शेतीचीं अवजारें व तिची केली जाणारी मशागत दोन्ही निकृष्टः असतात. तरीसुद्धां भूमि सुपीक असल्यामुळें पाऊसपाणी वेळेवर झाल्यास पीक भरघोस येतें.

**बैलगाड्या :—** ह्या फारच अवजड व ओबडधोबड असतात. याची कल्पना येण्यास एवढें सांगितलें म्हणजे पुरे कीं, ज्याप्रमाणें गांवठी वेड्या-वांकड्या तराजूच्या पारड्याला तोल ठीक राहावा म्हणून अनेक लोखंडाचे तुकडे बांधलेले असतात त्याप्रमाणें भरलेल्या गाडीचा तोल ठीक राहावा (ती धुराळ किंवा उराड होऊं नये) म्हणून तिच्या धुरीं किंवा उरीं अनेक अर्ध्या-पाव मणाचे दगड ठेवावे लागतात. अर्थात् ही आवश्यकता नेहमींच असल्या-मुळें हे दगड गाडींत कायमचेच ठेवलेले असतात. ह्या गाड्या इतक्या मोठ्या

असतात कीं, लहान गाड्या आपल्याकडील जवळजवळ दोन गाड्यांचा व मोठ्या गाड्या तीन-चार गाड्यांचा बोजा नेऊं शकतात. येवढ्या बोजानें आंख तुटूं नये म्हणून चाकांच्या बाहेरून रथाप्रमाणें त्याला लाकडी कमानीचा आधार दिलेला असतो.

गाड्यांचे बैल शेतकीच्या बैलांसारखे दुबळे नसून दणकट व धिप्पाड असतात. लहान गाडी एक बैलाची व मोठी दोन बैलांची असली तरी गाड्यांत बोजा फार लादीत असल्यामुळें भरलेल्या गाड्यांना पुढें आणखी एक बैल जोडण्याचा रिवाज आहे. मोकळ्या गाड्यांना हे बैल नुसते मागें बांधून नेतात. ह्या पुढच्या जनावरांना पाणिनीय परिभाषेंत 'प्रष्ठ' म्हणतात. 'प्रष्ठोऽग्रगामिनि' ह्या पाणिनीच्या सूत्रावरून ही पद्धति त्याच्याहि पूर्वीची दिसते.

**दूधदुभतें :—** काशीकडे पूर्वी दूधदुभत्याच्या सुबत्तेबरोबर स्वस्तता पण होती. आतां सुबत्ता असली तरी स्वस्तता मात्र राहिली नाहीं. तरीसुद्धां इकडल्यापेक्षां तिकडे दूधहि थोडें स्वस्त पडत असे.

**गाईचें दूध :—** आपल्याकडे गाईचें दूध कमीच. लहान मुलें, आजारी ह्यांच्या पिण्यापुरताच त्याचा वापर. म्हणजे तें एक औषधापैकींच समजलें जातें. ह्यामुळें गवळी आपल्या म्हशींमध्यें एखादी गाय ठेवतात. आतां दुग्धालयें झाल्यापासून गाईचें दूध मिळणेंसुद्धां कठिण झालें आहे.

काशीकडे म्हशींच्या बरोबरीनें गाई पाळतात. आयुर्वेदामध्यें गाईचें दूध "जीवनीयं रसायनं" म्हणजे सर्व दुधांत श्रेष्ठ मानलें गेलें आहे. पिण्यास सर्वोत्तम दूध गाईचें. काशींत अजून पुष्कळ लोक सर्वच कामाकरितां व त्याहि-पेक्षां अधिक लोक पिण्याकरितां गाईचें दूध वापरणारे आहेत. विश्वविद्यालयांत सकाळचे वेळीं वसतिगृहासमोरच्या सडकेनें जावयास लागलें कीं गाईचें समोर काढून घेतलेलें शुद्ध दूध पिण्याकरितां जमलेले अनेक विद्यार्थी व गाई घेऊन आलेले व दूध काढीत असलेले अनेक गवळी दृष्टीस पडत.

**चारा घालण्याची पद्धति :—** काशींत जनावरांना चारा बारीक कापून घालण्याचा रिवाज आहे. त्याकरितां गोठ्यांतून किंवा शेतांतून मोठमोठे उघड्या तोंडाचे रांजण ( नांद ) मातींत उंचावर पुरून ठेवलेले असतात.

त्यांत कापलेला चारा, मीठ, पेंडेचा चुरा भरपूर पाण्यांत भिजवून ठेवलेला असतो. दिवसांतून दोन किंवा तीन वेळेला असा चारा जनावरांना नियमानें देतात. यामुळें चाऱ्याची तनसडी फुकट जात नाहीं व उन्हाळ्याशिवाय इतर दिवसांत जनावरांना निराळें पाणीसुद्धां पाजावें लागत नाहीं.

काशीकडे चाऱ्याचीं ताटें अंगठ्यापासून मनगटापर्यंत जाड असतात. त्यामुळें तीं तोडून घालणेंच जरूर असतें. पण ताटें मोठीं म्हणून तीं तोडून घातलीं जातात अशी जर कोणाची समजूत असेल तर ती चुकीची आहे. कारण तिकडे बाजरी, जोंधळा, मका यांचीं हिरवीं ताटें, फार काय पावसाळी हिरवें गवत सुद्धां तोडून, बारीक करून घातलें जातें. तेव्हां चारा फुकट जाऊं नये म्हणूनच तो तोडून बारीक करून घातला जातो हें उघड होईल. यामुळेंच तिकडे बारा महिने बाजारांत विकावयास आलेला ओला–सुका सर्वच प्रकारचा चारा तोडून बारीक करून आणतात.

चारा तोडण्यास तिकडे पूर्वी गण्डासे ( प्रचंड विळे. कसायांच्या विळ्यां-सारखे. ) वापरीत असत व अजूनहि कापण्याचीं यंत्रें नसणारे ते वापरतात. हें मोठें घातक हत्यार आहे. याचा उपयोग तिकडे मारामाऱ्यांमधून केला जातो. हल्लीं मात्र यंत्राचा वापर वाढला आहे व तो खेडोंपाडीं पसरला आहे. शहरांत तर धान्य दळण्याच्या गिरण्यांप्रमाणें चारा कापण्याच्या गिरण्याच निघाल्या आहेत. तेथें आपण नेऊन दिलेला चारा कापून मिळतो किंवा कापलेला तयार चारा विकत मिळतो.

लेखकाच्या लहानपणीं त्याच्या घरीं वैरण कुऱ्हाडीनें तोडून घातली जाई असें त्याला आठवतें. पण एकंदरींत महाराष्ट्रामध्यें चारा तोडून घालण्याची पद्धति नाहीं हेंच खरें. पेंडी घेऊन त्याचें वेटाळें सोडावयाचें. फार झालें तर ती गुडघ्यावर अर्धी मोडावयाची व जनावरांपुढें सोडावयाची एवढेंच. या योगानें चाऱ्याचीं अर्धी अधिक ताटें फुकट जातात.

महाराष्ट्र दुष्काळी प्रांत आहे. त्यामध्यें धान्य व वैरण यांचें दुर्भिक्ष्य कोठें ना कोठें चालू असतें. धान्याचें दुर्भिक्ष्य परप्रांतांतून किंवा परठिकाणाहून धान्य आणणें परवडत असल्यामुळें तितकें जाणवत नाहीं. पण वैरणीचें तसें नाहीं. त्यामुळें धान्यापेक्षां वैरणीचा दुष्काळ जनावरांना फार जाणवतो. तेव्हां

महाराष्ट्रानें खेड्यापाड्यांतून चारा कापण्याच्या यंत्रांचा व शहरांतून चारा कापण्याच्या कारखान्यांचा अवलंब करून वैरणीचें दुर्भिक्ष्य दूर करण्याचा प्रयत्न करणें अत्यंत आवश्यक आहे.

**बाजार :**— दशाश्वमेध, विश्वनाथगल्ली, ज्ञानवापी, कचौडी गल्ली, ठठेरी गल्ली, चौक व आसपासचा भाग, बुलानाला, बिसेसरगंज, गोलादीनानाथ हे काशींतील प्रमुख बाजार आहेत. यांमध्यें बिसेसरगंज ही धान्य, गाळित, गूळ, साखर, तेल–तूप, भाजीपाला यांची सर्वांत मोठी बाजारपेठ आहे.

गंगाकांठची जमीन ही भारतांतील सर्वांत सुपीक जमिनींपैकीं आहे. त्यामुळें काशींतील बाजारावर सुपीकतेची झांक दिसल्याशिवाय रहात नाहीं. सुपीकतेशिवाय काशीच्या बाजाराची विशेषता विविधतेंतसुद्धां आहे.

**तांदूळ :**— बिसेसरगंजांतील धान्याच्या दुकानांत गेलें कीं तेथें, साधे, भुजिया ( perboiled ), वासाचे ( वसुमति, डेहराडून, तुळशीफूल इत्यादि) व बिनवासाचे, देशी रंगून, बारकेमोठे व प्रत्येकाचे नवेजुने तसेच अन्य अनेक नमुने असे १०–२० प्रकारचे तांदूळ बघावयास सांपडतात. पूर्वी १०–१५ वर्षांचे जुने तांदूळ मिळत असत. शिध्याच्या दिवसांपासून इतके जुने तांदूळ मिळेनासे झाले. तरी तीन वर्षांचे जुने जरूर मिळतात.

**साखर :**—साखरेच्या दुकानांत १०–२० प्रकारची साखर दृष्टीस पडेल. त्यांत १०-५ प्रकारचा साखऱ्या. त्यांचे प्रकार लहानमोठ्या दाण्यावरून. यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. दुसरी खांडसारी ( देशी ) साखर. हिचे पण १०-५ प्रकार असतात. ही साखर असल्यामुळें हिचे प्रकार दाण्यावर नसून ‘यथा यथैषां वैमल्यं’ ह्या वचनानुसार तिच्या गुळीपणावर–अगदीं गुळी, मध्यम गुळी, अल्प गुळी असे–असतात. काशीकडे नवीन पद्धतीनें साखर करण्याचे भरपूर कारखाने असून सुद्धां जुन्या पद्धतीनें साखर तयार करण्याचा धंदा अजूनपर्यंत फार मोठ्या प्रमाणांत नवीन कारखान्यांशीं यशस्वीपणानें टक्कर देऊन टिकला आहे; येवढेंच नव्हे तर स्पर्धेमध्यें त्यांना मागें टाकीत आहे. त्यामुळें कारखानदारांना संरक्षण देण्याच्या दृष्टीनें खांड-सारीच्या उत्पादनावर बंधन घालावें किंवा कसें याचा पण सरकारतर्फें विचार चालू झाला आहे. ही साखर खुली असल्यामुळें शिध्याच्या काळांत काशींत साखर मिळण्याची अडचण भासली नाहीं.

हिच्यामध्यें साखरेचा निर्मळपणा व गुळाचा खमंगपणा यांचा सुंदर संगम असतो. तेणेंकरून हिनें बनविलेले पदार्थ अधिक स्वादिष्ट लागतात. यामुळें तिकडे पक्वान्नें व मिठाया करण्यास हीच साखर अधिक वापरतात. मोतीचुरासारख्या अव्वल दर्जाच्या पक्वान्नाला हीच साखर पसंत करतात. यावरून वरील विधानाची यथार्थता लक्षांत येईल. आयुर्वेदामध्यें ज्या साखरेचें गुणवर्णन आहे ती ही खांडसारी. आधुनिक कारखान्यांतील सुधाशुभ्रशर्करा नव्हे.

**गूळ** :— याची विविधता गुण व खडा या दोहोंवर असते. कच्चा, पक्का, सुका, ओला, चिकीचा, बिनचिकीचा, लाल, पिवळा, पांढरा, काळा असे अनेक प्रकार तिकडे दृष्टीस पडतात. इकडच्यासारखा खारटपणा तिकडील गुळांत आढळत नाहीं. दुसरी विशेषता ढेपेची. तिकडे आपल्याकडल्यासारख्या ओतून तयार केलेल्या मण–अर्धा मणाच्या ढेपा नसून हातानें वळून तयार केलेल्या तोळा, दोन तोळे, चार तोळ्यांच्या छोट्या छोट्या भेल्या ( खडे ) असतात.

**मिठाई** :— यांतील विविधता तर भाजीपाल्यापेक्षां अधिक. आपल्याकडे मिठाई म्हटली कीं प्रथम पेढे व नंतर बर्फी हीं दोनच नांवें डोळ्यांसमोर चटकन् येतात. तिसरें नांव शोधूनच काढावें लागतें. काशीकडे मिठाईमध्यें पेढ्यास फारसें स्थान नाहीं. ते मुख्यतया देवापुढील मिठाईवाल्यांकडे दिसतात. बर्फीला मात्र तिकडे फार प्रतिष्ठा आहे व त्याचे पांचपंचवीस प्रकार असतात. असें असलें तरी आंब्याची बर्फी मात्र तिकडे बनत नाहीं. काशींत बंगाली व हिंदुस्थानी मिळून मिठाईचे शेंपन्नास तरी प्रकार आहेत. हे सर्व प्रकार जुने आहेत असें नाहीं. राष्ट्रीय किंवा तिरंगी बर्फी, ॲटम बॉबसारखे नवीन नवीन प्रकार सुद्धां आहेत. मिठाईचीं दुकानें सर्व शहरभर असलीं तरी ठठेरीबाजार, कचौडीगल्ली व दशाश्वमेधावरील बंगाली टोल्यामध्यें अधिक आहेत. ठठेरीबाजारांतील ‘ राममंडार ’ हें काशींतील मिठाईचें प्रसिद्ध दुकान आहे. मिठायांच्या दुकानांचें ऐश्वर्य दिवाळी व होळीच्या वेळीं बघण्यासारखें असतें.

**साखरेचीं चित्रें** :— काशीकडे पशु, पक्षी, भांडीं इत्यादि साखरेचीं चित्रें फार चांगलीं बनवतात. तीं दिवाळीच्या वेळीं करतात व लक्ष्मीपूजनास साळीच्या लाह्यांबरोबर व आप्तेष्टांमध्यें मिठाईबरोबर वांटतात. काशीचे बत्तासे

पण इकडच्यापेक्षां फार उत्तम. ते पैशायेवढ्यापासून तळहाताच्या बचक्या-येवढे जाड व मोठे असतात. हे बत्तासे कितीही लहान किंवा मोठे असोत, वजनांत फार हलके व खाण्यास बिस्किटांसारखे खुसखुशीत व खमंग. साखरेच्या गांठ्या मात्र आपल्याकडच्यासारख्या तिकडे होत नाहींत.

**लोणचीं :**— मिठाईप्रमाणें आपल्याकडे लोणचीं पण मुख्यतया दोनच. एक आंब्याचें व दुसरें लिंबाचें. तिसऱ्याचें नांव शोधावयास पाहिजे. अर्थात् हें टिकाऊ लोणच्यासंबंधाचें म्हणणें आहे. काशीकडे केवळ खाद्य द्रव्यांचींच नव्हे तर कळकाच्या कोमल कोंबासारख्या एरवीं अखाद्य द्रव्यांचींसुद्धां लोणचीं करण्याची व एक एक लोणचें अनेक प्रकारांनीं करण्याची पद्धति असल्या-मुळें मिठायांप्रमाणें लोणच्यांची संख्या भरपूर आहे. तिकडे लोणच्याकरितां सरसोंचें तेल वापरतात. लोणच्यांचीं दुकानें ठठेरीबाजार व कचौडी-गल्लीमध्यें आहेत.

**भाजीबाजार :**— सट्टी ( भाजीची मंडई ) त गेलें कीं पैशायेवढ्या लहान सोनेरी पानांपासून तळहातायेवढ्या फताड्या काळ्या पानांचा पालक; पांढरा, हिरवा, तसेंच अन्य रंगाचा करंगळीयेवढ्या गोल आकारापासून तळहाता-येवढा फताडा व चपटा घेवडा; करंळीयेवढ्यापासून मनगटासारखे मोठे मुळे; वीतभर लांबीपासून हत्तीच्या सोंडेसारखे मोठे व वांकडे दुधभोपळे; वाटोळीं, लांबोळीं, कांट्यांचीं, बिनकांट्यांचीं, भाजीचीं, कलौंजी ( भरलेली करण्या )चीं, भरताचीं, काळीं, पांढरीं, निळीं, जांभळीं, चितकबरी ( मिश्ररंगांचीं ) मोठ्या बोरायेवढ्यापासून ३-४ शेर वजनापर्यंतचीं १०-२० प्रकारचीं वांगीं; तुरीच्या शेंगेपासून आंगठ्यापेक्षां जाड व टीचभर लांबीच्या मटाराच्या शेंगा; शेर दोन शेरांपासून १५-२० शेर वजनाचे फणस ( काशीकडे आपल्याकडच्यासारखा खाण्याचा कापा फणस नाहींच म्हटल्यास चालेल. जवळजवळ फणसाचा मुख्य उपयोग भाजीकरितांच. जे थोडे पिकतात किंवा पिकवतात ते बरक्यासारखे असतात ); बोटाच्या पेऱ्यायेवढ्यापासून आंगठ्यायेवढें किंवा त्यापेक्षां थोडें मोठें असें परवल, लिंबायेवढ्यापासून घमेल्यायेवढे मोठे फुलावर असे अनेक भाज्यांचे अनेक नमुने दृष्टीस पडतील. वर निर्दिष्ट केलेल्या कांहीं भाज्यांचे नमुने एकाच वेळीं तर कांहींचे ऋतुपरिवर्तनानुसार बाजारांत दिसावयास लागतील. उदाहरणार्थ, मुळ्याच्या मोसमांत प्रारंभीं करंगळीसारखे तर शेवटीं

मनगटासारखे मोठे मुळे येतात व सोल्यांच्या मोसमांत मोहरीयेवढ्या लहानापासून टपोऱ्या दाण्यापर्यंत मोठे सोले एकाच वेळीं दिसतात. सोल्यांचा बाजार चौकांत असतो.

विविधतेबरोबर भावांची फार अधिक चढउतार ही भाजीबाजाराची दुसरी विशेषता आहे. कांहीं भाज्यांच्या अल्पांत अल्प व अधिकांत अधिक भावांत बारापटीपर्यंत अन्तर दिसून येतें. ह्याचें उत्तम उदाहरण बटाटा आहे. नवीन बटाटा निघाला कीं त्याचा भाव सव्वा दीड रुपया शेर इतका अधिक व भर मोसमांत तो दोन आणे दहा पैशाइतका कमी होतो. पूर्वी तर तो एक आण्यापर्यंत उतरत असे. अशीं अनेक उदाहरणें आहेत. काशीमध्यें प्रत्येक मोसमांत येणाऱ्या नवीन भाज्या अत्यंत महाग असल्या तरी त्या उन्मेखून खाणारे श्रीमंतांप्रमाणें गरीब व मध्यमवर्गांत अनेक लोक दृष्टीस पडतात. परंतु सर्वसाधारण जनता आपल्याकडच्यापेक्षां फार गरीब असल्यामुळें सर्वांना त्या घेणें परवडण्यांतलें नसतें. अशा गरीब जनतेला भाज्या महाग म्हणून त्यांच्याशिवाय रहावें लागत नाहीं किंवा नुसतें डोळ्यांनीं बघून संतोष करून घ्यावा लागत नाहीं तर प्रत्येक भाजीच्या मोसमांत ती भरपेट व भरपूर खाऊन शरिराचा परिपोष व मनाचा परितोष करून घेतां येतो.

भावांतील चढउताराप्रमाणें खुद्द भाजीपाल्यांच्या पैदासींतील चढउतार ही काशीच्या बाजाराची तिसरी विशेषता आहे. पुण्यांतील मंडईप्रमाणें तो बारा महिने अठरा काळ एकसारखा हराभरा नसतो. तिकडे हवापाण्याच्या दृष्टीनें जसा हिंवाळा उत्तम तसाच भाजीपाल्यांच्या दृष्टीनें पण उत्तम असतो. सर्व भाजीबाजार ( सट्ट्या ) भाजीपाल्यांनीं नुसते नटलेले असतात. सकाळच्या प्रहरीं एक चक्कर मारली कीं विविध ताज्या टवटवीत भाज्यांनीं नटलेला बाजार बघून मन प्रसन्न होतें व काय घेऊं असें होऊन जातें. वसंतपंचमीनंतर ओहटी सुरू होते. व होळीनंतर पूर्ण ओहटी असते. याशिवाय उन्हाळ्यामुळें भाज्या सुकून जातात तें निराळें. त्यामुळें हिंवाळ्याचा बाजार बघितल्यावर उन्हाळ्यांत बाजारांत जाण्याची इच्छासुद्धां होत नाहीं. कारण हिंवाळ्यांतील चित्र डोळ्यांसमोर उभें राहून मनाला दुःख होतें.

काशींतील भाजीबाजारामध्यें जशा वरीलसारख्या विशेषता दृष्टीस पडतात तशा तेथल्या भाजीपाल्यांमध्यें खालीलसारख्या विशेषता अनुभवास येतात.

पहिली विशेषता नैसर्गिक रुचिगंधाची. तिकडील भाजीपाले सुपीक जमिनी-मुळें भरपूर पोसतात. शेतकरी अजून जुनाट व गरीब असल्यामुळें जमिनींत आपल्याजवळचें शेणखतच घालतो. पण तेवढ्यानें काम भागतें. कृत्रिम किंवा मासळी खताचा वापर तिकडे नसल्यासारखाच आहे. त्यामुळें भाजीपाल्यांच्या नैसर्गिक रुचि-गंधांत फारसा बिघाड झालेला नाहीं. पाकक्षमता ही दुसरी विशेषता. दोन शेरांचें वांगें भाजलें कीं लोण्याचा गोळा बनतें, बियांचें नांव नाहीं. हीच स्थिति अनेक भाज्यांची. काशीला नवीन बटाटा धाकट्या बोरा-एवढा झाला कीं काढावयास सुरवात होते. बाहेरून नितळ व पिवळसर, आंतून सुगंधी व रुचिकर अशा काशीच्या कोवळ्या नव्या बटाट्याची भाजी म्हणजे एक अपरुप खाद्यवस्तु आहे. पुण्याचा बटाटा पूर्वी फारच रद्दी होता, आतां थोडा सुधारला आहे. पण त्यांत नवीनतेची विशेषता नाहीं. उलट नव्यापेक्षां जुनाच लोक बरा समजतात. तिसरी विशेषता ताजेपणा. मोठ्या शहरांतून ताज्या भाज्या मिळणें कठिण झालें आहे. शिळ्याताज्या भाज्या एकत्र केल्या जातात. निवडतां येत नाहींत. याशिवाय भाज्या अशा रीतीनें येतात कीं, त्या ताज्या असल्या तरी त्यांचें ताजेपण नष्ट होऊन जातें. काशीच्या मंडईत अद्यापपर्यंत तरी ज्यांना अंतर्बाह्य ताज्या म्हणतां येतील अशा भाज्या येत असत. विश्वविद्यालयांत तर आंसपासच्या शेतांतून आलेल्या भाज्या आपल्या परसांतल्या भाज्यांइतक्या ताज्या असत. त्यामुळें सदासर्वकाळ सर्व प्रकारच्या भाज्या मिळत असतांनासुद्धां काशीच्या भाज्यांची आठवण वेळोवेळीं झाल्याशिवाय रहात नाहीं.

प्रासंगिक बाजाराच्या दृष्टीनें संक्रांतीनिमित्त भरणारा बिसेसरगंजांतील बाजार बघण्यासारखा असतो. त्या वेळीं तेथें विविध प्रकारच्या पोह्यांचे, तिळांचे व तिळकुटांचे लागलेले ढीगचे ढीग बघितले कीं काशीच्या बाजारांतील विविधतेची व विपुलतेची छाप मनावर बसल्याशिवाय रहात नाहीं.

काशीकडील हवामानाचा प्रभाव अनेक भाज्याफळांच्या मोसमावर व प्रकृतीवर त्यांच्या होणाऱ्या परिणामावर दिसून येतो. तिकडे आंब्याचा मोसम उशीरां सुरू होतो व उशीरांपर्यंत चालतो. आपल्याकडे पाऊस पडल्यावर आंबा खाणें चांगलें समजत नाहींत तर तिकडे पाऊस पडल्यावरच आंब्याला खरी गोडी येते असें मानलें जातें. मटार आपल्याकडे पावसाळ्यांत तर काशीकडे

हिंवाळ्यांत. पोपई आपण गरम समजतों व उन्हाळ्यांत खात नाहीं. तिकडे पोपईचा मोसम भर उन्हाळ्यांत असतो व त्या वेळीं ती खाणें चांगलें समजलें जातें. आपल्याकडे एक वर्षाच्या आंतील म्हणजे नवा तांदूळ खाल्ल्यापासून फारसा त्रास होत नाहीं. वर्षभराचा जुना तांदूळ बाळंतिणी, बालक व रोगी यांनाच देण्याचा रिवाज आहे. डॉक्टरी औषधांचें राज्य सुरू झाल्यामुळें तो तरी सध्यां रिवाज राहिला आहे कीं नाहीं सांगतां येत नाहीं. काशीकडील हवेला नव्या तांदुळांनीं पोटांत वारा धरतो व मुरडा होतो. म्हणून तिकडे जुना तांदूळ खाण्याचा फार रिवाज आहे. नवा खावयाचा झालाच तर वरील कारणाकरितां पेज काढून खाल्ला जातो. जुना तांदूळ महाग असतो व जितका जुना तितका अधिक महाग मिळतो. तरी अनेक वर्षांचे जुने तांदूळ मिळतात. लेखक ३ वर्षांचे जुने तांदूळ वापरी. आळवाची भाजी व तुरीचें वरण हीं नेहमीं घशाशीं जळजळ करीत असत म्हणून लेखकाचे घरीं हे दोन्ही पदार्थ पुण्याकडील आलेल्या पाहुण्यांच्याकरितां राखून ठेवलेले असत. ह्या बाबती-मध्यें इतरांचे काय अनुभव असतील ते असोत.

**फूलबाजार :**— काशींत देवाच्या दर्शनास गेलें कीं त्याला माळा, फुलें चढविण्याचा रिवाज आहे. त्यामुळें अगदीं लहानशा देवळांत किंवा देवासमोर-सुद्धां एखादा माळी थोडीफार फुलें व माळा घेऊन बसलेला असतो. मोठ-मोठ्या देवळांसमोर व देवळाच्या उत्सवाच्या किंवा मेळ्याच्या वेळीं अनेक माळी माळा, फुलें घेऊन बसतात. विश्वनाथ - अन्नपूर्णेकरितां देवळासमोरच्या माळ्यांच्याशिवाय विश्वनाथगल्लीच्या तोंडाशीं दशाश्वमेध रस्त्यावर सुद्धां अनेक फुलवाले बसलेले असतात. परंतु ह्या माळ्यांचीं माळाफुलें स्थानीय देवतेवर चढविण्याच्याकरितांच असतात. लग्नकार्यें, सभासंमेलनें, पूजाअर्चा, उत्सव अशा विशेष प्रसंगीं लागणाऱ्या फुलांच्या सामानाकरितां कोणी ह्या फुल-वाल्यांचा उपयोग करीत नाहींत. ह्यांकरितां लागणाऱ्या फुलांच्या सामाना-करितां काशीस आपल्याकडल्यासारखीं ठिकठिकाणीं माळ्यांचीं दुकानें नसून फुलांचा किंवा माळ्यांचा बाजार आहे. तो ज्ञानवापीवरून बांसफाटकाकडे जाणाऱ्या सडकेवर सत्यनारायणमंदिरापाशीं वळणावर आंतील मोकळ्या जागेंत भरतो. तेथें रोज तीन साडेतीन वाजल्यापासून शहरांतील माळी किंवा फुलाचा धंदा करणारे लोक कालमानाप्रमाणें लागणाऱ्या फुलांच्या सामानांनीं भरलेल्या

टोपल्या घेऊन यावयास लागतात. संध्याकाळीं पांच सहाच्या सुमारास फुलांचा बाजार अगदीं भरगच्च भरलेला असतो. आपल्याला कोणत्याही कामाकरितां किंवा समारंभाकरितां कसलाही फुलांचा माल लागला तरी सहसा कोणाला अगोदर कांहीं सांगावयाची जरुरी नसते. ज्याप्रमाणें मंडईमध्यें जाऊन वाटले त्या प्रकारची वाटेल तेवढी भाजी खरेदी करावी त्याप्रमाणें काशीच्या ह्या फूलबाजारांत जाऊन वाटेल त्या प्रकारचा फुलांचा माल वाटेल तेवढा खरेदी करावा. बाजारांत फुलांचा अनेक प्रकारचा माल असला तरी लहानमोठ्या, पांढऱ्या, रंगीबेरंगी, वासाच्या, बिनवासाच्या, बागेंतल्या, तशाच जंगली फुलांच्या माळांचा किंवा हारांचा माल सर्वांत अधिक असतो. कारण काशीमध्यें (सामाजिक जीवनांत देवदर्शन पहा, प्रकरण ५ वें) माळांचा वापर फार केला जातो.

माळांकरितां अनेक प्रकारचीं फुलें वापरण्यांत येत असलीं तरी झेंडूचा (गेंदा हिन्दी) उपयोग फार केला जातो. आपल्याकडे झेंडू दसऱ्या–दिपवाळीच्या सणांत घरें, गाड्या, घोडे, वाहनें सजविण्याकरितां मुख्यतया वापरला जातो. देवाकरितां त्याचा फारसा उपयोग केला जात नाहीं. काशीकडे देवाकरितां-सुद्धां त्याचा सर्रास उपयोग केला जातो. त्यामुळें काशीच्याभोंवतीं झेंडूचीं शेतें लावलेलीं असतात. तिकडे बाजारांत गेंदासारख्या मोठ्या झेंडूच्या पुरुषभर उंचीच्या माळा येतात. त्या संकटमोचनसारख्या एखाद्या भव्य देवतेला चढविण्यास उपयुक्त असल्या तरी त्यांचा मुख्य उपयोग मांडव, सभामंडप, घरें यांना सजविण्याकरितांच केला जातो. सुकला किंवा शिळा झाला तरी टवटवी नष्ट होत नसल्यामुळें तिकडे मंडपशोभेला झेंडूचा फार मोठ्या प्रमाणांत वापर केला जातो. झेंडूच्या माळा सांड व त्यांचीं खोबरीं माकडें खातात म्हणून गल्ल्यांतून झेंडूची माळ हातांत असतांना सांडापासून व दुर्गेच्या देवळांत माकडांपासून सावध रहावें.

आपल्याकडील स्त्रियांना काशीच्या फूलबाजारांत अभावरूपानें खटकणारी वस्तु म्हणजे वेणी ही होय. आपल्याकडे सदासर्वदा सर्वांत अधिक खपणारी ही फुलांची वस्तु आहे असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. विवाह, हळदीकुंकू अशासारख्या मंगलप्रसंगींच नव्हे तर जवळजवळ रोज आपल्या-कडील स्त्रिया वेणी हा एक अलंकार म्हणून वापरतात. आणि खरोखरच गरीब

स्त्रीलासुद्धां आपली नटण्याची हौस पुरविण्यास परवडेल अशा थाटाचा तो अलंकार आहे. म्हणूनच बहुधा त्याचा इतका वापर होत असावा. परंतु त्यानें नटलेला आपला केशकलाप सरळ डोळ्यांनीं दिसावयाचें लांबच राहिलें, आरश्यांत सुद्धां आपल्या डोळ्याला दिसत नाहीं. ' इतरेजन ' मात्र तो सहज रीत्या बघून आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून घेत असतात, म्हणजे ' कविः करोति काव्यानि स्वादु जानन्ति पण्डिताः ' किंवा ' तरुः प्रसूते पुष्पाणि मरुद्वहति सौरभम् ' अशा स्वरूपाचा तो अलंकार आहे हें तो वापरणाऱ्या स्त्रियांच्या कधीं लक्षांत आलें आहे काय ?

**फळबाजार** — भाजीबाजाराइतकें फळबाजारासंबंधानें लिहितां येण्यासारखें नसलें तरी कांहीं फळासंबंधानें लिहिणें उपयुक्त होईल.

पेरू — हें काशींतील एक नामांकित फळ आहे. प्रयागचे पेरू काशीपेक्षांसुद्धां अधिक प्रसिद्ध आहेत. हे पेरू बचक्यायेवढे मोठे असतात. पण पेरू लहान असोत कीं मोठे त्यांच्यामध्यें बिया कमी व गर अधिक असतो. हे रंगानें पिवळे व रुचीमध्यें ' अमृता 'सारखे गोड असतात. एक मोठा पेरू खाल्ला कीं पोट भरतें व मन प्रसन्न होतें. त्यांच्या रुचीमुळेंच बहुधा पेरूला ' अमरूत ' हा शब्द हिंदीमध्यें रूढ झाला असावा. ह्यांच्यापासून अनेक खाद्य पदार्थ बनत असले तरी जेली व मोरांबा हे दोन निर्देश करण्यासारखे आहेत. जेली डोळ्यांनीं सारखी बघत रहावी व मोरांबा सारखा खात रहावा अशा योग्यतेचे हे जिन्नस आहेत. ते बनत असतांना कांहींही न घालतां त्यांच्यामध्यें मनमोहक रंग उत्पन्न होतो व पेरूच्या सुवासानें घर नुसतें दरवळून जातें. आपल्याकडले पेरू कितीही मोठे व चांगले घेतले तरी त्यांच्यापासून बनविलेल्या वरील जिनसांत ती खुशबू, लज्जत व रंगत येऊंच शकत नाहीं.

**आंवळा** :— हें काशींतील दुसरें नांवाजण्यासारखें फळ आहे. लहानशा बोरापासून छटाकभर वजनापर्यंत मोठे आंवळे तेथें मिळतात. महाराष्ट्रांतील कांहीं कारखानदार औषधांकरितां काशीहून आंवळे मागवितात. महाराष्ट्रामध्यें मोरावळा हें सर्वांच्या परिचयाचें औषध आहे व खातांना आणि खाल्ल्यानंतर तें औषध आहे असें वाटण्यासारखी त्याची रुचि आहे. काशीकडे मोरावळा हें औषध म्हणून माहीत असलें तरी सर्वसाधारण लोक तें एक उत्तमपैकीं खाद्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २४८०८ ... दि: ...
नों: दि: ...


म्हणूनच जाणतात; कारण खाण्यानंतर खाल्ल्यावर गुलाबजामून खाल्ल्या-सारखेंच आपणांस सुख मिळतें. सारांश, काशीकडील मोरावळ्यामध्यें रोग्या-प्रमाणें चांगल्या स्वस्थ व्यक्तीचेंसुद्धां पित्तशमन करण्याचा गुण आहे.

**बेलफळ:**—हें काशींतील नामानिर्देश करण्यासारखें तिसरें फळ आहे. महाराष्ट्रामध्यें बेलफळाला खायचें फळ म्हणून कोणीच जाणत नाहीं. कारण त्या दर्जाचीं फळें इकडील बेलांना येतच नाहींत व जीं येतात तीं मोठीं झाल्यावर कुर्कुटीमुर्कुटीं, किडकीं होतात. कांहीं आयुर्वेदीय औषधांचे निर्माते व प्रवाहिका, अतिसार अशांसारख्या पोटाच्या रोगांनीं पीडित रोगी मोरांब्याच्या रूपानें त्याचें ‘फलत्व’ जाणतात. पण त्याकरितां पक्व फल प्रयुक्त न होतां ‘फलेषु परिपक्वं यद्गुणवत्तदुदाहृतम्। बिल्वादन्यत्र विज्ञेयमिमं तद्धि गुणोत्तरम्’ या वचनानुसार कच्चें फळ वापरलें जातें. सारांश, ‘बालबिल्व औषधि’ व ‘पक्वबिल्व फळ’ असें व्यावहारिक दृष्ट्या म्हणावयास हरकत नाहीं.

काशीकडे औषधि म्हणून बेलफळाचा उपयोग होत असला तरी सर्वसाधारण जनता ‘फळ’ म्हणूनच बेलफळाचें सेवन करते. तिकडे बचक्यायेवढीं, नारळायेवढीं मोठीं बेलफळें होतात. पिकावयास लागलीं कीं, त्यांचा गर मेणासारखा मऊ व गुळासारखा गोड व्हावयास लागतो. गोरगरीब त्यांचा गर नुसताच कच्चा किंवा फळ भाजून मग खातात. ज्यांना साखर खर्च करण्याची ऐपत आहे ते त्याचें सरबत करून पितात. ह्याच्या सरबताला एक प्रकारचा उग्र वास येतो. त्यामुळें तें सर्वांनाच आवडतें असें नाहीं. काशीकडे कडक उन्हाळ्यामुळें फार पाणी प्यायलें जातें. ह्या अति पाणी पिण्याचे आंतड्यांवर होणारे दुष्परिणाम दूर करण्याचा गुण पिकलेल्या बेलफळांत आहे. याच्या सेवनानें मळ बांधून शौचास साफ होतें. प्रथम थोडा अवरोध होतो, पण नित्य सेवनानें तो दूर होतो. ह्यामुळें उन्हाळा आला कीं, बाजारांत पाट्याच्या पाट्या बेलफळें विकावयास येतात. लेखकानें एक उत्तम बेलफळाचें झाड आपल्या बंगल्यांत लावलें होतें. त्याला फळें येऊं लागल्यावर प्रतिवर्षी उन्हाळ्यामध्यें ५०–७५ बेलफळांचें सरबत एकटें त्याच्या घरींच होत असे, व भेटावयास कोणी आल्यास त्याला पण तें दिलें जात असे. याशिवाय मित्रमंडळी व नोकरचाकर यांना बेलफळें दिलीं जात तें वेगळें.

**आंबे**:— काशीकडे कलमी व गांवठी दोन्ही प्रकारचे भरपूर आंबे होतात. कलमीमध्यें 'लंगडा' फार प्रसिद्ध आहे व त्यांतही काशी छावणींतील सरकारी (स्टेट) बॅंकेच्या आवारांतील लंगडा सर्वांत उत्तम असें बोललें जातें. परंतु मुंबईकडील हापूस आंबा खाणाराला कुठल्याही आणि कोणत्याही कलमी आंब्यांत अधिक कांहीं सांपडेल असें वाटत नाहीं. तिकडे जवळजवळ प्रत्येक गांवांत गांवठी आंब्याच्या आंबराई दिसून येतील. पण इकडील गांवठी आंब्याच्या तुलनेनें तिकडील गांवठी आंबे रद्दीच असें म्हणावें लागेल. पण तिकडे त्या आंब्यांचा कापून, वाळवून व कुटून 'आमचूर' करतात व हिंदुस्थानी लोक चिंचेच्याऐवजीं त्याचा सर्रास उपयोग करतात. चिवड्यासारख्या कोरड्या खाद्य द्रव्यांना रुचि आणण्यास तो फार उपयोगी आहे यांत शंका नाहीं.

**कोहोळा**:— हिंदीमध्यें 'कोहला' किंवा 'कुम्हडा' हा शब्द तांबडा भोपळा व कोहोळा दोहींला वापरतात. आपल्याइकडे कोहोळा एक औषधि म्हणून समजला जातो व त्याचप्रमाणें त्याची उपज व उपयोग अगदीं मर्यादित केला जातो. आयुर्वेदामध्यें 'वल्लीफलानां प्रवरं कूष्माण्डं वातपित्तजित्, बस्तिशुद्धिकरं वृष्यं' असें त्याचें वर्णन आहे. म्हणजे वेलांच्या फळांत सर्वश्रेष्ठ व पौष्टिक असें तें फळ मानलें गेलें आहे व काशीकडे त्याप्रमाणें तें पौष्टिक फळ म्हणूनच खाल्लें जातें. तिकडे दोन शेरापासून १५–२० शेरांपर्यंत मोठे कोहळे होतात व ढीगच्या ढीग बाजारांत विकावयास असतात. त्याच्या तिकडे अनेक मिठाया बनविल्या जातात. त्यांपैकीं 'पेठा' एक मिठाई आहे. पेठा मिठाईवाल्याच्या दुकानींच नव्हे, रस्तोरस्तीं विकत असतो. विशेष टिकाऊ पद्धतीमुळें आग्र्याचा पेठा प्रसिद्ध आहे.

# चतुर्थ प्रकरण

## योग–धर्म–विद्यादर्शन

**विद्यानां सदनं काशी काशी लक्ष्म्याः परालयः**
**मुक्तिक्षेत्रमिदं काशी काशी सर्वा त्रयी मयी**

### योगपरम्परा

शंकर हे योगीश्वर, योगाधीश, योगिराज, योगीन्द्राणां च योगीन्द्र असल्यामुळें वाराणशीच्या महास्मशानामध्यें काशीनगरी वसण्यापूर्वी अनेक योगी व योगार्थी यांची वस्ती असली पाहिजे, परंतु ही योगविद्या गूढ असल्यामुळें हिच्या परंपरेचें कांहींच ज्ञान नाहीं. खालीं तीन प्रसिद्ध योग्यांची संक्षिप्त माहिती दिली जात आहे.

**काशींतील योगी :**—चांगदेव हे महाराष्ट्रामध्यें सर्वांच्या चांगले परिचयाचे आहेत. त्यांना आत्मबोध करण्याकरितां श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं चांगदेव पासष्टी लिहिली. हे महान् हठयोगी ज्ञानेश्वरांच्या वेळीं १४०० वर्षांचे होते अशी आख्यायिका आहे. पण त्यांनीं योगविद्या काशींतील एका योग्यापाशीं शिकून सर्व सिद्धि प्राप्त करून घेतल्या हें ध्यानांत धरण्यासारखें आहे. म्हणजे ज्ञानेश्वरांपूर्वी शेंकडों वर्षांची ही गोष्ट झाली. यावरून काशींतील योगविद्येची परंपरा किती प्राचीन आहे हें लक्षांत येईल.

त्यानंतरच्या काळांतील दुसरे योगी तैलंगस्वामी होत. हे जसे महान् योगी होते तसे महाविद्वान् पण होते. हे १५२९ त जन्मले व एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात समाधिस्थ झाले असें सांगतात. हे करीत असलेल्या चमत्कारांच्या अनेक गोष्टी प्रचलित आहेत. ह्यांचा राहण्याचा मठ भैरवनाथापासून जवळच एका बोळामध्यें आहे. तेथें त्यांची मूर्ति, खडावा, आसन, पुस्तकें इत्यादि वस्तु व पूजेचे देव आहेत.

अगदीं अलीकडील काशींतील प्रसिद्ध योगी म्हणजे स्वामी भास्करानंद. यांच्यापण चमत्कारांच्या अनेक गोष्टी सांगितल्या जातात. त्या ऐकून

रशियाच्या झारनें भारत-प्रवास करतांना १८९० त त्यांची भेट घेतली होती. मार्कट्वैननें पण यांची भेट घेतली होती. ह्यांची समाधि दुर्गा कुण्डावरून अस्सीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अमेठी राज्याच्या आनंदबागेमध्यें आहे. त्यावर संगमरवराची फार सुंदर इमारत आहे. स्थान एकांत व रम्य आहे. काशीमध्यें अजूनसुद्धां योगाची शिक्षा देणारे योगी आहेत हें योगाची शिक्षा घेणाऱ्या कांहीं परिचितांकडून लेखकास माहीत आहे.

## धर्मपरंपरा

**वैदिकधर्म :**—काशी हें अनादि कालापासून वैदिक धर्माचें आद्यपीठ आहे. बृहदारण्यकोपनिषदामध्यें 'दृप्तबालाकिर्हानूचानो गार्ग्य आस–सहोवाचाजातशत्रुं काश्यं ब्रह्म ते ब्रवाणीति' अशा प्रकारची दृप्तबालाकि व काशिराज यांच्यामधील ब्रह्माची चर्चा आली आहे.

काशीचा अशा प्रकारचा मान असल्यामुळें उत्तर काळांतील सर्व धर्म व पंथ यांच्या प्रवर्तकांनीं आपल्या धर्माला किंवा पंथाला मान्यता मिळून त्याचा भारतांत प्रचार व्हावा म्हणून काशीचीच कास धरली. याच कारणानें प्रत्येक हिंदुधर्मद्वेष्ट्या मुसलमान राजानें पण आपल्या हिंदुधर्मविध्वंसनाच्या कार्याकरितां काशी पसंत केली.

**बौद्धधर्म :**—वैदिक धर्मांतून निघालेला हा सर्वांत मोठा धर्म. गौतम बुद्धास जरी गयेस अन्तर्ज्ञान झालें तरी 'वाराणसीं गमिष्यामि गत्वा वै काशिकां पुरीम्। धर्मचक्रं प्रवर्तिष्ये' म्हणून त्यानें आपल्या धर्मप्रचाराचें काम काशीसच प्रारंभ केलें.

काशीच्या ज्या भागांत त्यानें हें काम प्रारंभ केलें त्याला सारनाथ म्हणतात. पूर्वीच्या जन्मांत त्या ठिकाणीं बुद्ध सारंगांचे (हरिणांचे) नाथ (मुख्य) म्हणून जन्मले होते अशी आख्यायिका आहे. यावरून त्या स्थानाला सारंगनाथ असें म्हणत. त्याचाच अपभ्रंश सारनाथ आहे. हें स्थान काशीपासून ५ मैल आहे. पूर्वोत्तर छोट्या लोहमार्गावर वाराणसी छावणी स्थानकापासून हें दुसरें किंवा बनारस सिटीपासून पहिलेंच स्थानक आहे. आगगाडीशिवाय सारनाथास रिक्शा, टांगा, टॅक्सी यांनीं जातां येतें. हीं वाहनें

बनारस छावणी स्थानकावरून करणें स्वस्त पडतें. तेथें उतरण्यास बिर्लाजींनी उत्तम धर्मशाळा बांधली आहे.

अशोकापासून हर्षवर्धनापर्यंत कित्येक शतकें सारनाथची सारखी भरभराट होत गेल्यामुळें तेथें अनेक स्तूप, मंदिरें, मठ बांधले गेले. पुढें १२ व्या शतकाच्या अखेरीस मुसलमानांनीं काशीबरोबर सारनाथाचा पण विध्वंस केला. तेव्हांपासून १९ व्या शतकापर्यंत (पृष्ठ ६२) तें अज्ञातदशेमध्यें राहिलें. इ. स. १७८३ मध्यें बनारस महाराजांचा दिवाण बाबू जगतसिंह यानें तेथील मुसलमानांनीं अर्धवट नष्ट करून ठेवलेला धर्मराजिका स्तूप तोडून त्याच्या मालमसाल्यापासून काशींत जगतगंज (पेठ) बांधावयास सुरवात केली. त्या मालमसाल्यामध्यें त्याला एक करंडा सांपडला जो त्यानें त्या वेळेच्या इंग्रजी राजदूत जोनाथन डंकन यास दिला. त्यानें तो बुद्धाचा असल्याबद्दल सिद्ध केलें. तेव्हांपासून सारनाथाकडे लोकांचें लक्ष वेधलें जाऊन वेड्यावाकड्या उत्खननास प्रारंभ झाला. पण संशोधनाच्या दृष्टीनें खऱ्या उत्खननास प्रारंभ १९०४ सालापासून पुराणवस्तुसंशोधनखात्यामार्फत झाला. या योगानें जगांतील बौद्धांचें लक्ष सारनाथाकडे ओढलें गेलें व आज पुन्हां सारनाथ बौद्धांचें प्राचीन काळाप्रमाणेंच सर्वांत मोठें धर्मक्षेत्र बनलें आहे. सारनाथमध्यें बघण्यासारख्या खालील वास्तु आहेत.

**धम्मेक स्तूप :**— हा १४३ फूट उंचीचा व ९३ फूट व्यासाचा प्रचंड स्तूप आहे. हा बहुधा ७ व्या शतकांतला असावा. ह्याच्या खालच्या अर्ध्या भागावरील दगडांवर भूमितीसारख्या रेखाकृति कोरलेल्या आहेत.

**चौखंडी स्तूप :**— हा सारनाथाला जातांना अर्धा मैल अलीकडे लागतो. ह्याच्यामध्यें हुमायून लपून बसला होता. त्याच्या स्मरणार्थ अकबरानें वर एक बुरुज बांधून त्यावर शिलालेख लावला आहे. ह्याच्यावर चढतां येतें व तेथून आसमंतांतचें उत्तम दृश्य दृष्टीस पडतें.

**संग्रहालय :**— ह्यामध्यें उत्खननांत सांपडलेल्या वस्तु ठेवल्या आहेत. त्यामध्यें सर्वांत महत्त्वाची व प्रेक्षणीय वस्तु अशोकस्तंभावरील सिंहासन. जगांत शिल्पकलेच्या ज्या थोड्या सर्वोत्तम वस्तु आहेत त्यांपैकीं ही एक वस्तु

आहे. ह्याचेंच चित्र सरकारच्यां अनेक मुद्रांच्यावर घेतलें आहे. ह्याशिवाय त्या संग्रहालयांत बुद्धाच्या अनेक सुंदर मूर्ति आहेत.

**बुद्ध मंदिरें :**—जुन्या सारनाथमध्यें दोन स्तूपांशिवाय कांहींच वास्तु उभ्या नव्हत्या. १९३१ सालीं बुद्ध सोसायटीनें सुंदरपैकीं एक बुद्ध मंदिर बांधलें. याच्या भिंतीवर जपानी चित्रकारांच्याकडून बुद्धजीवनांतील अनेक घटनांचें वर्णन करणारीं अनेक सुंदर चित्रें रेखाटलीं आहेत. मंदिराच्या अंगणांत लंकेहून आणलेलें बोधिवृक्षाचें रोपटें लावलें आहे. याशिवाय चिनी लोकांनीं पण एक स्वतंत्र बुद्ध मंदिर बांधलें आहे.

**सारनाथ महादेव :**— बौद्धधर्माचा पूर्ण पराभव केल्यावर हिंदूंनीं बुद्धाच्या मुख्य ठिकाणीं त्याच्याच नांवानें सारंगनाथ महादेवाची सारनाथास प्रतिष्ठा केली. कांहींचें असें म्हणणें आहे कीं, मुसल्मानांच्या डोळ्यांत काशींतील विश्वनाथ फार सलावयास लागला. तेव्हां त्यांच्या लवकर लक्षांत येऊं नये अशा ठिकाणीं सारनाथास विश्वेश्वरस्वरूप सारंगनाथ महादेवाची हिंदूंनीं स्थापना केली. कांहींही असो, काशींत ह्या महादेवाचें फार महत्त्व आहे. श्रावणी सोमवारीं सारनाथाला फार मोठा मेळा भरतो.

बुद्धपूर्वकालीं सारनाथाच्या परिसरांत शेंकडों हरणें स्वच्छंदानें वावरत होतीं. मध्यंतरींच्या काळांत त्यांचा बींमोड झाला होता. आतां पुन्हां कांहीं हरणें तेथें सोडलीं आहेत. परंतु सध्यांची परिस्थिति त्यांच्या वाढीस तितकीशी अनुकूल आढळून आली नाहीं. नुकताच बुद्धपरिनिर्वाणास २५०० वर्षें झालीं त्यानिमित्त सारनाथास महोत्सव केला गेला त्या वेळीं त्याकरितां सर्व सुखसोयींनीं युक्त असें नवीन स्थानक बांधलें गेलें, तसेंच गांवांत पण पुष्कळ सुधारणा केल्या गेल्या.

**जैनधर्म :**—'हिन्दुधर्माशीं संबंधित असा हा दुसरा महत्त्वाचा धर्म आहे. बौद्धधर्माप्रमाणें ह्याचें पण काशी हें महत्त्वाचें तीर्थस्थान आहे. कारण श्रेयांसनाथ नांवाच्या ११ व्या तीर्थंकराचा जन्म सारनाथास झाला व तेथें संग्रहालयासमोर त्यांचें मंदिर आहे. ७ वे तीर्थंकर सुपार्श्वनाथ व २३ वे पार्श्वनाथ यांचे जन्म काशीस झाले व त्यांचीं मंदिरें अनुक्रमें भेलूपुरा व भदैनी येथें आहेत. ज्या ठिकाणीं पार्श्वनाथाचें मंदिर आहे त्यांच्या पुढच्या

घाटास पार्श्वनाथ घाटच म्हणतात. नुकताच गेल्या वर्षीच्या पुरांत हा घाट पोखरला ( पृष्ठ २४ ) जाऊन त्याच्यावरील जैन विद्यालयाची इमारत गंगार्पण झाली व मंदिरास धोका उत्पन्न झाला.

**श्रीशंकराचार्य :—** भारतांतील बौद्ध धर्माचें वर्चस्व नष्ट करून त्या जागीं वैदिकधर्माचें वर्चस्व स्थापण्याकरितां आद्य शंकराचार्य काशींतच तळ ठोकून बसले होते. त्या वेळीं प्रत्यक्ष श्रीशंकरांनीं त्यांना वेदान्ताची शिक्षा दिली अशी कथा प्रसिद्ध आहे. प्रस्थानत्रयीच्या भाष्यांतील कांहीं उल्लेखांवरून त्या भाष्यांचा बराचसा भाग काशींत किंवा त्याच्या आसपास लिहिला गेला असें विद्वानांचें मत आहे. काशींत कमच्छा विभागांत थिऑसॉफिकल सोसायटी ( पृष्ठ ९३ ) जवळ एका बागेंत शंकराचार्यांचा मठ आहे. त्यामध्यें त्यांची संगमरवरी सुंदर मूर्ति बसविलेली आहे. त्या मठांतील निरंजनेश्वर व दक्षिण कालिकाम्बाची स्थापना त्यांनींच केली असें अनेकांचें म्हणणें आहे.

**श्रीवल्लभाचार्य :—** वैष्णवसंप्रदायाचे हे प्रसिद्ध आचार्य आपल्या संप्रदायाच्या प्रचारार्थ शेवटीं काशींत हनुमान् घाटावर येऊन राहिले होते. एक दिवस त्यांनीं गंगेंत देह विसर्जन केला. त्या वेळीं गंगेंतून एक उज्ज्वल ज्योति निघून आकाशांत गेली असें सांगतात. चौखंबामधील गोपालमंदिर ह्या संप्रदायाचें काशींतील महत्त्वाचें पीठ आहे.

**श्रीचैतन्यप्रभु :—** हे बंगाल्यांतील वैष्णवसंप्रदायाचे महापुरुष पण काशींत येऊन राहिले होते. त्यांच्या नांवानें तेथें एक मोहल्ला, एक वटवृक्ष ( चैतन्य-वट जतनबर ) व एक मठ ( चैतन्यमठ ) आहे.

**श्रीगुरु नानक :—** हे शीख धर्माचे संस्थापक सुद्धां आपल्या धर्माच्या प्रसाराकरितां काशीस आले होते.

**श्रीरामानंद :—** हे काशींतील भक्तिसंप्रदायाचे महासंत पंचगंगा ( पृष्ठ २७ ) घाटावर रहात होते. तेथें घाटावर त्यांची बसण्याची जागा दाखविली जाते. वर त्यांच्या पादुका ठेवल्या आहेत. ह्यांचा शिष्य कबीर काशीच्या बाहेर ग्रँड ट्रंक रस्त्यानजीक सांपडला. तेथें ‘ कबीरदासका बैठक ’ म्हणून त्यांचें स्मारक आहे. शहरांत त्यांची समाधि ज्या भागांत आहे त्याला ‘ कबीरचौरा ’ मोहल्ला म्हणतात.

**श्रीतुलसीदास :**— हे काशीस जन्मले नसले तरी यांची कर्मभूमि काशीच होती. हे अयोध्येहून काशीस आले तेव्हां प्रथम हनुमान्‌फाटकावर रहात होते, नंतर गोपालमंदिरांत गेले. तेथून पुढें ते अस्सीपाशीं गंगातटाकीं आले. ते जेथें गंगाकांठीं रहात होते तोच पुढें तुलसी घाट म्हणून प्रसिद्ध झाला. तेथेंच त्यांचा स्वर्गवास झाला. त्या ठिकाणीं त्यांच्या पादुका, कंठी, त्यांच्या पूजेची मारुतीची मूर्ति इत्यादि वस्तु आहेत. काशीमध्यें तुलसीदासांनीं हनुमान्‌फाटक मृत्युंजय, प्रल्हाद घाट, तुलसी घाट, संकटमोचन इत्यादि ठिकाणीं हनुमान्‌जीच्या मूर्ति स्थापल्या. रामचरितमानसाचा अरण्यकांडाच्या पुढचा भाग काशींत लिहिला गेला.

रामचरितमानस हा हिन्दींतील अद्वितीय ग्रन्थ आहे. हिंदी लोकांकडून त्या ग्रंथाचें जितकें श्रवण, मनन, पठन होत असतें तितकें जगांतील दुसऱ्या कोणत्याही धार्मिक ग्रंथाचें होत असेल असें वाटत नाहीं. ह्याचा थोडाफार अंश पाठ येत नाहीं असा मनुष्य मिळणें कठीण. मोठ्यापासून लहानापर्यंत, थोरांपासून क्षुद्रापर्यंत, ब्राह्मणापासून अतिशूद्रापर्यंत, सज्जनापासून दुर्जनापर्यंत, आस्तिकापासून नास्तिकापर्यंत, सुशिक्षितापासून अशिक्षितापर्यंत, सनातन्यापासून समाजसुधारकापर्यंत सर्वच ह्या ग्रन्थाचा थोडाफार आपापल्या दृष्टीनें अभ्यास करतात. कोणी स्वान्तः सुखाकरितां, कोणी भगवन्नामसंकीर्तनाकरितां, कोणी प्रवचनाकरितां, कोणी साहित्याकरितां, कोणी काव्यामृतरसास्वादाकरितां, कोणी सुभाषिताकरितां, कोणी व्यवहारशिक्षणाकरितां, तर कोणी ' ढोल गंवार सूद्र पशु नारी। सकल ताडनाके अधिकारी ' अशासारखीं त्यांचीं वचनें हुडकून काढून त्यांच्यावर टीका करण्याकरितां. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हिन्दी लोकांच्या दृष्टीनें रामचरितमानसाची स्थिति ' रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ' अशासारखी आहे.

रामचरितमानस हा तिकडील प्रवचनकारांचा ( व्यासांचा ) मुख्य ग्रन्थ असतो. ते ह्या ग्रन्थाचा सखोल अभ्यास करून प्रवचनामध्यें जेव्हां घटपटादि खटपट करून नाना प्रकारचे श्लेष व व्यंग्य काढून एकेका चौपाईचे अनेक अर्थ सांगतांना रंगून जातात त्या वेळीं त्यांचें कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं. ह्या व्यासांचें प्रतिवर्ष संमेलन भरतें व नवीन नवीन अर्थ काढण्याच्या दृष्टीनें

त्यांच्यामध्यें स्पर्धा होतात. जो ह्या बाबतीमध्यें अधिक कल्पक ठरतो त्याची बहुजनसमाजावर सर्वांत अधिक छाप बसते.

**राधास्वामी संप्रदाय:**—हा अगदीं आधुनिक धर्मपंथ आहे. ह्याचें मुख्य स्थान आग्रा. त्याची शाखापण काशीस काढली गेली आहे. आतां ती स्वतंत्र झाली आहे.

## विद्यापरंपरा

काशी प्राचीन कालापासून धर्माप्रमाणें विद्येचेंपण केंद्र होतें. परंतु प्राचीन वलभी, नालंदा किंवा आधुनिक विद्यापीठाप्रमाणें तेथील विद्यादानाचें काम एकतन्त्री किंवा कोणा एका संस्थेमार्फत न होतां गुरुकुल पद्धतीप्रमाणें होत होते. म्हणजे मोठ मोठे पंडित किंवा विद्वान् आपल्या शक्तीप्रमाणें आपल्या घरीं ५-२५ विद्यार्थी ठेवून त्यांना पढविण्याचें काम करीत व शिक्षा पूर्ण झाल्यावर त्यांना घरीं जाण्यास अनुज्ञा देत. विद्यार्थ्यांना शुल्क, ठरलेला अभ्यास-क्रम किंवा परीक्षा नसे. गुरुजींचा संतोष येवढीच शिक्षणाची कसोटी होती. हा संतोष विद्यार्थ्यानें केलेल्या गुरूच्या सेवेवर किंवा ३३ टक्के गुणावर नव्हता तर केवळ शिकविलेल्या विषयांत विद्यार्थ्याच्या १०० टक्के प्रावीण्यावर होता. त्यामुळें अर्धवट विद्यार्थी बाहेरच पडत नसत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रत्येक गुरु म्हणजे एक छोटेंसें स्वतंत्र उच्चकोटीचें विद्यापीठच होतें. धनिकांकडून कसल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवतां काशीच्या पंडितांनीं आपल्या विद्यापीठांची परंपरा प्राचीन काळापासून आतांपर्यंत अखंडितपणें चालविली. येवढेंच नव्हे तर पांडित्यांच्या बाबतींमध्यें आपल्या विद्यापीठाचा निकष फार उच्च ठेवला. त्यामुळें त्यांच्यापाशीं ज्यांनीं अध्ययन केलें त्यांची तसेंच ज्या बाहेरच्या पंडितांना त्यांच्याकडून मान्यता मिळाली त्यांची भारतवर्षभर प्रतिष्ठा होत असे. याच्या उलट ज्या बाहेरच्या पंडितांना यांच्याकडून मान्यता मिळत नसे किंवा त्यांच्यापुढें ज्यांचा टिकाव लागत नसे त्यांना कोठेंही प्रतिष्ठा प्राप्त होत नसे. त्यामुळें अजिंक्यपद मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे पंडित सर्व भारतवर्ष सोडून किंवा तुडवून काशींत येऊन पोंचत असत.

याप्रमाणें अत्यंत प्राचीन कालापासून काशींतील विद्यादानाची अशा प्रकारची परंपरा चालू असली तरी इ. स. १५०० च्या पूर्वी काशींत कोण कोण पंडित

होऊन गेले याची फारशी माहिती उपलब्ध नाहीं. त्यानंतरचें या बाबतींतलें ज्ञान पुष्कळसें निश्चित आहे. हें ज्ञान ग्रंथलेखनामुळेंच उपलब्ध झालें आहे.

**ग्रंथलेखन :**— काशीच्या पंडितांनीं केवळ विद्यादानच केलें नाहीं तर त्या वेळीं प्रचलित असलेल्या बहुतेक सर्व विषयांवर व त्यांच्या शाखांवर ग्रंथ-लेखन केलें. या बाबतीमध्यें ग्रन्थसंपत्तीचा आढावा घेतल्यावर असें दिसून आलें कीं १५००-१८०० या चारशें वर्षांत 'नऊ खण्ड पृथ्वी' तील सर्व पण्डितांनीं जितकी ग्रन्थसंपत्ति निर्माण केली त्यापेक्षां अधिक एकट्या 'दहाव्या खण्डां' तील पण्डितांनीं केली आहे. कसल्याही प्रकारची मदत नसतांना काशीच्या संस्कृतपंडितांनीं केलेली ही सरस्वतिसेवा सर्व सरस्वतिसेवकांनीं सदैव अनुकरण करण्यासारखी आहे. आपल्या पांडित्याला प्रतिष्ठा प्राप्त होण्या-करितां ज्याप्रमाणें भारतांतील अन्य ठिकाणचे पण्डित काशींतील पण्डित-परिषदेपुढें जात असत त्याप्रमाणें आपल्या ग्रन्थांना मान्यता प्राप्त होण्या-करितांपण लेखक तिच्यापुढें आपले ग्रन्थ घेऊन जात. या बाबतीमध्यें आपल्याकडील मोरोपंत व श्रीएकनाथ यांचें उदाहरण देण्यासारखें आहे. श्रीनाथांना काशीच्या पण्डितांच्या मान्यतेची आवश्यकता नव्हती. पण त्यांचा कोणी शिष्य भागवताचा कांहीं भाग तयार झाल्यावर काशीस घेऊन गेला. तेथील पण्डितांनीं मराठीमध्यें टीका बघून आंतील भाव न बघतां नाथांवर तोंड सोडण्यास सुरवात केली. तेव्हां नाथ काशीस गेले व तेथंच त्यांनीं टीकेचें काम पुढें चालवून 'वाराणसी मुक्तक्षेत्रीं। मणिकर्णिका महातीरीं' ही टीका पुरी केली. टीकेबरोबरच त्यांनीं आपल्या 'मराठी' पाण्डित्यांनीं पण्डितांना चकित केलें. तेव्हां ग्रन्थ पूर्ण झाल्यावर त्यांनीं त्या ग्रन्थाची साऱ्या काशी-नगरीमध्यें पालखींतून मिरवणूक काढली.

**विद्येतील महाराष्ट्र :**— ज्याप्रमाणें मराठी राजेरजवाड्यांनीं काशी त्यांच्या राज्याबाहेर असतांना तेथें मंदिरें, घाट, वाडे इत्यादि बांधून तिच्या भौतिक वैभवाच्या इतिहासांत आपलें नांव केलें त्याप्रमाणें मराठी पंडितांनीं आपल्या पांडित्यानें व ग्रंथलेखनानें काशीच्या विद्यावैभवाच्या इतिहासांत आपलें नांव अमर करून ठेवलें. काशीमध्यें मराठी पंडित दुर्गादेवीच्या दुष्काळांतच पोंचले होते. परंतु पहिल्या १००–१५० वर्षांतील इतिहास उपलब्ध नसल्यामुळें

त्यांच्याबद्दल कांहींच लिहितां येत नाहीं. इ. स. १५०० च्या सुमारास पुन्हां कांहीं कुटुंबें काशीस गेलीं. तेव्हांपासून आतांपर्यंत महाराष्ट्रीय पंडित विद्येच्या बहुतेक सर्व शाखांमध्यें आघाडीवरच आहेत.

**भट्टघराणें :—** १५०० च्या सुमारास काशींत स्थायिक झालेल्या कुटुंबांतील सर्वांत अधिक निर्देश करण्यासारखा पुरुष भट्टनारायण हा होय. ह्यानें आपल्या विद्वत्तेनें काशीच्या पंडितांकडून 'जगद्गुरु' ही पदवी व पंडितसभेंत अग्रपूजेचा मान मिळविला. तो अजून त्याच्या वंशजाकडे चालू आहे. यांच्या प्रभावामुळेंच पुन्हां विश्वनाथ मन्दिर बांधण्याची परवानगी मिळाली व राजा तोडरमल्लाच्या देणगींतून त्यानें इ. स. १५८० त प्रशस्त असें विश्वनाथ मन्दिर बांधलें. ह्यानें प्रयोगरत्न, त्रिस्थली हेतू इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत. त्याचा मुलगा शंकरभट्ट यानें द्वैतनिर्णय, व्रतमयूख, गाधीवंशानुचरितकाव्य (आपल्या घराण्याचा इतिहास) हे ग्रंथ लिहिले आहेत. त्याचा मुलगा नीलकण्ठभट्ट यानें धर्मशास्त्रावर फार मोठा ग्रन्थ लिंहिला आहे. त्यांपैकीं 'व्यवहारमयूख' हा भाग सर्वप्रसिद्ध आहे. त्याचा चुलत भाऊ कमलाकर भट्ट यानें 'धर्मसिंधु' लिहिला आहे. गागाभट्ट हा नारायणभट्टाचा नातू. श्रीशिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाकरितां हेच काशीहून बोलावले गेले होते. ह्यांनीं श्रीसमर्थांच्या सल्ल्यानें छत्रपतींचें क्षात्रियत्व सिद्ध करून त्यांना वैदिक मंत्रांनीं राज्याभिषेक केला.

**शेषघराणें :—** ह्यांत शेष विष्णु, शेष कृष्ण, चिन्तामणि, विश्वेश्वर, महादेव असे गाढे पंडित झाले. गंगालहरीचे जगन्नाथपण्डित, सिद्धान्तकौमुदीचे भट्टोजी दीक्षित, तर्कसंग्रहाचे अण्णंभट हे विश्वेश्वराचे शिष्य. महादेव शेष हे दाराशिकोहचे संस्कृत शिक्षक होते.

**इतर घराणीं :—** रंगोजी, रङ्गोजी व कोंडभट दीक्षित, नागोजीभट्ट काळे, वैद्यनाथ पायगुंडे व त्यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई, महादेवशास्त्री पुणतांबेकर इत्यादि अनेक महाराष्ट्रीय पण्डित काशींत झाले व त्यांनीं अनेक ग्रंथ लिहिले. काशींतील महाराष्ट्रीय पण्डितांची उज्ज्वल परंपरा ह्या काळापर्यंत तरी टिकून आहे असें कै. भाऊशास्त्री वझे, कै. लक्ष्मणशास्त्री द्राविड, पं. राजेश्वरशास्त्री द्रविड, फडकेशास्त्री, खिस्तेशास्त्री, खणंगशास्त्री यांच्यासारख्यांच्याकडे

अंगुलिनिर्देश करून म्हणतां येईल. काशीच्या पण्डितांनीं निर्माण केलेल्या ग्रंथसंपत्तीमध्यें वरील पण्डितांनीं निर्माण केलेल्या ग्रंथसंपत्तीचा फार मोठा हिस्सा आहे.

**आयुर्वेद** :— आयुर्वेदाचा व काशीचा फारच जिव्हाळ्याचा संबंध आहे. काशिराज दिवोदास याच्या कृपेनेंच आयुर्वेदांतील शारीर–शल्यशालाक्यावरील सर्वोत्कृष्ट ग्रन्थ सुश्रुत तयार झाला.

अथ खलु भगवन्तममरवरमृषिगणपरिवृतमाश्रमस्थं काशिराजं दिवोदासं धन्वन्तरिमौषधेनववैतरणौरभ्रपौष्कलावतकरवीर्यगोपुररक्षितसुश्रुतप्रभृतय ऊचुः ॥

**धन्वन्तरिः काशिपतिस्तपो धर्मभृतां वरः**
**सुश्रुतप्रभृतीञ्छिष्याञ्छशासाहतशासनः**

— सुश्रुत ॥

कै. त्रिंबकशास्त्री हे आधुनिक काळांतील काशीचे महाराष्ट्रीय धन्वन्तरी होते. त्यांच्या वेळेला चिकित्सेमध्यें त्यांचा हात धरणारा दुसरा चिकित्सक नव्हता. विचित्र स्वभाव असला तरी चिकित्सेंतील सिद्धहस्ततेमुळें राजेमहाराजे तसेंच पाश्चात्य पदवीधरसुद्धां त्यांच्याकडे जात असत. श्रीनिवासशास्त्री चुणेकर हे त्यांचे शिष्यपण काशींतील एक नामांकित चिकित्सक आहेत. ह्यांनीं पाश्चात्य वैद्यक व रसायन यांचा फार उत्तम अभ्यास केलेला आहे.

काशींतच लिहिल्या गेलेल्या सुश्रुतावर लेखकाला काशींतच टीका लिहिण्याचें महद्भाग्य प्राप्त झालें. त्या टीकेसंबंधाचे कांहीं अभिप्राय खालीं दिले आहेत.

‘आपने सुश्रुत संहिता की आयुर्वेदरहस्यदीपिकानामक व्याख्या के प्रकाश से युगान्तरकारी परिवर्तन संभव कर दिया है। आयुर्वेदीय क्षेत्र में जो आज लेखकपरंपरा निर्माण हुई है उसका मुख्य श्रेय आपकी इस व्याख्या को ही दिया जा सकता है जिसे विना देखे आधुनिक स्तरपर आयुर्वेदीय ग्रन्थोंका प्रणयन संभव नहीं है। आपका यह कार्य प्रकाशस्तम्भवत् युगानुयुगतक इस मार्ग से गमन करनेवाले पथिकों का मार्गदर्शन करतां रहेगा।’

—मानपत्रांतील उतारा.

'सुश्रुत संहितेवरील अपूर्व ग्रन्थ' – ३० जून १९५३ केसरी अभिप्राय.

When completed, this edition of Sushrut would be a glorious addition to Ayurvedic literature.

— महामहोपाध्याय कविराज गणनाथसेन, कलकत्ता.

'I am sure it (शारीरस्थानटीका) will remain a standard book for many decades hereafter.

— Dr. K. S. Mhaskar

**कीर्तनसंस्था :**—कीर्तन ही निखिल भारतवर्षीय संस्था असली तरी मराठी कीर्तनाची मजा कांहीं और आहे हें काशीकडील लोकसुद्धां कबूल करतात ; यामुळें विश्वविद्यालयांत ज्या वेळीं महाराष्ट्रीय कीर्तनकारांचीं हिंदीमध्यें कीर्तनें होत त्या वेळीं तिकडील प्राध्यापक व विद्यार्थी यांची भरपूर गर्दी असे.

कै. कीर्तनालंकार रामचंद्रबुवा चांदवडकर हे आधुनिक काळांतील काशीचे सर्वश्रेष्ठ कीर्तनकार होते. मराठी, हिंदी, गुजराथी, बंगाली, संस्कृत इतक्या भाषांमधून सारखेंच सफाईनें कीर्तन करणें व श्रोतृसमाज जसा असेल तसा कीर्तनांत रंग भरणें हे त्यांचे विशेष होते. १९१६ सालीं विश्वविद्यालयाच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमांत पं. मालवीयजींनीं यांचें कीर्तन ठेवलें होतें. हें कीर्तन कै. चांदवडकरांना जसें त्यांच्या कीर्तनयोग्यतेबद्दल तसेंच महाराष्ट्रीय कीर्तनसंस्थेस तिच्या निखिल भारतवर्षीय मान्यतेबद्दल निखिल भारतवर्षीय विद्वत्समाजापुढें पं. मालवीयांच्या हस्तें काशींत मिळालेलें मानपत्रच समजावयास हरकत नाहीं. तेव्हां महाराष्ट्रीय कीर्तनकारांनीं हिंदीचा व तुलसीदास, सूरदास, कबीर अशा कांहीं निवडक हिंदी संतांच्या वाङ्मयाचा अभ्यास करून महाराष्ट्राबाहेर पडावें. या योगानें त्यांना आपल्या व्यवसायाकरितां फार मोठें क्षेत्र मिळून महाराष्ट्राचा इतिहास, साधुसंत, साहित्य, संस्कृति इत्यादिकांचें ज्ञान हिंदी लोकांमध्यें पसरवून मायदेशाची सेवा करतां येईल.

**व्यायाम विद्या :**—मल्लखांब, मल्लविद्या, मुक्की (मुष्टियुद्ध) यांमध्यें काशींत महाराष्ट्रानें नांव कमावलें होतें. दुसरे बाजीराव यांचेपाशीं कोंडभट-नाना नांवाचे नामांकित मल्ल होते. त्यांच्या परंपरेंतील दामोदर गुरु काशींत होते. पुण्यांतील प्रसिद्ध व्यायामतज्ज्ञ कै. वझे मास्तर व दादा साठे (पृष्ठ ५)

हे त्यांचे शिष्य होते. दामोदर गुरूंनीं काशींत मल्लविद्येमध्यें नांव कमावलें होतें. मल्लखांबामध्यें त्यांचा हात धरणारा कोणीच नव्हता. त्यांचे शिष्य अनंतराम गुरु व नारायण गुरु गोडबोले हे मल्लविद्या व मल्लखांब यांमध्यें प्रसिद्ध होते. आम्हीं पायीं काशीस गेलों त्या वेळीं कै. दादा साठे यांचेमुळें त्यांचेकडेच उतरलों होतों. त्यांचे शिष्य श्री. पटवर्धन विश्वविद्यालयांत मल्लखांबाचे शिक्षक होते. त्यांच्यापाशीं लेखकाचा मुलगा चि. वासुदेव मल्लखांब शिकला व त्यानें त्या विद्येमध्यें विश्वविद्यालयांत प्रजेतापद ( Championship ) प्राप्त केलें. डॉ. देशपांडे, श्री. काणे, श्री. सोनार इत्यादि अनेक मंडळींनीं कुस्ती, सुडौल शरीर, मर्दानी खेळ यामध्यें प्रजेतापद व बक्षिसें मिळविलीं होतीं. गणेशोत्सवांतील होणारे मर्दानी खेळांचें प्रदर्शन तर केवळ महाराष्ट्रीयच असे.

**वेदविद्या :**— संस्कृत विद्येप्रमाणेंच काशींतील वैदिक आपल्या घरीं विद्यार्थ्यांना वेद पढविण्याचें काम करीत आले आहेत. काशीमध्यें सर्व शाखांचे वैदिक मिळतात. तत्प्रांतीयांमध्यें ऋग्वेदी, नगण्य व यजुर्वेदी फार. आपल्या शाखेशिवाय इतर वेद पण पढण्याची तिकडे पद्धति आहे. त्याप्रमाणें पढलेल्या वेदांच्या संख्येनुसार द्विवेदी ( दुबे ), त्रिवेदी ( त्रिपाठी, तिवारी ), चतुर्वेदी ( चौबे ) असें त्यांना म्हणत. तींच नांवें किंवा कंसांतील त्यांचे पर्याय पुढें त्यांचीं आडनांवें झालीं.

**महाराष्ट्रीय वैदिक :**— यांच्यामध्यें सर्व शाखांचे वैदिक आहेत; पण ऋग्वेदी ही त्यांची विशेषता. दुसरी विशेषता उच्चाराची. वेदपठनामध्यें उच्चारास फार महत्त्व आहे. उच्चाराच्या दृष्टीनें सर्व प्रांतीयांचें म्हणणें ऐकल्यावर महाराष्ट्रीयांचें वेदोच्चारण सर्वांपेक्षां उत्तम असें वाटल्याशिवाय रहात नाहीं. ही गोष्ट तत्प्रांतीय विद्वान्सुद्धां कबूल करतात व लेखकानें अनेक वेळेला अनाहूतपणें त्यांच्या तोंडून ही कबुली ऐकली आहे. वेदमंत्रांचा प्रभाव पडण्याच्या अनेक कारणांमध्यें उत्तम उच्चारण हें सर्वप्रथम कारण आहे. लेखकाला मंत्र-जागरश्रवणाची विशेष आवड असल्यामुळें लग्नकार्यासारख्या विशेष प्रसंगानें तो नेहमीं मंत्रजागर करीत आला. त्या कारणानें त्यानें सेवानिवृत्तीनंतर काशी सोडण्यापूर्वी तेथील सर्व शाखांच्या महाराष्ट्रीय वैदिकांचा मंत्रजागर केला व तेथील परंपरेप्रमाणें सर्वांना पोटभर आटीव दूध दिलें.

महाराष्ट्रीय राजेरजवाड्यांनीं ज्याप्रमाणें काशीच्या ऐहिक वैभवावर आपली छाप मारली त्याप्रमाणें महाराष्ट्रीय वैदिक–पण्डितांनीं तेथील विद्या-वैभवावर आपली छाप ठेवली. पण दिवसेंदिवस पहिल्या छापेप्रमाणें ( पृष्ठ ४७ ) ही सुद्धां अस्पष्ट होत जाणार अशी भीति वाटते. काशीमध्यें एके काळीं शेंकडों वैदिक होते असें वृद्ध वैदिकांच्या तोंडून लेखकानें ऐकलें होतें. काशींतील वस्ती मुख्यतया वैदिक-याज्ञिक-शास्त्री-पंडित-पुराणिक अशांचीच असल्यामुळें वरील आप्तवाक्यावर अविश्वास ठेवण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. लेखकानें मंत्र-जागर केला त्या वेळीं यजुर्वेदी ३२, ऋग्वेदी २८, आपस्तंभ १८, काण्व १०, सामवेदी ८, अथर्ववेदी ९ असे मिळून १०५ वैदिक होते. म्हणजे शेंकडोंचा शेंकडा झाला. जी स्थिति वैदिकांची तीच संस्कृतपंडितांची समजावयास हरकत नाहीं. तेव्हां भविष्यकाळीं यांचें अस्तित्व अगदींच नष्ट होणार नसलें ( पृष्ठ ५० ) तरी संख्या घटत जाणार हें मात्र निश्चित.

**राजकीय संस्कृत पाठशाळा:—** काशीमध्यें प्राचीन विद्यांचें शिक्षण गुरुकुल पद्धतीनें दिलें जात असे. त्याला आधुनिक पाश्चात्य पद्धतीचें वळण देण्याचा हा सर्वांत पहिला प्रयत्न होय. ही पाठशाळा जोनाथन डंकन नांवाच्या इंग्रजांच्या बनारसच्या राजदूतानें १७९१ त स्थापली. प्रथम तीमध्यें केवळ संस्कृतचें शिक्षण दिलें जात होतें. १८२९ त तेथें इंग्रजीचे वर्ग सुरू केले. तेव्हांपासून ही संयुक्त पाठशाळा झाली. या पाठशाळेच्या संस्कृत परीक्षांना फार मोठी मान्यता आहे. त्यामुळें सर्व भारतवर्षांतून तिच्या परीक्षांना विद्यार्थी बसतात. फार काय खुद्द काशी हिंदु विश्वविद्यालयांतील संस्कृत विभागाचे विद्यार्थी तेथील परीक्षांना बसत असत किंवा चोरून बसण्याचा प्रयत्न करीत यावरून तिच्या परीक्षांचें महत्त्व लक्षांत येईल. या पाठ-शाळेंत 'सरस्वतिभवन' म्हणून संस्कृतच्या प्रकाशित तथा अप्रकाशित ग्रंथांचें फार मोठें ग्रंथालय आहे.

**संस्कृत विश्वविद्यालय:—** काशी, संस्कृत विद्या, हिंदी भाषा व भारतीय संस्कृति यांचे अभिमानी, उत्तर प्रदेशाचे प्रधान मंत्री बाबू संपूर्णानंदजी यांचे मनांत फार वर्षांपासून काशीमध्यें संस्कृत विश्वविद्यालय स्थापण्याची महत्त्वा-कांक्षा होती व त्याकरितां त्यांचे अव्याहत प्रयत्न चालले होते. खरें म्हटलें तर भारतामध्यें सर्वप्रथम काशीमध्येंच संस्कृत विश्वविद्यालय स्थापलें जाणें उचित

होतें. पण आपल्या सरकारची सर्वच विचारसरणी विचित्र. त्यामुळें काशीला तो प्रथम मान मिळाला नाहीं. शेवटीं १९५८ मध्यें वरील पाठशाळेचें रूपान्तर विश्वविद्यालयांत होऊन बाबू संपूर्णानंदांची अभिलाषा सफळ झाली.

**क्वीन्स कॉलेज :—** गोदोलियावरून कचेरीकडे जाणाऱ्या सडकेवर लहुरा-वीर या चौकाच्यापुढें २ फर्लांग जगत्‌गंज (पृष्ठ ८१) मोहल्ल्यामध्यें वरील राजकीय पाठशाळेकरितां १८५३ मध्यें मेजर कीटोनें हें कॉलेज बांधलें. यामधील व्हिक्टोरिया राणीची मूर्ति व खांबावरील वेद, कुराण, बायबलचीं कोरलेलीं वचनें बघण्यासारखीं आहेत. बनारसमध्यें तरी इतकी सुंदर प्रशस्त दुसरी इमारत नाहीं. असें असलें तरी वास्तुविद्येच्या दृष्टीनें जोतें नसणें हा तिच्यामध्यें फार मोठा एक दोष आहे, जो कालिदासानें म्हटल्याप्रमाणें तिची शोभावृद्धि करणारा नसून त्याचा प्रतिवाद करणाऱ्या सुभाषितकारानें म्हटल्याप्रमाणें ‘ गुणकोटि-हारी ’ अशा स्वरूपाचा आहे. ह्या दोषामुळेंच १९४९ च्या वरुणेच्या महापुरांत इमारतीचें व आंतील सामानाचें बरेंच नुकसान झालें. असलें भव्य भवन-निर्मात्या वास्तुविद्याकुशलानें केलेली ही चूक बघून विद्या व व्यावहारिकता या गोष्टी निराळ्या आहेत हा विचार मनांत आल्याशिवाय राहात नाहीं.

**प्राचीन परंपरेच्या अन्य संस्था :—** गोयंका संस्कृत महाविद्यालय, मारवाडी संस्कृत कॉलेज, टिकामणी संस्कृत कॉलेज, बिर्ला संस्कृत विद्यालय, श्रीचन्द्र महाविद्यालय, स्याद्वाद जैन महाविद्यालय, सांगवेद विद्यालय, रणवीर संस्कृत पाठशाळा, संस्कृत महाविद्यालय (काशी हिंदु विश्वविद्यालयान्तर्गत) इत्यादि. या संस्थांमध्यें केवळ शिक्षणच फुकट दिलें जातें असें नसून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्यासुद्धां दिल्या जातात. त्यामुळें ज्यांना आधुनिक महागडें शिक्षण स्वतः घेणें किंवा आपल्या मुलांना देणें (पृष्ठ ५०) परवडत नाहीं ते यामध्यें शिक्षण घेतात. सध्यांच्या काळांत काशींतील विद्येची प्राचीन परंपरा खंडित होऊं न देण्याचें सर्व श्रेय या संस्थांना आहे.

आजच्या संस्कृत व वेदविद्येच्या पडत्या काळांतसुद्धां काशीमध्यें प्राचीन पद्धतीनें त्यांचें शिक्षण घेणारे विद्यार्थी व शिक्षण देणारे गुरु, त्यांचें प्रकाशन करणारे प्रकाशक व विक्री करणारे आपणिक जितके दृष्टीस पडतात तितके अन्यत्र दृष्टीस पडणें कठिण आहे. संस्कृत पुस्तक प्रकाशकामध्यें ‘ चौखंबा

संस्कृत पुस्तकालय ' हे काशींतील सर्वांत प्रसिद्ध व प्राचीन प्रकाशक आहेत. ह्या सर्वांची दुकानें चौक व कचौडी गल्लीमध्यें आहेत.

**थिऑसॉफिकल सोसायटी :**—डॉ. ॲनी बिझांटची ही संस्था कमच्छा विभागांत आहे. त्या ठिकाणीं तिचा बराच भूमिभाग असून त्यावर त्या संस्थेचीं अनेक विद्यालयें व ग्रंथालयें, निवास गृहें इत्यादि आहेत. १८९८ त ह्या संस्थेनें सेंट्रल हिंदु कॉलेज उघडलें. तें पुढें बिझांटबाईनें हिंदु विश्वविद्यालयास सर्व संपत्तिसुद्धां देऊन टाकलें. त्यामुळें तें कमच्छांतून विश्वविद्यालयांत गेलें.

**ऋषि व्हॅली ट्रस्ट :**—वरील संस्थेंतून फुटून निघालेली ही संस्था काशीं स्थानकाच्या पलीकडे आहे. हिच्या पूर्वेस गंगा, उत्तरेस वरुणा, पश्चिमेस वरुणेस मिळणारा ओढा व दक्षिणेस मालवीय पुलावर जाणारी सडक व पलीकडे काशी स्थानक. स्थान उंचनीच, झाडीनें व्यापलेलें असून रमणीय आहे. वरुणा – गंगा संगमावर पंचतीर्थांपैकीं आदिकेशव घाट व आदिकेशवादिकांचीं मंदिरें आहेत. ह्या स्थानाच्याजवळ दक्षिणेस गंगेवर राजघाट आहे. ह्याला लागूनच काशी स्थानकावरून मोगलसराईकडे जाणाऱ्या लोहमार्गाचा गंगेवर पूल आहे. हा पूल १ जानेवारी १८८७ ला लॉर्ड डफरिन यांच्या हस्तें उघडला गेला व त्याला डफरिनचें नांव दिलें गेलें. हा एकेरी मार्गाचा व एक मजली होता. कांहीं वर्षांपूर्वी तो दुहेरी मार्गाचा व दुमजली केला गेला व त्याला पं. मालवीय यांचें नांव दिलें गेलें. यांत वरील मजल्यावरून वाहनें जाण्याचा रस्ता केला गेला.

ह्या पुलावरून खालून आगगाडीनें किंवा वरून सडकेनें काशीच्या घाटांचें दृश्य ( पृष्ठ ३१ ) फार छान दिसतें. त्यामुळें काशीच्या त्या भागांतील लोकांना हा पूल म्हणजे एक हवा खाण्याचें ठिकाण झालें आहे.

मालवीय पुलावरील वाहनांचा रस्ता फार उंच झाल्यामुळें त्याला जोडणारी सडक उंच करावी लागली. त्याकरितां राजघाटापाशीं खणून माती वापरण्यांत आली. त्या वेळीं उत्खननांत प्राचीन इमारतींचे अवशेष, नाणीं, मुद्रा व इतर वस्तु सांपडल्या. परंतु खणण्याचें काम अडाण्यांच्या देखरेखीखालीं झाल्यामुळें अनेक अवशेष नष्ट झाले व अनेक नाणीं तशाच इतर वस्तु चोरापोरी गेल्या

ह्याचा परिस्फोट झाल्यावर मग सरकारनें ती जागा ताब्यांत घेऊन पुराणवस्तु-संशोधन खात्यातर्फे तें काम चालू केलें. नंतर हिंदु विश्वविद्यालयामार्फत झालें व मिळालेल्या वस्तु भारतकलाभवनांत जपून ठेवल्या. या उत्खननानें गुप्तपूर्व काळची पुष्कळच माहिती उजेडांत आली. त्यावरून ह्या ठिकाणीं एके काळीं राजधानी होती हें स्पष्ट झालें व त्याजबरोबर ह्या घाटाला 'राज'-घाट हें नांव कां रूढ झालें तें लक्षांत आलें.

## काशी हिंदु विश्वविद्यालय

**यह मालवीय की है देशभक्ति । यह उनका साहस यह उनकी शक्ति ॥**
**प्रकट हुई है नवीन होकर । यह कर्मवीरोंकी राजधानी ॥**
**मधुर मनोहर अतीव सुंदर । यह सर्व विद्या की राजधानी ॥**
**बसी है गङ्गा के रम्य तटपर । यह सर्व विद्या की राजधानी ॥**

— कुलगीत.

हें विद्यालय पं. मालवीयजींनीं १९१६ मध्यें स्थापलें. तेव्हांपासून हें सारखें वाढतच चाललें आहे. आज यामध्यें १४ महाविद्यालयें असून त्यांत भारताच्या सर्व प्रांतांतून आलेले ५०० हून अधिक अध्यापक अध्यापनाचें व दहा सहस्र विद्यार्थी ( ज्यामध्यें आफ्रिका, अमेरिका, मादागास्कर, लंका, ब्रह्मदेश इत्यादि परदेशचे पण विद्यार्थी आहेत व ज्यांच्याकरितां तेथें आंतरराष्ट्रीय वसतिगृह बांधलें आहे ) विद्यार्जनाचें काम करीत आहेत. हें नैवासिक विश्वविद्यालय आहे. याची स्वतःची २००० बिघे भूमि आहे ज्यावर विश्वविद्यालय स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीनें आवश्यक सर्व ( पृष्ठ ९७ ) कांहीं आहे. म्हणजे लखनौ, प्रयाग इत्यादि अन्य नैवासिक विश्वविद्यालयांसारखें हें केवळ सांविधानिक अर्थानें नैवासिक नसून खऱ्या खऱ्या अर्थानें आहे. अशा प्रकारचें इतकें मोठें विश्वविद्यालय भारतवर्षांत दुसरें नाहीं.

हें काशीनगरीच्या दक्षिणेस आहे. दुर्गेवरून पुढें ( पृष्ठ २९ ) गेलें कीं प्रथम लंका चौमुहानी ( चौक ) लागते. तेथून उजवीकडील रुंद सडक विश्वविद्यालयाकडे जाते. अस्सीकडून येणारी सडक लंका चौमुहानीवर सरळ या सडकेस मिळते. विश्वविद्यालयाला महाद्वार असून ( चित्र नं. ३ ) त्यावर नांवाची

मली मोठी शिला लावलेली आहे. प्रवासी जेव्हां जुनी काशी हिंडल्यावर विश्वविद्यालयांत फिरतो त्या वेळीं आपण सगळ्याच दृष्टीनें नव्या सृष्टींत आहोंत असें त्यास वाटल्याशिवाय रहात नाहीं. मालवीयनगर हें त्या नव्या सृष्टीला दिलेलें नामाभिधान सर्वथैव योग्य असेंच आहे. कारण विश्व-विद्यालयाच्या बाबतींमध्यें मालवीयांची स्थिति अक्षरशः 'स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठद्दशांगुलम्' अशी होती.

त्याचबरोबर मालवीयजींनीं सर्व भारत, फार काय आपलें जन्मस्थान तीर्थराज प्रयागसुद्धां सोडून विश्वविद्यालयाकरितां काशी पसंत केली हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्या शब्दशास्त्रकारांनीं 'तात्स्थ्यतद्धर्मताभ्यां च तत्समीपतयाऽपि च तत्साहचर्यात्' अशा शब्दसिद्धीच्या चार दृष्टि (वृत्ति) सांगितल्या आहेत. त्या सर्वच्या सर्व लागूं होत असल्यामुळें ह्या वसाहतीच्या नांवांत काशी हा शब्द असणें इष्ट आहे. तेव्हां पूर्वीच्या नव्या जुन्या (पृष्ठ ११) काशीशीं घोटाळा होऊं नये म्हणून ह्या वसाहतीस 'अभिनव काशी' हें नांव मालवीयनगर ह्या नांवाइतकेंच यथार्थ होणार आहे.

**मालवीयनगर अथवा अभिनव काशी** :—जुन्या काशीप्रमाणें ही काशी गंगातटाजवळ असावी अशी मालवीयांची इच्छा होती. परंतु इकडील तट-प्रांत जुन्या काशीच्या तटाइतका उंच नसल्यामुळें शिलान्यास तटापासून मागें उंच भूभागावर करावा लागला. त्याच वर्षीं गंगेस महापूर येऊन प्राण-प्रतिष्ठेच्या दगडाभोंवतालचा सर्व भाग पाण्याखालीं गेला. तेव्हां विश्व-विद्यालयाची वास्तु आणखी मागें उंच स्थानीं हलवावी लागली. हा प्रारंभींच आलेला पूर विश्वविद्यालयाच्या दृष्टीनें इष्टापत्तिच ठरला. त्यामुळें १९४८ सालीं ७५ वर्षांत आला नव्हता एवढा महापूर येऊन सुद्धां महिला महाविद्यालय व सुंदरलाल चिकित्सालय सोडून बाकी इमारतींना पाण्याचा उपसर्ग पोंचूं शकला नाहीं. त्या महापुरांत वरील दोन्ही इमारतींना पाण्याचा वेढा पडला होता; विश्वविद्यालयाच्या महाद्वारांतून वरील इमारतींच्या प्रवेशद्वारापर्यंत पाणी पोंचलें होतें व माणसें तेथें नावेंत बसून अस्सीवर किंवा दुर्गेकडे जात होतीं.

ह्या नगरीचें क्षेत्रफळ जवळ जवळ २ वर्ग मैल असून तिच्याभोंवतीं पक्का प्राकार घातला गेला आहे. ह्यामध्यें चारपांच फाटकें असलीं तरी लंकेवरून येणाऱ्या

सडकेवरील फाटकच महाद्वार आहे. नगरीची रचना अर्ध्या चाकाप्रमाणें (प्रारंभीं नकाशा पहा) आहे. तीमध्यें तुम्ब्यापासून धावेपर्यंत आऱ्यासारखे १६ सरळ रस्ते व तुम्बा व धाव यामध्यें अर्धवर्तुळाकार ६ रस्ते आंखले आहेत. सर्व रस्त्यांची लांबी जवळ जवळ २० मैल व रस्त्यावरील तसेंच इतर ठिकाणच्या झाडांची संख्या जवळ जवळ २०–२५ हजार आहे.

महाद्वारांतून आंत शिरलें कीं, प्रथम डाव्या बाजूस स्त्रियांचें महाविद्यालय व वसतिगृह लागतें. त्याच्या प्रवेशद्वारासमोर मध्यवर्ति अर्ध वर्तुळाकार हरिश्चन्द्र मार्ग प्रारंभ होतो. ह्या रस्त्यावर उजवीकडे विश्वविद्यालयाचें धमार्थ सार्वजनिक सर सुंदरलाल चिकित्सालय लागतें. त्याच्या पुढें पं. मालवीय यांचा राहता बंगला व त्यानंतर क्रमानें कोचीन व लक्ष्मणदास अतिथिगृहें आहेत. ह्यांपैकीं एकामध्यें बहुधा उपकुलपति राहातात. त्यानंतर शेवटपर्यंत त्या रस्त्यावर ओळीनें रुईया, बिर्ला, भरूचा, रामस्वामी, राधाकृष्णन्, भगवानदास, गुर्तु, मोर्वी, धनराजागिरी, राजपुताना, लिमडी, डे अशी विद्यार्थिवसतिगृहें आहेत. ह्या रस्त्याच्या बाहेर उजव्या बाजूला जे दोन अर्धवर्तुळाकार रस्ते आहेत त्यावर प्राध्यापक व इतर सेवक यांचे राहाण्याचे बंगले आहेत. रस्त्याच्या डावीकडे सुंदरलाल चिकित्सालयासमोर आयुर्वेद बगीचा आहे. त्याच्यापुढें होळकर अतिथिभुवन आहे. त्यामध्यें प्र–उपकुलपति राहतात. त्याच्यापुढें आयुर्वेद्–औषधि निर्माण शाळा आहे. त्यानंतर भरूचापर्यंत त्या त्या छात्रावासांचीं क्रीडांगणें आहेत. भरूचासमोर पऱ्यांचें छप्पर असलेली भव्य ‘शिवाजी व्यायाम शाळा’ आहे. मध्यवर्ति अर्धवर्तुळाकार रस्त्याच्या डावी-कडील दोन अर्धवर्तुळाकार रस्त्यांच्यामध्यें महाविद्यालयें व प्रयोगशाळा आहेत. त्यांच्या व पलीकडील अर्धवर्तुळाकार रस्ता यांच्यामध्यें एका बाजूस मंडळाकार-सभागृह आहे. त्यामध्यें जवळजवळ ५०,००० लोक बसूं शकतील. त्याच्या पुढील प्रशस्त पटांगणांत शामिआना उभा करून वार्षिक किंवा विशेष पदवी-दानसमारंभ केला जातो. मंडळाकार सभागृहाच्या पलीकडे विश्वविद्यालयाचीं केंद्रीय कार्यालयें आहेत. सरळ रस्त्यापैकीं मध्यवर्ति रस्ता या कार्यालयांच्या-समोरून निघतो. त्यावर एका बाजूला प्रथम शेतकी महाविद्यालय व त्यासमोर गायकवाड ग्रंथालय व नंतर वाटेच्यामध्यें विश्वविद्यालयाचें विश्वनाथ-मंदिर लागतें.

वास्तु-रथ्या निर्माण व त्यांचा जीर्णोद्धार, दिवाबत्ती, औषधपाणी, आरोग्य, वाहतुकनियंत्रण, रक्षी-प्रहरी, मुद्रण इत्यादिकांकरितां विश्वविद्यालयाची आपली स्वतंत्र व्यवस्था आहे. याशिवाय मुलांची शाळा, सरकारी डाक-तारगृह व बँक, सहकारी धान्य-किराणाभांडार इत्यादि सर्व सुखसोईपण आहेत. शैक्षणिक व इतर मिळून ह्या नगरीचा अर्थसंकल्प सध्यां १ कोटीच्यावर गेला आहे व असाच पुढें वाढत जाणार आहे. तेव्हां आज हिंदुस्थानांत संस्थानें असतीं तर या अभिनव काशीस 'सर्वांत लहान मोठें संस्थान' म्हणतां आलें असतें.

**प्रेक्षणीय स्थानें**—काशी हिंदु विश्वविद्यालय ही भिकाऱ्यांच्या राजानें निर्माण केलेली 'प्रतीचि-प्राची का मेल सुंदर, यह विश्वविद्या की राजधानी' आहे. आणि तिची रचना व योजनापण अपूर्व अशीच आहे. म्हणून ज्यांना शक्य आहे त्यांनीं एक दोन दिवस राहून संपूर्ण विश्वविद्यालय बघावें. त्याकरितां तेथें कोणाचीही अनुज्ञा घ्यावी लागत नाहीं. ज्यांना तें शक्य नाहीं त्यांनीं तेथील वास्तूंचे नमुने म्हणून खालील वास्तु बघाव्या.

( १ ) संस्कृत महाविद्यालय—महाद्वारांतून सरळ रस्त्यानें जाऊन मंडलाकार सभागृहाभिमुख महाविद्यालयाच्या पंक्तीमध्यें प्रथम आयुर्वेद व नंतर संस्कृत महाविद्यालय आहे. ह्याचें खालील सभागृह प्रेक्षणीय आहे. तेथें रविवारीं गीता होते.

( २ ) भारतकलाभुवन—हें १९२९ सालीं स्थापन होऊन तेव्हांपासून १९५० पर्यंत नागरी प्रचारिणी सभेच्या इमारतीमध्यें व व्यवस्थेखालीं होतें. पुढें तें काशी हिंदु विश्वविद्यालयाच्या व्यवस्थेखालीं विश्वविद्यालयांत आलें. त्याकरितां संस्कृत महाविद्यालयाच्या मागें स्वतंत्र इमारत बांधली गेली. त्यामध्यें प्राचीन चित्रें, मूर्ति, मुद्रा, नाणीं, ताम्रपट, शिलालेख, भांडीं, हत्यारें इत्यादि भारतीय कला व पुराणवस्तु यांचा विशेषतः राजघाटापाशीं (पृष्ठ ९४) झालेल्या तसेंच केलेल्या उत्खननांतील वस्तूंचा चांगल्यापैकीं संग्रह आहे.

( ३ ) गायकवाड ग्रंथालय—हें विश्वविद्यालयांतील मध्यवर्ति सरळ रस्त्यावर (पृष्ठ ९६) आहे. इमारत दुमजली व दुपाखी आहे. ह्यामध्यें एक लाखा-

पेक्षां अधिक ग्रंथ आहेत. तळमजल्याच्या मध्यावर प्रवेशद्वारांतून आंत शिरल्या-बरोबर वाचनाच्या दृष्टीनें सोईस्कर सर्व साधनसामग्रीनें सुसज्ज असें प्रशस्त गोल वाचनालय प्रेक्षणीय आहे. ह्याच्या तशाच वरच्या मजल्याच्या भिंतीवर विश्वविद्यालयाशीं संबंधित अशा सर्व थोर व्यक्तींचीं मोठमोठीं तैलचित्रें लावलेलीं आहेत.

( ४ ) विश्वनाथ मंदिर—विश्वनाथ ही काशीची प्रतिष्ठा आहे. त्यामुळें मालवीयजींनीं आपल्या विश्वविद्यालयांत विश्वनाथ मंदिराची योजना करून ठेवली होती. मालवीयनगरीस लेखकानें ' अभिनव काशी ' ( पृष्ठ ९५ ) हें दुसरें नामाभिधान सुचविलें तें यावरून किती यथार्थ आहे हें लक्षांत येईल. या मंदिराच्या पायाभरणीचा समारंभ मालवीयजींनीं आपल्या जीवनांत आपल्या विशिष्ट श्रद्धेप्रमाणें हिमालयांतून स्वामी कृष्णानंद नांवाच्या तपस्व्यास आणून त्यांच्याकडून करून घेतला. मालवीयजी धनानें दरिद्री असले तरी मनानें दरिद्री नव्हते. त्यामुळें त्यांच्या सर्वच योजना जबरदस्त महत्त्वाकांक्षी असत. हें मंदिर त्याला अपवाद नव्हतें. ह्या मंदिराची त्यांनीं आंखलेली योजना तंजावर येथील राजराजेश्वराच्या मंदिरापेक्षां उत्तुंग व विशाल होती येवढें सांगितलें कीं, ज्यांनीं तें मंदिर बघितलें आहे त्यांना त्यांच्या महत्त्वाकाक्षेची कल्पना येईल. त्या योजनेप्रमाणें मंदिराच्या पायाचें काम झालें. पण पुढें पैशाच्या दृष्टीनें अनुकूल काल न राहिल्यानें मंदिराचें काम मागें पडलें व त्यांच्या ह्यातीमध्यें होऊं शकलें नाहीं. ही गोष्ट पंडितजींना फार लागून राहिली होती. तेव्हां शेवटच्या दुखण्यांत ' सार्वजनिक दान ' स्वीकारून तें मंदिर पुरें करून देण्याचें बिर्लाजींनीं आश्वासन दिलें. त्याप्रमाणें त्यांचे पश्चात् कामास प्रारंभ करून मन्दिर पुरे केलें व १९५८ त तेथें विश्वनाथाची प्राणप्रतिष्ठा केली. हें देऊळ पंडितजींच्या मूळ योजनेंत पुष्कळच काटछाट करून बांधलें गेलें आहे. तरीसुद्धां तें पुष्कळच प्रशस्त व भव्य झालें आहे. काशीमध्यें येवढें भव्य दुसरें मंदिर नाहीं. तळमजल्यावर मध्यें विश्वनाथाची पिंडी व वरच्या मजल्यावर ठीक तिच्यावर मूर्ति आहे. तिच्या उजव्या बाजूच्या स्वतंत्र गृहांत लक्ष्मी-नारायण व डाव्या बाजूच्या गृहांत दुर्गा आहेत. याशिवाय अन्य देवतापण आहेत. मंदिरांत सर्वत्र ऋषिमुनि, पौराणिक घटना इत्यादिकांचीं चित्रें, संस्कृत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 24002 दि:
क्रमांक 282

श्लोक कोरले आहेत. वरच्या मजल्यावर मागल्या बाजूस भिंतीवर संपूर्ण भगवद्‌गीता कोरली आहे.

**विश्वविद्यालयांतील महाराष्ट्र :—** मालवीयजींनीं विश्वविद्यालयाकरितां आसेतु हिमाचल झोळी फिरवली व स्वप्नांत कोणीं कल्पना केली नसेल इतकी भिक्षा गोळा करून ‘ भिक्षुराज ’ ही पदवी प्राप्त करून घेतली. ह्या झोळीमध्यें महाराष्ट्रीय संस्थानिक व लोक यांनीं यथाशक्ति दान दिलें. यांपैकीं कांहीं भाग संपूर्ण विश्वविद्यालयाच्या उभारणीमध्यें व कांहीं भाग ‘ दातुरिच्छा बलीयसी ’ या न्यायानें खालील विशिष्ट वास्तूंच्या उभारणीमध्यें लावला गेला.

( १ ) गायकवाड ग्रंथालय :— हें सयाजीरावांच्या देणगींतून बांधलें गेलें.

( २ ) होळकर अतिथिभुवन :— हें होळकरांच्या देणगींतून बांधलें गेलें. या देणगींतून प्राध्यापकांना परदेशी शिक्षणाकरितां शिष्यवृत्त्यापण मिळतात.

( ३ ) शिवाजी व्यायाम शाळा :— ही कोल्हापूर छत्रपतींच्या देणगीचें फळ आहे. येथें देशीविदेशी सर्व प्रकारच्या व्यायामांची सोय व साधन-सामुग्री आहे.

( ४ ) शिवाजीमहाराजांचा अर्धपुतळा :— महाराष्ट्र मंडळानें आपल्या रजतजयन्तीचें स्मारक म्हणून वरील व्यायामशाळेच्या प्रवेशद्वारासमोर छत्रपतींचा अर्धपुतळा उभारण्याचें ठरवून त्याप्रमाणें १९४६ सालीं बिहारचे राज्यपाल लोकनायक अणे यांच्या हस्तें त्याची स्थापना केली.

हा पुतळा व्यायामशाळेच्या बाहेर एका चबुतऱ्यावर मेघडंबरीखालीं बसावेलेला आहे. पुतळा अरक्षित व रस्ता रहदारीचा यामुळें येणाऱ्या – जाणाऱ्यां-कडून चबुतऱ्यास व पुतळ्यास कळत नकळत उपसर्ग पोंचत असे. एक दिवस पुतळा तिरपा झालेला तेथील शिक्षकांनीं बघितला. तेव्हां त्यांनीं ती गोष्ट लेखकाच्या नजरेस आणली. लेखकानें पुतळ्याच्या रक्षणाकरितां त्या भोंवतीं स्वखर्चानें उंच कठडा उभारण्याचें योजून त्याप्रमाणें एक्झिक्यूटिव्ह इंजीनिअर यांस काम सुरू करण्यास सांगितलें. कामाच्या प्रारंभीं त्यानें कुलपतींना पाठविलेलें पत्र खालीं देत आहें —

Dear Sir, 24-4-55

It has been brought to my notice by Dr. Ghanekar that the bust of Shivaji in front of Shivaji hall, which

is open and unprotected is in danger of being damaged. It is, therefore, necessary to provide a railing round the bust to make an enclosure of about 20′ × 20′ which will make the bust outside the reach of human hand.

(Sd.) Ex Engineer

ह्या योजनेमध्यें लेखकानें पुतळ्याभोंवतालच्या सुंदर कठड्याशिवाय पुतळ्याच्या चवुतऱ्याची दुरुस्ती, कठड्याच्या आंतबाहेर व्यायामशाळेच्या प्रवेशद्वारासमोरच्या चौकांत सिमेंटची फरशी, पुतळ्यावर रात्रीं प्रकाश पडावा म्हणून मेघडंबरींत विजेच्या दिव्याची व्यवस्था इतकीं कामें केलीं व त्याकरितां पदरचे २००० रुपये खर्च केले. हीं सर्वच कामें नुसतीं शोभिवंतच नव्हे तर भक्कम व टिकाऊ व्हावीं ह्या दृष्टीनें लेखकानें प्रत्येक गोष्टींत किती लक्ष घातलें होतें हें ए. इंजिनिअरनें ३०–३–५६ ला कुलसचिवांना पाठविलेल्या पत्रांतील ‘Dr. Ghanekar has been consulted at every step.’ ह्या एकाच वाक्यावरून समजेल. कठड्याचें काम चांगलें झाल्यामुळें पुतळ्याची रक्षा होऊन त्याची तसेंच व्यायामशाळेच्या प्रवेशद्वाराची शोभा वाढली.

व्यायामशाळेंत प्रतिवर्षं खेळांचे सामने होऊन बक्षीससमारंभ होतो. त्या वेळीं अध्यक्षांच्या हस्तें छत्रपतींना हार घालून कार्यक्रम प्रारंभ केला जावा अशी लेखकानें व्यायामसमितीच्या मन्त्र्यांना विनंति केली व त्यांनीं ती सहर्ष स्वीकारली. १९–२–५७ रोजीं बक्षीससमारंभ होण्याचें ठरलें. त्या दिवशीं लखनौ विश्वविद्यालयाच्या एका बैठकीस लेखकास जावयाचें होतें. परंतु आपण सुचविलेली प्रथा प्रथमच प्रारंभ व्हावयाची असल्यामुळें तिचा श्रीगणेशा ठीक व्हावा व विश्वविद्यालयांतून सेवानिवृत्त होत असल्यामुळें पुन्हां तो समारंभ बघावयास मिळणार नाहीं तेव्हां तो यंदाच बघून घेऊन डोळ्यांचें पारणें फेडावें म्हणून लेखकानें लखनौचा बेत रहित केला. संध्याकाळीं कठडा, छत्रपति व त्यांचें मंदिर माळा–फुलांनीं सजविलें ( चित्र नं. ४ ) गेलें व कार्यक्रम छत्रपतींना उपकुलपति डॉ. झा यांचेकडून हार घालून प्रारंभ करण्याचें ठरलें. तो समारंभ बघून डोळ्यांचें पारणें फेडण्याचें काम लेखकास डॉ. झांच्याबरोबर पुतळ्यापाशीं जाऊन करतां आलें असतें, परंतु तसें न करतां ‘ दास डोंगरीं राहतो । देवाची यात्रा पाहतो ’ या समर्थोक्तीप्रमाणें त्यानें

१०७९९

दुरूनच समारंभ बघून डोळ्यांचें पारणें फेडण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तो आपल्या अन्य सहयोग्यांच्याबरोबर व्यायामशाळेंत बसेला. पुतळ्यापाशीं जाऊन डॉ. झा हार घालण्याकरितां खुर्चीवर चढतांच व्यायामशाळेंत टाळयांचा कडकडाट झाला. तो ऐकून आनंदाश्रूंनीं लेखकाचे डोळे डबडबले. तेव्हां हार घालतांना नीट दिसावें म्हणून त्यानें चटकन् डोळे मिटून उघडले तों त्यास डॉ. झा परत येतांनाच दृष्टीस पडले.

'वाइटांतून चांगलें' याचें कठडा–प्रकरण एक उत्तम उदाहरण आहे. पुतळा स्थापला, पण तो पूर्णपणें उपेक्षित ठेवला गेला याकडे वरील घटना होईपर्यंत कोणाचें लक्ष गेलें नाहीं. पुतळा तिरपा करणाराचा काय उद्देश असेल तो असो, पण त्यानें आपल्या ह्या कृत्यानें पुतळ्याची होत असलेली उपेक्षा सर्वांच्या नजरेसमोर आणली व त्यामुळेंच त्याच्याभोंवतीं सुंदर कठडा बनला, त्याच्यावर दिवा लागला व वरीलसारखी योग्य प्रथा प्रारंभ झाली. ज्या वेळीं तिरपा केलेला पुतळा लेखकाला दाखविला गेला त्या वेळीं त्याला त्याचा फार राग आला. पण कठड्याचें काम समाप्त होऊन वरील समारंभ झाल्यावर 'निंदक तो परउपकारी, काय वर्णूं त्याची थोरी' या तुकाराममहाराजांच्या उपदेशाप्रमाणें त्यानें त्याचे उपकारच मानले.
पुतळ्याच्या जोत्यावरील कठड्याचा शिलालेख :—

> **लोकब्रह्मवियद्विलोचनमिते श्रीविक्रमाब्दे शुभे**
> **दीपाल्या दिवसे निजद्रविणतो घाणेकरोपाह्वकः ।**
> **गोविन्दात्मज भास्करो व्यरचयल्लौहंशलाकामयं**
> **सुश्रीकं शिवराजशोभनकरं रक्षाकरं वर्मकम् ॥**

(५) **श्रीहनुमान् मन्दिर :**— पुराण्या काशीमध्यें हजारों मन्दिरें असलीं तरी 'अभिनव' काशीमध्यें दहापांचच होतीं. व तींही तेथील पूर्वीच्या खेडे-गांवांतील मोडकळीस आलेलीं. मालवीयजींनीं त्यांच्या पूजेकरितां एक ब्राह्मण ठेवला, पण ह्यापेक्षां त्यांच्याकडे लक्ष दिलें गेलें नाहीं. व पुढें जरी विश्व-विद्यालयांत पैशाचा पाऊस पडावयास लागला तरी ह्यांच्यावरून करणी फिरली नाहीं कीं रंगाचा हात लागला नाहीं. मग तीं दर्शनीय बनविण्याचें दूरच राहिलें. त्यामुळें विश्वविद्यालयांत सुशिक्षित समाज दर्शनाला जाऊं इच्छील असें एकही मन्दिर नव्हतें.

१९१० सालीं वडील विषमज्वरानें आजारी असतांना मातुःश्रीच्या सांगण्यावरून लेखक रोज मारुतिरायाचें दर्शन करून त्याला आर्के घालूं लागला. पुढें वडील बरे झाल्यावर त्यानें तो नित्यक्रमच करून टाकला. त्यामुळें विश्वविद्यालयांत नौकरीस गेल्यावर जेव्हां त्याला मारुतीच्या मन्दिराची जरुरी पडली तेव्हां त्यानें बंगल्यापासून फार दूर नसलेलें असें पूर्वीचें मोडकळीस आलेलें एक मारुति मन्दिर शोधून काढलें. प्रथम त्यानें प्रदक्षणेची वाट व गाभारा पक्का करून घेतला व काम चालू केलें. परंतु पुढें जवळ बांधलेल्या बंगल्याच्या आवारांत मन्दिर गेल्यावर लेखकानें एक हजार रुपये खर्च करून त्याला सध्यांचें शोभिवंत रूप ( चित्र नं. ५ ) दिलें. त्यांत त्यानें विश्वविद्यालयाकडून मन्दिराकरितां आवारांतील जागा काढून घेऊन त्याभोंवतीं कांटेरी कुंपण, सडकेपाशीं पक्का पूल, तेथून मन्दिरापर्यंत ३ फूट रुंदीची विटांची पक्की वाट, 'देवाचिये द्वारीं' बसण्याकरितां दोन पक्के ओटे, शिखर, मन्दिरांत विजेचा दिवा, कुंपणाच्या आंत फुलझाडांचा बगीचा, पाण्याचा नळ, देवळासमोर सडकेच्या दुतर्फा अशोकवृक्ष पंक्ति लावणें इत्यादि कामें केलीं व चैत्री पौर्णिमेस मारुतिरायाचा उत्सव सुरू केला. उत्सवाच्या दिवशीं दर्शन-प्रसादाकरितां त्यानें कुलपतींपासून कारकुनापर्यंत विश्वविद्यालयांतील सर्व रहिवाश्यांना सहकुटुंब सहपरिवार निमंत्रणें दिलीं. या योगानें विश्वविद्यालयांत दर्शन करण्यासारखें एक चांगलें देवस्थान बनलें आहे याची सर्वांना माहिती होऊन त्याचा योग्य तोच परिणाम झाला. आज हें 'घाणेकरां'चें हनुमान् मन्दिर विश्वविद्यालयांतील भाविक लोकांचें नित्यनैमित्तिक दर्शनाचें व पूजेचें स्थान होऊन बसलें आहे. सेवानिवृत्तीनंतर लेखकानें काशी सोडली. परंतु वार्षिक उत्सव करणें व उत्सवाला उपस्थित राहणें सोडलें नाहीं. व यावच्छक्य हीं दोन्ही कामें सोडावयाचीं नाहींत असा पण संकल्प केला.

मंदिरावरील शिलालेख :—

**श्रीहनुमान् मन्दिर**

**जीर्णोद्धार — संवत् २००९**

डॉ. **भास्कर गोविंद घाणेकर**

येथपर्यंत विश्वविद्यालयांतील महाराष्ट्रीय स्मृतिचिन्हांचें वर्णन झालें. यापुढें

मागें वर्णन केलेल्या कारणामुळें ( पृष्ठ ४८ ) तसेंच सरकार संस्था चालविण्यास लागल्यामुळें महाराष्ट्रीय स्मृतिचिन्हें अधिक होण्याची फारशी आशा नाहीं. विश्वविद्यालयांत महाराष्ट्रीय मंडळास गणेशोत्सव तसेंच अन्य कार्यक्रम करण्यास आपल्या मालकीची इमारत असावी ही कल्पना जुनीच होती. लेखकानें त्या दृष्टीनें मंडळाच्या प्रमुख व्यक्तींच्या एकदोन बैठकी बोलावल्या. त्यांमध्यें पैशाची अडचण तर प्रामुख्यानें पुढें आलीच, पण अशा स्वरूपाच्या संस्था विश्वविद्यालयामध्यें होऊं द्याव्या कीं न होऊं द्याव्या व होऊं दिल्यास त्यांच्यावरील नियंत्रणाचे नियम यांच्यापण अडचणी पुढें मांडण्यांत आल्या. सर्वांचा विचार करून ह्या भानगडींत पडण्यापासून कांहीं लाभ नाहीं असें वाटून लेखकानें तो नाद सोडला.

**महाराष्ट्रीय प्राध्यापक :**— पं. मालवीयजी महाराष्ट्रीयांचा स्वार्थत्याग, कर्तव्यनिष्ठा, टापटीप, साधेपणा इत्यादि अनेक गुणांचे चाहते होते. त्यामुळें योग्य महाराष्ट्रीय आढळला किंवा कळला कीं ते त्याला विश्वविद्यालयांत आपणहून ( पृष्ठ १९ ) बोलावीत. त्यामुळें त्यांच्या कारकीर्दीमध्यें पुणतांबेकर, नारळीकर, कालेलकर, आळतेकर, बेलवलकर, जोशी, देशपांडे, गोडबोले, खापर्डे, कुलकर्णी इत्यादि अनेक महाराष्ट्रीय विद्वद्रत्नें गोळा झालीं व त्यांनीं महाराष्ट्राचें तसेंच विश्वविद्यालयाचें मुख उज्ज्वल केलें. यापुढें मात्र महाराष्ट्रीय विद्वान् तेथें पहिल्याइतके नेमले जाण्याची शक्यता नाहीं.

**महाराष्ट्रीय विद्यार्थी :**— प्रारंभीं विद्यार्थी पांच-पंचवीस होते. ते वाढत वाढत २५० वर गेले. वऱ्हाड-नागपूरकडे त्या वेळीं महाविद्यालयें फार नसल्यामुळें विद्यार्थ्यांमध्यें तिकडील विद्यार्थ्यांचाच जास्त भरणा असे. आतां तिकडे विद्यालयें वाढावयास लागलीं. त्यामुळें विद्यार्थ्यांची संख्या शंभराच्या आंत आली. ती पण यापुढें वाढणार नाहीं.

**महाराष्ट्र मंडळ :**— १९२० सालीं विश्वविद्यालयांत महाराष्ट्र मंडळ स्थापलें गेलें व त्याच्या मागोमाग गणेशोत्सव सुरू झाला. हा उत्सव मध्यन्तरींच्या काळांत कित्येक वर्षें कै. पुणतांबेकरांसारख्या नामवंत व खणखणीत व्याख्यात्याच्या व्याख्यानामुळें, श्री. अण्णासाहेब खापर्डे यांच्यासारख्या अत्यंत कलावान् प्राध्यापकांच्या देखरेखीखालीं तयार होणाऱ्या सार्वजनिक मराठी नाटकामुळें

व महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या मैदानी व मर्दानी खेळांच्या प्रदर्शनामुळें विश्वविद्यालयभर चांगलाच गाजला. १९४५ सालीं मंडळानें आपली रजतजयन्ती साजरी केली. त्या वर्षीं मंडळानें व गणेशोत्सवानें आपलें वैभवाचें शिखर गांठलें असें म्हणावयास हरकत नाहीं. रजतजयन्तीचे सर्वच कार्यक्रम उत्तम झाले. त्यांत निर्देश करण्यासारखा कार्यक्रम म्हणजे 'अखिल महाराष्ट्र संगीत संमेलन' हा होय. हें संमेलन तिकीट लावून शहरांत केलें गेलें व खर्चवेंच जाऊन त्यांत ५२०० रुपये मंडळाच्या पदरांत पडले. त्यांतून मंडळाच्या रजतजयन्तीचें स्थायी स्मारक म्हणून श्रीशिवछत्रपतींचा पुतळा, शिवाजी व्यायाम शाळेचें नांव सार्थक करण्याकरितां तिच्या महाद्वारापाशीं ( पृष्ठ ९९ ) उभारला. जुन्या प्राध्यापकांचें अन्यत्र गमन व सेवानिवृत्ति तसेंच विद्यार्थ्यांचें अल्पसंख्येनें आगमन यांमुळें रजतजयन्तीनंतर मंडळास ओहोटी लागली. 'चक्रनेमिक्रमेण' पुन्हां केव्हां भरती येईल ती येवो, सध्यां तरी मंडळ पूर्ण ओहोटीच्या स्थितींत आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

**काशी विद्यापीठ** :— विद्याप्रेमी काशीचे सुप्रसिद्ध रईस कै. शिवप्रसाद गुप्त यांनीं १९२१ त हें विद्यापीठ स्थापिलें. गुप्ताजी मालवीयजींचे परममित्र तसेंच भक्त. परंतु सिद्धांताचे पक्के असल्यामुळें सरकारी मदत घेण्याच्या बाबतीमध्यें मतभेद झाल्याबरोबर मित्रता व भक्ति यांमध्यें थोडेंसुद्धां अंतर येऊं न देतां त्यांनीं आपलें काशी विद्यापीठ काढलें. राष्ट्रीय चळवळीमध्यें सरकारनें ह्या विद्यापीठास पुष्कळ छळलें. परंतु राष्ट्रीय शिक्षणावरील अढळ श्रद्धा व पैसा यांच्या जोरावर त्यांनीं तें निभावून नेलें. आचार्य नरेंद्र देव, बाबू संपूर्णानंद यांसारख्या अनेक थोर व्यक्तींचा या विद्यापीठाशीं संबंध आलेला आहे. मराठीमध्यें विश्वविद्यालयास विद्यापीठ म्हणतात. त्यामुळें पुष्कळ मराठी मंडळी काशी विश्वविद्यालय व काशी विद्यापीठ यांमध्यें घोटाळा करतात. पण दोहोंचा कांहींही संबंध नाहीं.

हें विद्यापीठ वाराणशी छावणी स्थानकावरून सीमेंटच्या सडकेनें सरळ २ फर्लांगांवर डाव्या बाजूस आहे. तेथें सर्व शिक्षण हिंदींतून दिलें जातें. विद्यापीठाचें 'बाबू भगवानदास स्वाध्याय पीठ' म्हणून एक उत्तम पुस्तकालय आहे. यांतील पुस्तकसंग्रह बाबू शिवप्रसाद गुप्तांचा असून तो त्यांनीं आपले

बंधु कै. डॉ. भगवानदास यांचे नांवानें इमारत बांधून विद्यापीठास देऊन टाकला. याची इमारत विद्यापीठाच्याच पुढें एक फर्लांग गेलें कीं लागते. शिवप्रसादजी फार मोठे राष्ट्रभाषाप्रेमी व विद्याप्रेमी होते. त्यांनीं आपल्या-करितां अनेक विषयांवरील उत्तमोत्तम ग्रंथांचा संग्रह केला होता. त्यामुळें या पुस्तकालयांत इतिहास, अर्थशास्त्र, राजनीति, समाजशास्त्र इत्यादि विषयां-वरील अनेक दुर्लभ बहुमोल ग्रंथ उपलब्ध आहेत. ह्या ग्रंथालयाचा उपयोग करणारास मासिक किंवा वार्षिक वर्गणी द्यावी लागत नाहीं ही ह्याची दुसरी विशेषता आहे. ती गुप्तांजींच्या ज्ञानप्रसाराबद्दलच्या कळकळीची निदर्शक आहे.

**भारतमाता मंदिर :—** हें काल्पनिक देवताकृति भारतमातेचें मंदिर नसून तिच्या उद्भृत ( Relief ) मानचित्राचें म्हणजे भारतमातेच्या खऱ्याखुऱ्या रूपाविष्कृतीचें मंदिर आहे. यामध्यें पर्वत, डोंगर, टेकड्या, नद्या, दरीखोरीं इत्यादि अंगोपांगांनीं भारतमाता जशी नटली आहे तशी प्रमाणबद्ध लहान रूपांत संगमरवरांनीं बनवून दाखविली आहे. हें मंदिर विद्यापीठ पुस्तकालया-शेजारीं असून कै. शिवप्रसाद गुप्तांनींच बांधलें आहे. ते पृथ्वीपर्यटनास गेले त्या वेळीं टोकियोमध्यें त्यांनीं जपानचें असें मानचित्र बघितलें व त्यावरून कल्पना घेऊन त्यांनीं वरील मंदिर बनविलें. १९२७ त ह्याचा शिलान्यास डॉ. भगवानदास यांचे हस्तें व १९३५ त उद्घाटन महात्मा गांधींच्या हस्तें झालें आहे. मानचित्राशिवाय मंदिराच्या भिंतीवर प्राचीन व अर्वाचीन ऐतिहासिक घटनांचा कालनिर्देश शिलाबद्ध करून ठेवला आहे. भारत-वर्षामध्यें भारतमातेचें अशा स्वरूपाचें येवढेंच मंदिर आहे. प्रवाशांनीं तसेंच यात्रेकरूंनीं तें बघितल्याशिवाय राहूं नये. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हें मंदिर बघितल्यावर आपण आपलें स्वातंत्र्य भारतमातेचे हात बळी देऊन मिळविलेलें आहे हा अत्यंत दुःखद विचार कोणाही स्वाभिमानी भारतीयाच्या मनांत आल्याशिवाय राहणें शक्य नाहीं.

## राष्ट्रभाषा हिंदी

हिंदी ही मुख्यतया उत्तरप्रदेशाची भाषा असून तिचा विकास व शब्द-भांडार यांवर प्रथमपासून व प्रामुख्यानें संस्कृत–प्राकृतचा व नंतर व गौणतया अरबी – फारसीचा प्रभाव पडत आला आहे. संस्कृत – प्राकृतचा प्रभाव असणारी संस्कृतनिष्ठ हिन्दी किंवा नुसती हिंदी व अरबी-फारसीचा प्रभाव

असणारी हिंदुस्तानी किंवा उर्दू म्हणावयास हरकत नाहीं. काशी हें संस्कृत भाषेचें व भारतीय संस्कृतीचें केन्द्र असल्यामुळें संस्कृतनिष्ठ हिंदी ही काशी व पूर्वीय उत्तर प्रदेशाची व लखनौ मुसलमानी राज्याचें व संस्कृतीचें केंद्र बनल्यामुळें उर्दू किंवा हिंदुस्तानी लखनौ व पश्चिमी उत्तर प्रदेशाची भाषा आहे. संस्कृतनिष्ठ हिंदी हीच भारताची राष्ट्रभाषा होण्यास योग्य आहे व होणें जरूर आहे अशा प्रकारची चळवळ व त्याजबरोबर तिला उन्नत करण्याची कोशीस पूर्वीय उत्तर प्रदेश व काशी यांमध्यें जन्मलेल्या, वाढलेल्या तसेंच काशीशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आलेल्या विद्वानांनींच केली आहे.

यामुळें संस्कृत भाषेप्रमाणें हिंदी भाषेच्या बाबतीमध्यें काशी प्रथमपासून भारतवर्षांत अग्रेसर राहिली व भविष्यकाळींसुद्धां राहील असें समजण्यास हरकत नाहीं. कारण काशींतील हिंदीच्या प्रेमी व अभिमानी विद्वानांनीं काशी विद्यापीठ (पृष्ठ १०४), हिंदु विश्वविद्यालय, नागरी प्रचारणी सभा यांसारख्या हिंदीचा विकास, उत्कर्ष व प्रचार करणाऱ्या मोठमोठ्या संस्था स्थापून ठेवल्या आहेत. यांशिवाय छोट्या छोट्या अन्य अनेक संस्था आहेत त्या निराळ्या.

**नागरी प्रचारणी सभा**:— ही हिंदीचा व नागरी लिपीचा प्रचार करणारी भारतवर्षांतील सर्वांत प्राचीन व मोठी संस्था आहे. १८९३ सालीं हिची स्थापना झाली. आर्यभाषापुस्तकालय हें या संस्थेचें हिंदी हस्तलिखितांचें व प्रकाशित ग्रंथांचें फार मोठें पुस्तकालय आहे. ह्या संस्थेमार्फत प्राचीन हिंदी हस्तलिखितांचें संरक्षण व संशोधन, तसेंच प्राचीन व अर्वाचीन उत्तमोत्तम हिंदी ग्रंथांचें प्रकाशन होतें. हिच्याचमार्फत हिंदी साहित्य संमेलन ही हिंदीचा प्रचार करणारी संस्था प्रयागास स्थापन केली गेली. नागरी प्रचारणीची सुवर्णजयंती १९५३ सालीं, राष्ट्रपति बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी केली गेली. त्या प्रसंगीं हिंदींतील उत्तमोत्तम १२ लेखकांना त्यांच्या हस्तें पारितोषिकें व पदकें दिलीं गेलीं. ही संस्था बिसेसरगंजामध्यें सिटी पोस्टासमोर आहे.

**हिंदी व महाराष्ट्रीय**:— महाराष्ट्रीय हे फार पूर्वींपासून हिंदीचे प्रेमी व पृष्ठपोषक आहेत. श्रीसमर्थ व अन्य महाराष्ट्रीय संत यांनीं शेंकडों वर्षांपूर्वीं हिंदीमध्यें काव्यरचना केलेली आहे. हिंदी राष्ट्रभाषा व्हावी म्हणून त्या दृष्टीनें प्रयत्न व प्रचार करणारांमध्यें तसेंच राष्ट्रभाषा झाल्यानंतर तिचा प्रयोग व

प्रचार करणारांमध्यें इतर सर्व अहिंदी प्रांतीयांमध्यें महाराष्ट्रीयच अग्रेसर राहिले आहेत. काशींतील महाराष्ट्रीय त्याला अपवाद नाहींत. परंतु त्यांनीं संस्कृतकडे अधिक लक्ष दिल्यामुळें तिच्या क्षेत्रामध्यें ते अधिक संख्येनें चमकले. असें असलें तरी ज्यांनीं हिंदीकडे लक्ष दिलें त्यांनीं तिच्या क्षेत्रामध्यें नांवच कमाविलें. अशा कांहीं लेखकांचा खालीं नामनिर्देश करीत आहें.

१. कै. बाबूराव पराडकर. हे मध्यंतरीं कांहीं काळ 'सन्मार्ग' पत्राचे मुख्य संपादक होते. तेवढा काळ सोडला तर ते शेवटपर्यंत काशींतील प्रसिद्ध 'आज' पत्राचे मुख्य संपादक राहिले.

२. श्री. लक्ष्मण नारायण गर्दे. हे हिंदी 'केसरी' व 'नवजीवन'चे संपादक होते. याशिवाय लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याचेंही हिंदी भाषान्तर यांचेंच आहे.

श्री. बाबूराव पराडकर स्वर्गवासी होऊन चार वर्षें होण्यापूर्वी काशीमध्यें त्यांचें स्मृतिभवन बनून उत्तर प्रदेशचे मुख्य मंत्री बाबू संपूर्णानन्द ह्यांचे हस्तें त्याचें उद्घाटनसुद्धां झालें. यावरून त्यांनीं मिळविलेल्या प्रतिष्ठेची व त्यांच्या पश्चात् 'आज'चें संपादकत्व महाराष्ट्रीयाकडे चालू राहिलें यावरून त्यांनीं उत्पन्न केलेल्या परंपरेची कल्पना येईल.

३० वर्षांपूर्वी लेखक हिंदु विश्वविद्यालयांत पाश्चात्य वैद्यकाचा अध्यापक म्हणून गेला. त्या वेळीं त्याला हिन्दी भाषा येत नव्हती. परंतु हिंदींतून शिकविण्याची मुभा असल्यामुळें त्यानें आपलें डॉक्टरी विषयाचें अध्यापन इंग्रजींतून न करतां हिंदींतूनच करण्याचा दृढ संकल्प केला व पहिल्या दिवसापासून मोडक्या-तोडक्या हिंदींतून व्याख्यानें सुरू केलीं. त्याचबरोबर त्यानें हिंदीचा शास्त्रशुद्ध अभ्यास आरंभिला. वर्ष-सहा महिन्यांत त्यानें हिंदीवर प्रभुत्व मिळविलें व विषयप्रतिपादनाच्या आपल्या विशिष्ट पद्धतीनें डॉक्टरी विषय इंग्रजीइतकेच किंबहुना कांकणभर सरसच हिंदीमधून शिकविले जाऊं शकतात हें सर्वांच्या नजरेस आणलें. अध्यापनाबरोबर त्यानें आपल्या विषयाचें लेखन पण आरंभिलें व वैद्यकीय परिभाषा बनवून ती अध्यापनांत तसेंच लेखनांत उपयोगांत आणून आयुर्वेद व ॲलोपॅथी या विषयांवर हजारों पानांचे ग्रंथ लिहून प्रकाशित केले. विश्वविद्यालयाच्या नैदानिकीय (clinical) प्रयोगशाळेंत लेखकास रोग्यांच्या रक्तमूत्रादि द्रव्यांच्या परीक्षणाचें पण काम

करावें लागे. त्या प्रयोगशाळेचा तो मुख्य असल्यामुळें आपल्या अधिकारांत त्यानें तेथील पावत्या, पञ्जिका, परीक्षणवृत्तलेख इत्यादिकांचा सर्व व्यवहार हिंदीमधून चालू केला होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अधिकार, प्रयत्न व योग्यता यांच्या बळावर एका व्यक्तीला जें जें करणें शक्य होतें तें तें सर्व लेखकानें हिंदीच्या बाबतीमध्यें करावयाचें ठेवलें नव्हतें. त्यामुळें इंग्रजी विषयाशीं संबंधित असणाऱ्या विश्वविद्यालयाच्या प्राध्यापकवर्गामध्यें आपला व आपल्या खात्याचा व्यवहार हिंदी व नागरीमध्यें करणारांत लेखकच अग्रेसर राहिला हें विनम्रपणें सुचवावयास हरकत नाहीं.

हिंदीच्या क्षेत्रामध्यें लेखकाच्या वांट्याला आलेल्या कांहीं गोष्टींचा उल्लेख केला जात आहे. प्रतिष्ठेच्या दृष्टीनें त्यांना किती महत्त्व द्यावयाचें हें प्रत्येकाच्या मनोवृत्तीवर अवलंबून आहे. ‘ योग्य ’ दिशेनें प्रयत्न केल्यास अंगीं योग्यता असो किंवा नसो, वाटेल त्या गोष्टी प्राप्त होऊं शकतात असें दिसून येतें. म्हणून लेखक तरी त्यांच्या योगानें आपली योग्यता वाढली किंवा प्रतिष्ठा झाली असें समजत नाहीं. तरीसुद्धां ‘ अकृत्वा परसंतापमगत्वा खलनम्रताम् । अनुत्सृज्य सतां वर्त्म ’ म्हणजे कोणापुढें तोंड न वेंगाडतां, कोणाला एक ओळीचें पत्र न लिहितां अनायासेन विना दैन्येन घरबसल्या प्राप्त झाल्या आहेत म्हणून त्याला त्या ‘ बहु ’ आहेत.

( १ ) विश्वविद्यालयांतील हिंदी प्रकाशन मंडळाचें सभासदत्व. ह्यामध्यें लेखक हा एकटाच अहिंदी सभासद होता व हें सभासदत्व सेवानिवृत्तीपर्यंत २५ वर्षांपेक्षां अधिक वर्षें त्याच्या वांट्याला आलें होतें.

( २ ) मेरठ येथील हिंदी साहित्य संमेलनांतील ( १९४८ ) विज्ञान-परिषदेचें सभापतित्व.

( ३ ) नागरी प्रचारणी व हिंदी साहित्य संमेलन ह्यांच्याकरितां वैद्यकाच्या पुस्तकांची प्रकाशन–योग्यता–परीक्षणाचें काम.

( ४ ) नागरी प्रचारणी सभेमार्फत प्रकाशित होणाऱ्या हिन्दी शब्द-सागराच्या द्वितीय आवृत्तीच्या सल्लागार संपादक मंडळाचें सभासदत्व. ह्यामध्यें लेखक तेवढाच अहिंदी सभासद होता.

( ५ ) नागरी प्रचारणी सभेच्या हीरक–महोत्सव–प्रसंगीं राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद यांच्या हस्तें ज्या १२ नामवन्त हिन्दी लेखकांस रोकड पारि-

तोषिकें वं. पदकें देण्यांत आलीं त्यांमध्यें स्थान. ह्यांमध्यें लेखक तेवढाच अहिंदी होता.

( ६ ) पाश्चात्य वैद्यकशास्त्रांतील विविध विषयांकरितां हिन्दी पारिभाषिक शब्द बनविण्यास स्थापलेल्या वैद्यकीय तज्ज्ञ समितीमध्यें भारत सरकारद्वारां नेमणूक. ह्या समितीमध्यें लेखक तेवढाच मराठी सभासद आहे.

विश्वविद्यालयांतून सेवानिवृत्त होतांना मिळालेल्या मानपत्रांतील हिन्दीच्या सेवेबद्दलचा उतारा.

## हिंदीके अग्रदूत

आपने हिन्दीमें एक आदर्श व्याख्यान परंपरा कायम की है। वह पूर्ण और उच्चस्तरकी रही है। लगभग ५० वर्ष आगे जिस भाषाका व्यवहार होगा उसके स्वरूपसे साक्षात्कार एक द्रष्टा के रूपमें आपने रख दिया है। उस तक पहुँचने के लिए आवश्यक पात्रताके अभावमें हिन्दी माध्यमसे भावाभिव्यक्ति की समुचित व्यवस्थाके लिए ‘ घाणेकरीय ’ पद्धतिही एक मात्र अवलंब है ऐसा विद्वज्जन मानने लगे हैं।

आधुनिक चिकित्सा वाङमय का हिन्दीकरण जिस स्तरसे प्रारंभकर जिस ऊंचे स्तरपर उपस्थित करनेमें आप समर्थ हुए हैं भावी भारत में वह भी आपकी एक अमर कहानी ही रहेगी।

# पंचम प्रकरण

## लोकसमाज–संस्कृतिदर्शन

### तीन लोकसे न्यारी काशी

### ‘काशीका अद्‌भुत व्यवहार, सात बार में नौ त्योहार’

### यात्रा व मेळे

सणपर्वांच्या निमित्तानें जेव्हां दर्शन–स्नानाकरितां बाहेरचे लोक येतात तेव्हां यात्रा व जेव्हां स्थानिक किंवा जवळचे लोक जमतात तेव्हां मेळा असा तात्त्विक भेद करतां आला तरी व्यवहारतः त्यांच्यामध्यें कांहीं अंतर नाहीं.

भारतांत बारा महिने अठरा काळ निरनिराळ्या ठिकाणीं व निरनिराळ्या निमित्तांनीं यात्रा किंवा मेळे भरत असतात. म्हणूच परदेशी लोक भारतास ‘यात्रेचा देश’ च म्हणतात. त्यांमध्यें यात्रेचें सर्वांत मोठें स्थान जर कोणतें असेल तर तें काशीनगरी होय. तेथें वर्षांतून जितकी यात्रा येते तितकी यात्रा भारतांत अन्यत्र कोठेंही येत नाहीं, तसेंच जितके मेळे भरतात तितके भरत नाहींत.

**यात्रा :—** काशी हें हिन्दूंच्याप्रमाणें हिन्दु धर्माशीं निगडित अन्य सर्व धर्मांचें व पंथांचें (पृष्ठ ८०) पवित्र क्षेत्र असल्यामुळें तेथें नेहमीं यात्रा येत असते. त्यांत अश्विनी नवरात्रामध्यें (पृष्ठ ११२) बंगाल्यांची, महाशिवरात्रीला सर्व हिंदुस्थानांतली, विशेषतः लिंगाइतांची, व ग्रहणाला तद्देशियांची, विशेषतः खेडवळांची, यात्रा येते. यामध्यें ग्रहणाची यात्रा फार मोठी असते.

चन्द्रग्रहणापेक्षां सूर्यग्रहणाचें पर्व अधिक महत्त्वाचें मानलें जातें. त्याकरितां कुरुक्षेत्र हें भारतांत सर्वांत पवित्र तीर्थ मानलें गेल्यामुळें तेथें सर्वांत अधिक यात्रा जमते. काशी हें भारताचें एक छोटेंसें (पृष्ठ ४८) प्रतीक आहे. त्यामुळें तेथेंसुद्धां कुरुक्षेत्र कुण्ड आहे व त्याचें महत्त्व जवळजवळ कुरुक्षेत्राइतकेंच समजलें जातें. त्यामुळें काशीसपण सूर्यग्रहणाला फार मोठी यात्रा

भरते. हें कुण्ड ( पृष्ठ ४० ) चांगलें बांधलेलें आहे. पण त्यांत पाणी नसतें. सूर्यग्रहणाचे वेळीं तें भरलें जातें.

**मेळे :**— काशीमध्यें नेहमींच मेळे भरत असले तरी त्यांमध्यें सोहरिया, लक्ष्मीकुण्ड, पिशाचमोचन, बेचूवीर, नागनथैया, रामनगर, दुर्गा, सारनाथ, बडाव्यास, बुढवामंगल, बडागणेश, रथयात्रा, रामलीला, संकटमोचन, रामनवमी, अक्षततृतीया, गंगादशहरा, नागपंचमी, दसरा, कार्तिकी पौर्णिमा, गोकुळअष्टमी, निर्जला–शृंगारी–प्रबोधिनी एकादशी, दिवाळी, मौनी सोमवती अमावास्या, शिवरात्री, होळी इत्यादिकांचे मेळे निर्देश करण्यासारखे आहेत.

मेळा कितीहि लहान असला तरी त्यांमध्यें माळा-फुलांचीं, मातीच्या चित्रांचीं व खेळण्यांचीं, मेवामिठाईचीं दुकानें असावयाचींच. मोठमोठ्या मेळ्यांमधून पाळणे, घोडे इत्यादि करमणुकीचीं साधनेंपण असतात. मेळ्यांमध्यें बायकामुलांची गर्दी साहजिकच जास्त असली तरी बनारसी पुरुष शौकीन असल्यामुळें त्यांचीपण भरपूर गर्दी असते व ते बायकामुलांच्याबरोबर मेळ्यांतील पाळणे-घोडे यांची मजा घेतांना दृष्टीस पडतात. कांहीं मेळ्यांची विशेषतापण असते. बेचूवीराच्या मेळ्यांत भूतप्रेतबाधा दूर करणारांची व करून घेणारांची गर्दी असते, तर लक्ष्मीकुंडाच्या मेळ्यांत मातीच्या भांड्यांच्या बाजाराची विशेषता असते; पिशाचमोचनच्या मेळ्यांत मोठमोठ्या वांगी-मुळ्यांची मजा असते, तर गणेशजयन्तीच्या मेळ्यांत हजारों लहान-मोठे गणपति बघण्याची गंमत असते.

**दुर्गापूजा :**—काशीमध्यें आश्विनी नवरात्राचे हिंदुस्थानी व बंगाली असे भेद करतां येतील. हिंदुस्थानी नवरात्रामध्यें नऊ दिवसांच्या नऊ स्वतंत्र देवी मानल्या गेल्या आहेत. भाविक लोक त्या त्या दिवशीं त्या त्या दिवसाच्या देवीच्या दर्शनास जातात. ह्या नवदुर्गांमध्यें दुर्गा ( पृष्ठ ४० ) सर्वांत महत्त्वाची आहे. त्यामुळें तिच्या दर्शनास रोजच गर्दी असते व तिच्या मंदिराचे सोपे पूजापाठ व होमहवन करणारांनीं भरलेले असतात. हिच्या वांट्याला चतुर्थी आली आहे म्हणून त्या तिथीस हिच्या दर्शनास सगळ्यांत अधिक गर्दी असते. बंगाली नऊ देवींना मानणारे नसल्यामुळें ते नवरात्रभर याच देवीला येतात. ही रुधिरप्रिया देवी आहे. हिला अष्टमीस बळी अर्पण केले जातात.

**बंगाली दुर्गापूजा :—** बंगाली आपल्याकडील गणपतीप्रमाणें दुर्गेची प्राणप्रतिष्ठा करून उत्सव करतात व दसऱ्याच्या दिवशीं संध्याकाळीं वाजत गाजत मिरवीत भजन करीत त्यांना दशाश्वमेधावर आणतात. नंतर नावांच्यावर त्यांना चढवून दोन-तीन तास भजन-पूजन, गायन-वादन, कीर्तन-नर्तन यांचा कार्यक्रम करून नंतर गंगेंत विसर्जन करतात. मिरवणूक व विसर्जन दोन्ही कार्यक्रम बघण्यासारखे असतात. विसर्जनाच्या वेळीं दशाश्वमेध व आसपासचे घाट तसेंच त्यावरील उत्तुंग इमारती माणसांनीं व गंगेचें विस्तृत पात्र दुर्गा व माणसें यांनीं भरलेल्या नावांनीं नुसतें फुलून जातें. दुर्गापूजा हा बंगालचा राष्ट्रीय सण आहे. त्या वेळीं बंगालमध्यें १५ दिवस सुट्टी असते. काशी व पूर्वीय उत्तरप्रदेश यांमध्यें पूर्वीपासून बंगाल्यांचा जोर असल्यामुळें तेथेंसुद्धां बंगालप्रमाणें दसऱ्याची सुट्टी मिळते व तिला ' दुर्गापूजा सुट्टी 'च म्हणतात. ह्या सुट्टींत काशीस हवापाणी चांगलें असल्यामुळें सर्वच दृष्टींनीं पालट व्हावा म्हणून शेंकडों बंगाली कलकत्त्याच्या बुजबुजाटांतून बाहेर पडून काशीस येतात.

**रामलीला :—** हा काशींतला सर्वांत मोठा मेळा असून भाद्रपद वद्य व आश्विन शुक्ल पक्षांत महिनाभर चालू असतो. रामलीला काशींत पेठापेठांमधून अनेक ठिकाणीं साजरी केली जाते. त्यांत रामनगराला महाराजा बनारस द्वारा रामबागेंत ( पृष्ठ ३० ) साजरी होणारी रामलीला सर्वांत मोठी होते. तेथें भगवान् रामचंद्रांच्या सेवेला महाराजा बनारससुद्धां सर्व संस्थान हजर असे. त्यामुळें तेथील लीलेला फार भव्य स्वरूप प्राप्त होत असे. संस्थान विलीन झाल्यापासून तेथील सोहळा थोडा कमी पडला.

रामलीलेमध्यें प्रत्येक तिथीचे कार्यक्रम ठरलेले आहेत. त्यांत धनुषयज्ञ, नक्कटैय्या ( शूर्पणखेचें नाक कापणें ), लंकादहन आणि भरत-मिलाप हे कार्यक्रम फार महत्त्वाचे मानले जातात. त्यांत लक्साचा धनुषयज्ञ, चेतगंज खोजवा येथील नक्कटैय्या, रामनगरचें लंकादहन, व नाटी इमलीचा भरत-मिलाप हे कार्यक्रम फारच प्रेक्षणीय होतात. त्यांत भरत-मिलापाचा कार्यक्रम अद्वितीय असतो. तो बघण्याकरितां काशी शहरच लोटतें असें नव्हे तर आसपासच्या ५–५० मैलांतील लोकपण येतात. त्या दिवशीं आसपासच्या

घरांतील समारंभ बघण्यास योग्य अशा जागा मगदुराप्रमाणें शेंपन्नास रुपये देऊन राखून ठेवल्या जातात. रामलीला तुलसीदासांनीं काशींतच प्रारंभ केली व थोड्याच वर्षांत ती संपूर्ण उत्तर हिंदुस्थानभर पसरली. काशीमध्यें तर ती इतकी बद्धमूल झाली आहे कीं, ज्याप्रमाणें आपल्याकडे ज्ञानोबाच्या पालख्यांच्या वेळीं लहान मुलें छोट्याशा पालख्या खांद्यावर घेऊन ज्ञानबा-तुकाराम करीत आनंदानें हिंडत असतात त्याप्रमाणें रामलीलेच्या दिवसांत काशींतील मुलें आपआपल्या पेठांतून रामलीलेचे कार्यक्रम करण्यांत मग्न दिसतात.

**दिवाळी :—** याचे धनत्रयोदशी व अमावास्या हे दोनच महत्त्वाचे दिवस. त्रयोदशी हा खरा भांडीबाजाराचा दिवस. त्या दिवशीं शकुनाचें म्हणून एक तरी नवीन भांडें विकत घेण्याची लोकांची रीत आहे. पुष्कळ लोक अनेक भांडीं सुद्धां विकत घेतात. भांड्यांच्या दुकानदारांची त्या दिवशीं हजारों रुपयांची विक्री होते. त्यामुळें शहरांतील भांड्यांचे दुकानदार कित्येक दिवसांपासून आपलीं दुकानें उजळून-पाजळून साफ केलेल्या असंख्य भांड्यांनीं व विजेच्या दिव्यांनीं सजवून ठेवतात. हीं दुकानें मुख्यतया ठठेरीबाजारामध्यें (पृष्ठ ६०) असल्यामुळें दिवसभर त्या बाजारांत भांडीं घेणारांची रीघ लागलेली असते. तिन्हीसांजा त्यांतच बाजार बघणारांची भर पडते. त्यामुळें तेव्हांपासून पुढें दोनतीन तास बाजारामध्यें माणसांची नुसती कोंडी होऊन जाते. ज्यांना बाजारांत जाऊन भांडीं विकत घेणें शक्य नसतें अशांच्याकरितां फेरीवाले शहरांत व आसपासच्या भागांत हिंडतात. अमावास्या हा काशींतील दिवाळीचा मुख्य दिवस. त्या दिवशीं तेथें दिव्यांची खरोखरच रेलचेल असते. तिकडे चार दिवस दिवे लावीत नाहींत, एका अमावास्येच. त्यामुळें आपल्याकडील चार दिवसांचे दिवे तेथें एकाच दिवशीं लावले जातात असें म्हणावयास हरकत नाहीं. विजेचे दिवे लोक लावीत असले तरी अजून काशीस पणत्या लावण्याचा पुष्कळच अधिक रिवाज आहे. अमावास्येस लक्ष्मीपूजनांत तेथें घरोघरीं लक्ष्मी-गणपतीचें पूजन करण्याची पद्धति आहे. त्यामुळें मातीच्या खेळण्यांच्या दुकानांत शेंकडों लक्ष्मी-गणपति विकण्यास ठेवलेले व लोक विकत घेत असलेले दृष्टीस पडतात.

तिकडे दारू उडविली जात असली तरी फार कमी प्रमाणांत, आपल्याकडच्या सारखी कानाचे पडदे फाडून डोकेदुखी व झोपमोड होण्याइतकी अंदाधुंद प्रमाणांत नाहीं. व जी उडविली जाते तीमध्यें बरीचशी नळे, चंद्रज्योति, बाण, फुलबाजी अशासारखी तेथें बनविलेली देशी असते. त्यामुळें त्यांत पैसा कमी खर्च होऊन तो बहुंशीं तेथील लोकांच्याच खिशांत जातो. आपल्याकडच्याप्रमाणें तिकडेसुद्धां दिवाळी हा खाण्यापिण्याचा सण आहे. अंतर येवढेंच कीं, आपण खाण्यापिण्याचे जिन्नस वरीं करून खातों, इष्टमित्रांच्याकडे फारसे वांटीत नाहीं. काशींत घरीं कोणी फारसे जिन्नस तयार करीत नाहींत; मिठाई घेऊन स्वतः खातात व इष्टमित्रांच्याकडे नेऊन पोंचवितात. त्यामुळें भांडीवाल्यांच्याप्रमाणें दिपवाळींत मिठाईवाल्यांची चलती असते व त्यांच्या दुकानासमोर मिठाई घेणारांची ठेचाठेच होते. दिपवाळींत जुगार खेळणें हें एक धर्मकृत्यच समजलें जातें. त्यामुळें लहानांपासून थोरांपर्यंत सर्व जुगार खेळतात. मुलें तर दोनतीन दिवस अगोदरपासून रस्त्यावर पट घेऊन जुगार खेळतांना दृष्टीस पडतात. अमावास्येच्या रात्रीं पूजन होऊन लक्ष्मी घरांत आल्यावर घरांतील अवदसा किंवा अलक्ष्मी पहाटे जुन्या सुपांनीं घराच्या बाहेर घालवून देण्याची प्रथा आहे. त्यामुळें पाडव्याचे दिवशीं पहाटेस ४—५ वाजण्याचे सुमारास आम्हांस विश्वविद्यालयांतील आपल्या बंगल्यांत आसपासच्या खेडेगांवांतील लोक अवदसेला बाहेर घालवीत असतांना सुपाच्या पाखडण्याचे आवाज ऐकूं येत व सकाळीं संकटमोचनला जातांना पंचक्रोशीच्या रस्त्यावर जिकडेतिकडे जुनीं सुपें फेकून दिलेलीं दिसत. आपल्याकडे व्यापाऱ्यांना अमावास्येइतकाच पाडवा महत्त्वाचा वाटतो. काशीकडे त्या दिवशीं पुष्कळशी सामसूमच असते व मिठाईचीं दुकानें सोडलीं तर पुष्कळशीं दुकानें दिवसां बंद किंवा अर्धवट उघडीं असतात व रात्रीं नेहमींसारखेच दिवे असतात. त्यामुळें तें आधल्या दिवशींच्या दिव्यांच्या चमचमाटामुळें डोळ्याला खटकल्याशिवाय राहात नाहीं. पाडव्याच्या दिवशींचा काशींतील मुख्य कार्यक्रम म्हणजे अन्नकोट. ह्यामध्यें अन्नपूर्णेच्या मंदिरांत नाना प्रकारच्या, विविध रंगांच्या सोन्याचांदीचा वर्ख लावलेल्या मिठायांचा सुंदर प्रेक्षणीय असा भला मोठा अन्नकोट बनविलेला असतो. त्याशिवाय वर्षभर बंद असलेली सोन्याची अन्नपूर्णापण बघण्याकरितां बाहेर ठेवलेली असते. त्यामुळें अन्नकोट व अन्नपूर्णा

जघण्याकरितां अन्नपूर्णा मंदिरांत लोकांची भयंकर गर्दी असते. लक्ष्मीपूजना-इतकेंच दिवाळींत वहीपूजनाला महत्त्व असतें. काशीकडे कायस्थांमध्यें (ही कोर्टकचेरी तसेंच दुकानांतून लिहिण्याचें काम करणारी एक निराळी जातच आहे. मुसलमानी अमदानींत उर्दूचे खरे पंडित हेच होते व अजूनसुद्धां हिंदूंमध्यें उर्दूचे जर कोणी पक्षपाती राहिले असले तर हेच मुख्यतया आहेत. हे मोठे बुद्धिमान् आहेत व पुष्कळ वेळेला तोऱ्यांत येऊन ‘ देखो, यह कायस्थ की खोपडी है, मजाक न समझो ’ असें घमेंडीमध्यें बोलतात.) ह्याचें महत्त्व जास्त व तें पूजन द्वितीयेला केलें जाते. तिकडे भाऊबीज असली तरी इकडल्याइतकी महत्त्वाची नाहीं. त्यामुळें विश्वविद्यालयाची दिवाळीची सुट्टी भाऊबिजेच्या दिवशीं संपत असे व विश्वविद्यालय उघडण्याचे दिवशीं हजर होण्यास आपल्याकडच्या विद्यार्थ्यांस दिवाळीच्या दिवशींच घरून निघणें भाग पडे. ह्या बाबतीमध्यें अनेकांनीं अनेक वेळेला थोडेफार प्रयत्न केले, पण ते व्यर्थ गेलेले पाहून महाराष्ट्र मंडळानें रजतजयंतीच्या कार्यक्रमांत त्याचा समावेश करून कुलपतींना भेटून व हजार दोन हजार सह्यांचा अर्ज त्यांच्या-पुढें ठेवून संघटित प्रयत्न केला. तेव्हां ती सुट्टी षष्ठीपर्यंत वाढली. आतां विद्यार्थी भाऊबीज आटोपून निघाला तरी वेळेवर पोंचूं शकतो.

**होळी** — आपल्याकडच्या मानानें तसेंच दिपवाळीच्या तुलनेनें उत्तर हिंदुस्थानांत होळीच्या सणाचें महत्त्व तसेंच प्रस्थ फार अधिक आहे. आपल्या-कडे आतां सार्वजनिक दृष्ट्या होळीचा उपद्रव जवळजवळ नाहींसाच झाला आहे. उत्तर हिंदुस्थानांत सुद्धां आतां पूर्वीपेक्षां त्याचा उपद्रव कमी झाला आहे. पूर्वी होळीच्या अगोदर कित्येक दिवसांपासून रंग उडविणें व अश्लील बोली बोलणें सुरू होत असे. त्यामुळेंच कित्येक दिवस अगोदर जुनीं रंगीत वस्त्रें घालून बाहेर निघण्याचा स्त्रीपुरुषांमध्यें व बाहेर शक्य तोंवर न निघण्याचा स्त्रियांमध्यें रिवाज होता. आतां ती दंगल एक दिवसावर आली आहे. असें असलें तरी ५० वर्षांपूर्वी आपल्याकडे होळीच्या दंगलीचा जो जोर होता त्यापेक्षां अधिक जोर अजून उत्तर हिंदुस्थानांत होळीचा आहे. या सणांत शिष्टता - अशिष्टता, स्वच्छता - अस्वच्छता याच्या कोणत्याच मर्यादांचें कोणालाच बंधन नसल्यामुळें ‘ मर्कटस्य सुरापानं, तस्य वृश्चिकदंशनम् ॥ तन्मध्ये भूतसंचारो

यद्वा तद्वा भविष्यति ' या सुभाषितामध्यें वर्णन केल्याप्रमाणें होळी खेळण्याकरितां बाहेर पडलेल्या लोकांची स्थिति होते. यामुळें तिकडे होळी खेळण्याच्या दिवशीं दंगे झाले नाहींत असें होत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी एका शिखानें अंगावर रंग उडवितांच आपल्या तरवारीनें पांचचार जणांस घायाळ केलें व एकास यमसदनास पाठविलें. अशा बातम्या तिकडे होळीनंतर वर्तमानपत्रांमध्यें नेहमीं वाचावयास सांपडतात. कधीं कधीं होळीच्या आड तिकडे काय काय भीषण घटना होऊं शकतात हें एका शिष्यानें पाठविलेल्या खालील पत्रावरून लक्षांत येईल.

आझमगढ
२७-३-५४

पूज्यपाद डॉक्टरसाहेब!

मैं कुशलपूर्वक रहकर आपकी कुशलता बाबा विश्वनाथसे चाहता हूँ। यहाँपर होली कुछ अच्छी नहीं रही। कुछ स्थलोंपर अघटित घटनाएं घटित हुई हैं। मजाके मजाक (थट्टेंत) पुरानी शत्रुताको ठीक करनेके लिए एक पक्षने दूसरे पक्षके आदमीको होलिकाकी प्रज्वलित अग्निमें डाल दिया। अन्य घटनाभी इसी प्रकारकी रही। यहां संप्रदाय विशेषनें एक हिन्दु नौजवानको मारकर पूर्वसेही होलिकामें डाल रक्खा था कि अग्नि जलानेपर जल मरेगा। बात वैसीही हुई। लेकिन झाडियोंके जलनेके बाद लाश (प्रेत) दिखलाई पडी तो होलीको पुनः बुझाया गया और लाश निकाली गयी।

आपका आज्ञाकारी शिष्य
भो. या.

आपल्याकडे होळीच्या दिवसांत कोणाच्या इच्छेविरुद्ध रंग उडविल्यास तो गुन्हा ठरविला गेला आहे. तिकडे वरील सारखी कठिण परिस्थिति असून एका उच्च न्यायालयानें (बहुधा बंगाल) होळींत अंगावर रंग उडविणें गुन्हा होत नाहीं असा आपला निर्णय दिला. सारांश 'फाल्गून मासीचा खेळ। जैसा अवघाचि बाष्कळ। तेथें पाहोनि निर्मळ। भल्यानें काय घ्यावें ' हें त्या वेळीं समर्थांनीं केलेलें होळीचें वर्णन आजच्या परिस्थितींत सुद्धां लागू होत आहे.

**शृंगारी एकादशी** :—काशीमध्यें होळी पौर्णिमेच्या पूर्वीच्या एकादशीच्या रात्रीं विश्वनाथ, अन्नपूर्णा तसेंच इतर देव यांना सोन्याचांदीचे अलंकार चढवून शृंगार करतात व भक्त देवांवर अबीर-गुलाल उधळतात. ह्यामुळें त्या एकादशीस 'शृंगारी' किंवा 'रंगभरी' एकादशी म्हणतात. त्या दिवशीं प्रत्येक देवळासमोर दुकानदार अबीर-गुलालानें भरलेलीं मोठमोठीं पातेलीं किंवा पराती घेऊन बसलेले असतात व लोक देवांवर उधळण्याकरितां तसेंच होळीकरितां त्यांच्याकडून तो विकत घेतात. त्या दिवशीं शृंगार बघण्याकरितां सर्व देवळांतून चिक्कार गर्दी असते. काशींतील होळीला रंगभरी एकादशीपासून रंग भरत जातो.

आपल्याकडे साधारणपणें सार्वजनिक होळ्या होतात. काशीकडे सार्वजनिक तर होतातच, पण घरोघरींसुद्धां केल्या जातात. तिकडे होळी पेटविण्याच्या मुहूर्तावर विशेष लक्ष दिलें जातें. त्यामुळें आपल्याकडच्यासारखी नेहमीं संध्याकाळीं होळी पेटत नाहीं तर कधीं संध्याकाळीं, कधीं रात्रीं, कधीं अपरात्रीं, कधीं पहाटे अशी प्रत्येक वर्षी निराळ्या वेळेला पेटते. पहाटे जळली कीं प्रायः दोन दिवस खेळली जाते. आपल्याकडे पूजेअर्चेमध्यें शंख वाजविण्याची फारशी पद्धति नाहीं. त्यामुळें ती कला फार थोडे जाणतात. शंख करण्याच्या कलेचें मात्र तसें नाहीं. त्यामुळें मनासारखें झालें नाहीं, कांहीं आपत्ति आली कीं लोकांचें लक्ष आकर्षित करण्याकरितां त्याचा भरपूर उपयोग केला जातो व होळीचें तर तें विशेष वाद्यच मानलें जातें. काशीकडे पूजेंत शंख वाजविण्याचा रिवाज असल्यामुळें ती कला प्रायः लहानमोठे सर्वच जाणतात. पण शंख करण्याची कला कोणीच जाणत नाहींत. त्यामुळें तेथें होळीच्या पूजेच्या वेळीं शंख वाजविण्याचा ध्वनि ऐकूं येतो, परंतु होळी पेटविण्याचे वेळीं व नंतर आपल्याकडे होणारा शंख करण्याचा गजर मात्र कानावर येत नाहीं. या कारणानें तिकडील होळी मुलांच्या ओरडाआरडीनें कितीही गरजली तरी शंख करण्याच्या गजराची मजा तींत नसल्यामुळें मराठी मनाला ती सुनी सुनी वाटते.

होळी जळण्याच्या दुसऱ्या दिवशीं होळी खेळली जाते. त्याला 'फाग' खेळणें म्हणतात. आपल्याकडे त्याकरितां चिखलमातीचा उपयोग केला जातो.

त्यामुळें त्याला ‘ धुळवड ’ हा शब्द योग्य असाच वाटतो. रंग आपण रंगपंचमीकरितां राखून ठेवला आहे. तिकडे रंगपंचमी नाहींच. होळी खेळण्यालाच रंग वापरला जातो. रंग उडविण्याकरितां तिकडे मोठमोठ्या पह्लेदार पितळी पिचकाऱ्या वापरल्या जातात. रंग उडविण्याचें काम पहाटेपासून १२–१ वाजेपर्यंत चालतें. त्या दिवशीं घराबाहेर पडलेला कोणी मनुष्य रंगापासून बचूं शकत नाहीं. कारण कांहीं रंगवाले शहरांतील पादचारी व वाहनचारी लोकांवर रंग उडवतात, तर कांहीं लोहमार्गाच्या बाजूनें उभे राहून धांवत्या गाड्यांवर चिखल व रंग उडवून गाड्यांना व खिडकी उघडून बसणारांना प्रसाद देण्याचें काम करतात, तर कांहीं स्थानकांत घुसून व डब्यांत शिरून प्रवाशांना रंगस्नान घालतात. त्या दिवशीं काशीच्या स्थानकामध्यें येणाऱ्या छोट्या बड्या मार्गांच्या सर्व गाड्या चिखलानें व रंगानें भरलेल्या असावयाच्या. लेखक पहिलीं कांहीं वर्षें होळी खेळावयाचे दिवशीं पहांटे गाडीनें कुठेंतरी बाहेर जात असे. परंतु स्थानक व गाड्या यांतील असुरक्षितपणा बघून त्यानें आगगाडीनें बाहेर जाण्याचें सोडून दिलें. साधारणतया १२ च्या पुढें रंग खेळण्याचें बंद होऊन लोक स्नान, शक्यतोंवर गंगेवर करून आपापल्या घरीं जातात व भोजन करतात; नंतर संध्याकाळीं उत्तमपैकीं पोषाख करून हातांत छोट्याशा झोळींत गुलाल घेऊन इष्टमित्र-नातलगांना भेटण्याकरितां बाहेर पडतात व भेटल्यावर एकमेकांच्या डोक्याला गुलाल लावून व्याही–भेटीप्रमाणें एकमेकांना कडकडून भेटतात. होळीचा हा कार्यक्रम स्त्रियासुद्धां अमलांत आणतात. म्हणजे होळीची अशिष्टता संपत असल्यामुळें त्या सुद्धां आपल्या मैत्रिणींच्याकडे जाऊन सिंदूर–गुलाल लावून एकमेकींना भेटतात.

**विश्वविद्यालयांतली होळी :—** तेथील विद्यार्थी व अध्यापक सुशिक्षित असले तरी ते होळी खेळण्यांत बहुजनसमाजाइतकेच रंगून जात. पुष्कळांना होळी खेळण्याचा हा कार्यक्रम पसंत नसल्यामुळें पुष्कळ वेळेला ह्याचा परिणाम विद्यार्थ्यांमध्यें मारामारी होण्यांत व प्राध्यापकांमध्यें कटुता होण्यांत होत असे. एकदां होळी खेळणारे प्राध्यापक न खेळणाऱ्या प्राध्यापकाकडे जाऊन गडबड करावयास लागले. तेव्हां त्यानें सुरा काढून त्यांना ‘ खबरदार ’ म्हणून बजावलें. कांहीं प्राध्यापक ही कटुता टाळण्याकरितां दरवाजे–खिडक्या

बंद करून घरांत लपून बसत. लेखकाला होळी खेळणें जसें पसंत नसे तसें कटकटी टाळण्याकरितां लपून बसणें पण पसंत नसे. त्यामुळें तो मोठ्या पहांटेच शूलटंकेश्वरासारख्या (हें विश्वविद्यालयापासून ६ मैल आहे.) गंगा तटाकीच्या प्रशांत, निसर्गरमणीय अशा स्थळीं जाऊन गंगास्नान करी व स्तोत्रपाठामध्यें १२ वाजेपर्यंत वेळ घालवून नंतर परत येई.

**होलिकोत्सव संमेलन :—** होळीच्या सणांत सगळीकडेच शिष्टतेचा अभाव असला तरी काशींत धुळवडीच्या दिवशीं संध्याकाळीं आपल्या सर्व इष्ट-मित्रपरिचितांना कोणताही भेदभाव मनांत न आणतां भेटण्याचा जो रिवाज आहे तो लेखकाला ' अन्त्यादपि परं धर्मम् ' ' अमेध्यादपि कांचनम् ' याप्रमाणें घेण्यासारखा वाटला. त्यामुळें ह्या रिवाजाप्रमाणें जरी विश्वविद्यालयांतील कांहीं प्राध्यापक आपल्या इष्ट-मित्रांना भेटत तरी हा समारंभ इतका संकुचित न राहतां विश्वविद्यालय हें एक कुटुम्ब समजून कुलपतीपासून ते खालच्या थरापर्यंतच्या अध्यापकांपर्यंत सर्वांनीं एकत्र येऊन फार मोठ्या प्रमाणांत तो साजरा झाला पाहिजे असें लेखकाच्या मनानें घेतलें व तसें घडवून आणण्याच्या दृष्टीनें विचार करून १९५२ च्या क्लबाच्या वार्षिकोत्सवप्रसंगीं त्यानें आपली ही कल्पना सर्व सभासदांच्यासमोर मांडली व क्लबामार्फत हा समारंभ केल्यास त्याकरितां आपल्यातर्फे २५ रुपये वर्गणी पण देण्याचें प्रकट केलें. कल्पना सर्वांनाच पसंत पडली व त्याप्रमाणें ठराव संमत होऊन पहिलें होलिकोत्सव–संमेलन १९५३ सालीं क्लबांत मोठ्या थाटानें व उत्साहानें पार पडलें. त्या प्रसंगीं कुलपति आचार्य नरेन्द्र देव, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध व तपोवृद्ध श्रद्धेय डे साहेब तसेंच अन्य सभासद, फार काय, होळीचें नांव घेतल्यानें सुद्धां ज्यांना धडकी भरे, असे पौर्वात्य, पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे महापण्डित डॉ. एस. के. मैत्रा, तसेंच होळीला भिणारे सर्व सभासद हजर राहिले व कोणत्याही प्रकारची उच्चनीचतेची कल्पना मनात न ठेवतां एकमेकांस बरोबरीच्या नात्यानें भेटले. संमेलनांत करमणुकीकरिता गाणें-बजावणें, होळीला साजेल अशा प्रकारचें विनोदी पण मर्यादातिक्रम न करणारें शीघ्र कवींचें काव्यगायन व स्वभावचित्रण, उन्हाळे दिवस असल्यामुळें पिण्यास थंडाई, खाण्यास पान, अत्तर-गुलाब इत्यादि ठेवले गेले होते. संमेलनांतील खाण्यापिण्याची व करमणुकीची व्यवस्था, विशेषतः खेळीमेळीचें वातावरण

घून सर्वच सभासद अत्यंत प्रसन्न झाले व तेव्हांपासून त्याच थाटांत व त्याच खेळीमेळीच्या वातावरणांत हें संमेलन प्रतिवर्षं अधिकाधिक उत्साहानें क्लबांत व्हावयास लागलें. प्रथम लेखक संमेलनास २५ रुपये देत असे. परंतु पुढें प्रतिवर्षं तें अधिकाधिक लोकप्रिय तसेंच अधिक खर्चिक व्हावयास लागल्यानें त्यानें आपली देणगी ४० रुपये केली. सेवानिवृत्तीनंतरसुद्धां तीं त्यानें तशीच चालू ठेवली आहे.

## दंगली

**कुस्त्यांची दंगल** :— आपल्याकडे कुस्त्यांची दंगल तेवढी सर्वांच्या परिचयाची आहे. काशीच्या लोकांना प्रत्येक गोष्टीस दंगलीचें स्वरूप देण्याची आवड किंवा शौक असल्यामुळें तेथें वर्षभर अनेक दंगली होत असतात. नागपंचमी हा दिवस आपल्याकडे भाज्या न कापणें व नागाची पूजा करून त्याला दूध पाजणें यांकरितां प्रसिद्ध आहे. तिकडे या गोष्टींना विशेष महत्त्व नसून कुस्तीला महत्त्व आहे. त्यामुळें त्या दिवशीं प्रत्येक आखाडयामध्यें कुस्त्यांच्या दंगली होतात. यामध्यें भाग घेणारे बहुसंख्य लोक खालच्या वर्गांचे असल्यामुळें त्यांच्यामध्यें ह्या सणाचें फार प्रस्थ आहे व त्यामुळें सर्वत्र त्या दिवशीं सुट्टी असते. विश्वविद्यालयांत एकदां नागपंचमीची सुट्टी बंद केली. तेव्हां नोकरवर्गानें संप करून ती सुट्टी पुन्हा चालू करावयास लाविली. त्या दिवशीं गारुडी आपलें संमेलन भरवितात. पण आपल्याकडच्या-सारखे घरोघरीं हिंडत नाहींत.

**लाठी दंगल** :— शिखांचें कृपाण, गुरख्यांची कुकरी तशीच हिंदुस्थानी लोकांची लाठी. परंतु ती कृपाण किंवा कुकरीपेक्षां अधिक उपयोगी आहे :—

लाठीमें गुण बहुत हैं, सदा राखिये संग।
गहिर नदी नाला जहां तहां बचावे अंग ॥
तहां बचावे अंग झपटि कुत्ताको मारै।
दुश्मन दावागीर होय तिनहूको झारै ॥
कह गिरिधर कविराय सुनो हो घरके बाठी।
सब हथियारन छोड हाथमहं लीजै लाठी ॥

शिक्षित लोकांत ती दिसत नसली तरी अशिक्षित खेडवळांत ती सर्रास दिसून येते. पुष्कळ वेळेला खेड्यांच्या स्थानकावर गाडी थांबली कीं आपणांस उतारूंच्यापेक्षां त्यांच्या हातांतील लाठ्यांचीच फार अडचण वाटते. लाठ्या तयार करण्याचा तिकडे धंदा आहे. त्या साध्या तशाच पितळी तारा, फुलें, खिळे यांनीं मढविलेल्या असतात. काशीस बुल्यानाल्यावर त्यांचीं दुकानें आहेत. काशीजवळील मिर्झापूर गुंडांचें आगर आहे. तेथें उत्तम लाठ्या तयार होतात व स्थानकावर विकावयास येतात. अंगापिंडानें चांगल्या व धीरोदात्त गतीनें चालणाऱ्याच्या हातांत लाठी फार शोभून दिसते. हिंदु-मुसलमानांच्या वितुष्टाचे वेळीं लेखकानें आपल्या गांवांतील वरीलसारख्या एक-दोन व्यक्तींना तिकडून लाठ्या आणून दिल्या होत्या. काशीकडे लाठी फिरवण्याचे शौकीन लोक पुष्कळ आहेत. तिकडे शौकीन मस्त लोकांना 'गुरु' म्हणतात. अशा लाठीगुरूंची दंगल तेथें होळीच्या वेळीं मानमंदिर घाटाशेजारील मीर घाटावर होते. ह्याच्यावर १८ व्या शतकांतील काशीचा राज्यपाल, मीर रुस्तुमअली, याचा वाडा आहे. म्हणून याला मीर घाट हें नांव पडलें. मनसारामानें (पृष्ठ ३२) पुढें याला हाकलून काशीवर आपला अंमल चालू केला. ह्या घाटावर गुंडांचा अड्डा असतो.

**तैराकी दंगल :—** काशीपर्यंत गंगा उथळ व अवखळ आहे. हृषीकेश व हरीची पायरी सोडली तर हरिद्वार यांमध्यें गंगेचा प्रवाह इतका प्रबळ आहे कीं, मनुष्य सहज वाहून जावा. येवढ्याकरितां हरिद्वारास घाटावर साखळदंड लावून ठेवले आहेत. ह्या गंगेचें वर्णन 'युधिष्ठिरः कस्य पुत्रो **गंगा वहति कीदृशी** । हंसस्य शोभा का वास्ते धर्मस्य **त्वरिता गतिः**' या सुभाषितामध्यें केलें आहे. काशीस व त्यानंतर गंगेचें पात्र प्रशस्त व प्रवाह प्रशान्त आहे. ह्याचें वर्णन 'का शीतलवाहिनी गंगा ?' (उत्तर-काशीतलवाहिनी गंगा) ह्या सुभाषितामध्यें केलें आहे. पावसाळ्यामध्येंसुद्धां येथून पुढें गंगेत अवखळपणा येत नाहीं हें 'नात्यर्थं क्षुभ्यते देवी गंगैव जलदागमे' ह्या रामायणाच्या वचनावरूनसुद्धां सिद्ध होतें. 'गंगा प्रवाह' हा वाक्प्रचार ह्याच प्रवाहाचा द्योतक आहे. वरील कारणामुळें काशींत बारा मास पोहण्याची व नावेंत बसण्याची मजा असते. येवढ्या मोठ्या अथांग पाण्यांत मगरी (हिन्दी घडियाल) असणें स्वाभाविक आहे व त्या आहेत सुद्धां. परंतु काशीच्या सीमेमध्यें विश्वनाथाच्या

आज्ञेमुळें त्या अपाय करीत नाहींत किंवा त्यांच्यापासून धोका नाहीं असें मानलें जातें व तें खरेंहि दिसतें. कारण तेथें पुष्करतीर्थाप्रमाणें घाटावर कोणी भाले घेऊन उभे राहत नाहींत व लोक कांठावर बुचकळ्या मारीत नाहींत, तर लहानमोठीं सर्वंच लागेल तितका वेळ व लागेल तितकें दूर जाऊन गंगेंत डुंबत किंवा पोहत असतात. आम्हीं पायीं काशीस गेलों त्या वेळीं जूनचा महिना, उन्हाळा मी म्हणत होता. त्यामुळें गंगेचें तें प्रशस्त पात्र व भरपूर पाणी बघून साहजिकच पोहण्याची इच्छा झाली. परंतु अज्ञात जलामध्यें उतरूं नये ( नाविज्ञाते जलाशये न स्नानमाचरेत् । – मनु ), त्यांत चिखल, शेवाळ, जीवजंतु यांपासून धोका असतो याचें प्रत्यक्ष ज्ञान रायगडच्या प्रवासांत महाडच्या रस्त्यावरील सावित्री नदीच्या डोहांत स्नान करते वेळीं प्राप्त झाल्यामुळें आम्हीं काशीस चौकशी केली. त्या वेळीं वरील माहिती आम्हांस सांगण्यांत आली. वरील कारणामुळें काशींत पोहण्याचे शौकीन लोक पुष्कळ आहेत व उन्हाळ्यांत मानमंदिर घाटावर त्यांची पोहण्याची दंगल होते.

**इतर दंगली**:—याशिवाय मुक्की ( एक प्रकारचें मुष्टियुद्ध ), पतंग इत्यादिकांच्या तसेंच कजली, बिरहा ( विरहगीत ), चनाजोरगरम ( विशेष पद्धतीनें खारावलेले फुटाणे विकतांना म्हणण्याचें गाणें ) इत्यादि गाण्यांच्या पण दंगली भिन्न भिन्न ऋतूंमध्यें होतात.

**पशुपक्ष्यांच्या दंगली**:—काशीच्या अनेक लोकांना तोता ( पोपट ). कोयल ( कोकिळा ), तीतर, बटेर, लाल, बुलबुल, मुर्गा ( कोंबडा ), कबूतर, मैंढा यांपैकीं एखाद दुसरा पक्षी पाळण्याचा शौक आहे. त्यामुळें बाजारांत इतर जिनसांप्रमाणें हे पक्षी विकणारे लोक नेहमीं दृष्टीस पडतात. ह्यामध्यें तीतर पाळणारे सर्वांत अधिक. विश्वविद्यालयांत सकाळीं बाहेर पडलें कीं त्यांना खायला घालण्याकरितां हातांत पिंजरा घेऊन शेतांतून हिंडतांना अनेक शौकीन दृष्टीस पडत. यांचें मुख्य खाद्य वाळवी व काशींत वाळवीचा भयंकर उपद्रव. विश्वविद्यालयांत अशी एक इमारत मिळावयाची नाहीं कीं, जिचें लांकडी सामान वाळवीनें खाऊन नाहींसें केलें नाहीं. काष्ठ, कापड व कागद हें यांचें मुख्य खाद्य. याकरितां ही जमिनींतून वर येते. सीमेंट व चुना हिच्या प्रवेशास बाधक होतात. परंतु पुष्कळ वेळेला ह्यांच्या गिलाव्यांत किंवा जमिनींत फटी

किंवा छिद्रें राहतात किंवा होतात. तसेंच कित्येक वेळेला वाळूमध्यें शंख-शिंपल्यांचे कण असतात. ते आपल्या अंगरसानें विरघळवून वाळवी छिद्र बनविते व अशा रीतीनें चुना-सीमेंटच्या इमारतीमध्यें सुद्धां प्रवेश करून वरच्या मजल्यापर्यंत पोंचते व नुकसान करते. एकदां वाळवीचा प्रादुर्भाव झाला कीं तिचा नायनाट करणें कठिण होतें. लेखकानें दुसऱ्या मजल्यावर आपलीं प्रकाशित पुस्तकें ठेवलीं होतीं. तेथें वाळवी कशी केव्हां पोंचली त्याचा पत्ता लागला नाहीं व तिनें शेंकडों रुपयांचें नुकसान केलें. वाळवीपायीं हिंदुस्थानांत करोडों रुपयांचें नुकसान होत असेल.

वरील पशुपक्ष्यांपैकीं पोपट व कोकिळा केवळ मजेखातर पाळले जातात. कबूतरांच्या उडविण्याच्या दंगली होतात व बाकीच्यांच्या प्रत्यक्ष लढायांच्या रूपानें होतात. त्याकरितां आपल्याकडील घोड्यांच्या शर्यतीप्रमाणें पांच-पंचवीस रुपयांपासून शेंकडों रुपये लावले जातात. थोडक्यांत काशीकरांचा दंगलीचा शौक फार व्यापक आहे.

## वनभोजन ( बहरीअलंग )

घनदाट वस्ती, एकमेकांना चिकटलेले उंच उंच वाडे, चक्रव्यूहासारखे बोळ, यांमुळें जुन्या काशींत राहणाराला सूर्यप्रकाश व मोकळी हवा ह्या गोष्टी बाहेर पडल्याशिवाय जवळजवळ दुर्मिळ सारख्याच असतात. तेथील कायमचे लोक जरी थोडेफार वरील परिस्थितीला अभ्यस्त झाले असले तरी मधून मधून बाहेर मोकळ्या वातावरणांत जाऊन पाय मोकळे करण्याची त्यांना इच्छा होणें स्वाभाविक आहे. ह्या स्वाभाविक इच्छेलाच अंगडेंटोपडें चढवून त्यांनीं आपल्या शौकीन जीवनाचें एक अंग बनविलें आहे.

याकरितां काशीकर संकटमोचन ( पृष्ठ ४१ ), छोटीबडी गैबी ( येथील पाणी फारच प्रसिद्ध आहे. पुष्कळ लोक तेथें पाणी पिण्याकरितां किंवा पिण्याचें पाणी नेण्याकरितां येतात. ), सिद्धगिरी, सारनाथ, रामनगर, ( पृष्ठ ३० ), राजा तलाव, तसेंच शहराबाहेरील रईस लोकांचे बगीचे इत्यादि ठिकाणीं मनास येईल तेव्हां किंवा तेथील उत्सव, मेळ्यांच्या दिवशीं जातात. तेथें दंड-बैठक, मालिश-स्नान करतात. थंडाई, भांग तयार करून पितात.

दालबाटी, चुर्मा, भरीत, दहीं, बुंदीलाडू इत्यादि तयार करून त्यावर हात मारतात व भांगेच्या नशेंत गहरेबाज एक्क्यांत बसून संध्याकाळीं घरीं परत येतात.

**गहरेबाज एक्के :—** हा रबरी धावांचा, मागल्या बाजूस नक्षीदार कठडा असलेला बहुधा उघडा एक्का ( पृष्ठ ५२ ) असतो. तबकडीवर चांगल्यापैकीं गादी असते. सर्व लांकडी सामानावर पितळी पट्ट्या व फुल्या असतात. तबकडीच्या खालीं चारी बाजूंस किंकिणी ( छोट्या घंटा ) असतात व मध्यावर अधिक खालीं लोंबणारी मोठी घंटा असते. खोगिरावर मध्यें उंच एक व दोन्हीकडे दोन अशा तीन घंटा असतात. पितळी सामान वासून पुसून चकचकीत ठेवलेलें असतें. घोड्याच्या लगामाच्या दोऱ्या रंगीत व जाड असतात. घोड्यास तोंडाच्या खालीं लोंबणारें व तोंडपट्टीपासून पोटपट्टीपर्यंत रंगीत वस्त्र बांधलेलें असतें. घोडा मस्त व ऐटबाज असतो. बनारसी शौकीन लोकांचें हें खाजगी वाहन आहे. वीस-पंचवीस वर्षांपूर्वी हें पुष्कळच बघण्यांत येत असे. आतां फार कमी झालें आहे. अशा एक्क्यामध्यें अंगांत मलमलीचा कुर्ता, डोक्याला बनारसी टोपी घालून एका हातानें एक खुंटी व दुसऱ्या हातानें लगाम खेंचून लगामाच्या इशाऱ्यावर घोड्यास सरपट दौडवीत घोड्याच्या टापांच्या व एक्क्याच्या घंटांच्या आवाजाच्या मस्तीमध्यें तोंडांत पान चघळीत व तोंड वर करून मागील दोस्ताशीं गप्पा मारीत शहराच्या भररस्त्यांतून सैरसपाटा करणें हा बनारसी रईसांचा एक शौक आहे.

## समाजजीवन

काशी हें प्राचीन काळापासून प्राचीन भारतीय संस्कृतीचें व परंपरेचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध आहे. ती काशीची प्रसिद्धि आजच्या बदललेल्या युगांत सुद्धां तुलनात्मक दृष्ट्या टिकून आहे. काशीच्या समाजामध्यें विविधता ( पृष्ठ ४८ ) असली तरी ती हल्लींच्या काळीं वाढलेल्या मोठमोठ्या शहरांतील चकाली विविधता नसून भारतीय आहे. डॉ. अनी बेझंट व पं. मालवीयजी यांच्यासारख्या भारतीय संस्कृतीच्या अभिमान्यांनीं काशींत आपल्या संस्था स्थापण्याचें हेंच मुख्य कारण होतें. सध्यां हिंदु समाजाची

प्रायः अशी स्थिति दिसून येते कीं, सरकारी सुट्टी नसली तर आपला कोणता सण, पर्वमास चालू आहे याची त्याला कल्पना नसते व तो त्याची फारशी परवा पण करीत नाहीं. काशींतील समाजाची तशी स्थिति नाहीं. ज्याप्रमाणें वर्षाच्या बदलणाऱ्या ऋतूंचें आगमन जलवायु, फुलें, फळें, भाज्यापाले यांच्या परिवर्तनानें करून येतें त्याप्रमाणें काशींत विविध सण–पर्व–मासांचें आगमन नगरभर दिसून येणाऱ्या लोकांच्या हालचालींनीं, धर्मकृत्यांनीं, ठिकठिकाणीं भरणाऱ्या मेळ्यांनीं व बाजारांत विकावयास येणाऱ्या वस्तूंनीं करून येतें.

**गंगास्नानः**— काशीमध्यें गंगा कायमचीच असली तरी 'संनिकर्षोऽत्र मर्त्यानामनादरणकारणम् । गांगं हित्वा यथान्याम्भस्तत्रत्यो याति शुद्धये' या भागवताच्या म्हणण्याप्रमाणें काशीकरांनीं तिचा अनादर किंवा तिच्यांत मोऱ्या सुटल्यांत, घाटापाशीं पाणी घाण असतें, म्हणून तिचा परित्याग केला नाहीं तर 'सर्व तीर्थमयी गंगा' ह्या महाभारतकारांच्या वचनावर विश्वास ठेवून तिच्याशीं व्यवहार ठेवला आहे. त्यामुळें काशींतील सर्व स्नानयोग्य घाट, विशेषतः दशाश्वमेधासारखे धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचे घाट सदा सर्वदा स्नान करणाऱ्या लोकांनीं गजबलेले (पृष्ठ १९) असतात. त्यांतून गंगादशहरा, सोमवती व मौनी अमावास्या, प्रबोधिनी एकादशी, ग्रहण अशासारख्या महापर्वांना तर घाटांवर मुंग्यांच्यासारखी माणसांची रीघ लागते व दशाश्वमेधाच्या रस्त्यावर वाहतुकीची विशेष व्यवस्था करणें भाग पडतें. हीं महापर्वें अनेक व वार्षिक असल्यामुळें गोदोलिया ते घाटापर्यंतच्या रस्त्यावर मध्यें खांब लावण्याकरितां सडेंकत कायमच्याच लोखंडी कुंड्या पुरून ठेवलेल्या आहेत.

**गंगापानः**— गंगास्नानाचें महत्त्व सर्वसाधारण जनतेला जितकें वाटतें तितकें गंगापानाचें वाटत नाहीं. तिला गंगापानाचें महत्त्व 'औषधं जाह्नवी तोयं' यांत वर्णन केल्याप्रमाणें मरावयाचे वेळीं दोन पळ्या गंगाजल सेवन करण्यापुरतेंच मर्यादित आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. तें मरावयाचे वेळीं सेवन केलें असतां जसें मोक्षप्रद आहे तसेंच जीवनभर प्यायलें असतां स्वास्थ्यप्रद पण आहे. कांहींना 'गंगास्नान व तुंगापान' ह्या म्हणीवरून पानाच्या दृष्टीनें तुंगभद्रेचें पाणी गंगेच्या पाण्यापेक्षां अधिक उपयुक्त वाटण्याचा संभव आहे. तुंगभद्रा कर्नाटकांत असून तिच्याकांठीं हरिहर व

हंपीविरूपाक्ष हीं दोन प्रसिद्ध क्षेत्रें आहेत. लेखकानें हीं दोन्ही क्षेत्रें बघितलीं आहेत व तुंगापान पण केलें आहे. तिच्या पाण्याला विशेष गोडी आहे म्हणून ही म्हण पडली आहे एवढेंच या बाबतीमध्यें म्हणतां येईल. यापेक्षां तिच्यामध्यें अधिक गुण असते तर गंगाजल पिणारे लोक तिचेंच पाणी आणून पिते.

**गंगागुण** :— आपल्यामध्यें 'गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वति। नर्मदेसिंधुकावेरी' अशा अन्य अनेक नद्यांचें जल पवित्र मानलें गेलें आहे. परंतु गंगाजलाचे गुण (खालीं पहा) यांपैकीं एकाहि नदीच्या पाण्यांत नाहींत. यापुढें जाऊन असें सुद्धां म्हणतां येईल कीं, भारतवर्षांतच काय, जगांतसुद्धां दुसऱ्या कोणत्याही नदीच्या पाण्यांत हे गुण असतील असें वाटत नाहीं. म्हणजे गंगाजल 'एकमेवाद्वितीयम्' अशा स्वरूपाचें आहे. वाल्मीकि रामायणाच्या बालकाण्डांत विश्वामित्रानें प्रभु रामचंद्रास गंगावतरणाची कथा सांगितली आहे. त्यामध्यें प्रत्येक ठिकाणीं गंगेला 'सरितां श्रेष्ठा', 'सरित्प्रवरा' हें विशेषण लावलें आहे. यावरून वरील विधानाची सत्यता व खालील गुणांवरून त्याची अन्वर्थकता लक्षांत येईल.

(१) **टिकाऊपणा** :— कोणतेंही पाणी कांहीं दिवस भांड्यांत भरून ठेवलें कीं तें खराब होतें. गंगाजल कांहीं दिवसच काय, कांहीं वर्षें ठेवूनसुद्धां जसेंच्या तसें राहतें हें आपणां सर्वांच्या परिचयाचें आहे. इंग्रजांना गंगाजलाचा टिकाऊपणा जहाजावरील पाण्याच्या निमित्तानें परिचित झाला. त्यांना असें दिसून आलें कीं, इंग्लंडांत जहाजावर पिण्याकरितां भरलेलें पाणी हिंदुस्थानापर्यंत चांगलें राहात नसल्यामुळें वाटेंत दोन-चार ठिकाणीं बदलावें लागतें : परंतु कलकत्त्यास हुगळी (गंगाशाखा) चें भरलेलें पाणी इंग्लंडपर्यंत जसेंच्या तसें चांगलें रहात असल्यामुळें बदलावें लागत नाहीं.

(२) **उपसर्गनाशन** :— पटकी, अतिसार यांसारख्या जलबाह्य उपसर्गानें मृतांचीं प्रेतें पाण्यांत पडून राहिलीं तर त्यांच्याभोंवतींचें पाणी त्या रोगांच्या तृणाणूंनीं (Bacteria) नुसतें बुजबुजून जातें. पण गंगेंत जर हीं प्रेतें पडून राहिलीं तर तशी स्थिति आढळून येत नाहीं. यावरून एका नळींत वरील रोगांचे उपसर्गकारी तृणाणु घेऊन त्यांत गंगेचें पाणी घालून बघितलें तेव्हां

ते थोड्या तासांत मेलेले आढळले. या बाबतीमध्यें ५० वर्षांपूर्वी भारतीय सैन्यांतील एक अधिकारी मेजर न्यूवेल यानें, बनारसवर लिहिलेल्या पुस्तकांतील खालील उतारा वाचनीय आहे—

For countless centuries Hindus have been persuaded that no harm could possibly come to them from the water of their hallowed river, which they believe to possess miraculous properties. Curiously enough modern science has in part established the truth of their ancient superstition. Extensive tests have revealed the presence of a powerful antiseptic of some kind. This is said to nullify the most virulent cholera germ, and to kill it outright within six hours.

पुढें अधिक संशोधन केल्यावर असें आढळून आलें कीं, तृणाणुभक्ष (Bacterio-phage) या जातीचे विकारी जीवाणूंच्यावर निर्वाह करणारे अतिसूक्ष्म जीव गंगेच्या पाण्यांत असल्यामुळें तिच्यामध्यें उपसर्गनाशनाचा (Disinfectant) गुण आला आहे.

चरकमुनींनीं 'आन्तरीक्षमुदकानां पथ्यतमम्' म्हणजे पावसाचें पाणी पिण्यास सर्वोत्तम असें सांगितलें आहे. त्यांत 'अनार्तवं च यद्दिव्यमार्तवं प्रथमं च यत्' म्हणजे अकालीं पडणाऱ्या पावसाचें तसेंच पावसाळ्याच्या आरंभींचें पाणी अहितकर व नंतरचें आश्विनांतलें पाणी सर्वोत्तम असें सांगितलें आहे. ह्याला काश्यपसंहितेंत 'हंसोदक' (हंसासारखें किंवा हंसास पिण्यास योग्य असें स्वच्छ शुद्ध जल) म्हटलें आहे—अतीते प्रथमे मासि प्रावृट्प्रोष्ठपदागमे। दिव्यं खात्पतितं तोयं नाम्ना हंसोदकं शिवम्॥ ह्या हंसोदकास सुश्रुताचार्यांनीं 'गांग' म्हटलें आहे—तत्रान्तरिक्षं चतुर्विधम्—धारं, कारं, तौषारं, हैममिति। तेषां धारं प्रधानम्। तत् पुनर्द्विविधम्—गांगं सामुद्रं चेति। तत्र गांगमाश्वयुजेमासि प्रायशो वर्षति॥ थोडक्यांत सांगावयाचें तर सुश्रुताचार्यांनीं सूचित केल्याप्रमाणें गंगाजल खरोखरच 'उपमानस्यापि सखे प्रत्युपमानं' ह्या कालिदासाच्या वचनानें वर्णन करण्याच्या योग्यतेचें आहे.

गंगाजलापासून जलबाह्य रोग होण्याची फारशी भीति नसल्यामुळें अत्यंत प्राचीन काळापासून गंगाकांठचे तसेंच गंगेपासून शेंकडों मैलांपर्यंत दूर असलेले अनेक धनिक धार्मिक लोक पिण्याकरितां गंगेचेंच पाणी वापरीत आले आहेत. या बाबतीमध्यें दोन गोष्टी प्रामुख्यानें पुढें ठेवण्यासारख्या आहेत. पहिली गोष्ट अशी कीं, गंगाजल केवळ हिंदूच नव्हे तर मुसल्मानी अमदानींत अनेक मुसलमान नवाब बादशहासुद्धां कटाक्षानें पीत आले आहेत. त्यामध्यें महंमद तघलघ, टिपू सुल्तान, अकबर व कट्टर हिंदुद्वेष्टा अवरंगजेब यांचा समावेश आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, इंग्रजी अमदानींत गंगापानाचें क्षेत्र भारताबाहेर विलायतेपर्यंत पोंचलें. म्हणजे अनेक लोक विलायतेमध्यें पिण्यास गंगाजल नेऊं लागले. ह्याचीं दोन टोकाचीं दोन उदाहरणें देण्यासारखीं आहेत. पं. मालवीयजी म्हणजे सनातनी हिंदुत्वाची अभिनव मूर्ति. विलायतेस गेले तेव्हां त्यांनीं वाटेंत तसेंच तेथल्या निवासकालांत पिण्याकरितां गंगाजलाची व्यवस्था केली. ह्याच्या उलट दुसरें उदाहरण पूर्ण पाश्चात्य पद्धतीनें राहणाऱ्या व प्रायः विलायतेंत निवास करणाऱ्या क्रिकेटिअर जामसाहेबांचें. हे नेहमीं पिण्याकरितां गंगाजल वापरीत व शेवटपर्यंत त्यांनीं गंगाजलच वापरलें असें माजी सौराष्ट्रप्रमुख जामसाहेब यांनीं जामनगर येथील आपल्या पदव्युत्तर आयुर्वेद प्रशिक्षण केन्द्राच्या प्राचार्यांच्या स्थानावर नेमण्याच्या दृष्टीनें दिल्लीस भेटावयास बोलाविलें असतांना बोलण्याच्या प्रसंगांत लेखकास सांगितल्याचें स्मरतें. हिंदु विश्वविद्यालय सोडून अन्यत्र कोठेंही सेवावृत्ति स्वीकारावयाची नाहीं अशी लेखकाची प्रथमपासून ठाम भूमिका असल्यामुळें त्यानें इतर जागांप्रमाणें त्या जागेस पण नकार दिला.

गंगेचें पाणी पिण्यास कितीही चांगलें असलें तरी त्यामध्यें अभ्रकाचे सूक्ष्म कण असतात. त्यामुळेंच बहुधा तें पाणी पांढरट दिसतें. ते कण पोटांत गेल्यास प्रवाहिका उत्पन्न होते. बद्रीनारायणाच्या यात्रेमध्यें जे लोक वाटेंतील गंगेचें पाणी पितात ते बहुधा परसाकडेच्या विकारानें पीडित होतात. त्याला पहाडी प्रवाहिका ( Hill diarrhoea ) म्हणतात. कधीं कधीं ही प्रवाहिका घातक होते. तेव्हां गंगेचें ताजें पाणी कधींही पिऊं नये. आचमनें करण्यास हरकत नाहीं. तें नेहमीं एक-दोन दिवस ठेवून पिणें जरुरीचें असतें. या योगानें

त्यांतील वरील दोष खालीं बसतात. गंगेचें पाणी पिण्याचा रिवाज आहे तेथें प्रत्येक घरांत पाणी सांठविण्याची पण व्यवस्था केलेली आहे.

अनेक नवशिक्षित लोक काशींत आल्यावर घाटाजवळील गंगेच्या पाण्यांतील घाण बघून स्नानच करीत नाहींत, मग पिण्याचें नांवच नको. हे लोक जर दिल्ली, आग्रा यांसारख्या घाणेरड्या शहरांतील प्रेक्षणीय स्थानें त्यांच्यामधील घाणेरडे भाग तुडवून किंवा टाळून बघूं शकतात किंवा बघतात, बघण्याचें सोडीत नाहींत तर मग गंगेनेंच काय केलें आहे ? तेव्हां जर त्यांची गंगेवरील श्रद्धा केवळ घाण पाणी बघून थोडीशी डळमळीत झाली असेल तर त्यांनीं घाटापासून पोहत किंवा नावेनें पुढें जाऊन मनसोक्त स्नान करावें, आनंद वाटल्याशिवाय राहणार नाहीं. घाटाजवळील घाण पाण्यांत स्नान करावें असें कोणी म्हणत नाहीं. त्याचबरोबर घाटापाशीं पाणी घाण आहे म्हणून गंगास्नानच नको हें म्हणणें पण उचित नाहीं. अर्थात् ज्यांची गंगेवर श्रद्धाच नाहीं त्यांच्या बाबतीमध्यें 'जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः' यापेक्षां दुसरें काय म्हणणार ?

**एकादशी** :—काशीस एकादशीचें फार महत्त्व आहे. आठवड्याच्या सुट्टीचा कायदा अमलांत येण्यापूर्वीं तेथें बहुतेक बाजार एकादशीलाच बंद असत. त्या दिवशीं सकाळीं दशाश्वमेध, विश्वनाथगल्ली इत्यादि मोठमोठ्या मंदिरांच्यापाशीं शिंगाड्याचें पीठ, कुट्टूचें तांदूळ व त्याचें पीठ इत्यादि उपवासाचे जिन्नस विकावयास बसलेल्या अनेक बायका आढळतील. याशिवाय प्रत्येक एकादशीची विशेषता असेल ती निराळी. शृंगारी एकादशी, मागें (पृष्ठ ११७) पहा. चातुर्मासप्रारंभींच्या आषाढी (शयनी) एकादशीचें काशींत विशेष महत्त्व नाहीं, परंतु चातुर्माससमाप्तीच्या कार्तिकी एकादशीचें फार मोठें माहात्म्य आहे. ती तिकडे तिच्या खऱ्या (प्रबोधिनी) नांवानेंच ओळखली जाते. ह्या एकादशीचें पहिलें सूचक लक्षण ऊंस. त्या दिवशीं ऊंस विकत घेतल्याशिवाय सहसा कोणी राहावयाचा नाहीं. त्यामुळें बाजारांत व शहरांत जिकडे तिकडे ऊंस व ऊंस विकणारे, ऊंस विकत घेणारे दृष्टीस पडतील. उंसाच्या माहात्म्यामुळें हिला 'ऊखी एकादशी' सुद्धां म्हणतात. दुसरें सूचक लक्षण नवा गूळ. हा पण त्या दिवशीं बाजारांत येतो व फार महाग असला तरी लोक विकत घेतात.

**हरिताळका :—** हरिताळका सगळीकडेच बायकांचा फार मोठा सण आहे. पण आपल्याकडे तो पूजेचा व उपासाचा. बाहेर त्याचा थांगपत्ता लागत नाहीं. काशीकडे हा सण ' तीज ' म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या दिवशीं हरिताळकेची पूजा होत असली तरी त्यापेक्षां अधिक महत्त्व गंगास्नानाचें किंवा तीर्थस्नानाचें व उपासाचें. खेडेगांवाच्या बायका दहावीस जणी मिळून रस्त्यानें गाणीं म्हणत गंगेवर किंवा जवळपासचें तीर्थ किंवा कुण्ड यावर स्नानाला जातात. विश्वविद्यालयामध्यें त्यांच्या स्नानाला जाण्यानें तिजेचा पत्ता लागत असे. उपासामध्यें उपाशी व दुप्पटखाशी हें नसून पुष्कळ बायका तर निर्जळी करतात. तिजेची सर्वांत मोठी लक्षांत येणारी गोष्ट म्हणजे बायकांचें नवीन बांगड्या भरणें. काशीस तिजेला नवीन बांगड्या भरणार नाहीं अशी सुवासिनी मिळणें कठिण. त्या दिवशीं सर्व बायकांना बांगड्या भरून घेणें शक्य नसल्यामुळें दोनतीन दिवस अगोदरपासून बांगड्या भरून घेण्याचें काम सुरू होतें. तेव्हां शहरांतील सर्व बांगडीवाल्यांच्या दुकानीं बांगड्या भरण्याकरितां बायकांच्या झुंडीच्या झुंडी दिसावयास लागल्या कीं तीज आली म्हणून समजावें. ह्या तिजेला नवीन लग्न झालेल्या मुलींच्या माहेरीं सासरहून साडीचोळी, कुंकवाचा करंडा, बांगड्या, बिंदी ( कपाळीं लावण्याच्या टिकल्या ) फळें, मकाणें अशासारखे उपासाचे पदार्थ इत्यादिकांची डाली वाजत गाजत पाठविली जाते. कांहीं बायका त्या दिवशीं गंगेवर मुलांचीं जावळें करतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सर्व वर्षांत काशीमध्यें स्त्रीजातीच्या दृष्टीनें तिजेसारखा दुसरा महत्त्वाचा दिवस नाहीं म्हटलें तरी चालेल.

**वसंतपंचमी :—** माघ शुद्ध पंचमीचा हा दिवस आपल्या परिचयाचा असला तरी आपल्याकडे त्याला विशेष महत्त्व नाहीं. काशीकडे तो एक अत्यंत पवित्र दिवस म्हणून मानला जातो. वसंतपंचमी वसंतागमसूचक असल्यामुळें अनेक स्त्री-पुरुष त्या दिवशीं पीतवस्त्र परिधान करतात. १९१६ सालीं याच दिवशीं पं. मदनमोहन मालवीयजींनीं आपल्या जीवनाचें सारसर्वस्व जें हिंदु-विश्वविद्यालय त्याचा शिलान्यास एखाद्या राजाला शोभेल अशा थाटानें त्या वेळेचे भारताचे व्हॉइसराय लार्ड हार्डिंज यांचे हस्तें करून घेतला. यामुळें विश्वविद्यालयांत हा दिवस स्थापनादिन म्हणून मोठ्या समारंभानें साजरा केला जातो.

**नारळी पौर्णिमा :—** ती येण्याच्या अगोदरपासून कित्येक दिवस शहरभर

राख्यांचीं दुकानें दृष्टीस पडूं लागतात. काशीकडे हलक्यापासून फार भारी किंमतीपर्यंत अनेक मनमोहक रंगरूपांच्या राख्या बनवितात. त्या दिवशीं बहिणी भावांच्या हातांत राख्या बांधतात. ह्या रक्षाबंधनाला तिकडे फार महत्त्व दिलें जातें. त्या दिवशीं गरीब ब्राह्मण घरोघरीं जाऊन लोकांच्या हातांत राख्या बांधून दक्षिणा मिळवतात. थोडक्यांत, नारळी पौर्णिमा ही काशीकडे 'राखी पौर्णिमा' आहे व तिचें ज्ञान पुरुषांच्या हातांत बांधलेल्या राखीनें होतें.

**संक्रान्ति :**—संक्रांत जवळ यावयास लागली कीं पोहे, तीळ व तिळकूट यांचा बाजार लागतो. बिसेसरगंजामध्यें तर या जिनसांचे ढीगचे ढीग (पृष्ठ ७३) लागतात. तिन्ही जिन्नस अनेक प्रकारचे मिळतात. काशीकडे संक्रांतीला तिळकुटाचा उपयोग केला जातो. हलवा तिकडे माहीत नाहीं, मग त्याच्या विविध प्रकारांची व अलंकारांची गोष्टच कशाला. आपली दक्षिणी मंडळी मात्र साधारण प्रतीचा हलवा करून विकतात. तिळकूट साखर व गूळ ह्या दोहींचें व अनेक प्रकारचें असतें. त्यामध्यें साखरेची बनविलेली 'तिळपापडी' फार उत्तम, खमंग व खुसखुशीत असते. ही तिकडे हिंवाळाभर मिळते. गयेची तिळपापडी काशीपेक्षां अधिक चांगली असते. संक्रांतीला सासरीं असणाऱ्या मुलीस 'खिचडी' पाठविण्याचा रिवाज आहे. ह्यामध्यें साडी, चोळी, कुंकवाचा करंडा, बिंदी, तांदूळ, मुगाची डाळ, विविध प्रकारचें तिळकूट, मटार, फुलावर, वांगीं इत्यादि भाज्या, पोहे हे सर्व जिन्नस भरपूर पाठविले जातात.

**दिवाळी :**—हा सण आला कीं बाजारांतून रंगरंगोटीचीं कामें सुरू होतात. देशी दारूचीं (नळे, चन्द्रज्योति) दुकानें दिसावयास लागतात, भांड्यांचीं व मिठाईचीं दुकानें मालानें गच्च भरलेलीं व सजविलेलीं आढळतात, व रस्त्यानें लहान मुलें जुगार खेळतांना दृष्टीस पडतात.

**होळी :**—हा सण आला कीं दांडी (माघी) पौर्णिमेपासून रस्त्यांत ज्या ज्या ठिकाणीं होळी होत असते त्या त्या ठिकाणीं लांकडें, झाडाच्या फांद्या गोळा करून होळी रचावयास सुरुवात झालेली दिसून येते. भांड्यांच्या दुकानांतून पितळी व जस्ताच्या दुकानांतून जस्ताच्या रंग उडविण्याच्या

पिचकाऱ्या तसेंच किराणा मालाच्या दुकानांतून खारका-खोबरें व मकाणे यांच्या गांठ्या ( काशीकडे साखरेच्या गांठ्यांचा फारसा रिवाज नाहीं.) विकावयास ठेवलेल्या दृष्टीस पडतात. एकादशीच्या दिवशीं देवळासमोर गुलाल विकावयास बसलेले लोक दिसतात. मधून मधून डफावर होळीचीं गाणीं गाथिलेलीं ऐकूं येतात, व स्त्रीपुरुष रंग उडविलेले जुने कपडे घालून बाहेर पडावयास लागतात.

काशींत बारा महिने कांहीं ना कांहीं चालू असलें तरी आश्विन व कार्तिक हे दोन महिने सगळ्यांत अधिक गडबडीचे असतात. तिकडे महिने अमावास्यान्त नसून पौर्णिमान्त असतात, त्यामुळें भाद्रपद पौर्णिमेपासून आश्विन व कोजागिरीपासून कार्तिक सुरू होतो. या पद्धतीमुळें धार्मिक तिथींचे दिवस बदलत नाहींत, पण कांहींचे महिने लौकिक व्यवहारांत बदललेले दिसतात. जसें, आपण गोकुळअष्टमी ( तिकडे जन्माष्टमी ) श्रावणांत म्हणतों तर तिकडे भाद्रपदांत व पितृपक्ष भाद्रपदांत म्हणतों तर तिकडे आश्विनांत म्हटला जातो.

**आश्विनमास** :— प्रारंभींच पितृपक्ष येतो. काशींत याची गडबड असतेच पण गयेस जाणाऱ्यांनीं वाराणशी छावणी स्थानकाला यात्रेचें स्वरूप आलें कीं पितृपक्ष सुरू झाला म्हणून समजावें. तें संपल्यानंतर शहरांतलि देवींच्या मंदिरांत नवरात्र बसतात व दर्शनांची व पूजापाठांची विशेषतः दुर्गेच्या ( पृष्ठ ४० ) मंदिरांत गर्दी होते. दसरा जर नवव्या दिवशीं आला तर कांहीं पत्ता लागत नाहीं. पण दहाव्या दिवशीं आला तर त्या दिवशीं दुर्गेचें मंदिर जवळ-जवळ ओसाड असतें व बाहेरचा बाजार उठलेला असतो. दसऱ्याच्या दिवशींचा देवीच्या देवळांतील हा ओसाडपणा दिपवाळी पाडव्याच्या रात्रीच्या बाजारांतील अंधःकाराइतकाच मराठी मनाला खटकतो. याच नवरात्रामध्यें बंगाली वस्तीमध्यें दुर्गेच्या स्थापना होऊन नऊ दिवस त्यांच्या उत्सवाची गडबड असते व दसऱ्याच्या दिवशीं त्यांची मोठी मिरवणूक काढून (पृष्ठ ११२) दशाश्वमेधावर त्यांचें विसर्जन होतें. ह्या महिन्यांत रामलीला सुरू होऊन तिथिक्रमानुसार ठरलेल्या ठिकाणीं रामलीलेच्या विशिष्ट कार्याचे समारंभ होत असतात. ते पुढील महिन्यांतसुद्धां चालू असतात.

**कार्तिकमास :—** गयेस जाणारांच्या गर्दीनें जसें आश्विनमासाचा तसेंच पंचक्रोशीच्या रस्त्यावरील गर्दीनें (पृष्ठ ५८) कार्तिक मासाचा पत्ता लागतो. ह्या महिन्यांत गंगेवर आकाशदिवे लावले जातात. त्यांत बिन्दुमाधव घाटावर (पृष्ठ ३८) टांगलेल्या शेकडों दिव्यांचें दृश्य बघण्यासारखें असतें. पहिल्या पंधरवड्यांत दिपवाळीची जिकडे तिकडे तयारी व गडबड दिसून येते. कार्तिकाच्या महिन्यामध्यें बिन्दुमाधवाच्या दर्शनास भाविक भक्तांची जास्त गर्दी असते. व पुष्कळ भक्तमंडळी तुळशीचें सहस्रनाम देवाला वाहतात. ह्याचा मुख्य दिवस वैकुंठचतुर्दशी. ह्याच महिन्यांत प्रबोधिनी एकादशी (पृष्ठ १२९) असते. त्रिपुरी पौर्णिमेस विश्वनाथाच्या दर्शनास जास्त गर्दी असते व रात्रीं देवाला शृंगार करतात. याशिवाय आवळीपूजन व आवळीभोजनाचे पण कार्यक्रम संकटमोचनासारख्या ठिकाणीं दिसून येतात.

**प्राचीन संस्कार :—** काशीकडे अजून अन्नप्राशन, जावळ यांसारखे संस्कार धार्मिक पद्धतीनें केले जातात. डोक्यावर केस ठेवले तरी शेंडीची बट राखून ठेवण्याची काळजी घेतली जाते. काशीकडील समाजचातुर्वर्णिक असल्यामुळें ब्राह्मणांप्रमाणें क्षत्रिय (वर्मा, सिंग इत्यादि) तसेंच वैश्य (गुप्त, आगरवाल इत्यादि) उपनयन करून जानवी घालतात. अशा रीतीनें प्रतिष्ठित लोक जानवी वापरीत असल्यानें समाजांत जानव्याला प्रतिष्ठा आहे. या कारणानें पं. मालवीयजींनीं अस्पृश्य समाजालासुद्धां जानवी देण्याचा धार्मिक समारंभ केला. जानव्याचा कांहीं उपयोग नाहीं, नसती अडचण म्हणून पुष्कळ लोक पुढें जानवीं घालणें बंद करतात. त्यांनीं आपल्या पेटीची ट्रंकेची, खोलीची, घराची किल्ली अडकवण्यास जानव्याचा उपयोग करावा जे लोक आपल्या किल्ल्या घरांत कोठें तरी, किंवा सदरा, कोट, विजार ह्यांच्या खिशांतून ठेवतात त्यांच्यावर किल्ल्या हरवून अडचणींत पडण्याचा नेहमीं प्रसंग येतो. जानव्याची किल्ली प्रतिव्रतेप्रमाणें सदा सेवेला हजर, घरीं, दारीं, प्रवासांत तुम्हीं कोठेंही असा, कधीं प्रतारणा करावयाची नाहीं. तेव्हां त्याकरितां तरी व्यवहारवादी लोकांनीं यज्ञोपवीत धारण करावें. कायमची किल्ली मात्र सरळ जानव्यांत न अडकवतां किल्ल्यांचें छोटेंसें वलय जानव्यांत घालून त्यामध्यें किल्ली किंवा किल्ल्या अडकवाव्यात म्हणजे किल्लीचा गंज जानव्याला लागून तें खराब होणार नाहीं किंवा तुटणार नाहीं. सारांश, जो मनुष्य नेहेमीं जन्मभर आपल्या किल्ल्या

जानव्यांत अडकवून ठेवील त्याच्यावर जन्मांत एकदांसुद्धां किल्ल्या हरवण्याचा व त्यामुळें कुलूप, कोयंडा तोडण्याचा प्रसंग येणार नाहीं.

'लशुनं गृञ्जनं चैव पलांडुं' ह्या मनुवचनाप्रमाणें तिकडे त्रैवर्णिकामध्यें कांदा, लसूण फारसे खाल्लें जात नाहीं. त्यामुळें हिंदुवस्तीच्या सट्टयांमधून हे जिन्नस चांगले मिळत नाहींत. मुसलमानांत हे जास्त खाल्ले जातात. त्यामुळें मुसल्मान वस्ती जवळ असलेल्या बिसेसर गंजांतील सट्टीमध्यें हे भरपूर मिळतात. तेथें ह्यांचे दुकानदार जवळजवळ सर्व मुसलमानच आहेत. 'न भिन्न भाण्डे भुञ्जीत' ह्या मनुवचनानें खाण्यापिण्यास भिन्न पात्रांचा निषेध केला आहे. कल्हईचें भांडें भिन्न पात्र म्हणून निषिद्ध मानलें गेलें आहे. याकारणानें आपल्याकडेसुद्धां पूर्वी कल्हईचीं भांडीं जेवणाकरितां न वापरणारे अनेक लोक होते. लेखकाचे वडील त्यांपैकींच होते. काशीमध्यें अजून कल्हईला निषिद्ध मानणारे असंख्य लोक आहेत. लेखकानें अनेकदां अनेक हिंदी सुशिक्षित मित्रांकडे भोजन केलेलें आहे, पण त्याला कल्हईचें भांडें कोठेंच दृष्टीस पडलें नाहीं. त्यामुळें तेथील हिंदुवस्तींत कल्हईचीं दुकानें नाहींत. मोडतोड नीट करणारे तांबटच जरूर पडल्यास कल्हई लावून देतात. कल्हईच्या भांड्याच्याऐवजीं तिकडे काश्यांचीं भांडीं वापरतात. यामुळें भांड्यांच्या दुकानांत काश्यांचीं भांडीं भरपूर मिळतात. आपल्याकडे लग्नांत किंवा धार्मिक संस्काराला काश्याची वाटी लागली तर चार दुकानें बघावीं लागतात.

डालडासुद्धां निषिद्ध समजणारे शेंकडों नव्हे तर हजारों सनातनी व अहित-कर समजणारे पुष्कळ शिक्षित तिकडे आहेत. त्यामुळें तळणीचें तूप मिळण्यास तिकडे मुळींच अडचण पडत नाहीं. श्रीरामभंडारा (पृष्ठ ७०) सारखे फलाहारी (उपासाचे) मिठाईचे दुकानदार शुद्ध तूपच वापरणारे आहेत. विश्वविद्या-लयाच्या प्राध्यापक क्लबांत वार्षिकोत्सव तसेंच अन्य प्रसंगीं तळणीकरितां शुद्ध तूपच वापरलें जावें म्हणून आग्रह धरला जात असे व त्याप्रमाणें तें वापरलें पण जाई.

मृताच्या अग्निसंस्कारास आपल्याकडे फार पूर्वीपासून 'रॉकेल दोन बाटल्या' हें जवळजवळ ठरून गेल्यासारखेंच आहे. काशींत अजूनसुद्धां रॉकेलच काय, काड्याची पेटीसुद्धां वापरली जात नाहीं. तेथें अग्नि

धरून न नेतां स्मशानांत डोंबाकडून घेण्याची परम्परागत चाल आहे. त्यावरून सनकड्या पेटवून चितेला अग्नि दिला जातो व नंतर सनकाड्या किंवा तुराट्या, राळ व तूप ह्यांनीं तो प्रज्वलित केला जातो.

**काश्यां मरणान्मुक्तिः** :—हें वचन पंचक्रोशीच्या आंत मरणारालाच लागू आहे. या वचनांवर विश्वास ठेवणारे लोक तिकडे पुष्कळ आहेत. हे बाहेर मरणाराला काशींत गंगेच्या कांठीं घेऊन जातात व तेथेंच प्राणोत्क्रमण होईपर्यंत ठेवून नंतर अंत्य-संस्कार करतात. विश्वविद्यालयासारख्या ठिकाणीं ह्या वचनावर विश्वास ठेवणारे किंवा मरणाऱ्याच्या इच्छेनुसार याप्रमाणें वागणारे प्राध्यापक लेखकाला आढळले. विश्वविद्यालयाची वास्तु पंचक्रोशीच्या बाहेर ( पृष्ठ ५६ ) असल्यामुळें एका प्राचार्यांचा मुलगा मरणासन्न झाल्यावर, लग्नमुहूर्त चुकूं नये म्हणून जितक्या तांतडीनें व घाईगर्दीनें वर वधूगृहीं नेला जातो त्यापेक्षां अधिक तांतडीनें व घाईगर्दीनें त्यास मोक्षगृहीं ( काशी ) नेतांना लेखकानें पाहिलेला आहे. याशिवाय गंगाकांठीं घेऊन जाण्याच्या दृष्टीनें गंभीर स्थितींतला रोगी किती वेळांत मरेल हें विचारणारेसुद्धां कांहीं लोक लेखकाला आढळले. या बाबतीमध्यें पं. मालवीयांचें उदाहरण देण्यासारखें आहे. देहावसानाच्या कांहीं वर्षांपूर्वी त्यांना त्यांच्या बैठकींतल्या कांहीं सनातनी लोकांनीं आपण विश्वविद्यालयांत देह ठेवूं इच्छितां का काशींत ? असा प्रश्न केला. त्यांनीं तत्काल ' काशींत नाहीं ' म्हणून उत्तर दिलें. मालवीयजींसारख्या श्रद्धावान्, सनातनी व काशीवर अत्यंत प्रेम करणाऱ्याच्या तोंडून हें उत्तर ऐकून सर्वांनाच आश्चर्य वाटलें. तेव्हां ' असें कां ? म्हणून विचारतां ते म्हणाले, ' विश्वविद्यालयाचें अजून पुष्कळ काम बाकी आहे. तें या जन्मांत होईलसें दिसत नाहीं. काशींत देह ठेवला तर पुन्हां जन्म मिळणार नाहीं व विश्वविद्यालयाचें काम अर्धवट राहील. तेव्हां मी काशींत देह ठेवूं इच्छीत नाहीं.' शेवटच्या दुखण्यांत ' मला डॉक्टरी औषधें देऊं नका ' असें ( पृष्ठ १२९ ) त्यांनीं बजावलें, परंतु काशींत घेऊन जा असें सांगितलें नाहीं. यावरून विश्वविद्यालयाकरितां पुनर्जन्म घेण्याची त्यांची इच्छा किती उत्कट होती हें स्पष्ट होईल. ह्या इच्छेच्या आधारावर सध्यांची विश्वविद्यालयाची बिघडलेली परिस्थिति बघून अत्यंत आतुरतेनें ' महाराज पुन्हां कधीं येणार, विश्व ( विद्यालय ) उद्धार करणार ' अशी त्यांची प्रार्थना केल्याशिवाय राहवत नाहीं.

**कस्यां मरणान्मुक्तिः? काश्यां वा जन्मभूमिक्षेत्रे वा :**— लेखकाच्या मनांत लहानपणापासून जन्मभूमीविषयीं वात्सल्य. तें वात्सल्य विद्यार्थीदशेंत प्रभु रामचन्द्राचें ‘अपि स्वर्णमयी लंका न मे लक्ष्मण रोचते। जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी’ हें वचन वाचण्यांत आल्यापासून विशेषच वाढलें. असें असलें तरी सुभाषितकारांनीं वर्णन केल्याप्रमाणें त्यामध्यें महत्त्वाकांक्षेच्या आड येण्याचा म्हणजे घरकोंबडे बनविण्याचा दोष उत्पन्न झाला नव्हता. त्यामुळें तो जन्मभूमि सोडून हजार मैलांवर काशीस हिन्दु विश्वविद्यालयांत नौकरीकरतां गेला व तेथें जवळजवळ ३० वर्षें काशीवास केला. लेखकाच्या काशीवासाच्या अभिलाषेमध्यें (पृष्ठ १८) ‘काश्यां मरणान्मुक्तिः’ची मनीषा नव्हती तर ‘काश्यां करणात् कीर्तिः’ची कल्पना होती. त्यामुळें सेवाकालांत बाहेर चांगल्या नोकऱ्या असतांना त्यानें प्रयत्न केला नाहीं, मिळत असतां (पृष्ठ १२८) होकार भरला नाहीं, नागपूर विद्यापीठांत अर्ज न करतां जागेच्या पगारापेक्षां अधिक पगार देऊन आयुर्वेद प्राध्यापकपदीं नेमणूक झाली असतां स्वीकार केला नाहीं व तेथेंच जेवढें कार्य करणें शक्य होतें तेवढें करून व कल्पनेप्रमाणें थोडेंफार नांव मिळवून तो सेवानिवृत्त झाला. सेवाकालांतील काशी न सोडण्याच्या आग्रहामुळें सेवानिवृत्तीनंतर तो काशींतच राहील अशी पुष्कळांची अपेक्षा होती. ती चूक ठरल्याची बघून अनेकांनीं त्याजपाशीं नंतर काशींतच राहण्याविषयीं अनेक वेळां गोष्ट काढली. प्रत्येक वेळीं लेखकानें प्रभु रामचंद्राच्या वरील वचनाचा उच्चार करून जन्मभूमी-करितां आपण काशी सोडीत आहोंत हें त्यांना सांगितलें. यावर सनातन्यांसुद्धां सर्व मनोवृत्तीच्या लोकांनीं संतोष प्रकट केला. सारांश, ज्याप्रमाणें पंडितजींनीं विश्वविद्यालयाकरितां काशींत देहत्याग करण्यास नकार दिला त्याप्रमाणें लेखकानें जन्मभूमिप्रेमाकरितां सेवानिवृत्तीनंतर काशींत राहण्यास नकार भरला. हा नकार भरण्यांत आणखी एक कल्पना कारणभूत झाली आहे. काशीमध्यें तनुत्याग करण्यानें मोक्ष कसा होतो ह्यासंबंधीं अध्यात्मरामायणांतील शंकरकृत रामस्तुतीमध्यें ‘अहं भवन्नाम गृणन् कृतार्थो वसामि काश्यामनिशं भवान्या। मुमुर्षमाणस्य विमुक्तयेऽहं दिशामि मन्त्रं तव रामनाम’ असा श्लोक आढळतो. यावरून मरणाराला मोक्ष मिळण्यास प्रभु रामचन्द्राचें नांवच कारणभूत आहे हें स्पष्ट होतें. केवळ फरक एवढाच कीं, इतर ठिकाणीं मरणारास

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक २४००८ दि: २१३७
क्रमांक २७२

मोक्षाकरितां स्वतः नांव घेण्याची जरुरी असते; काशींत मरणारास स्वतः करावें लागत नाहीं, काशीनाथ त्याकरितां मंत्र करीत असतात. तेव्हां मोक्षदात्या रामचंद्रांनीं ज्या जन्मभूमीचें एवढें स्तुतिस्तोत्र गायलें व सोन्याची लंका जिच्याकरितां सोडून गेले त्या आपल्या जन्मभूमींत आपण देहत्याग केल्यास मोक्ष मिळण्यास कांहींच हरकत नाहीं, अशी कल्पना मनांत आली व अनेक दिवस 'विवेकें विचारें विवंचून' ती भावनेंत परिणत झाली. ती भावना वरील स्वकृत संस्कृत प्रश्नोत्तरीमध्यें ग्रथित करून ठेवली आहे. त्या भावनेप्रमाणें काशी सोडून जन्मभूमीचा प्रवास सुरू केला आहे. तेथें पोंचवणें व अन्तिम अभिलाषा पुरी करणें जन्मभूमिप्रिय जानकीवल्लभाच्या इच्छेवर आहे.

**आयुर्वेद :**— तिकडे आयुर्वेदावर विश्वास ठेवणारे भरपूर लोक असल्या-मुळें पुष्कळ वैद्य उत्तम रीतीनें व प्रतिष्ठेनें व्यवसाय करतांना व डॉक्टरांशीं टक्कर देतांना दृष्टीस पडतात. आपल्याकडे सरकारनें सुरू केलेला शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम उत्तम फळ येण्याच्या दृष्टीनें ५० वर्षांपूर्वी सुरू व्हावयास पाहिजे होता. कारण त्या वेळीं चांगल्या वैद्यांची परंपरा खण्डित झाली नव्हती. काशींत तसेंच उत्तरप्रदेशांत अजून जुने पढिक व अनुभवी अनेक वैद्य आहेत. तेव्हां तिकडे असा अभ्यासक्रम सुरू करण्यासारखा आहे. १९५८ च्या ऑगस्टमध्यें लेखक लखनौस विश्वविद्यालयाच्या एका बैठकीस गेला होता. त्या वेळीं आयुर्वेदासंबंधीं खाजगी चर्चा करण्याकरितां केंद्रीय उडुपा समितीचे सभासद त्यास भेटले असतांना वरील मत त्यानें निःसंदिग्ध शब्दांत त्यांचेपुढें मांडलें. त्याचा व्यावहारिक अर्थ असा कीं, आपल्या देशांत शुद्ध आयुर्वेद, आयुर्वेद एलोपाथीमिश्र व शुद्ध एलोपाथी असे तीन वैद्यकीय अभ्यासक्रम ठेवावेत व त्यांना त्याच प्रकारचें अंतरंगी आतुरालय जोडलेलें असावें. या योगानें विद्यार्थी किंवा चिकित्सक कोणत्याहि मताचा किंवा इच्छा करणारा असो, त्याला तक्रार करण्यास किंवा दुसऱ्याचा हेवादावा करण्यास जागा मिळणार नाहीं व सरकारला प्रत्येकाची उपयुक्तता व रोगचिकित्सेंतील विशिष्टता कळून येऊन पुढें पाऊल टाकण्यास मार्गदर्शन होईल.

तिकडे आयुर्वेदावरील श्रद्धा सुशिक्षितांमध्येंसुद्धां भरपूर दिसून येत असे. विश्वविद्यालयामध्यें पुष्कळ प्राध्यापक डॉक्टरीपेक्षां आयुर्वेदाचींच औषधें घेणें पसंत करीत. मात्र प्रमाणभूत औषधें मिळण्याच्या दृष्टीनें जरूर विशेष काळजी घेत आणि वैद्यावैद्यांत फरक करीत. या बाबतीमध्यें श्री. कुलकर्णी यांचा निर्देश करण्यासारखा आहे. हे आयुर्वेद विद्यालयांत रसायनाचे प्राध्यापक होते. स्वतः एम्. एस्सी. असून आयुर्वेदाचार्य झाले होते. आयुर्वेदीय-रसशास्त्रामध्यें उत्तम निष्णात बनले होते. स्वतः व स्वतःच्या देखरेखीखालीं आयुर्वेदाचीं शास्त्रोक्त औषधें तयार करीत होते. त्यामुळें आयुर्वेदीय औषधें घेणारे प्राध्यापक शक्य तोंवर त्यांच्याकडूनच औषधें घेत. ते पुढं उत्तरप्रदेश सरकारांत आयुर्वेदाचे उपसंचालक म्हणून लखनौस गेले. तेव्हां विश्वसनीय औषधें कोणाकडून घ्यावींत हा सर्वांच्याच्यपुढें कांहीं काळ प्रश्न उभा राहिला.

**पं. मालवीयांचा कायाकल्प :—** सध्यांच्या सुशिक्षित मंडळींत पं. मालवीयांच्यासारखा आयुर्वेदाचा निष्ठावन्त कर्मठ भक्त मिळणें कठिण. आयुर्वेदावरील निष्ठेमुळें त्यांनीं आपल्या विश्वविद्यालयांत त्याची शाखा उघडून भारतीय विश्वविद्यालयांत त्याला सर्वप्रथम मानाचें स्थान प्राप्त करून दिलें. आयुर्वेदोक्त कायाकल्पाच्या प्रयोगाकरितां आपलें अमूल्य शरीर अर्पण करून त्यांनीं वरीलपेक्षां अधिक उच्च कोटीची आयुर्वेदावरील आपली सक्रिय निष्ठा प्रकट केली. वय झालेलें, कायाकल्पाची परंपरा तुटलेली, प्रयोग योगा-इतकाच कठीण, काय फळ मिळेल याची शाश्वती नाहीं. अशी स्थिति असतांना पण्डितजी तें करण्यास तयार झाले, म्हणून अर्पण शब्दाचा प्रयोग केला आहे. असलें धाडस केल्याबद्दल कांहींनीं पण्डितजींना ' अविचारी ' म्हटलें, तर कांहींनीं कायाकल्पानें कांहीं फायदा झाला नाहीं, उलटें नुकसानच झालें म्हणून बोलून दाखविलें. या दोन्ही आरोपांबद्दल थोडेंसें विवेचन उपयुक्त होईल.

पंडितजींनीं अविचार केला काय ? आयुर्वेदाच्या इतर कांहीं अंगांप्रमाणें कायाकल्पाचें अंग जवळजवळ लुप्त झालें होतें. त्याचें पुनरुज्जीवन करण्या-करितां त्यांनीं आपलें शरीर देऊं केलें. त्यांत त्यांना यश आलें असतें तर आपण त्यांची प्रशंसा केली असती, आयुर्वेदांत क्रांति झाली असती व जगांतील वैद्यकांत आयुर्वेदाचें व भारताचें नांव अजरामर झालें असतें. परंतु

असलीं क्रांतिकारक फळें एका प्रयत्नांत प्राप्त होत नाहींत. त्याकरितां फळ मिळेपर्यंत प्रयत्नपरंपरा चालू ठेवावी लागते. दुःखाची गोष्ट अशी कीं, ती परंपरा आमच्याकडून चालू राहिली नाहीं. तेव्हां त्यांना अविचारी म्हणण्यापेक्षां आपणच 'अतिविचारी' असें म्हणणेंच जास्त चांगलें.

कायाकल्पानें नुकसान झालें काय? 'पूर्वे वयसि मध्ये वा मनुष्यस्य रसायनम्। प्रयुञ्जीत' असें आयुर्वेदामध्यें सांगितलें आहे. कायाकल्पाचे वेळीं मालवीयजी पूर्व किंवा मध्य वयाचे नसून ६० च्या पुढें गेलेले वृद्ध होते. तेव्हां त्यांना कायाकल्पापासून लाभ झाला नसल्यास तो त्या विधीचा दोष म्हणतां येणार नाहीं. कायाकल्पानंतर पंडितजी बरेच दिवस तापानें आजारी होते. कायाकल्प विधीमध्यें मनुष्य दीर्घकाल खाणें–पिणें, हवा–पाणी यांच्या कडक निर्बंधामध्यें असतो. ज्याप्रमाणें दीर्घकाल अनशन केल्यानंतर खानपान फार सावकाश व पद्धतशीर सुरू करावें लागतें त्याप्रमाणें ह्या विधीनंतर निर्बंध ढिले ( संसर्जन ) करावे लागतात. म्हणजे दीर्घकालपर्यंत विश्रांति घेऊन पथ्यानें रहावें लागतें. तें पंडितजींच्यानें झालें नाहीं, येवढेंच नव्हे तर त्यांनीं विश्वविद्यालयाच्या अर्थसंकल्पामध्यें लक्ष घातलें. विश्वविद्यालयाच्या अर्थसंकल्पाचें काम शेवटीं शेवटीं फार मोठया व ओढघस्त कुटुम्बाच्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याइतकेंच जिकीरीचें झालें होतें. ती जिकीर त्यांना भोंवली. त्यांत विधीचा दोष म्हणतां येत नाहीं.

**पंडितजींची आयुर्वेदनिष्ठेची पराकाष्ठा :—** शेवटच्या दुखण्यांत नेहमींप्रमाणें आयुर्वेदाची चिकित्सा राजवैद्य पं. सत्यनारायण शास्त्री यांच्याकडून सुरू केली. रोग विकोपास जाऊं लागला तेव्हां शहरांतले सिव्हिल सर्जन, तसेंच अन्य नामांकित डॉक्टर त्यांना भेटण्यास येऊन तपासूं लागले. त्या वेळीं पंडितजींनीं जवळच्या लोकांस सांगून ठेवलें, 'देखो, मैंने जीवनभर कभी भी ॲलोपाथिक औषधि किसी भी प्रकारसे अपने शरीरमें नहीं प्रवेश होने दी। अतः अब चलते समय मेरे शरीरको उनका स्पर्श न कराया जाय।'

सिव्हिल सर्जन रोज मालवीयजींना बघत होते तरी त्यांना केवळ शारीरिक परीक्षणानें रोगाचें निदान होईना. तेव्हां त्यांनीं त्याकरितां रक्त तपासण्याची

शिफारस केली. लेखक विश्वविद्यालयांतील नैदानिकीय प्रयोगशाळेचा मुख्य ( पृष्ठ १०७ ) असल्यामुळें त्यांच्याकडे तें काम आलें. रोग विकोपास जावयास लागल्यावर मालवीयजींची शुद्धि थोडी कमी व्हावयास लागली होती. लेखक रक्त घ्यावयास गेला त्या वेळीं ते अर्धवट शुद्धीमध्येंच होते. जवळ त्यांचे पुत्र पं. गोविंद मालवीय होते. वरील कारणाकरितां गोविंदजींनीं ' बाबूजी दवाईकी सुई नहीं दी जा रही है, डॉ. घाणेकरजी जाँच के लिये थोडासा खून ले रहे हैं। ' असें त्यांच्याजवळ जाऊन सांगितलें. तें ऐकून जेव्हां त्यांनीं होकारार्थी मान हलविली तेव्हां लेखकानें रक्त घेण्याकरितां बोटाला सुई टोंचली. सुई टोंचतांच पंडिजींच्या सर्वांगाचा भयंकर थरकांप झाला, चेहऱ्यावर असह्य दुःख झाल्याचा भाव उमटला व बोटांतून टप टप रक्ताचे थेंब गळूं लागले. खरोखर पंडितजींना बेशुद्ध व मरणासन्न स्थितींत बघून तो अगोदरच व्यथितचित्त व गलितगात्र झाला होता. त्यांतच सुई टोंचल्यामुळें त्यांना झालेल्या असह्य दुःखाला बघून मरणासन्न स्थितींतल्या एका महात्म्याला असह्य दुःख देण्यांत आपल्या हातून अक्षम्य पाप झालें आहे या कल्पनेची व बोटांतून टपाटप पडणाऱ्या रक्ताच्या दृश्याची भर पडली. रक्त बघून मूर्च्छा आल्याचा किंवा येत आहे असें वाटण्याचा अनेकांना अनुभव असेल, कारण ' द्रव्य-स्वभावइत्येके दृष्ट्वा यदाभिमुह्यति ' अशी स्थितिं आहे. लेखकाची तशी स्थिति व्हावयाचें कारण नव्हतें. परंतु वरीलसारख्या मनःस्थितींत रक्ताचें दर्शन झाल्यामुळें 'सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति। वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते। न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ' अशी अक्षरशः स्थिति होऊन गांडीवाप्रमाणें रक्त तपासण्याचीं आयुधें हातांतून पडतात किंवा काय असें त्यास वाटूं लागलें. परंतु कसेंतरी त्यानें शरीराचें व मनाचें बळ एकवटून रक्त घेतलें व तेथून पाय काढला.

रोग्यांचीं रक्तें तपासणें हें लेखकाचें नित्यकर्म होतें. त्यामुळें त्याच्यावर पंडितजींशिवाय डॉ. राधाकृष्णन्, आचार्य नरेंद्र देव, सर सी. पी. रामस्वामी अय्यर ह्या उपकुलपतींच्या आजारीपणांत त्यांचीं रक्तें तपासण्याचा प्रसंग आला होता. ते सर्व डॉक्टरी चिकित्सेखालीं व साधारण स्थितीमध्यें असल्यामुळें सूचना येतांच त्यांचीं रक्तें तपासलीं गेलीं. पंडितजी आयुर्वेदीय चिकित्सेखालीं व मरणासन्न स्थितीमध्यें होते. रक्तपरीक्षणाचा परिणाम आयुर्वेदीय चिकित्से-

वर फारसा होण्यांतला नाहीं हें लेखक जाणून होता व मरणासन्न रोग्याला कोणत्याही प्रकारें त्रास न देतां सुखानें मरूं द्यावें असें त्याचें मत होतें. त्यामुळें आदल्या दिवशीं सूचना येऊनसुद्धां रक्त घेण्याची त्यानें टाळाटाळ केली. दुसऱ्या दिवशीं ( ९ नवंबर १९४६ ) निकडीची सूचना आल्यावर नाखुषीनें त्यानें रक्त घेतलें व त्या वेळीं त्याच्यावर वरील प्रसंग आला.

काळ जसजसा जातो तसतशी अनुभवलेल्या दुःखांची दुःखदायकता कमी होत जाते हें खरें आहे. परंतु वरील घटना होऊन बारांपेक्षां अधिक वर्षें लोटूनसुद्धां तिची दुःखदायकता काडीमात्र कमी झाली नाहीं हें या लेखनाच्या निमित्तानें चांगलेंच अनुभवास आलें. एक फरक जरूर निदर्शनास आला तो असा कीं, त्या वेळीं 'सीदन्ति मम गात्राणि' अशी स्थिति झाली होती. ह्या वेळीं तसें कांहींही न होतां 'कण्ठः स्तम्भितबाष्पवृत्तिकलुषश्चिन्ताजडं दर्शनं' असें होत होतें.

धार्मिक आचाराप्रमाणें इतर व्यवहारांत तिकडे अजून पुष्कळ जुनेपणा दिसून येतो. उडविण्याची दारू पुष्कळशी देशीच असते; स्लेटपाट्यांच्या ऐवजीं लांकडी तक्त्या शाळांमधून लिहिण्याकरितां उपयोगांत आणतांना दृष्टीस पडतात. पुष्कळसे न्हावी अजून गोल भरीव मुठीचे वस्तरेच वापरतात. चिसेसर गंजासारख्या सर्वांत मोठ्या बाजारपेठेंत अनेक वाणी पुड्या बांधण्यास मुंजासारखें गवत वापरतांना दिसतात. सुगंधी तेलांच्या दुकानांत तेल देण्या-करितां उंटाच्या कातड्याच्या बनविलेल्या कुप्या देण्यांत येतात. मातीच्या भांड्यांच्या वापराविषयीं मागें ( पृष्ठ ६३ ) लिहिलेंच आहे. तोंड धुण्यास दंतौन ( निंबादि झाडांच्या काड्या ) वापरणारे तेथें भरपूर लोक अजून दिसतात. खादीचा वापर तिकडे पुष्कळच आहे. तो दिवसेंदिवस कमी होत चालला आहे अशी ओरड ऐकूं येतें. ही ओरड आतां प्रत्येक जुन्या गोष्टीबद्दल करतां येण्यासारखी आहे. असें असलें तरी अजून सुद्धां डोळ्यांत भरण्याइतके कायमचे खादीधारी शहरांत काय किंवा विश्वविद्यालयांत काय दृष्टीस पडतात. कपबश्यांतून दिलेले खाण्यापिण्याचे पदार्थ न खाणारे तिकडे उच्चवर्णीयांमध्यें पुष्कळ लोक आहेत. तसेंच मिठाईसारखे खाद्यपदार्थ रद्दीच्या कागदांतून न देणारे दुकानदारपण आहेत.

## शिष्टाचार

ऋषयो राक्षसीमाहुर्वाचमुन्मत्तदृप्तयोः।
सा योनिः सर्ववैराणां सा हि लोकस्य निर्ऋतिः॥
तां चाप्येतां मातरं मंगलानां धेनुं धीराः सूनृतां वाचमाहुः॥
—भवभूति

**गोड भाषण :**—मृदुता, मिठास, विनम्रता हे काशीकडील लोकांच्या वागणीचे विशेष आहेत. हे विशेष घरींदारीं, सभा-संमेलनांच्या स्थानीं किंवा कोठेंही कोणी कोणास भेटो सर्रास दृष्टीस पडतात. नौकरचाकर, चपराशी, मजूर अशांसारखीं खालच्या वर्गाचीं माणसें तर 'जी हुजूर, जी सरकार' म्हणूनच संबोधतात. जरा खालचीं माणसें मोठ्या आदरानें हात जोडून व मोठ्या विनम्रपणानें व्यवहार करतात; व बरोबरीचीं माणसें मोठ्या प्रेमानें व हंसतमुखानें भेटतात. मोठमोठ्या सभा-संमेलनांत मंडळी यावयास लागली कीं त्यांचा एकमेकांना भेटण्याचा कार्यक्रम बघण्यासारखा असतो. रस्त्यानें कोणी फार दिवसांनीं भेटले व ते आपल्या घराजवळ असले तर 'इधर कहाँ' प्रश्न करतांच 'आपहीके दर्शनके लिए' असें चटकन् उत्तर देण्याचा तिकडे रिवाज आहे. कोणाबरोबर लहान मूल असलें व आपल्यास तें कोणाचें हें माहीत नसल्यामुळें आपण प्रश्न केला तर 'आपहीका है' अशा प्रकारचें उत्तर देण्यापर्यंत तिकडील शिष्टाचाराची मजल गेलेली आहे.

घरीं भेटावयास गेल्यावर 'आइये, तशरीफ रक्खिये, विराजिये, कैसे कष्ट किया' अशांसारख्या शब्दांनीं हात जोडून बसावयास सांगणें, अतिथि बसल्यावर आपण बसणें, जलपान-पान देणें, परत जातांना दरवाजापर्यंत पोंचवावयास येणें व जातां जातां दोन-चार वेळां नमस्कार करणें हा तिकडील शिष्टाचाराचा सर्वसाधारण नमुना आहे. थोडक्यांत सांगावयाचें तर 'सबहीसे मिल बोलना मीठे मीठे बोल। मीठी बोली बोलकर बनो यार अनमोल' हें तिकडील शिष्टाचाराचें सारसर्वस्व आहे.

वडील किंवा वयोवृद्ध माणसाशीं तिकडील लोक आदबीनें व्यवहार करतात. घरांमध्यें वडिलांच्या किंवा फार वडील भावाच्या समोर मुलगा अत्यवस्थ

पडतांना किंवा अचावचा बोलतांना सहसा सांपडावयाचा नाहीं. ह्या मनोवृत्तिमुळेंच बहुधा तिकडे एकत्र कुटुंबपद्धति अजून बरीच टिकून राहिली असावी.

गुरुजनांशीं शिष्यांचा व्यवहार अजून सुद्धां पुष्कळसा ‘ शय्यासनस्थश्चैवैनं प्रत्युत्थायाभिवादयेत् ’ या मनुवचनाप्रमाणें दिसून येतो. मोठ्या पदाला पोंचल्या-नंतर सुद्धां घरींदारीं, सार्वजनिक ठिकाणीं गुरुचरणाला स्पर्श करणारे तिकडे अनेक लोक दृष्टीस पडतात.

सभासंमेलन – कीर्तन – प्रवचनाच्या वेळीं फार गर्दी झाल्यावर जेव्हां लोक अगदीं एकमेकांना खेटून बसतात त्या वेळीं मधून जातांना ओणवें होऊन हात पुढें करून मार्ग दाखवीत जाण्याचा तिकडील रिवाज चांगला आहे. या योगानें बसणारांना येणाराचा मार्ग कळतो. ते वाट करून देतात व कोणाला पाय लागत नाहीं. कांहीं लोक कोणाला पाय लागो वा न लागो हात पुढें करावयाचे ऐवजीं दोन्हीं हातांनीं नमस्कार करीत जातात.

**नमस्काराचा चमत्कार :—** नमस्ते करण्याचा तिकडे फार रिवाज आहे. नमस्कार शब्दाच्या ऐवजीं आतां आपल्याकडे पण तो शब्द बराच रूढ झाला आहे. लहान मुलांना तिकडे कोणीं आलें गेलें भेटलें कीं नमस्ते करावयास शिकविलें जातें. त्यामुळें परिचित किंवा परिचिताबरोबर असलेलीं मुलें कोठेंही भेटलीं कीं तीं मोठ्या प्रेमानें व हंसतमुखानें नमस्ते केल्याशिवाय सहसा राहात नाहींत. बरोबरीचीं मोठीं माणसें जितक्या वेळां भेटतात तितक्या वेळां नमस्ते करण्यास बहुधा चुकत नाहींत. खालचे लोक कधीं कधीं इतका लवून नमस्कार करतात कीं, त्याचें डोकें वर येईपर्यंत तुम्ही बहुधा पुढें व ते मागें निघून जातात व तुम्हीं परत केलेला नमस्कार त्यांना दिसत म्हणजे पोंचत नाहीं. जेव्हां धार्मिक किंवा सामाजिक समारंभाच्या प्रसंगीं जमलेल्या मंडळींची नमस्काराची देवाण घेवाण सुरू होते तेव्हां ती बघून मन प्रसन्न होतें. परंतु जेव्हां हे नमस्ते कानावर जानवें असतांना, प्रेतयात्रेकरितां जमले असतांना, प्रेत यात्रेबरोबर जातांना किंवा तशाचसारख्या अशुभ व अपवित्र प्रसंगीं होत असतांना दिसतात त्या वेळीं आपल्या मनाला जरा चमत्कारिक वाटल्या-शिवाय राहात नाहीं.

सेवानिवृत्तीनंतर लेखक अनेक महिने विश्वविद्यालयांत राहिला व विश्वविद्यालय सोडून आल्यानंतर अनेक वेळां तेथें गेला. त्या वेळीं तेथील नोकरचाकर चपराशीं, कारकून, प्राध्यापक यांनीं त्याच्याशीं असा व्यवहार ठेवला कीं, त्याला आपण सेवानिवृत्त झालों आहोंत असा क्षणभर सुद्धां आभास होऊं शकला नाहीं. हें कथन शिष्टाचाराच्या बाबतीमध्यें जितकें सत्य आहे तितकेंच त्याचें कामकाज करण्याच्या बाबतीमध्यें सुद्धां आहे. टाळी जशी एका हातानें वाजत नाहीं त्याप्रमाणें शिष्ट व्यवहार सुद्धां एकतर्फी होऊं शकत नाहीं व टिकूं शकत नाहीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. ह्या पुस्तकाच्या अर्पणपत्रिकेवर लावण्याकरितां पंडितजींच्या चित्राच्या ठोकळ्याची जरुरी होती. विश्वविद्यालयाच्या मुद्रणविभागाचे प्रमुख श्री रामकृष्णदास यांचेकडे मागणी करतांच त्यांनीं तो पाठवून दिला. यावरून लेखकाच्या वरील विधानाची सत्यता लक्षांत येईल. श्रीमारुतिरायाचें मंदिर (पृष्ठ १०१) हें लेखकास विश्वविद्यालयाकडे ओढणारें बलवत्तर कारण असलें तरी तेथील लोकांचा प्रेमळ व्यवहार हें जवळजवळ तितकेंच बलवत्तर कारण आहे. यामुळें लेखकाला तेथें वारंवार जाण्याची इच्छा होते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे एक सहयोगी म्हणून तेथील मंडळींशीं संबंध तुटला असला तरी स्नेही म्हणून त्यांचा संबंध जसाच्या तसाच राहिला आहे. हिंदी लोकांचा शिष्टाचार म्हणजे एक ढोंग असतें, असें लेखकानें आपल्यापैकीं कांहीं मंडळींना बोलतांना ऐकलें आहे. असतील कांहीं ढोंगी. कोणत्या समाजांत ढोंगी नाहींत ? काबूलमें क्या गधे नहीं होते ? अशी हिंदी म्हण आहे. तेव्हां कांहीं व्यक्तींच्या किंवा एखाद्या व्यक्तीनें प्रसंगविशेषीं केलेल्या ढोंगी शिष्टाचारावरून शिष्टाचार म्हणजे ढोंग आहे असें समजून चालणें हें कायदेशीर व्यवहार करतांना कदाचित् उचित असेल, परंतु नित्याच्या माणुसकीच्या व्यवहारांत तसें समजणें अनुचित आहे, असें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं.

**देवदर्शन :—** काशीमध्यें देवांची नुसती गर्दी (पृष्ठ ३१) आहे. त्यामध्यें प्राचीन काळांतील आपत्तींतून सहीसलामत सुटलेले जसे देव आहेत तसे हातपाय किंवा डोकें गमावून बसलेले पण आहेत. त्याप्रमाणें जसे श्रीमंत आहेत तसेच गरीब पण आहेत. भाविक काशीकरांनीं मात्र त्यांच्यामध्यें भेदभाव केलेला नाहीं. गंगास्नान करून घरीं परत जातांना ते जसे विश्वनाथावर

जलफूल चढवीत असतात तसेंच वाटेंत येणाऱ्या सर्वच देवांवर पण चढवीत जातात.

'न रिक्तहस्तं पश्येत राजानं देवतां गुरुम्' या शास्त्रवचनानुसार काशीकडे मोकळ्या हातानें देवदर्शन करण्याचा रिवाज नाहीं. याकरितां माळा – फुलें वस्त्र, दोरे, बत्तासे, फुटाणे, मिठाई कांहीं ना कांहींतरी चढविलें जातें. देवाला माळ – चढविली कीं ती लगेच काढून घेऊन देवाचा प्रसाद म्हणून चढविणाऱ्याच्या गळ्यांत घालण्याचा तिकडील पुजाऱ्यांचा रिवाज आहे. त्यामुळें देवळांतून बाहेर पडणारीं अनेक माणसें गळ्यांत माळा घातलेलीं दृष्टीस पडतात. आपल्याकडे शनवारीं मारुतीला, नवरात्रांत देवीला, जन्माच्या वेळीं रामकृष्णादि देवतांना, महाशिवरात्रीला शंकराला अशा विशेषप्रसंगीं माळा, फुलें वाहण्याची पद्धति आहे; पण गळ्यांत माळा घालण्याची नाहीं. तिकडे माळा - फुलांबरोबरच भोगपण चढविण्याची पद्धति आहे. त्याकरितां पेढे, बर्फी, लाडू, बत्तासे, साखरफुटाणे अशांसारखे जिन्नस घेतले जातात. आपल्याकडे शनवारीं मारुतीला जो नारळ फोडला जातो तो भोगासारखाच असतो. तिकडे मात्र मारुतीला नारळ फोडण्याचा रिवाज नाहीं. देवाला चढविण्याकरितां भोग दिला कीं पुजारी तो चढवून किंवा नैवेद्य दाखवून सगळाच्या सगळा चढविणारास परत करतो. मग चढविणारानें आपल्या इच्छेप्रमाणें देवापुढें पाहिजे तेवढा ठेवावा. तो ठेवल्यानंतर चढविणारा इष्टमित्र असल्यास त्यांना प्रसाद देतो व स्वतः तेथेंच तो प्रसाद खातो. संकटमोचनाच्या देवळांत जेथें नवसासायासामुळें फार भोग चढविले जातात, तेथें प्रसाद खाल्ल्यावर लोकांना पाणी देण्याकरितां एक स्वतंत्र मनुष्य शनवारीं, मंगळवारीं बसलेला असतो. वरील रिवाजामुळें काशीस प्रत्येक देवळासमोर माळा, फुलें व मिठाई विकणारे नेहमीं बसलेले असतात. उत्सवांत तर त्यांचा भला मोठा बाजारच लागलेला असतो. दर्शनाला गेल्यावर पोथी वाचण्याची पण तिकडे पद्धति आहे. अन्नपूर्णेच्या मंदिरांत नेहमींच शेंपन्नास लोक पोथी वाचत बसतात. नवरात्रामध्यें दुर्गेच्या देवळांत बसतात. संकटमोचनमध्यें दर शनवारीं, मंगळवारीं लोक पोथी वाचतात. तेथें तर देवळामध्येंच हनुमान्चालिसा, हनुमानबाहुक, अध्यात्मरामायण अशांसारख्या पोथ्या ठेवलेल्या आहेत.

दर्शन करणारानें त्यांपैकीं पाहिजे ती पोथी घ्यावी, वाचावी व नंतर ठेवून द्यावी.

पुष्कळ देवळांतून समोरासमोर देव ( जसें श्रीराम, मारुति ) असतात. तेथें देवाला साष्टांग नमस्कार करावयाचा झाल्यास तिकडील लोक देवासमोर नमस्कार न घालतां आडवें होऊन म्हणजे दोने देवांना जोडणाऱ्या रेषेशीं नव्वद अंशांचा कोन करून नमस्कार घालतात. या योगानें कोणत्याच देवाकडे पाय होत नाहींत व मानलेंच तर एका नमस्कारांत दोन्ही देवांना साष्टांग नमस्कार केल्याचें श्रेय पण घेतां येतें.

**गुरुभेट :**— शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें गुरूला रिक्तहस्त न भेटणारे तिकडे अजून पुष्कळ विद्यार्थी दृष्टीस पडतात. हे सणावारानंतर किंवा सुटीनंतर विद्यालयांत परत आले कीं गुरूला मेवामिठाई किंवा आपल्याकडची कांहीं विशेष वस्तु असल्यास भेट म्हणून देतात. गुरु चिकित्सक असला कीं त्याला श्रीमंत रोगी आणून देणें हा धूर्त विद्यार्थ्यांचा गुरूला भेट देण्याचाच एक प्रकार आहे. देवाला भेट चढविल्यास त्यामध्यें देवाकडून किंवा भक्ताकडून दुरुपयोग होण्याची शक्यताच नाहीं. परंतु गुरु-शिष्य भेटीच्या देवाणघेवाणीमध्यें दुरुपयोग होत असल्याचीं उदाहरणें दृष्टीस पडत. त्याकरितां शिष्याकडून तो शिकत आहे तोंपर्यंत कसल्याच प्रकारची भेट घ्यावयाची नाहीं, त्याच्याशीं केवळ बौद्धिक संबंध ठेवावयाचा असा लेखकाचा कडक नियम होता.

**स्वागतविधि :**— काशीमध्यें स्वागत किंवा सन्मान करण्याचे वेळीं फुलें, गोटे यांच्याऐवजीं माळाच वापरण्याची पद्धति आहे. मंत्रजागर केला, विद्वत् सभा बोलावली कीं ब्राह्मणांचा व विद्वानांचा सन्मान गळ्यांत माळा घालूनच केला जातो. लग्नाला वरात ( हा शब्द वर येण्याच्या मिरवणुकीला लावतात ) आली कीं वधूकडील लोक वराकडील मंडळींचें स्वागत त्यांच्या गळ्यांत माळा घालूनच करतात. सभा-संमेलनामध्यें निमंत्रितांचें स्वागत स्वागत-समिति त्यांच्या गळ्यांत माळा घालूनच करते. गळ्यांत माळा वापरणें हें काशींत प्रतिष्ठितपणाचें मानलें जातें. त्यामुळें वरीलसारख्या प्रसंगीं लोक गळ्यांत माळा ठेवूनच बसतात, समाजांत हिंडतात किंवा घरीं जातात. यामुळें काशींतील शौकीन लोक उन्हाळ्यामध्यें संध्याकाळीं स्वतः सुगंधी

माळा घेऊन गळ्यांत घालतात व हातपंख्याच्या वाऱ्यांत व फुलांच्या सुगंधाच्या मस्तींत शहरांतून हिंडत असतात.

## खानपान

**खाण्याचा शौक :—** काशीकडील लोक खाण्यापिण्याचे चांगले शौकीन आहेत. हा शौक केवळ श्रीमंतांपुरताच मर्यादित नसून गरीबांमध्यें सुद्धां दिसून येतो. अंगभर कपडा नसलेले लोकसुद्धां तिकडे मेवा-मिठाई, मक्खन-मलाई खातांना दृष्टीस पडतात. चांगल्या पौष्टिक अन्नानें शरीर धष्टपुष्ट बनतें, कपड्यांच्या छानछोकीनें तें कमजोर व अप्रतिकारक होतें. म्हणून गरीब व मध्यम वर्गाच्या लोकांनीं कपड्यांपेक्षां चांगल्या सकस अन्नांत अधिक पैसा खर्च करणें श्रेयस्कर आहे. या दृष्टीनें विचार केल्यास काशीकरांचा खाण्या-पिण्याचा शौक आरोग्याच्या दृष्टीनें चांगला आहे असें म्हणावेंसें वाटतें. जुन्या काशीनगरीची रचना व तेथील हवा स्वास्थ्यवर्धक आहे असें म्हणतां येत नाहीं. परंतु तशा वातावरणामध्यें सुद्धां पूर्वी पौष्टिक आहार मिळत असल्यामुळें लोक धष्टपुष्ट होते. दिवसेंदिवस महर्गतेमुळें शहरांतील मध्यम व गरीब वर्ग अगदीं निस्तेज व क्षयग्रस्त होत चालला आहे.

**खाण्यापिण्याचे निर्बंध :—** काशीकडे खाण्यापिण्याच्या बाबतीमध्यें कांहीं निर्बंध आहेत. आपल्याकडे ब्राह्मणांच्या हातचें अन्न सर्वांना चालतें तसें तिकडे नाहीं. कांहीं पोटजाती दुसऱ्या पोटजातीच्यासुद्धां ब्राह्मणांचें अन्न ग्रहण करीत नाहींत. मालवीय ब्राह्मण केवळ मालवीय ब्राह्मणांच्या हातचेंच अन्न ग्रहण करतात. त्यामुळें काशीस आपल्याकडच्यासारख्या व इतक्या सार्वजनिक खाणावळी नाहींत. दिवसेंदिवस हे निर्बंध सैल होत चालले असले तरी अजून आपल्याइकडल्याइतके शिथिल झाले नाहींत.

तिकडे कच्ची व पक्की रसोई असे अन्नाचे दोन विभाग केले जातात. भात, पोळ्या असले पदार्थ कच्च्या रसोईमध्यें व पक्वान्नें, मिठाई, पुऱ्या, फलाहारी (फराळाचे) पदार्थ पक्क्या रसोईमध्यें येतात. खाण्याचे निर्बंध कच्च्या रसोईला मुख्यतया लागू आहेत. अहीर (गवळी), किसान (शेतकरी) यांसारखे खालच्या जातीचे लोकसुद्धां दुसऱ्या जातीच्या लोकांनीं बनविलेली कच्ची रसोई

खात नाहींत. ती फक्त कहार, चांभार अशा हलक्या जातीच्या लोकांनाच चालते. म्हणून सार्वजनिक भोजनामध्यें तिकडे मिठाईच वापरण्याचा रिवाज आहे. याकरितां आपण कोणाला बोलावल्यास किंवा आपल्याकडे तिकडील कोणी आल्यास त्यास मिठाईच द्यावी. पाण्याच्या बाबतीमध्यें मात्र अगदीं उलट आहे. अस्पृश्य सोडले तर तिकडे कोणालाहि कोणाच्याहि हातचें पाणी चालतें.

**उष्टेंखरकटें :**— काशीकडे उष्टया ( झूठा ) ला फार महत्त्व दिलें जातें. खाण्यापिण्यांतील शिल्लक राहिलेल्यास किंवा तोंडाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध आलेल्यास झूठा म्हणतात. खाद्य, पेय, पात्र कांहींहि झूठें झालें कीं मग त्याला कोणी हात लावावयाचे नाहींत. रोज जेवणें खाणें झालीं कीं काशीकडे स्वयंपाक केलेलीं व जेवलेलीं भांडीं तशींच पडून राहतात. त्यांना कहार येऊन घेऊन जातो व तो स्वयंपाकघराची व भांड्यांची सफाई करतो. याला 'चौकाबर्तन' करणें म्हणतात. हें काम फक्त कहार जातीचे लोक करतात म्हणजे दुपारीं दोनचार तास व रात्रीं बहुधा रात्रभर स्वयंपाकघरांतील उष्टेंखरकटें तसेंच पडून राहिलेलें असतें.

आपण एखादा खाण्याचा जिन्नस घेण्याकरितां मिठाईवाल्याच्या दुकानीं गेलों कीं दुकानदार नमुना म्हणून तो जिन्नस पानावर किंवा तश्तरीं ( बशी ) त आपणास देतो. पुष्कळ वेळेला आपण तो अर्धा खाऊन बाकीचा तसाच ठेवून देतो. काशीस तसें करणें किंवा ठेवणें इष्ट नाहीं, कारण दुकानदाराच्या दृष्टीनें तो राहिलेला जिन्नस उष्टयासारखाच असतो. आपण दुरून पाणी किंवा पेय प्यायलों तर भांडें उष्टं झालं असें समजत नाहीं, पण हिंदुस्थानी लोक समजतात. ( पृष्ठ १३ ). म्हणून पाणी प्यावयाचें झालें तर लोट्यानें ओंजळींत पाणी ओतून ओंजळीला तोंड लावून प्यावें. अर्थात् हा व्यवहार 'न वार्यञ्जलिना पिबेत्' ह्या मनुवचनानुसार शास्त्रविरुद्ध असला तरी तिकडे शिष्टसंमत आहे. झूठ्याच्या बाबतीमध्यें विशेष कटाक्ष ठेवणारी काशी-कडील मंडळी खरकट्याच्या बाबतीमध्यें मात्र लहान मुलासारखी बेपरवा दिसतात. दोन्ही हातांनीं जेवणखाण करणें, अंगावर सांडल्यास नुसतें उडवून देणें व खाणें झाल्यावर हात भरले नसल्यास नुसते झटकून व चोळून मोकळे

होणें हें आपल्याकडील जुन्या परंपरेच्या लोकांना कसेंसेंच वाटल्याशिवाय रहात नाहीं. ही स्थिति उत्तर हिंदुस्थानभर दृष्टीस पडते.

**अनशेपोटीं पाणी न पिणें :—** कांहीं न खातां अवेळीं पाणी पिऊं नये असें आपणसुद्धां म्हणतां. मात्र व्यवहारांत याकडें फारसें लक्ष दिलें जात नाहीं. पण काशींत बहुसंख्य लोक या नियमाचें शक्यतोंवर पालन करतांना दिसतात. मजूर, रिक्शा, टांगा हांकणारे खाल्ल्याशिवाय बहुधा पाणी पीत नाहींत. यामुळें पाणपोईवाले ( प्याऊ ) आपल्याजवळ गूळ, बत्तासे, साखरफुटाणे, पेढे इत्यादि खाद्य ठेवतात व वरील लोक त्यांच्याजवळून दोनचार पैशांचे जिन्नस घेऊन मग पाणी पितात. तेव्हां 'रिक्शा – टांगेवाला किंवा मजूर कोणी आपल्या कामाकरितां येऊन त्यानें प्यावयास पाणी मागितल्यास ( व उन्हाळी मुलूख असल्यामुळें ते बहुधा प्यावयास पाणी मागतात ) त्याला कांहीं तरी निदान गुळाचा खडा खावयास देऊन मग पाणी पाजावें. त्याचप्रमाणें आपल्याकडे कोणी तिकडील मनुष्य भेटावयास आल्यास व त्यानें पाणी मागितल्यास त्यास नुसतें पाणी देऊं नये.

**तयार जिन्नस :—** आपल्याकडे पूर्वी बाजारचे तयार जिन्नस घेण्याची पद्धति नव्हती. आतां राहणी बदलल्यामुळें सुरू झाली आहे. काशीकडे ही पद्धति जुनी असल्यामुळें तेथें सर्व प्रकारचें पीठ, मीठ, हळद, तिखट, मसाले पापड, लोणचीं, मोरांबे, वडे, दहीं, रबडी ( बासुंदी ) इत्यादि भोजनोपयोगी तसेंच उपवासोपयोगी सर्व वस्तु तयार मिळण्याची सोय आहे. त्यामुळें यात्रेकरूंना किंवा प्रवाशांना धर्मशाळेंत किंवा उपाध्यायांच्या येथें स्वतंत्र जागा घेऊन स्वयंपाक करावयाचा म्हटल्यास कसलीच अडचण पडत नाहीं.

**सोवळें :—** काशीमध्यें पूजाअर्चा, देवदर्शन, भोजन इत्यादिकांमध्यें सोवळ्या – ओवळ्याचा रिवाज नाहीं व शिवाशिवीचा फारसा विचार नाहीं. आपली महाराष्ट्रीय मंडळी मात्र इकडील जुन्या मंडळीप्रमाणें अजून सोवळें ओवळें पाळतात व शिवाशिवीकडे लक्ष देतात. पण काशींतील सर्वसामान्य जनतेची राहणी व वागणी अशी आहे कीं, घराबाहेर वरील निर्बंध चालूच शकत नाहींत.

**मेवा** :—काजू, आक्रोड, बदाम, पिस्ते, चारोळ्या, खारका, खोबरें, अंजीर, बेदाणा इत्यादि सुक्या फळांना ' मेवा ' म्हणतात. ह्यांचीं दुकानें चौकांत व दशाश्वमेध घाटावर मुख्यतया आहेत. वरील स्वतंत्र वस्तूंच्याशिवाय ह्या दुकानांमधून अनेक मेव्यांचें मिश्रण खडीसाखर घालून ठेवलेलें असतें. हिंवाळ्यामध्यें काशीकर गोरगरीबसुद्धां मेव्याचा उपयोग मिठाईप्रमाणें करतात व तो योग्यच आहे. कारण मेव्यामध्यें स्निग्ध द्रव्य पुष्कळ असल्यामुळें इतर द्रव्यांपेक्षां थंडीमध्यें शरिरांत अधिक उष्णता उत्पन्न करण्यास तो उपयुक्त होतो.

**मिठाई** :—हें काशींतील लोकांचें आवडतें खाद्य. मिठाई मुख्यतया दुधापासून केली जाते. तिचे दोन प्रकार आहेत. एक दूध आटवून खव्यापासून व दुसरा दूध फाडून छेन्यापासून. पहिला प्रकार हिंदुस्थानी व त्याचे प्रतीक पेढे-बर्फी. दुसरा प्रकार बंगाली व त्याचें प्रतीक रसगुल्ला चमचम.

मिठाई हें काशीकडील लोकांचें आवडतं खाद्य असल्यामुळें जिकडे तिकडे मिठाईचीं दुकानें दृष्टीस पडतात. आपल्याकडे मिठाई म्हणजे मुख्यतया पेढे व त्यांचा उपयोग मुख्यतया परीक्षा, लग्नें, नवस यांकरितां लोकांना वांटण्यास. म्हणजे मिठाई ही आपल्याकडे खाद्य द्रव्यांपैकीं नाहीं. काशीकडे मिठाई रोज खाण्याकरितां व दिपवाळी, होळीसारख्या मोठमोठ्या सणांमध्यें वांटण्याकरितां वापरली जाते. मजूर तिकडे चारआठ आण्यांची मिठाई घेऊन खातात. चॉकोलेट, पेपरमीट, टॉफी यांचा तिकडे आतां प्रचार झाला असला तरी शाळेंतील मुलंसुद्धां मिठाई घेऊन खातात. निरनिराळ्या प्रसंगीं होणाऱ्या जलपाना( पार्ट्यां )करितां चहाचा वापर होत असला तरी पाव बिस्किटांऐवजीं मिठाई-नमकीनच वापरलें जातें. जिलबी आपल्याकडे प्रतिष्ठित खाद्य आहे. तिकडे तें खालच्या लोकांचें खाद्य समजलें जातें. त्याच्याऐवजीं हातांतील जाळीदार तोडयांच्या आकाराची ' इमरती ' म्हणून मिठाई तिकडे वापरली जाते. काशीजवळील जौनपूर हिच्याकरितां प्रसिद्ध आहे.

**वर्ख** :—मिठायांच्यावर चांदीचा वर्ख लावण्याची तिकडे पद्धति आहे. मिठाया घेतल्या कीं ज्यावर वर्ख लावणें शक्य आहे त्यावर गुलाबपाणी शिंपडून वर्ख चिकटवला जातो. दिपवाळी, होळीच्या वेळीं प्रथमपासूनच मिठायांच्यावर वर्ख लावून त्या थाळ्यामध्यें सजवून ठेवतात. त्यामुळें मिठायांचीं

दुकानें चांदीच्या दुकानासारखीं रात्रीच्या प्रकाशांत झगझगीत व चकचकीत दिसतात. मिठायांशिवाय पान, साखरेचीं चित्रें यांवर सुद्धां वर्ख लावला जातो. त्यामुळें मिठायांच्याप्रमाणें वर्ख बनविण्याचा पण धंदा काशींत जोरदार चालतो. हे लोक रात्रंदिवस ‘ठपठपठप’ ठोकीत वर्ख बनवीत असतांना शहरांत जिकडे तिकडे दृष्टीस पडतात. वर्ख लावण्याच्या रिवाजामुळें मिठायांच्या स्वादुतेमध्यें सुंदरता व सुगंधिता या दोन गुणांची भर पडते.

**रबडी व कुल्फी मलाई :—** हे दोन्हीं मिठाईचेच प्रकार आहेत. पण ते मिठाईच्या दुकानांत मात्र मिळत नाहींत. रबडी ही आपल्याकडील बासुंदीची थोरली बहीण म्हणावयास हरकत नाहीं. हलवाई ती दूध तापवून वर वेळोवेळीं जमणाऱ्या साईला अलग करून बनवितात. त्यामुळें ती बासुंदी-प्रमाणें पातळ न राहतां अगदीं घट्ट किंवा लच्छेदार व जवळजवळ साईचीच बनलेली असते.

कुल्फी ही आइसक्रीमची मोठी बहीण म्हणावयास हरकत नाहीं. आइसक्रीमचा प्रचार तिकडे पुष्कळ झाला आहे तरीसुद्धां कुल्फी टिकून आहे, तिचे विशेषज्ञ आहेत, आइसक्रीमपेक्षां तिची एक विशेष लज्जत आहे व लग्नें, सभा-संमेलनें इत्यादि प्रसंगीं लोकांना देण्याकरितां तिचा उपयोग करण्याइतकी तिची तिकडे प्रतिष्ठा आहे.

**सरबतें :—** काशीमध्यें आतां चहा-कॉफीचा पहिल्यापेक्षां पुष्कळच प्रचार झाला आहे, पण आपल्या इकडल्याइतका नाहीं. चहा मुख्यतया बंगाली लोकांमध्यें व कॉफी मद्रासी लोकांमध्यें आहे. हिंदुस्थानी लोकांचें मुख्य पेय थंड सरबतें हें होय. वातेरित ( Aerated ) जल दुकानांत असलीं तरी तीं पिणारे फार थोडे. पैशाच्या मोबदल्याचा विचार केला तर चहा, कॉफी किंवा वातेरित जल यांच्यापेक्षां कोणतेंही सरबत अधिक पौष्टिक, रुचिकर, स्वास्थ्यप्रद व हितकर असें म्हणणें प्राप्त होतें. मिठायांच्यापेक्षां सरबतांमध्यें रुचीला व गंधाला अधिक विविधता देतां येते, कारण हीं लिंबू, संतरा, अननस, नारंगें, डाळिंब, फालसा, गुलाब, वाळा, केवडा, आंबा, बदाम, पिस्ता इत्यादि अनेक फळांपासून व सुगंधी द्रव्यांपासून तसेंच दूध, मठ्ठा ( लस्सी ) इत्यादि द्रव्यांपासून बनविलीं जातात.

**थंडाई:**—हें काशींतील नामांकित पेय बडीशेप, गुलाबपत्ती, वेलदोडे, मिरे, खसखस, काकडी-भोपळा-कलिंगडांच्या बियांचा मगज, बदाम, पिस्ते गुलकंद, दूध-साखर ह्यांपासून बनविलें जातें. यांपैकीं बडीशेप सर्वांत जास्त, त्याच्या तृतीयांशानें गुलाबपत्ती, खसखस, बियांचा मगज व सहाव्या हिस्स्यानें इतर वस्तु असें साधारण प्रमाण आहे. यांत आपल्या रुचीप्रमाणें फरक करतां येईल. गुलकंद, दूधसाखरेशिवाय बाकीच्या वस्तु दोनतीन तास पाण्यांत भिजविल्यानंतर पाट्यावर वाटून पाण्याच्या साहाय्यानें कपडछान केल्या जातात. वर राहिलेला चोथा पुन्हा वाटून कपडछान केला जातो. असें तीन-चारदां केल्यावर चोथा फेंकून दिला जातो. बदामपिस्त्यांचा चोथा वाटवाटून संपूर्ण जिरविला जातो. नंतर साखर-दूध घालून थंडाई बनविली जाते व बर्फ घालून किंवा बर्फांत ठेवून थंड केली जाते. वैद्यकीय दृष्ट्या ह्यांत पडणाऱ्या द्रव्यांच्या गुणाचा विचार केल्यास हें दीपकपाचक, वातानुलोमक, कोष्ठशुद्धिकर, पौष्टिक व हृद्य तसेंच रसाच्या दृष्टीनें अमृतासारखें रुचकर पेय आहे. थोडक्यांत हें पेयांचा राजा आहे. उन्हाळ्यांत उन्हाळ्याचा शीण घालवून शक्ति, स्फूर्ति देणारें यासारखें दुसरें पेय नाहीं. ह्याकरितां होलिकोत्सवामध्यें हेंच पेय ठेवलें ( पृष्ठ ११९ ) गेलें. उन्हाळ्यांत थंडाईच्या जिनसांचें मिश्रण चौकांतील मेव्यांच्या दुकानीं मिळतें. परंतु ज्यांना पुष्कळ व चांगली थंडाई पाहिजे असेल त्यांनीं गोलादीनानाथ( कबीरचौरा )मधून तिचे सर्व जिन्नस स्वतंत्रपणें विकत घ्यावेत.

**भांग:**—हिचा व थंडाईचा घनिष्ठ संबंध आहे. थंडाई प्रायः भांगेचीच केली जाते. भांगेची थंडाई हें काशीचें खास पेय आहे. शंकर हे भांग ( विजया ) प्रिय आहेत असें आपण मानतों व त्याचा उल्लेख ' जातिलवंग-मरिचशर्करया विजया पानं कुरु सहितम् ' अशा प्रकारें शिवतांडव स्तोत्रा-मध्यें केला आहे. काशी विश्वनाथाची नगरी असल्यानें तेथले नागरिक भांगेचे भोक्ते असल्यास नवल नाहीं. काशीस भांग फार उत्तमपैकीं मिळते. व उत्तर प्रदेशांत अजून पूर्ण मादक द्रव्यप्रतिबंधनाचें खूळ नसल्यामुळें ती खुलेपणानें घेऊन वापरतां येते. लेखक थंडाईचा भोक्ता असला तरी भांगेचा नाहीं, येवढेंच नव्हे तर त्यानें एकदांही भांगेचा स्वाद व तिच्यापासून प्राप्त होणारें स्वर्गसुख अनुभवलें नाहीं. परंतु लेखकाचे एक परम मित्र श्री. हरिभाऊ दीक्षित,

घड्याळजी हे तिचे थोडेसे भोक्ते असल्यामुळें तो त्यांच्याकरितां पुण्यास भांग आणीत असे व ते शिवरात्रीस तयार करून आपल्या मित्रांना देत असत. पुढें आपल्याकडे पूर्ण? मादक द्रव्यप्रतिबंधनाचें खूळ माजल्यावर त्यानें भांग पाठविण्याचें बंद केलें.

भांग शंकराचा प्रसाद म्हणून आपल्याकडे शिवरात्रीस घेण्याचा कांहीं लोकांचा रिवाज आहे. असें असलें तरी आपल्याकडे भांगिष्ट अगदींच नव्हते असें नाहीं. पुण्यास तर ह्यांनीं एका आदर्श निर्व्यसनी देवतेला कायमचेंच बदनाम करून आपलें नांव अजरामर करून ठेवलें आहे.

भांग तयार करणें हें काशीचें एक मोठें व्यावहारिक शास्त्र आहे. त्या शास्त्राच्या परंपरेंत वाढलेला मनुष्यच ती उत्तम प्रकारें बनवूं शकतो व असली भांगिष्ट अशा माणसानें तयार केलेली भांगच पसंत करतात. भांग जितकी घोटावी व चढवावी तितकी चढते व जितकी चढते तितकी भांगिष्टांना मजा येते. त्यामुळें भांगिष्ट तासन्तास पाट्यावर भांग घोटीत बसलेले दिसतात. आंब्याचें पन्हें, कालिंगड, फालसा, उंसाचा रस, बदाम, मलाई इत्यादि अनेक द्रव्यांत भांग छानली जाते व प्रत्येकाची खुमारी कांहीं और असते. अमेरिकेमध्यें हॉटेलमधील कपबश्या स्वच्छ करण्याच्या विषयावर संशोधन करून प्रबंध लिहिणारास डॉक्टरेट मिळते असें म्हणतात. तर भांग कशी व किती प्रकारांनीं बनविली जाते, प्रत्येक पद्धतींत व प्रकारांत तिच्या गुणांत काय काय फरक होतात याचा शास्त्रोक्त अभ्यास व संशोधन करून प्रबंध लिहिणारास काशी हिंदु विश्वविद्यालयाकडून 'विजयावाचस्पति'ची पदवी (डाक्टरेट) ठेवली जाणें उचित आहे.

**विडा**:—विड्यास काशीकडे पान म्हणतात. तिकडे पानाचे शौकीन लोक फार आहेत. घरीं विडा करून खाण्याची पद्धति असली तरी इतर तयार जिनसांप्रमाणें बाजाराचा तयार विडाच फार वापरला जातो. त्यामुळें शहरांत जिकडे तिकडे पानाचीं दुकानें दृष्टीस पडतात. पानाकरितां तेथें फार मौल्यवान् मसाले वापरतात. त्याचीं तेथें स्वतंत्र दुकानें आहेत. ह्या मसाल्यामुळें तेथें दोनचार पैशांपासून पांचचार रुपयांपर्यंत विडे तयार करून मिळतात. महाग विडे गोविंद विड्यासारखे करतात व त्यांच्यावर वर्ख लावलेला असतो.

चहाबाजांना ज्याप्रमाणें चहानें तरतरी येते त्याप्रमाणें पानवाल्यांना पानानें येते. हे लोक केवळ भोजनोत्तर दोन वेळ पान खाऊन संतुष्ट होत नाहींत तर दिवसभर पानावर पान खात राहतात. त्यामुळें त्यांचें तोंड नेहमीं पानानें भरलेलें व रंगलेलें असतें. ज्याप्रमाणें उडणाऱ्या भुईनळ्यासमोर उभें राहिल्यास अंगावर अग्निरसाच्या ठिणग्या उडून कपड्यांना भोकें पडण्याची भीति असते त्याप्रमाणें बोलणाऱ्या पानखाऊसमोर उभें राहिल्यास अंगावर मुखरसाचे शिंतोडे उडून कपड्यांना डाग पडण्याची भीति असते. म्हणून उडणाऱ्या भुईनळ्याप्रमाणेंच त्यांच्यापासून नेहमीं दूर असावें. कधीं कधीं हे लोक आपल्याच मुखरसानें आपले कपडे खराब करतात. घरंदाज शौकीन लोक प्रवासास निघाले कीं बरोबर लावलेल्या पानांची एक भली मोठी गड्डीच घेऊन निघतात. काशीकडे मिठाईप्रमाणें पान हें आदरातिथ्याचें एक अंग मानलें जातें. त्यामुळें कोणी भेटण्यास आला कीं मिठाईबरोबर पान पण मागविलें जातें. समारंभ, संमेलन, विवाह, पार्ट्या ह्यांच्या वेळीं आपल्याकडच्याप्रमाणें तिकडे कोरडी पानसुपारी न देतां लावलेलें पानच ( विडा ) देण्याचा रिवाज आहे.

**खाण्याचे इतर शौक :—** प्रत्येक ऋतूमध्यें उत्पन्न होणारीं भाज्याफळें निघाल्याबरोबर तीं खाण्याचा काशीकरांमध्यें फार मोठा शौक दिसून येतो. पुण्याकडे नवीन बटाटा कांहीं अपरूप वस्तु नाहीं. पण काशींत तसें नाहीं. त्याची रुचि व स्वाद कांहीं और असतो. म्हणून तो लहान बोराएवढा झाल्यापासून बाजारांत यावयास लागतो. हरबरा मोहरीयेवढा धरला कीं त्याचे सोले यावयास लागतात. नारळवाले नारळ फोडून व त्याचे छोटे छोटे तुकडे करून; पपईवाले पपई कापून, सालंबिया काढून व त्याच्या फोडी करून; मक्खनवाले लोण्याचे छोटे छोटे गोळे करून; मलाई, रबडीवाले छोट्या छोट्या पंत्यांमधून मलाई, रबडी भरून गरी, पपीता, मक्खन, रबडी असें ओरडत शहरभर फेऱ्या मारतात व शहरांतील गोरगरीब त्या पदार्थांचा रोजच्या खाण्यांत उपयोग करतात. सारांश, चहा, चिवडा, भजीं, भेळ अशासारखे निःसत्त्व जिन्नस तिकडे सुद्धां बाजारांत येत असले तरी सर्वच बाजार त्यांनीं व्यापलेला नसतो.

## स्त्रियांची राहणी

**पडदा :—** उत्तर हिंदुस्थानांत स्त्रियांत पडदा आहे असें जें आपण समजतों तें मुसलमानांच्या इतकें हिंदूंच्या बाबतींमध्यें खरें नाहीं. या म्हणण्याची सत्यता काशींत मदनपुऱ्यांतून केव्हांही गेले कीं लक्षांत येण्यास वेळ लागत नाहीं. काशीच्या हिंदूंमध्यें पडदा जवळजवळ नसल्यासारखाच आहे. जो थोडासा आडपडदा आहे तो नवविवाहित व कुलीन स्त्रियांच्यामध्यें व तोही तोंडावर थोडासा पदर ओढण्यापुरता.

प्राचीन काळीं आपल्याकडे पडदा होता का नव्हता हें निश्चित सांगणें कठिण आहे. आपल्या संस्कृतीचे आदर्श प्रभु रामचंद्र व माता सीतामाई. त्या ज्या अर्थी अन्तःपुर सोडून वनवासास जावयास निघाल्या व प्रभु रामचंद्रांनीं त्याला अनुमति दिली त्या अर्थी तो फारसा मान्य असा नव्हता असें मानण्यास हरकत नाहीं. तरी सुद्धां प्रत्यक्ष ' असूर्यं पश्या नारी ' ' असूर्यं पश्याः राजदाराः ' असे शब्दप्रयोग आढळतात. यावरून कोठें कोठें पक्का पडदा असावा असें मानण्यास जागा आहे. हें सर्व लिहिण्याचें कारण असें कीं, काशींमध्यें लेखकाला खालील थाटांत बाहेर पडणारी एका थोरामोठ्याची स्त्री आढळली. ती संकटमोचनचे दर्शनास देवळाच्या पायवाटेपर्यंत चारचाकी घोड्याच्या बंद गाडींत येई. बरोबर चार कांठ्यांवर बनणारा कनातीचा तंबू आणी. गाडी थांबली कीं दासी गाडीला चिकटवून तंबू उभा करीत, त्यामध्यें ती उतरे व तंबूंतून चालत चालत देवळांत जाऊन कनातीच्या फटींतून दर्शन करी व तशीच गाडींत येऊन बसे व परत जाई.

**पेहेराव :—** डोक्यावर पदर व अंगावर अंगभर जाड ओढणी हा काशींतील स्त्रियांचा घराबाहेरचा सर्वसाधारण पेहेराव आहे. आपल्याकडेसुद्धां पूर्वी घराबाहेर जातांना डोक्यावरून पदर घेण्याचा व अंगावर चौघडीसारखें व लग्नकार्यांत शेल्यासारखें वस्त्र घेण्याचा रिवाज होता. आतां डोक्यावरील पदराचें तर नांवच नको, अंगावरील एकच पदरसुद्धां नीट अंगभर आवरून सावरून घेण्याचें बंद होऊन तो पोटापाठीवर जानव्यासारखा पडूं लागला आहे. काशींतील दक्षिणी बायकांनीं अजूनपर्यंत तरी बाहेर जातांना डोक्यावर पदर व अंगावर चौघडी घ्यावयाचें सोडलें नाहीं. घराबाहेर जातांना स्त्रियांनीं

आपला उरोभाग उत्कटत्वानें नजरेंत येईल असा पेहेराव केल्यास विठोबा अण्णा दप्तरदारांच्या शब्दांत ‘ धाराधराणां किल वृष्टिपातो धराधराणां शिखरेषु पूर्वम् । तथैव यूनामपि दृष्टिपातः पयोधरणां शिखरेषु पूर्वम् ’ अशी स्थिति होते. याचें तात्पर्य असें कीं, अशा स्त्रिया पुरुषांच्या दृष्टिपाताचें लक्ष्य बनतात. याच्या उलट ज्या स्त्रिया आपलें कोणतेंही अंग उत्कटत्वानें नजरेंत येणार नाहीं असा नीटनेटका पेहेराव करतात त्या पुरुषांच्या दृष्टिपातापासून पुष्कळशा बचावतात. म्हणून ज्यांना आपण पुरुषांचें लक्ष्य बनूं नये अशी इच्छा असेल त्यांनीं नीटनेटका पेहेराव करावा. ज्यांना त्याची परवा नाहीं त्यांना कांहींच म्हणावयाचें नाहीं. एकंदर भारदस्तपणाच्या दृष्टीनें तिकडील किंवा आपल्याकडील जुना पेहेराव अधिक चांगला असें वाटतें. कांहीं इतर प्रांतीय स्त्रिया झिरझिरीत जाळीदार ओढणी वापरतात. स्त्रियांनीं आपलें आंतील अंग किंवा वस्त्र दिसेल अशा प्रकारचा झिरझिररीत कपडा वरून वापरणें किंवा नेसणें मेघराजांना निमंत्रण देण्यासारखेंच आहे असें समजावें व जशी इच्छा असेल त्याप्रमाणें वरील वस्त्र वापरावें.

**अलंकार**:—काशीकडील बायकांच्यामध्यें अजून जुन्या पद्धतीचे अलंकार वापरण्याची पुष्कळच पद्धति आहे. त्यांच्या अंगाखांद्यावरच्या अलंकारांसंबंधानें लेखकाला लक्ष्मणाप्रमाणें ‘ नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुण्डले, असें छातीठोकपणें म्हणतां यावयाचें नाहीं हें जितकें खरें तितकेंच त्यांच्यासंबंधानें अधिक कांहीं लिहितां यावयाचें नाहीं हें पण खरें. पायांतील अलंकारासंबंधानें मात्र त्याला थोडेंफार लिहितां येण्यासारखें आहे. ही शक्यता लक्ष्मणाप्रमाणें ‘ नित्यं पादाभिवन्दनात् ’ यामुळें नसून ‘ नित्यं पादाभिदर्शनात् ’ म्हणजे वरींदारीं कोठेंहि स्त्रिया दृष्टीस पडल्यावर खालीं दृष्टि करून पुढें निघून जाण्याच्या व्यवहारामुळें उत्पन्न होऊं शकली आहे.

आपल्याकडे पूर्वीं सांखळ्या, तोरड्या, तोडे यांसारखे पायांतले दागिने बायका वापरतांना दिसत. लग्नानंतर यांच्या जोडीला पायांच्या बोटांत जोडवीं येत. आतां क्वचित् जोडव्यांशिवाय पायांतले सर्व दागिने शहरांतच नाहीं, खेडेगांवांतूनसुद्धां दिसेनासे झाले आहेत. काशीकडे अजून श्रीमंत, गरीब, लहान-मोठ्या सर्व दर्जाच्या व वयाच्या बायकांच्या पायांत पायल

( नूपुर ) पैंजणी, छडा, बिछुआ इत्यादि दागिने दृष्टीस पडतात. पायांतल्या जोडव्यांशिवाय तिकडे सुवासिनी मिळणें कठिण. बांगड्या हा बायकांचा मूलभूत अलंकार. लंकेची पार्वती असली तरी हातांत बांगडी ही असा- वयाचीच. अजीबात बांगडी नसणारी किंवा सोन्याच्या एखाद्या बांगडीवर संतोष करणारी स्त्री तिकडे मिळणें कठिण. हातांत भरपूर व विविध प्रकारच्या बांगड्या भरण्याचा तिकडे रिवाज आहे.

**गाणीं–वजावणीं :—** काशीमध्यें नांव ठेवणें, कान टोंचणें, जावळ, उपनयन, विवाह, त्यानंतरची वधु–वरांची गंगाभेट अशासारख्या मंगलप्रसंगीं वरीं रस्त्यावरून मिरवत जातांना, गंगेच्या घाटावर त्या त्या प्रसंगाला अनुरूप अशीं गाणीं ढोलकाच्या, सनईच्या साथीबरोबर म्हणण्याचा बायकांचा रिवाज आहे. घरीं तर ढोलकींसुद्धां बायका वाजवितात. विश्वविद्यालयामध्यें वरीलसारख्या प्रसंगीं प्राध्यापकांच्या घरीं बायकांच्या गाण्यांचे कार्यक्रम नेहमीं होत असत. यावरून हा लोकाचार तिकडे किती शिष्टसंमत आहे हें लक्षांत येईल. आपल्याकडे मजुरी करणाऱ्या बायका कधीं कधीं गाणीं म्हणतांना ऐकूं येतात. पुण्यांतील त्याचें उत्तम उदाहरण म्हणजे आंब्याच्या मोसमांत पहांटे कैऱ्यांच्या पाट्या वाहणाऱ्या बायकांचें. परंतु हें शिष्टसंमत नसलेले व क्वचित् होणारे कार्यक्रम असल्यामुळें तिकडे नेहमीं होणारे वरील कार्यक्रम प्रथम प्रथम तरी आपल्या मनाला, कानाला तसेंच डोळ्याला खटकल्याशिवाय रहात नाहीं.

**विवाह :—** लग्न हा व्यक्तीच्या तसेंच समाजाच्या जीवनांतील सर्वांत मोठा सण किंवा उत्सव आहे. मुलीचें लग्न हा सगळ्याच समाजामध्यें प्राचीन काळापासून एक बिकट प्रश्न होऊन राहिलेला आहे, अंतर केवळ तपशिलाचें. आपल्याकडे वधूपरीक्षण हा लग्नापूर्वीचा एक ठरून गेलेला कार्यक्रम आहे. काशीकडे सरळ बघणें विशेषतः वरानें वधूला बघणें हें अजून फारसें शिष्टसंमत किंवा रूढ झालेलें नाहीं. त्यामुळें छायाचित्रावरून किंवा आडपडद्यानें बघण्याचें काम करावें लागतें. आपल्याकडे मुली बघण्याला बाजाराचें स्वरूप आलें आहे म्हणून मुलीकडचे तक्रार करतात तर तिकडे मुलगी नीट बघावयास मिळत नाहीं म्हणून मुलाकडले तक्रार करतात. हुंडा ( दहेज )

घेण्याची चाल तिकडे आहे. हा हुंडा रोकडीशिवाय मुलीला व जांवयाला उपयोगी वस्त्रपात्र, सुखसोईंचीं व करमणुकीचीं साधनें ( जसें, शिवण्याचें यन्त्र, नभोवाणी यंत्र ) इत्यादिकांच्या रूपानें घेतला जात असल्यानें मुलीचा बाप नुसता पिळून निघतो. लग्नांत ह्या दिलेल्या वस्तु सर्वांना पाहण्या-करितां प्रदर्शनासारख्या एके ठिकाणीं मांडून ठेवण्यांत येतात.

**कन्यापितृत्वं खलु नाम कष्टम् :**— हें कथन वरसंशोधनामध्यें मुलीच्या बापाला सहन कराव्या लागणाऱ्या कष्टाला बघून केलें गेलें आहे. ह्या बाबतींतलें कष्टमय जीवन अजून तरी कमी झालें नाहीं, उलटें वाढलेंच आहे व धान्याच्या भावासारखें तें पुढें कमी होईल असें वाटत नाहीं. ह्याचें कारण योग्य वर मिळवून देण्याच्या बाबतीमध्यें मुलीच्या बापाची प्रज्ञा-बुद्धि, पैसा-अडका, प्रयत्न-पौरुष यांपैकीं कशाचाही हमखास उपयोग न होणें हें होय. प्रत्येक बाबतींमध्यें परवशता व परानुरंजन. परवशता म्हणजे 'फारचि बरी निरयगति' व परानुरंजन म्हणजे 'दिवसे दिवसे मरणं.' व इतकें सगळें सहन करून 'फलं पुनस्तदेवास्य यद्विधेर्मनसि स्थितम्' म्हणजे फळ दैवायत्तच. सारांश, 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' ह्या कर्मयोगाच्या सिद्धान्ताचें पालन झाल्या – किंवा केल्याशिवाय मुलीच्या बापाकडून वरसंशोधनाचें कार्य होऊंच शकत नाहीं.

**वधूपरीक्षण :**— यामध्यें वधूचें कुलशील, शरीरस्वास्थ्य, गृहकार्यदक्षता, शिक्षण, स्वभाव इत्यादि अनेक बाबी बघणें इष्ट असतें. परंतु सध्यां रूपरंगाला प्राधान्य दिलें जाऊं लागलें आहे. त्यामुळें मुलीच्या बापाचे कष्ट वाढले आहेत. उमेदवार निवडण्याच्या दृष्टीनें ह्या पद्धतीचें परीक्षण केल्यास असें म्हणतां येईल कीं, ज्या व्यवसायाकरितां उमेदवार निवडावयाचा त्याकरितां ठेवलेल्या सर्व विषयांचे गुण बघून त्यांत जो सरस ठरेल तो उमेदवार अनेकांच्या समिती-द्वारा निवडावयाच्याऐवजीं आतां केवळ इंग्रजीसारख्या एका विषयांत भरगच्च गुण बघून एकाच्याद्वारा निवडला जाऊं लागला आहे. व्यवसायांत सफलता मिळविण्याच्या दृष्टीनें दुसऱ्यापेक्षां प्रथम पद्धति अधिक चांगली आहे हें कोणीही निरपेक्ष तज्ज्ञ कबूल करील. बहुसंख्य स्त्रियांचा मुख्य व्यवसाय प्रपंच चालविणें हा आहे. तो नीटनेटका करण्यास कोणताही एक गुण कितीही भरगच्च

असला तरी पुरेसा पढूं शकत नाहीं, रूपरंग तर नाहींच नाहीं. प्राचीन नीतिशास्त्रकारांनीं तर ' एते गुणा वैरकरा भवन्ति ' यामध्यें त्याचा समावेश केला आहे. तें सोडलें तरी केवळ त्याच्यावर मुलगी पसंत किंवा नापसंत करणें हें मुळींच इष्ट नाहीं. पण ह्याचा काय उपयोग – Beggars cannot be choosers. म्हणून सध्यांच्या दृष्टीनें (उत्तरार्धांत फरक करून ). ' किमिष्टं सुतवचनं इष्टतरं किं तदेव सुतवचनम्। कष्टात् कष्टतरं किं सुतापितृत्वं सुतापितृत्वं च ' असें म्हणावेंसें वाटतें. या कारणानें वरसंशोधनाच्या कार्यांत मधून मधून मनाला असह्य पीडा होणं स्वाभाविक आहे. अशा वेळीं त्यांनीं ' आपल्यामागें सर्व कन्यापिते उभे आहेत व ते आपल्यासारखेच कष्टांत आहेत ' ह्या विचाराची गोळी सेवन करावी. तत्काल त्यांना हलके वाटेल — स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति ॥ कालिदास ॥

**वरात** :— वरानें उठून वधूकडे लग्नाला जाण्याचा आपला प्राचीन रिवाज आहे. मराठे मंडळींत अजून तो पाळला जातो. पांढरपेशामध्यें तो उलटा झाला आहे. तिकडे अजून कांहीं विशेष कारण नसल्यास वरपक्ष उठून वधूच्या गांवीं किंवा शहरीं लग्नाला जातो. वराबरोबर परगांवला किंवा गांवांतच वधूकडे जाणाऱ्या जथ्याला ' बारात ' म्हणतात. वरातीमध्यें वर कधीं घोड्यावर परन्तु बहुधा दोन पांढऱ्या घोड्यांच्या बग्गीमध्यें बसून जातो. आपल्याकडच्याप्रमाणें तिकडे मोटारीचा उपयोग फारसा करीत नाहींत. वरातीबरोबर घरच्या बायका जात नाहींत. त्या आपल्याच घरीं इष्टमैत्रिणींना बोलावून बाहुलाबाहुलीच्या लग्नाप्रमाणें घरीं सगळा थाट करून व गाणींबजावणीं करून वर वधूला घेऊन परत येईपर्यंत करमणूक करीत राहतात. वरातीं लोक वधूच्या गांवीं पोंचल्यावर संध्याकाळीं वाजतगाजत मिरवीत वधूच्या घरीं पोंचतात. त्या वेळीं मंडपाच्या दरवाजापाशीं वधूपक्षाचे लोक त्यांचे गळ्यांत माळ घालून ( पृष्ठ १४६ ) स्वागत करतात व नातेवाईक व निमंत्रित मंडळी प्रवेशमार्गाच्या दुतर्फा उभे राहून स्वागतांत सहायता करतात. प्रवेशद्वारापाशीं वर उतरून तो घराच्या द्वारापाशीं नेला जातो व तेथें स्त्रिया त्याचें ओवाळून वगैरे स्वागत करतात. ह्या विधीस ' द्वारपूजा ' म्हणतात. ह्याच वेळीं सर्व इष्टमित्र निमन्त्रित केले जातात. वराचें स्वागत झालें कीं निमन्त्रित मंडळींना जलपान दिलें जातें. नंतर पान देऊन ते सर्व घरीं

निघून जातात. काशीकडील लग्नांत आपल्याकडील लग्नघटकेइतकेंच द्यारपूजेला महत्त्व असतें, पण त्याकरितां आपल्या लग्नासारखीं घटकापळें निश्चित नसतात. त्यामुळें ती केव्हां होईल हें सांगतां येत नाहीं. तिची सर्वसाधारण वेळ गोरज असते. पण प्रत्यक्ष वेळ वरात येण्यावर अवलंबून असते. बहुधा वरातीला तास अर्धा तास उशीर होतोच. कधीं याहीपेक्षां अधिक उशीर होतो व जेव्हां वरपक्ष त्याच सुमारास येणाऱ्या आगगाडीनें येऊन वरात काढली जाते त्या वेळीं गाडी उशीरा येण्यामुळें किंवा अन्य कारणानें दोन दोन चार चार तास सुद्धां विलंब होतो. सारांश, आपल्याकडे पांचचार लग्नांचीं निमंत्रणें असलीं तरी मनुष्य सर्व ठिकाणीं जाऊं शकतो. काशीकडे एका लग्नाला गेलें कीं दुसरीकडे कोठेंही जातां येत नाहीं व किती वेळ मोडेल हें सांगतां येत नाहीं. लग्नें रात्रीं, मध्यरात्रीं, अपरात्रीं लागतात. त्या वेळीं फक्त वधूवर पक्षाचीं मंडळी हजर असतात, इष्टमित्र फारसे नाहींत. दुसऱ्या दिवशीं वरपक्षाची मंडळी वधूला घेऊन आपल्या गांवीं निघून जातात. परंतु वर येण्याच्या वेळेप्रमाणें त्याला सार्वजनिक मिरवणुकीचें स्वरूप नसतें. सारांश, काशीकडील लग्न दिवाळी-प्रमाणें एक रात्रीचें व तसेंच डोळ्यांत भरणारें असतें.

## काशीवासांतील विघ्नें

**रांड सांड सीढी संन्यासी। इनसे बचे तो सेवे कासी॥**

**रांड** :— वारांगना द्व्यर्थकारी आहेत. जेव्हां त्या संख्येनें कमी व तुटक तसेंच दूर अशा मर्यादित क्षेत्रामध्यें राहातात त्या वेळीं त्या स्वैराचारी लोकांच्या गरजा भागवून त्यांच्या उपसर्गापासून समाजाचें रक्षण करतात म्हणजे समाजाच्या दृष्टीनें त्या अर्थकारी ( उपयोगी ) होतात. याउलट जेव्हां त्या संख्येनें अधिक होऊन समाजांत मिसळून राहतात त्या वेळीं त्या चांगल्या माणसांना वाईट मार्गास नेण्यास कारणीभूत होतात म्हणजे समाजाच्या दृष्टीनें त्या अनर्थकारी होतात. वरील चौपाईवरून काशीची समाजस्थिति एके काळीं दुसऱ्या प्रकारची असावी असें मानण्यास जागा आहे. सध्यां या बाबतीमध्यें काय स्थिति असावी याविषयीं अनुमान करण्यास उपयोगी, उद्बोधक व अन्यत्र पण लागू होण्यासारखी अशी गोष्ट खालीं दिली जात आहे.

कांहीं वर्षांपूर्वी काशीच्या नगरपालिकेंत वैद्य ( चिकित्सक ), वकील व वक्कल यांच्यावर कर लावण्याची कल्पना निघाली. तेव्हां कांहीं वारांगना एका नगरपित्याकडे गेल्या व त्यांनीं आपणावर कर लागूं नये या दृष्टीनें त्याच्यासमोर आपली बाजू मांडली. त्या नगरपित्याचे डॉक्टर चिरंजीव लेखकाचे सहयोगी होते. त्यानें एक दिवस विद्यालयामध्यें गप्पा मारण्याचे वेळीं ही हकीगत व वारांगनांचें म्हणणें सांगितलें. त्याचा सारांश असा:—आमच्या उत्पन्नाच्या दोन बाबी, गाणें-बजावणें-नाचणें प्रथम बाब. याचे मुख्य गिऱ्हाईक संस्थानिक, रईस जमीनदार. हें नाहींसे झाल्यामुळें ह्या बाबीचें आमचें उत्पन्न नष्ट झालें. दुसरी बाब शरीरविक्री. ह्यामध्यें सध्यां कांहीं घरगुती स्त्रिया व मुली आमची भागीदारी करावयास लागल्यामुळें हेंही आमचें उत्पन्न घटलें. तेव्हां आतां आमची आर्थिक स्थिति कर बसविण्यासारखी राहिली नाहीं.

**सांड** :—आपल्याकडे पूर्वीपासून एका व्यावहारिक उद्देशानें देवाकरितां सांड सोडण्याची पद्धति आहे. काशी शंकराची नगरी व सांड शंकराचें वाहन. त्यामुळें तेथें भरपूर सांड असल्यास नवल नाहीं. त्यांच्याशिवाय तेथें अनेक गायी पण पोळासारख्या सोडलेल्या किंवा सुटलेल्या दिसतात. ह्यांची संख्या पूर्वी पुष्कळच होती. आतां कालमानानें कांहीं कमी झाली आहे. 'जगद्गुरोः शंकरस्य बलिवर्दोऽपि पूज्यते' अशी ह्या सांडांच्याविषयीं भूमिका असल्यामुळें हे नगरभर मोठ्या प्रतिष्ठेनें वावरतात व दिसली कोणाच्या हातांत झेंडूची माळ कीं घे हिसकून, दिसली भाजी घे असडून, दिसलीं धान्यें घे तोंड भरून हे उद्योग करीत आपली क्षुधाशांति करतात. याशिवाय वाटेनें लागलेल्या मंदिरांत शिरून निर्माल्यावर ताव मारतात. दुकानदार ह्यांच्या छाप्यापासून बचण्याकरितां लाठी घेऊन बसलेलेच असतात. परंतु जोंपर्यंत यांच्याकडून विशेष नुकसान होत नाहीं तोंपर्यंत कोणीही सहसा यांना मारहाण करीत नाहींत, नुसतें हांकून देतात.

काशींतील सर्वसाधारण सर्व सांड शरिरानें इतके हृष्टपुष्ट व दिसावयास इतके मदमस्त असतात कीं, बोळकुंडींत त्यांना बघितलें कीं चार हात दूर रहाण्याची इच्छा व्हावी व खरोखर त्याप्रमाणें यात्रेकरू व स्त्रिया भीतीनें दूरच उभे राहतात. अशा वेळीं तेथील जाणत्या पुरुषाला त्यांना पुढें काढून द्यावें लागतें. सावधानपणाच्या दृष्टीनें हें योग्य असलें तरी जेव्हां हे स्वेच्छेनें वावरत असतात

त्या वेळीं ह्या सावधानपणाची म्हणजे त्यांना भिण्याची आवश्यकता नसते. साधारणपणें शिंगांच्या जनावराजवळून मनुष्य चालला कीं त्याला मान हलविण्याची नैसर्गिक इच्छा होते व मनुष्य गाफील असला तर शिंग लागण्याची पण भीति असते. काशींतील सांड तुम्ही कितीही जवळून जा किंवा त्याला धक्का देऊन जा मान हलविणार नाहीं. मग तुम्हांला मारण्याकरितां धांवून येणें लांबच राहिलें. त्याचप्रमाणें तुम्ही रस्त्यांत उभे असतांना माणसें धक्का देऊन जातील, पण सांड शक्यतोंवर तुम्हांला धक्का न लागेल अशा रीतीनें जाईल. सारांश, हल्लींच्या काळीं एखाद्या अज्ञात इसमाच्या सालसपणावर विश्वास ठेवून त्याच्याशीं व्यवहार करण्यांत जितका धोका आहे तितका धोका ह्या सांडाच्या सालसपणावर विश्वास ठेवून व्यवहार करण्यांत नाहीं. मग ही धोक्याची सूचना कां ? ती अशाकरितां कीं, हे काशींतील सांड नेहमींच एकटे 'रमते राम' असत नाहींत तर अनेक वेळेला आपल्या सहधर्मचारिणीला, सहोदराला तसेंच आपल्यास मारण्याकरितां लाठी घेऊन येणाऱ्या दुकानदार शत्रूला पहातात त्या वेळीं कामक्रोधभयावेगानें बेभान व बेफाम होऊन मागेंपुढें न बघतां ते गल्ल्यांतून पळत सुटतात. त्याचप्रमाणें जेव्हां यांना कोठेंही तोंड मारण्यास सांपडत नाहीं तेव्हां विश्वनाथ – अन्नपूर्णा मंदिरापाशीं आल्यावर आपल्या स्वामित्वाच्या धुंदीमध्यें हे सांड बेधडक आंत घुसतात. अशा वेळीं यांच्या भीतीनें, हुंदडण्यानें, धडकीनें, धक्क्यानें पुष्कळ लोक पडतात, फेंकले जातात, पायांखालीं चेंगरतात व जखमी होतात. परंतु कांहीं झालें तरी काशीचा सांड शिंग रोखून माणसांवर केव्हांही आक्रमण करीत नाहीं. म्हणून 'नदीनां नखिनां चैव शृंगिणां शस्त्रधारिणाम् । विश्वासो नैव कर्तव्यः' हें वचन वाराणसींतील विश्वनाथाच्या वाहनाविषयीं तितकेंसें लागू होत नाहीं.

**सींढी** — काशीमध्यें लक्ष्मणवाला, दुर्गा, ब्रह्मा, बिन्दुमाधव, पंचगंगा, शिंदे, भोसले, केदार इत्यादि अनेक घाट फारच उंच आहेत. ह्यांच्या पायऱ्या चढतां चढतां चांगल्या माणसाची छाती भरून येते. अशक्त, आजारी, म्हातारी यांना तर ते एका दमांत चढणेंच अशक्य. पावसाळ्यांत बुळबुळीत माती जमून व एरवीच्या दिवसांत कायमचें पाणी असलेल्या पायऱ्यांवर शेवाळें जमून घाटांच्या पायऱ्यांवरून पाय घसरतात याकरितां पावसाळ्यांत

सर्व घाटांच्या सर्व पायऱ्यांवरून व इतर दिवसांत पाण्यांत बुडालेल्या पायऱ्यांवरून सावधपणानें व सावकाशीनें चढावें–उतरावें. जरा गाफीलपणा केल्यास पाय घसरून हातपाय मोडण्याची भीति असते.

काशींतील वाडे अनेक मजली आहेत. ते आंत प्रशस्त असले तरी त्यांचे जिने फार उंच उंच पायऱ्यांचे, अंधेरे व वळणदार असतात. त्यामुळें त्यांच्यावरून चढतां–उतरतांना फार सावकाश व संभाळून राहावें लागतें. जरा दुर्लक्ष झालें कीं पडण्याची, ठोकर खाण्याची, डोक्याला लागण्याची भीति असते. म्हणून प्रवाशांनीं घाटांवरून व जुन्या काशींतील वाड्यांच्या जिन्यांवरून फार संभाळून चढावें - उतरावें.

**संन्यासी** — आपल्याकडे पूर्वी पुष्कळ संन्यासी दृष्टीस पडत व कधीं कधीं ते पुढील पण येत. आतां त्यांचें दर्शन दुर्मिळ झालें आहे. कधींकाळीं श्रीशंकराचार्यांचा मुक्काम झाला व त्यांच्या दर्शनास गेलें तर संन्यासी कसा असतो याची कल्पना यावयाची. नाहींतर श्रीशंकराचार्यांच्या चित्रावरून कल्पना करून ध्यावी लागावयाची.

काशीमध्यें अजून भरपूर संन्यासी असून ते घाटांवरून, रस्त्यांतून, देवळांतून रोज दृष्टीस पडतात. दण्डीघाट, लालीघाट यांवर त्यांचे आखाडे आहेत. काशीमध्यें संन्यासी भरपूर असण्याचीं अनेक कारणें आहेत. तेथें जुन्या परंपरेचे भरपूर लोक असल्यामुळें त्यांच्यापैकीं अनेक संन्यासग्रहण करतात. इतर लोकांप्रमाणें बाहेरचे संन्यासी काशीवासाकरितां काशींत येऊन राहातात. काशीमध्यें संन्यासी सर्वांत अधिक दिसण्याचें मुख्य कारण अनेक धनिक धार्मिक लोकांनीं त्यांच्याकरितां बांधलेल्या 'मुमुक्षु भवन', 'दण्डी आश्रम', 'तारकमठ' यांसारख्या संस्था. काशींत पुढीची पंचाईत पडत नाहीं. आसरा, कपडालत्ता इत्यादींची व्यवस्था ह्या संस्थांच्या मार्फत होते. त्यामुळें साहजिकच काशींतील तसेंच त्या प्रदेशांतील सनातनी वृत्तीच्या लोकांना संन्यास घेण्याची इच्छा होते.

संन्यासी अनेक प्रकारचे असतात. सर्वसंगपरित्यागाला अनुकूल मनःस्थिति झाल्यानंतर संन्यास घेणारे 'नैष्ठिक' संन्यासी. असे संन्यासी फार कमी असतात. ह्यांचें वर्णन भर्तृहरीनें 'कदा वाराणस्याममरतटिनी रोधसि वसन्व-

सानः कौपीनं शिरसि निदधानोञ्जलिपुटम् । अये गौरीनाथ त्रिपुहरशम्भोत्रिनयन प्रसीदेत्याक्रोशन्निमिषमिवनेष्यामि दिवसान् ' ह्या श्लोकांत केलें आहे. दुसरे शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें वयोवस्था प्राप्त झाल्यावर संन्यास घेणारे ' लौकिक ' संन्यासी. ह्यांची संख्या वरच्यापेक्षां पुष्कळ अधिक असते. हे नैष्ठिक संन्याशासारखे उच्च दर्जाचे नसले तरी प्रामाणिक संन्यासी असतात. ह्या दोन्ही प्रकारच्या संन्याशांपासून समाजास कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा उपसर्ग पोंचत नाहीं. तिसरे ' नारि मुई, कुल संपति नासी । मुंडमुंडाय भये संन्यासी ' अशा प्रकारचे म्हणजे मारून मुटकून संन्यासी असतात. ह्यांची संख्या सर्वांत अधिक असते.

एकदा एक संन्यासी पुडीकरितां लेखकाकडे आले. त्या वेळीं त्यांनीं चहा मागितला. भोजनाचे वेळीं भाषणांत त्यांनीं लेखकाची तसेंच दिलेल्या चहाची व जेवणाची फार स्तुति केली. हें स्तुतिस्तोत्र पुनरागमनाकरितां होतें हें थोड्याच दिवसांत पुन्हां त्यांच्या चहा – भोजनास येण्यानें लक्षांत आलें. ' आपण संन्यासी, चहा कां घेतां ? ' असा लेखकानें त्यांना प्रश्न केला त्या वेळीं ' परिस्थितीला वैतागून झालेला मी संन्यासी आहें, माझ्या वासना नष्ट झालेल्या नाहींत ' असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. अशाच संन्याशांकडून समाजाला थोडासा उपसर्ग पोंचतो, पण तो चहा – भोजनापेक्षां केव्हांही अधिक असूं शकत नाहीं.

वरील चौपाईमध्यें संन्यासी हें उपलक्षण असून त्यामध्यें बैरागी, भिकारी, साधु यांचा मुख्यतया संबंध आहे. काशीमध्यें यांची संख्या भरपूर आहे. हे सर्व धंदेवाईक पोटभरू असल्यामुळें संधि साधून यात्रेकरूंच्या चोऱ्या करतात. विशेषतः घाटावर स्नानाच्या वेळीं यांना चांगलें फावतें. तेव्हां खरा धोका यांच्यापासून आहे. म्हणून स्नानाचे वेळीं कपड्यालत्त्यापाशीं कोणास तरी ठेवावें. एकटेच असल्यास व अनेक असले तरी सुद्धां घाट्या ( घाटावरील पंड्या ) पाशीं कपडेलत्ते ठेवणें उत्तम. स्नान झाल्यावर पुरुषांनीं गंध, स्त्रियांनीं कुंकू लावावें व प्रत्येकानें त्याच्या हातावर पैसा दोन पैसे दक्षणा ठेवून नमस्कार करावा – एका क्रिया द्व्यर्थकरी प्रसिद्धा ।

# परिशिष्ट प्रकरण

## श्रीमारुतिरायाचा पाळणा

जो जो जो जो रे, हनुमंता । अंजनीचे सुता ।
निद्रा करि बाळा, बलवन्ता । श्रीरामाचे दूता ॥ ध्रु० ॥

पाळणा लांबविला, दक्षिणेसी । केसरीचे वंशीं ।
पुत्र जन्मला, रुद्रांशीं । अंजनीचे कूशीं ॥ १ ॥

जन्म होतांचि, बाळपणीं । गिळूं पाहे दिनमणी ।
तेव्हां हनूवरीं, इंद्रांनीं । मारियले वज्रांनीं ॥ २ ॥

रत्नजडित, पालख । झळके अमोलिक ।
त्यांत पहुडलें बालक । कपिवंश दीपक ॥ ३ ॥

हालवी अंजनी माउली । हातीं धरूनि दोरी ।
पुष्पें वरूषती, सुरवरीं । गर्जति जयजयकारी ॥ ४ ॥

वायुनंदना, कपिराया । निद्रा करि बा सखया ।
तुजवरि कुरवंडी, करूनिया । सांडिन अपुली काया ॥ ५ ॥

येउनि शंकर, सत्वर । सांगे जन्मान्तर ।
बाळ महारुद्र, साचार । माझा हा अवतार ॥ ६ ॥

लंघुनि समुद्र, लंकेस । जाई अशोकवनास ।
तेथें भेटूनी, सीतेस । करील वनविध्वंस ॥ ७ ॥

रावण शक्तीनें, लक्ष्मण । होता अचेतन ।
जाउनि हिमाचलीं, तत्क्षण । आणिल गिरि हा द्रोण ॥८॥

समूळ मर्दूनी, राक्षस । करील लंकानाश ।
देव हे सोडवूनी निःशेष । नन्दवील जगतास ॥ ९ ॥

ऐसीं चरित्रें, अपार । करील हा महावीर ।
इतुकें ऐकोनी, कपीश्वर । हांसले सत्वर ॥ १० ॥

भीम भावाचा भुकेला । भक्ताधीन जहाला ।
दास भास्करें चिन्तिला । पाळणा गायिला ॥ ११ ॥

**पूर्वपीठिका:**— १९५५ सालची गोष्ट. लेखकानें आपली मुलगी बाळंतपणाकरितां पुण्याहून काशीस आणली. बाळंतपण घरींच करावयाचें ठरवून त्याकरितां विश्वविद्यालयांतील मुख्य डॉक्टरीण सौ. जानकीबाईची योजना केली. प्रसवाला बाजवीपेक्षां अधिक वेळ लागत आहे असें बघतांच तिनें औषधि योजना केली. परंतु कित्येक तास वाट बघितल्यावर ती व्यर्थ झालेली दिसतांच यंत्रानें प्रसव करावयाचें तिनें ठरविलें व त्याकरितां लेखकाची परवानगी मागितली.

यंत्रकर्माकरितां आणखी एका डॉक्टरिणीची आवश्यकता होती. रात्रीं दोन वाजण्याची वेळ. अशा अपरात्रीं चिंतातुर स्थितीमध्यें लेखकास धांवपळ करावी लागली असती. परंतु मारुतिरायाची लीला अपरंपार. डॉ. जानकीबाईची डॉक्टरीण मुलगी माहेरपणाकरितां आली होती. ती आलेली लेखकास माहिती नव्हती व त्यानें तिला निमंत्रण पण दिलें नव्हतें. तरी डॉ. जानकीबाई यावयास निघतांच ती आपणहून तिला बरोबर घेऊन आली. त्यामुळें ती अडचण आपोआप दूर झाली.

ह्या गंडांतरांतून बाळबाळंतीण सुखरूप सुटावी म्हणून लेखकानें अत्यंत आतुरतेनें श्रीसमर्थांच्या खालील ओव्यांनीं आपल्या इष्ट देवते (मारुतिराया) ची प्रार्थना चालू केली.

**परंतु एकवचनी देव एक । जेणें सोडिलें देव अनेक ॥**
**सेवाहीन मी सेवक । त्याचा म्हणवीं ॥ १ ॥**
**समर्थें अंगीकार केला । नाना संकटीं रक्षिला ।**
**त्याचिये अन्नें पिंड वाढविला । जन्मवरी ॥ २ ॥**
**मारुतीसारखे सेवक । तेंथें मी मानवी रंक ।**
**नवल सामर्थ्याचें कौतुक । काय सांगों ॥ ३ ॥**
**समर्थ आणि दीनानाथ । वैभवें समर्थांहून समर्थ ।**
**जेणें माझे मनोरथ । पूर्ण केले ॥ ४ ॥**
**जें जें मनें अभिलाषिलें । तें तें समर्थें पुरविलें ।**
**मज दीनासी वाढविलें । मर्यादे वेगळें ॥ ५ ॥**

हजार मैलांवरून हौशीनें पहिल्या बाळंतपणाकरितां आणलेल्या मुलीवर गुजरलेल्या वरील प्रसंगानें लेखकाचें अंतःकरण अत्यंत विषण्ण झालें होतें. त्यांतच थोड्या वेळांत मुलगी बाळंतीण होऊन मूल निश्चेष्ट व निष्प्राण जन्मल्याचें त्याला कळविण्यांत आलें. तेव्हां त्याचें अंतःकरण पार करपून गेलें व दिवस उजाडण्यापूर्वी मुलाला गंगार्पण ( काशींत लहान मुलें दगडाला बांधून गंगेंत सोडून देण्याची पद्धति आहे. ) करून यावें म्हणजे आपलें अपेशी तोंड सध्यां तरी कोणाच्या दृष्टीस पडावयास नको अशी कल्पना मनांत आली. तरीसुद्धां निराश न होतां मारुतिरायाची करुणा भाकणें चालूच ठेवलें होतें व तिकडे डॉ. जानकीबाईंनीं मुलाला सजीव करण्याचे आटोकाट प्रयत्न चालविले होते. थोड्या वेळांत मुलगा रडावयास लागला. तें ऐकून मनाला किती आनंद झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. मारुतिरायानें कृपा केली असें त्याच्या मनानें पक्कें घेतलें.

**प्रार्थनेच्या सफळतेचें तत्त्व** :— मनुष्य रोज कशाना कशाकरितां तरी देवाची प्रार्थना करीत असतात. त्यांपैकीं बहुतेक प्रार्थना व्यर्थ होऊन कधीं तरी एखादी प्रार्थना सफळ होण्याचा योग येतो. त्यामुळें एक तर देवच नाहीं व असल्यास त्यास प्रार्थना करण्यांत अर्थ नाहीं असें आपण समजावयास लागतों. परंतु ही विचारसरणी चुकीची आहे. वरील प्रसंगीं तसेंच दुसऱ्या एकदोन प्रसंगीं आलेल्या अनुभवावरून लेखकाचें असें मत झालें आहे कीं, जी प्रार्थना कवाइतीसारखी केली जाते, मग ती व्यक्ति करो कीं समाज, तिची सफळ होण्याची फारशी आशा नाहीं. याच्या उलट जी आतुरतेनें केली जाते ती आतुरतोत्कटतेच्या प्रमाणांत सफळ होण्याची आशा असते. संतांच्या प्रार्थना देवांनीं पुऱ्या केल्याचें आपण वाचतों व ऐकतों. यावर कोणाचा विश्वास असो किंवा नसो, लेखकाचा तरी आहे. याला कारण संतांच्या प्रार्थनेंतील आतुरता असें त्याचें मत आहे. अधिकारी पुरुषांनीं याची सत्यासत्यता पारखून बघावी. या मताच्या पुष्ट्यर्थ एक फार प्रसिद्ध असा ऐतिहासिक पुरावा दिला जात आहे.

श्री समर्थांना महाराष्ट्र स्वतन्त्र होऊन तेथें धर्मराज्य स्थापलें जावें अशी तळमळ लागून राहिली होती व त्याकरितां त्यांना ‘ कैपक्षीं परमार्थी ऐसा

राजा पाहिजे ' होता. तो ( छत्रपति शिवाजी ) दृष्टिपथांत आल्यानंतर जेव्हां ते वडिलांचा नवस फेडण्यास तुळजापुरास गेले तेव्हां त्यांनीं देवीची खालील प्रार्थना केली—

येकचि मागणें आतां, द्यावें तें मजकारणें ।
तुझा तूं वाढवी राजा, शीघ्र आम्हांचि देखतां ॥
दुष्ट संहारिले मागें, ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं, मूळ सामर्थ्य दाखवी ॥
देवांचीं राहिलीं सत्त्वें, तूं सत्त्व पाहसी किती ।
भक्तासी वाढवी वेगीं, इच्छा पूर्ण परोपरी ॥
रामदास म्हणे माझें, सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजे माते, इच्छा पूर्णचि ते करी ॥

या प्रार्थनेंतील प्रत्येक शब्द मनाची आतुरता व जिवाची तळमळ प्रकट करणारा असतांना श्रीसमर्थांनीं स्वतः ' आतुर ' शब्दाचा प्रयोग केला आहे. यावरून या प्रार्थनेविषयीं ते किती आतुर असतील हें लक्षांत येईल. ह्या अत्यंत आतुर प्रार्थनेचीं गोड फळें महाराष्ट्रानें चाखलीं असल्यामुळें आतुरतेच्या उत्कटतेचा व सफलतेचा किती घनिष्ठ संबंध आहे हें स्पष्टपणें लक्षांत येईल. तुकाराम-रामदासांसारखे साधुसंत नेहमींच आतुरतेमध्यें उच्च कोटीपर्यंत पोंचत असल्यामुळें त्यांच्या प्रार्थना प्रायः सफळ होत. सामान्य व्यक्ति प्रसंगाच्या गांभीर्यानें जर त्या उच्च स्थितीपर्यंत जाऊन पोंचली तर तिच्या पण प्रार्थना सफळ होतात. सारांश, सामान्य व्यक्तीच्या दृष्टीनें साध्य करूं म्हणून साध्य होणारी ती अवस्था नाहीं व म्हणून त्या मार्गानें फळप्राप्ति करून घेणें फार कठिण काम आहे.

**प्रार्थना व प्रयत्न :—** आतुरतेनें प्रार्थना केल्यावर मग प्रयत्नांची जरुरी नाहीं असें कोणी वरील विवेचनावरून समजेल तर तें चुकीचें आहे. श्रीसमर्थ प्रार्थना करून थांबले नाहींत तर त्या दिशेनें प्रयत्न करण्यांत त्यांनीं आपला सर्व जन्म खर्च केला. वेदामध्यें सुद्धां ' न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः ' प्रयत्नांनीं थकल्यावरच देव सहाय्यास येतो असें सांगितलें आहे.

ह्यांत सिद्धान्त श्रीसमर्थांनीं ' सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ' ह्या प्रसिद्ध ओवीमध्यें मांडला आहे. याचा अर्थ कोणत्याही कार्याच्या सिद्धीकरितां प्रयत्न चालू करूनच त्यास यश यावें याबद्दल अधिष्ठान म्हणून देवाची आतुरतेनें प्रार्थना करावयास पाहिजे.

प्रस्तुत प्रकरणीं प्रसव करण्याकरितां तसेंच मृतकल्प मूल सजीव करण्याकरितां दोन तज्ज्ञांचे प्रयत्न चालू असतांना लेखकानें मारुतिरायाची प्रार्थना चालू ठेवली होती. यावर कोणी असें म्हणेल कीं, मूल खरें तज्ज्ञांच्या प्रयत्नांनींच सजीव झालेलें आहे. मारुतिरायाची कृपा हें ' सब झूट ' आहे. याला उत्तर असें कीं, सर्वच मृतकल्प मुलांच्या बाबतीमध्यें प्रयत्न केले जातात, परंतु सर्व सजीव होत नाहींत. तेव्हां सजीव होणाऱ्या मुलांच्या बाबतीमध्यें प्रयत्नाच्या वर कांहीं तरी ' चवात्र पंचमं ' असलें पाहिजे. इतर सजीव होणाऱ्या मुलांच्या बाबतीमध्यें तें काय असेल हें लेखकाला सांगतां आलें नाहीं तरी त्याच्या नातवाच्या बाबतीमध्यें तें मारुतिरायाची कृपा होतें. कारण लेखकानें त्या दिशेनें प्रयत्न केला होता.

मुलगा जन्मला त्या वेळीं त्याच्या डोक्यावर दुरून दिसतील एवढ्या मोठ्या शिवणी होत्या. चिमट्याच्या पण एकदोन खुणा उमटल्या होत्या. व प्रसवास विलंब झाल्यामुळें पोटांत गर्भोदक जाऊन त्याच्या उलट्या होत होत्या. परंतु ज्याच्या कृपेनें मुलाचा पुनर्जन्म झाला त्याच्याच कृपेनें वरील सर्व विकार लवकर दूर होऊन तो ' प्रतिपच्चन्द्ररेखेव ' वाढीस लागला व महिनाभरांत पौर्णिमेच्या चन्द्रासारखा रूपवान् दिसावयास लागला.

**महती देवता ह्येषाः**—मनुष्यांच्यामध्यें निरपवादरूपेण जर देव कुठें वास करीत असेल तर तो लहान तान्ह्या मुलांत करतो. ' महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ' हें राजासंबंधानें भगवान् मनूंनीं लिहिलेलें वचन राजांच्यापेक्षांसुद्धां अशा लहान बालकांना अधिक लागू पडतें असें लेखकाचें मत असल्यामुळें त्याला लहान मुलांबद्दल विशेष प्रेम व आवड वाटे. प्रत्येकाचें स्वतःचें मूल म्हणजे त्याच्या मताप्रमाणें प्रत्येकाचें आवडतें दैवत, आनंदाचें स्थान. ह्या बाबतीमध्यें ' अंतःकरणतत्त्वस्य दम्पत्योः स्नेहसंश्रयात् । आनंदग्रंथिरेकोयमपत्यमिति बध्यते ' हें भवभूतीचें वचन सुप्रसिद्ध आहेच. अशा

आपल्या मुलांची जोपासना म्हणजे परमेश्वराचीच सेवा असल्यामुळें लेखक आपल्या मुलांच्या जोपासनेकडे अत्यंत बारकाईनें लक्ष देत असे. त्यांतून हा नातू गंडांतरांतून वांचून पुनर्जन्म पावून हातीं लागला असल्यामुळें त्याला तो पोटच्या गोळ्यापेक्षांसुद्धां प्रिय वाटूं लागला. त्यामुळें अक्षरशः ‘ पहिल्या ’ दिवसापासून त्यानें त्याच्या जोपासनेकडे जीव घालून लक्ष देण्यास प्रारंभ केला व यावज्जीव तें लक्ष तसेंच राहणार आहे.

**पाळण्याची आवड :**—मुलांच्या जोपासनेंतलें लेखकाचें सर्वांत आवडतें कृत्य मुलाला हातावर घेऊन किंवा पाळण्यांत घालून देवांच्या पाळण्यानें निजवणें हें होय. रामराय लेखकाचें आवडतें दैवत असल्यामुळें पहिल्या पुत्राच्या वेळीं तो विठ्ठलकृत रामरायाचा पाळणा म्हणत असे. त्या वेळीं तो तल्लीन होई व मुलगा निजून जाई. दुर्दैवानें तो मुलगा दोन वर्षांचा होऊन वारला. या योगानें त्यास पुत्रवियोगाचें असह्य दुःख झालें, पण प्रस्तुत प्रकरणाच्या दृष्टीनें त्याहीपेक्षां विशेष महत्त्वाचा परिणाम म्हणजे इतःपर रामरायाचा पाळणा त्याला मुलाला निजविण्याचें व निजवितांना स्वतः ब्रह्मानंदांत तल्लीन होण्याचें गीत न राहतां पुत्रवियोगाचें विलापगीत झालें. त्यामुळें त्यानें पुन्हां विठ्ठलकृत रामरायाचा पाळणा म्हणावयाचा नाहीं असा संकल्प केला.

**मारुतीच्या पाळण्याचा अभाव :**—आपल्याकडे जन्मोत्सवाचे वेळीं जन्म झाल्यावर देवास पाळण्यांत घालून पाळणा म्हणण्याचा रिवाज आहे. ह्या बाबतींत रामजन्मानंतर म्हटला जाणारा विठ्ठलकृत रामरायाचा पाळणा निर्देश करण्यासारखा आहे. हनुमज्जयंती हा महाराष्ट्रांत होणारा सर्वांत मोठा व सर्वांत व्यापक जन्मोत्सव आहे. पूर्वींच्या साधुसंतांनीं रचलेला मारुतिरायाचा पाळणा नसल्यानें ह्या उत्सवांत जन्मानंतर म्हणण्यास उपयोगी असा पाळणाच नाहीं. या बाबतींमध्यें लेखकास आलेल्या कांहीं पत्रांतील उपयुक्त भाग खालीं दिला जात आहे :—

( १ ) आम्ही दरसाल श्रीएकनाथमहाराजांचे जन्मकाळअभंगांचे भजनानें जन्मकाळ करीत असतों. आमचे सांप्रदायिक जनरल पद्धतीचा श्रीज्ञानराजकृत पाळणा म्हटला जातो. आपला हा स्पेशल असल्यानें विशेष महत्त्व समजण्यास हरकत नाहीं.

— आ. कृ. स., कोल्हापूर.

( २ ) मला मारुतिरायाचा पाळणा चांगला कोठेंही मिळाला नाहीं.

— ह. वा. जो., दुधोंडी.

( ३ ) आम्हांस गेल्या दहा वर्षांत पाळणा मिळाला नाहीं.

— श्या. गो. को., जयसिंगपूर.

( ४ ) सद्गुरु ब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर यांच्या श्रीराम मंदिरांतील श्रीमारुतिरायाचा जन्मकाळ झाल्यावर म्हणण्यास आपला पाळणा योग्य होईल. जरूर पाठविणें. फारच स्तुत्य सेवा आहे. — कारभारी, गोंदवलें.

( ५ ) नेहमींच आम्हांस पाळण्याची अडचण भासत होती.

— गो. र. बी., हळशी.

( ६ ) मला मारुतीचा पाळणा पाहिजे होताच, परंतु कोठें मिळाला नाहीं. मीं मारुतीचीं अनेक पुस्तकें वाचलीं आहेत. — अ. बा. कु., शहापूर-बेळगांव.

**पाळणाविरोधी मतः—** कांहीं लोक मारुतिरायाला पाळण्यांत घालण्याच्या व पाळणा म्हणण्याच्या विरुद्ध आढळले. त्यांची कल्पना अशी कीं, मारुतिराय जन्मल्याबरोबर सूर्यमंडळ ग्रासावयास गेले. 'ते पाळण्यांत निजण्यास आईपाशीं राहिलेच नाहींत.' पण ही कल्पना चुकीची आहे. येवढें खरें कीं, मारुतिराय 'उपजतांच' सूर्यमंडळ ग्रासावयास गेले, असा शब्दप्रयोग संतकवींच्या मारुतिजन्मवर्णनांत आढळतो :—

**नामा म्हणे जन्म पावतांचि बाळ । झाला असे काळ रविमंडळा ॥** नामदेव

**जन्मतांचि जेणें सूर्यातें धरिलें । इन्द्रादिकां दिले घोरमार ॥** एकनाथ

**हा तनय मारुताचा याच्या ऐका अपार वीर्याला ।**
**भक्षित होता परिणत फळ मतिनें उपजतांचि सूर्याला ॥** मोरोपंत

**चुकीचें मत :—** परंतु तो शब्दप्रयोग तत्क्षणार्थी समजावयाचा नसून अल्पकालार्थी समजावयाचा आहे. मारुतिरायाचा जन्म आपल्याकडे चैत्री व उत्तर हिंदुस्थानांत माघी पौर्णिमेस झाला असें मानतात. म्हणजे पौर्णिमेबद्दल मतभेद नाहीं. वाल्मीकि रामायणांत दोन ठिकाणीं हनुमान्जन्माची कथा आहे. पण जन्माचा मास व तिथि कोठेंही दिले नाहींत. ज्या दिवशीं तो सूर्यावर झेपावला त्या दिवशीं सूर्यग्रहण होतें व राहु त्यास ग्रासावयास आला होता हें मात्र स्पष्ट दिलें आहे.

शालिशूकनिभाभासं प्रासूतेयं तदाञ्जना ।
फलान्याहर्तुकामा वै निष्क्रान्ता गहने वरा ॥
एष मातुर्वियोगाच्च क्षुधया च भृशार्दितः ।
रुरोद शिशुरत्यर्थं शिशुःशरवणे यथा ॥
तदोद्यन्तं विवस्वन्तं जपापुष्पोत्करोपमम् ।
ददर्श फल लोभाच्च ह्युत्पपात रविं प्रति ॥
यमेव दिवसं ह्येष ग्रहीतं भास्करं प्लुतः ।
तमेव दिवसं राहुर्जिघृक्षति दिवाकरम् ॥

मारुतिराय सूर्यापाशीं पोंचलेले बघून राहु इंद्राकडे तक्रार करूं लागला :—

अद्याहं पर्वकाले तु जिघृक्षुः सूर्यमागतः ।
अथान्यो राहुरासाद्य जग्राह सहसा रविम् ॥ वा. रा. उ. ३५

श्रीधरांनीं रामविजयांत ' हनुमंत मुख पसरोनि। सूर्याजवळी पातला॥ तो ते दिवशीं सूर्यग्रहण। राहु आला मुख पसरोन, असें स्पष्ट लिहिले आहे. सारांश, मराठी संत कवींच्या आधारें मारुतिराय जन्मानंतर घरांत निदान पंधरा दिवस व वाल्मीकि रामायणाधारें निदान कांहीं काळ तरी होते, ते आईच्या उदरांतून बाहेर येतांच सूर्यावर झेपावले नाहींत हें निश्चित. तेव्हां जन्मोत्सवांत जन्मानंतर त्यांना पाळण्यांत घालण्यांत व पाळणा म्हणण्यांत वस्तुस्थितीचा विरोध येत नाहीं. म्हणून जे पाळण्याचा कार्यक्रम करीत नसतील त्यांनीं तो जरूर करावा अशी त्यांना नम्र विनंति आहे.

**पाळण्याची प्रेरणा :**— जन्माच्या वेळीं म्हणण्याकरितां मारुतिरायाला स्वतः-चा पाळणा नाहीं ही उणीव लेखकाला लहानपणींच हनुमज्जयन्तीच्या उत्सवाच्या वेळीं कळून चुकली होती. परंतु ती भरून काढण्याची कल्पना मारुतिरायाच्या कृपेनें गंडान्तरांतून वाचलेल्या नातवाला निजविण्याचे वेळीं सुचली व त्याचें कारण लेखकाच्या मुलाची दुःखद घटना हें होय. ती झाली नसती तर त्यानें नातवास निजविण्यास रामरायाचा पाळणा म्हटला असता. कारण तो त्याचा अत्यंत आवडता होता; परंतु पुत्रवियोगानें तो म्हणण्याचें बंद झाल्यानें व नातवा-वरची मारुतिरायाची कृपा प्रामुख्यानें समोर असल्यामुळें त्याला निजविण्या-करितां मारुतिरायावर पाळणा रचण्याची प्रेरणा झाली. सारांश, ' वाइटांतून चांगलें ' याचें हें एक दुसरें ( पृष्ठ १०१ ) उदाहरण समजावयास हरकत नाहीं.

**पाळण्याची रूपरेखा :—** आजपर्यंत मारुतिरायाला जर कोणता पाळणा ऐकण्याचा अभ्यास असेल तर तो विठ्ठलकृत रामरायाचा. लेखकानें लहानपणीं मारुतिजन्मानंतर तो म्हटलेला ऐकला आहे. तेव्हां नवीन धर्तीचा व नवीन शब्दविन्यासानें नटलेला पाळणा करून म्हटल्यास त्यांना चुकल्या चुकल्यासारखें होण्याचा संभव आहे, कदाचित् त्यांना तो आवडणार नाहीं. तसें होऊं नये आपण रचलेला पाळणा ऐकतांना तो विठ्ठलकृत आपल्या प्रभूचाच आहे असा भास व्हावा व आपला पाळणा खपून जावा म्हणून लेखकानें विठ्ठलकृत रामरायाचा पाळणा मारुतिरायाच्या दृष्टीनें जरूर तेवढा फरक करून स्वकृत मारुतिरायाच्या पाळण्यांत रूपान्तरित करण्याचें ठरविलें. पुत्रवियोगाचा विसर पडावा म्हणूच लेखकानें विठ्ठलाचा पाळणा म्हणण्याचें बंद केलें होतें. परंतु त्याबरोबर रामरायाच्या गोड पाळण्याला आपण कायमचे मुकलों याची पण मनाला रुखरुख लागून राहिलेली होती. विठ्ठलाच्या पाळण्याप्रमाणें पाळणा म्हणावयास मिळाला तर 'दुधाची तहान ताकानें' या म्हणीप्रमाणें मनाला लागलेली रुखरुख पुष्कळच नाहींशी होईल असें वाटून पण वरील योजनाच त्यानें पसंत केली. याशिवाय 'लवण मेळवितां जळें। काय उरलें निराळें॥ तैसा समरस झालों। तुज माजी हरपलों' ही देवभक्तांच्याविषयीं वर्णिलेली स्थिति रामराय व मारुतिराय ह्यांना पूर्णपणें लागू असल्यामुळें रामरायाच्या पाळण्याबरहुकूम मारुतिरायाचा पाळणा रचल्यास तें सर्वैथैव योग्य असेंच होईल ही पण कल्पना मनांत येऊन वरील योजनाच पक्की केली.

एकदा योजना ठरल्यावर मग काय वेळ? विठ्ठलकृत पाळणा ओठांतून बाहेर निघत नसला तरी पोटांत होताच. नातवाला निजवतांना त्याचें 'चिंतन' करून नवीन पाळणा गुणगुणावयास प्रारंभ केला व पांचचारदा नातवाला निजविण्याच्या कालावधींत पाळणा तयार झाल्यावर तो मोठ्यांदा म्हटला. त्या वेळीं लेखकाला जो आनंद वाटला, जी शांति मिळाली व जें सुख अनुभवास आलें तें सर्वच अनिर्वचनीय होतें. लेखकाच्या आयुष्यांतील तो एक अविस्मरणीय प्रसंग होता. पाळणा तयार झाल्यावर कांहीं दिवस तो म्हणण्याचें लेखकाला वेडच लागलें. नातू निजत नसला तरी त्याला हातावर घेऊन तो दिवसांतून अनेक वेळेला गाऊं लागला.

**विचित्र अनुभव** — मारुतिरायाचा पाळणा म्हणावयास लागल्यावर रामरायाचा पाळणा म्हणतां येत नाहीं म्हणून मनाला लागलेली रुखरुख खरोखरच कल्पनेप्रमाणें नाहींशी झाली, पण त्याजबरोबर घाटणी व शब्द-सादृश्य यांचेमुळें पहिल्या मुलाची आठवण पण व्हावयास लागली. परंतु आश्चर्य असें कीं, पूर्वी आठवणीनें दुःख होत असे तें मारुतिरायाचा पाळणा म्हणतांना होणाऱ्या आठवणींत राहिलें नाहीं. उलट हा पाळणा नसून इतक्या वर्षांनीं 'अक्षर' रूपांत जन्मलेला आपला पहिला मुलगाच आहे अशी भावना उत्पन्न होऊन मनाला एक प्रकारें समाधानच वाटावयास लागलें. मारुतिरायाचा पाळणा रचल्यानंतर मनःस्थितीमध्यें वरीलसारखा चमत्कारिक फरक घडून आला तरी रामरायाचा पाळणा पुन्हां म्हणावयास सुरुवात करावी ही कल्पना मात्र मनाला शिवूं शकली नाहीं. त्यामुळें एकदा जो पाळणा बंद झाला तो कायमचाच.

**पाळणा प्रकाशन व प्रचार** — पाळणा तयार झाल्यावर कांहीं दिवसांनीं तो कीर्तनकार व मारुतिभक्त यांना मारुतिजन्माकरितां व मातांना आपल्या चिरंजीवांना निजविण्याकरितां उपलब्ध करून द्यावा अशी कल्पना आली. त्याप्रमाणें १९५६ च्या 'सज्जनगड' पत्रिकेच्या जानेवारीच्या व 'महाराष्ट्र विस्तारा'च्या मार्चच्या अंकांत तो प्रसिद्ध केला. त्यानंतर मारुतिजन्माच्या पूर्वी 'केसरी', 'नवाकाळ', 'बलवंत', 'बेळगांव समाचार' ह्या वर्तमानपत्रांतून प्रकट विनंती करून पाळणा मागविणारांच्याकडे व त्याचा प्रचार करणारांच्याकडे शेंकडों प्रती डाकेनें फुकट पाठविल्या व पुण्यास जन्मोत्सवाच्या वेळीं १०–१२ मारुतींच्यापुढें श्रोतृसमाजामध्यें शेंकडों प्रती वांटल्या. यासंबंधीं कांहीं पत्रें खालीं देत आहें —

( १ ) आपल्याकडून ३५ प्रती मिळाल्या. त्याचा प्रचार प्रत्येक मंदिरांत व कथेकऱ्यास हनुमज्जयंतीच्या दिवशीं करीन. द. कृ. घा., नाशीक.

( २ ) मजला प्रचारकार्याकरितां पाळण्याच्या २५ प्रती पाठवून देणें.

एम्. व्ही. वि., गोरेगांव.

( ३ ) १०० प्रती पाळण्याच्या माझे नांवें वरील पत्त्यावर पाठवाव्या. पुढील वर्षी पुनश्च मी मागवीन त्या वेळीं १५० प्रती तरी अवश्य पाठवाव्यात.

वा. जो. कीर्तनकार, गिरगांव.

(४) श्रीमारुतिरायाचा पाळणा प्रती २५ आमच्या संस्थेस पाठवाव्या.
हेडमास्तर, घोलवडे.

(५) मारुतीचा पाळणा २५–३० प्रती पाठवाव्या.
वि. वा. जु., बडोदें, हिन्दुमहासभासेवक.

(६) पाळणा ११ प्रती मिळाल्या. मारुतिभक्त पुष्कळ. जन्माचा हंगाम. ह्या प्रती एक एक दूरवर ११ ठिकाणीं गेल्या. तरी आणखी कांहीं प्रती पाठविण्याची कृपा करावी. मा. वि. आ., शिक्षक, नागांव.

(७) मारुतिरायाचा पाळणा पाठवावा. गेलीं २०–२५ वर्षें केवळ हौस म्हणून मी कीर्तन करीत असतों. वै. कु. रायकर, चिपळूण.

(८) आपण पाठविलेला मारुतिरायाचा प्रासादिक पाळणा पोंचला. अत्यंत आभारी आहें. एक अत्यंत नम्र विनंति म्हणजे त्या पाळण्याच्या सुमारें २–२॥ शें प्रती पाठविल्यास त्या आमचे भागांतील हनुमज्जयंती-उत्सवाचे वेळीं प्रसारासाठीं वांटण्याचा मनोदय आहे.
गो. ना. प., बेळगांव.

(९) आपणांस विनंति केल्याप्रमाणें पाळण्याच्या तीन प्रती पाठविल्या त्या मिळाल्या. पाळणा १० प्रती पुढील पत्त्यावर मुंबईस पाठवाव्या. द. दे., पुणें. राष्ट्रीय कीर्तनकार.

(१०) माझी मुलगी कीर्तन करीत असते. आणि तिचे गुरुजी श्री. गो. पै., नाशिक ह्यांच्याकरितां मिळून दोन प्रती पाठविण्याची कृपा करावी.
शं. रा. कु., पुणें.

मारुतिराय हें लोकप्रिय दैवत असल्याचें माहीत होतें तरी ते किती लोकप्रिय आहे याची खरी कल्पना पाळण्याच्या निमित्तानें संपूर्ण महाराष्ट्रांतून तसेंच बृहन्महाराष्ट्रांतून आलेल्या शेंकडों पत्रांवरून आली. त्याजबरोबर उत्सवांत जन्मानंतर म्हणण्यास पाळणा नसल्याची जाणीव असल्याचें व पाळणा मिळाल्यानंतर संतोष व आनंद झाल्याचें दिसून आलें. सारांश, हिंदु विश्वविद्यालयांत मारुतिरायाचें मंदिर बांधल्यामुळें ज्याप्रमाणें तेथील भाविक जनांची देवदर्शनाची उणीव दूर झाली त्याप्रमाणें मारुतिरायाचा पाळणा रचून तो सर्वांना उपलब्ध करून

दिल्यामुळें कीर्तनकार व मारुतिभक्त यांची उत्सवांतील एक उणीव दूर झाली असें निदर्शनास आलें.

**पाळण्याचें संशोधनः**— दुसऱ्या वर्षी केसरींत दिलेल्या जाहीर विनंतीनंतर पाळणा मागवून व आस्थेनें अभ्यास करून एक हौशी कीर्तनकार ग. ल. जो., बी. कॉम. लिहितात : ‘ मी पाळण्याचा अवश्यमेव उपयोग केल्याशिवाय राहणार नाहीं. आपण पाळणा रचून माझ्यासारख्या हौशी कीर्तनकाराची मोठी गरज भागविली आहे. पाळणा उत्तम साधला आहे. आपण राग मानीत नसाल तर कांहीं सूचना कराव्याशा वाटतात. आणखी जास्त चांगला तो कां होऊं नये या बुद्धीनेंच केवळ लिहीत आहें. पटत असल्यास पहावें. नाहीं तर सोडून द्यावें. ’

त्या पत्रांत त्यांनीं समुद्र, अचेतन, महावीर, अमोलिक, हनूवरी यांबद्दल सागर, आचेतन, माहावीर, आमोलिक, हनुवटी ह्या व अशाच प्रकारच्या आणखी दोनचार सुधारणा सुचविल्या होत्या. त्या पत्राबद्दल त्यांना पाठविलेल्या पत्राचा सारांश :—

( १ ) हा पाळणा मारुतिरायाच्या परम कृपेनें भारावलेल्या अन्तःकरणांतून निघालेला आहे. त्यामुळें त्यांतील प्रत्येक अक्षर चूक किंवा बरोबर मला पवित्र व प्रिय आहे. गेल्या वर्षभर मी तो पाळणा हजारांपेक्षां अधिक वेळां म्हटला असेन पण अधिक चांगला करावा ही कल्पना सुद्धां मला शिवली नाहीं.

( २ ) आपल्या सूचनेप्रमाणें आपणास तो म्हणण्यास हरकत नाहीं. पाळणा मीं रचला असला तरी तो माझा नाहीं, मारुतिभक्तांचा आहे. त्यामुळें भक्तांस तो आपल्या आवडीप्रमाणें बदल करून म्हणावयाचा अधिकार आहे.

( ३ ) प्राचीन साधुसंतांच्या काव्यांत अनेक पाठभेद दृष्टीस पडतात. त्यांचीं अनेक कारणें असूं शकतील. त्यामध्यें लेखकानें किंवा वाचकानें आपल्या दृष्टीनें त्यांच्या भाषेकडे बघणें व त्याप्रमाणें फरक करणें हें एक कारण असलें पाहिजे असें आपलें पत्र वाचल्यानन्तर मला वाटावयास लागलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



क्रमांक ... नों: दि:

**पाळण्याची लोकप्रियता**:—हा पाळणा अपेक्षेपेक्षां अधिक लोकप्रिय झाला हें पण पत्रावरून दिसून आलें. एक कीर्तनकार ( ल. मो. का. ) लिहितात—

> प्रत्येक हरिदासासी । देतों आम्ही त्यासी । प्रसार करण्यासी ।
> सांगतों आम्ही मारुति जन्माचे वेळीं म्हणा हो तुम्ही ॥
>
> सुंदर काव्यें हें आहे म्हणतात ।
> याचाच प्रसार करा हो सांगतात ।
>
> नरनारी आनंदानें हो । म्हणती वाहवा हो । काव्य सुंदर हो ।
> आवडलें आम्हां । सर्वांचा आशीर्वाद सांगत असें तुम्हां ॥

दुसरे कीर्तनकार ( वा. जो. ) लिहितात :—'आपला केलेला पाळणा अत्यंत सोपा, अतिप्रासादिक आणि संपूर्ण अर्थानें भरलेला असा झाला आहे. त्यांतले 'हांसले कपीश्वर' ही उक्ति मला व श्रोत्यांना फार आवडली.'

शनवार नेनेघाटावरील पुण्यांतील एक प्रतिष्ठित वयोवृद्ध नागरिक व लेखकाचे मावस चुलते तीं. स्व. अनंत गोविंद जोगळेकर लिहितात :— 'शनवार मारुतीच्या उत्सव-चालकांनीं त्याच्या ५०० प्रती छापून वांटल्यामुळें जन्माचें कीर्तन झाल्यावर समक्ष हरिदासांनीं जेव्हां पाळणा म्हटला त्या वेळीं श्रोत्यांना पाळणा म्हणणें सुकर झालें. पाळणा गातांना श्रोते मंडळी रंगून गेलेली दिसली.'

पाळण्याच्या लोकप्रियतेचं प्रथम कारण मारुतिरायाची लोकप्रियता, दुसरें जन्मोत्सवांतील एका आवश्यकतेची पूर्ति व तिसरें पाळण्याची काव्यगोडी. यांपैकीं पहिल्या दोन्हींबद्दल लिहिण्याचें कारण नाहीं. तिसऱ्याबद्दल थोडा खुलासा करणें उचित आहे. खरोखर लेखकानें हा पाळणा आपली काव्यशक्ति प्रदर्शित करण्याकरितां रचला नसून अन्तःप्रेरणेनेंव स्वान्तःसुखाय रचला असल्यामुळें त्यांत काव्यगुण आले नसते तरी त्याच्या सुखांत अन्तर पडलें नसतें. परंतु पाळण्याची रचना खरोखरच चांगली झाली म्हणून तो प्रकाशित करण्याची इच्छा झाली. पाळणा हें मातांनीं म्हणावयाचें गाणें. त्यांना पण तो फार आवडला. एक माता लिहिते—'तुम्हीं लिहिलेला पाळणा वाचून मनाला फार आनंद झाला.' सौ. वा. फणसव. परंतु हा पाळणा विठ्ठलकृत

रामरायाच्या पाळण्याची हुबेहुब नक्कल इतकी कीं, एक झांकावा व दुसरा काढावा. ह्याच्याबरोबर विठ्ठलकृत पाळणा दिला असता म्हणजे वरील विधानाची यथार्थता लक्षांत आली असती. परंतु उपर्युक्त कारणामुळें (पृष्ठ १७५.) तो देतां आला नाहीं. ज्यांना कुतूहल असेल त्यांनीं दोन्ही ताडून बघावे. अशी स्थिति असल्यामुळें पाळण्यांतील काव्यगुण विठ्ठलाचे आहेत. थोडक्यांत, पाळण्याच्या लोकप्रियतेचें काडीमात्र श्रेय लेखकास घेतां येत नाहीं.

**मारुतिराय व बालक** :—बालक हे राष्ट्राचे भावी आधार, म्हणून त्यांच्यापुढें अगदीं बाळपणापासून शक्ति, युक्ति, नीतीच्या बाबतींमध्यें सर्वोच्च आदर्श ठेवावयास पाहिजे. या दृष्टीनें विचार केल्यावर मारुतिराया-सारखा आदर्श नाहीं व जिच्या हातांत पाळण्याची दोरी त्या मातेला आपल्या चिरंजीवाकरितां प्रथमपासून म्हणण्याच्या गाण्यामध्यें मारुतिरायाच्या पाळण्यासारखें उत्तम गाणें नाहीं असें लेखकाचें मत आहे. तें त्यानें वांटण्याकरितां छापलेल्या पाळण्याच्या छोट्याशा भूमिकेंत ‘याचा उपयोग हनुमज्जयन्तीच्या दिवशीं मारुतिरायांना पाळण्यांत घालण्याच्या वेळीं व्हावा, येवढेंच नव्हे तर हा चिरंजीवाचा पाळणा घरोघरीं रोज चिरंजीवांना पाळण्यांत निजविण्यास पण म्हटला जावा अशी इच्छा आहे’ अशी विनंति केली होती. पाळण्याकरितां आलेल्या पत्रांत अनेकांनीं ही कल्पना प्रकट केली होती :—

‘ चि. मारुतिरायाचा हा पाळणा घरोघर पाळण्याच्या दोरीबरोबर म्हटला जावा अन् त्या प्रेरणेतून शक्तिशाली नवी पिढी उत्पन्न होऊन, चिरंजीवी भारतीय संस्कृतीच्या उद्धारार्थ ती झटो ही अपेक्षा व्यक्तवितों. प्र. त्र्यं. पं., पुणें. ‘ भावी सुदृढ बालकांच्या दृष्ट्या मातांना ह्या बलशालीचा पाळणा योग्य आहे. घरोघर असे पाळणे गाइल्यावर निश्चित शिवाजी निर्माण होऊन संस्कार-क्षम हिंदुस्थान बलशाली बनेल.’ भा. पु. जो., दोंडाईचे.

पाळण्याची मागणी अनेक बालकांकडून आली व त्यांना पाळणा पाठ-विल्यावर पोंच दिली. त्याचे दोन नमुने खालीं देत आहें. त्यावरून बालकांचीं मनें कशीं संस्कारक्षम असतात व त्यांना प्रथमपासून वळण लावल्यास तीं किती सुधारूं शकतील हें लक्षांत येईल.

१०७९९

'तुम्ही मारुतीचा पाळणा पाठवितां असें वाचलें. माझी मारुतीवर फार श्रद्धा आहे. मी आज दोन वर्षें शनवार करतों. आतां तुम्ही म्हणाल कीं, हा इंग्रजी शाळेंतील मुलगा आणि शनवारचा उपवास करतो. पण 'काका' इंग्रजी-मध्यें ज्याला आपण Good tradition म्हणतों ती माझ्या मनावर झालेली आहे. म्हणून मला मारुतीचा फोटो, पाळणा व मारुतीचा गंडा पाठवावा, अशी तुम्हांला मुलगा ह्या हुकुमानें सांगत आहे. मी तो पाळणा माझ्या वृद्ध आजीला आणि आईला नियमित वाचून दाखवीन व त्या मारुतिरायाची तुम्हांला साक्ष देऊन संपूर्ण भक्तीनें व शुद्ध मनानें सेवा करीन.'

सु. रा. के., पालगड.

'तुम्हीं पाठविलेला फोटो व मारुतिरायांचा पाळणा आजच पोंचला. तो सुंदर फोटो पाहून व तुमचा अमोल असा उपदेश वाचून मला खरोखरच धन्य वाटलें. तुम्हीं आमच्यासाठीं आपल्या मुलांच्या पूजेचे फोटो पाठविलेत याबद्दल मी खरोखर तुमचे उपकार विसरणार नाहीं. तुम्हीं सांगितल्याप्रमाणें मी तो फोटो तसबिरींत ठेवून त्यासमोर रोज नमस्कार घालीत जाईन. त्या मारुतिरायाचे व तुमच्यासारख्या थोरामोठ्यांचे प्रेमळ आशीर्वाद आम्हांला असल्यावर आम्हांला जीवनांत कांहीं कमी पडावयाचें नाहीं असें वाटतें. खरोखर तुमच्यासारख्या थोर गृहस्थांनीं आम्हां अज्ञ बालकांना इतका मार्ग दाखविला हें पाहून माझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं.'

बा. वा. खे., खेड.

१९५६ च्या मारुतिजन्माच्या उत्सवाच्या वेळीं नातू काशींतच होता. १९५७ सालांत लेखक सेवानिवृत्त होणार होता. म्हणून त्या वर्षीच्या उत्सवाच्या वेळीं 'प्राणदात्याच्या दर्शनाकरितां' लेखक आपल्या नातवास मुंबईहून मुद्दामहून घेऊन (चित्र नं. ६) आला व पुढें काशी सोडल्यावर प्रतिवर्षी उत्सवास त्याला आपल्याबरोबर (पृष्ठ १०२) घेऊन येण्याचा त्यानं मनोरथ पण करून ठेवला—'मनोरथानामगतिर्न विद्यते।'

**रघुराज वैकुण्ठ धामासि गेले। तधीं मारुती दास हे नीरवीले।**
**रघुनाथ उपासकाला प्रसंगें। सख्या मारुति पाव रे लागवेगें॥**

— श्रीसमर्थ

ग्रंथ ... स्वागत.
अनुक्र. ... दि: ...

# विषयसूची


अनशेपोर्टी पाणी १४९
अन्नकोट ३६, ११४
अभिनवकाशी ९५
अलईपूर ५१
अलंकार स्त्रियांचे १५६
आमचूर ७८
आंबे ७८
आयुर्वेद ८८, १३७
आर्यभाषा पुस्तकालय १०६
आवळे ७६
आश्विनमास १३२
इमरती ( मिठाई ) १५०
उष्टें-खरकटें १३, १४८
ऊखी एकादशी १२९
ऋषिव्हॅलीट्रस्ट ५१, ९३
एकादशी ११७, १२९
एक्का ५२
,, गहरेबाज १२४
कन्यापितृत्व १५८
कपिलधारा ५७
कलाकृति-व्यापार-दर्शन ५८-७८
करंडे लांकडी ६१
कर्दमेश्वर ५७
कस्यां मरणान्मुक्तिः १३६
कहार १४८
कांचेचे डोल्हारे ६४
कायस्थ ११५
कायाकल्प १३८
कार्तिकमास १३३
काशीवासांतील विघ्नें १६०
काशीविद्यापीठ १०४
काशीहिंदुविश्वविद्यालय ९४-१०४
काश्यां मरणान्मुक्तिः ४८, १३५
कीर्तनसंस्था ८९
कुरुक्षेत्र कुण्ड ११०
कुल्फी १५१
कुस्त्यांची दंगल १२०
केदारखण्ड ३९
कोहळा ७८
क्वीन्स कॉलिज ९२
खांडसरी साखर ६९
खाण्यापिण्याचा शोक १४७, १५४
,, निर्बंध १४७
गंगागुण १२६
गंगापान १२५
गंगाप्रवाह १२१
गंगास्नान १२५
गण्डे ३७
गुरुभेट १४६
गुरुशिष्य व्यवहार १४३
गूळ ७०
गोड भाषण १४२
गोटाबादला ६५
घाट २३-३१

घाट अस्सी २९
,, अहिल्याबाई ४६
,, केदार ३९
,, चेतसिंग २९
,, जलशायी २८
,, तुलसी ८४
,, दण्डी १६३
,, दरभंगा ३०
,, दशाश्वमेध २५
,, नेपाळी ४३
,, पंचगंगा २७
,, पार्श्वनाथ ८३
,, भोसले ४६
,, मणिकर्णिका २६
,, मानमंदिर २७
,, मीर १२१
,, मुन्शी २९
,, राजघाट ११,९४
,, शीतला २६,४६
,, शिवाला २९
,, शिन्दे ४६
,, स्त्रियांच्या स्नानाचा २६
,, स्मशान २७
,, हरिश्चंद्र २८
चक्रपुष्करणी २६
चरणपादुका २९
चारा घालण्याची पद्धति ६७
चौकावर्तन १४४
चौखंडी स्तूप ८१
जंतरमन्तर २७
जैनधर्म ८२
टिळक पुतळा ९९
ठठेरी बाजार ६०,११३
तांदूळ ६९
तिळपापडी १३१
तैराकी दंगल १२१
थिओसोफिकल सोसायटी ९३
थंडाई १५२
दंगली १२०-१२३
दिवाळी ११३, १३१
दुर्गापूजा १११
,, सुट्टी ११२
दूधदुभतें ६७
देवदर्शन १४४
देवांचे अलंकार ६५
देवांना भोग चढविणें १४५
धनत्रयोदशी ११३
धम्मेकस्तूप ८१
धर्मपरंपरा ८०
धर्मशाळा ५४
नगररचना २१
नगरी - नागरिक जलवायु-दर्शन १९-५८
नमस्काराची पद्धति १४३
,, ,, देवाला १४६
नागरी प्रचारणी सभा १०६
नारळीपौर्णिमा १३०
पंचक्रोशी ५६

पडदा स्त्रियांचा १५५
पशुपक्ष्यांच्या दंगली १२२
पाणी पिण्याची पद्धति १४८
पायी प्रवास काशी १–१९
पेरू ७६
पेहेराव स्त्रियांचा १५५
प्रबोधिनी एकादशी १२९
प्राचीन संस्कार १३३
प्रार्थनेच्या सफलतेचें तत्त्व १६७
प्रार्थना व प्रयत्न यांचा संबंध १६८
फळबाजार ७६
फूलबाजार ७४
बंगाली समाज ४९
,, दुर्गापूजा ११२
बहरीअलंग १२३
बांगड्या ६४
बाजार ६९
बेलफळ ७७
बैलगाड्या ६६
बौद्धधर्म ८०
भगवानदासस्वाध्यायपीठ १०४
भट्टवाणें ८७
भांग १५२
भाजीबाजार ७१
भांडीं धातूंचीं ६०
,, मातीचीं ६३
भारत कलाभुवन ९७
भीमचंडी ५७
भैरवनाथ ३६
मणिकर्णिका २६
मन्दिरें ३१
,, अन्नपूर्णा ३५
,, कर्दमेश्वर ५७
,, कवडा देवी (गौबाई) ४०
,, काळभैरव ३६
,, केदारनाथ ३९
,, जैन ८२
,, तारकेश्वर २६
,, दण्डपाणि ३७
,, दशाश्वमेधेश्वर २५
,, दुर्गा ३०, ३९
,, धुंढिराज ३६
,, नेपाळी ४३
,, बडागणेश ४३
,, बिंदुमाधव ३७
,, बुद्धमंदिर सारनाथचें ८२
,, भारतमाता १०५
,, विश्वनाथ ३१, ९८
,, शनि ३५
,, शीतला २६
,, संकटमोचन ४१
,, संकटहरण ४२
,, साक्षीविनायक ३६
,, सारनाथ महादेव ८२
,, हनुमान् विश्वविद्यालय १०१
महाराष्ट्र काशींतील ४४
,, विद्येंतील ८६
,, विश्वविद्यालयांतील ९९

महाराष्ट्र मंडळ ,, १०३
महाराष्ट्रीय, आयुर्वेदांतील ८८
,, कीर्तनांतील ८९
,, वेदविद्येंतील ९०
,, व्यायामांती ८९
,, हिंदींतील १०६
,, समाज ४९
मातीचीं भांडीं ६३
माधवरावका धौरहरा ३८
मारुतिरायाचा पाळणा १६५,१८०
,, पूर्वपीठिका १६६
,, रूपरेषा १७४
,, व बालक १७८
मालवीयनगर ९५
मालीस ६५
मिठाई ७०,१६०
मोगलसराई ५२
यात्रा–मेळे ११०
योगपरंपरा ७९
योगविद्याधर्मदर्शन ७८–१०९
रंगभरी एकादशी ११७
रबडी १५१
रसोई कच्ची–पक्की १४७
रस्ते २१
राखी पौर्णिमा १३०
राजघाट ५१,९४
रांडा १६०
रामचरितमानस ८४
रामलीला ११२
रामेश्वर ५७
लंगडा आंबा ७८
लांकडी खेळणीं ६०
लाठी दंगल १२०
लोकवस्ती ४८
लोकसमाजसंस्कृतिदर्शन ११०–१६४
लोणचीं ७१
वधूपरीक्षण १५७, १५८
वनभोजन १२३
वरात १५९
वर्ख १५०
वसंतपंचमी १३०
वस्त्रव्यवसाय ५८
वाराणशी २०
वाळवी १२२
विडा १५३
विद्यापरंपरा ८५
विवाह १५७
वेदविद्या ९०
व्यक्ति अहिल्याबाई ४४,४६
,, एकनाथ ८६
,, कबीर ८३
,, कुलकर्णी द. अ. १३८
,, गर्दे ल. ना. १०७
,, गागाभट्ट ८७
,, गुरुनानक ८३
,, चांगदेव ७९
,, चांदवडकर बुवा ८९
,, चैतन्यप्रभु ८३

व्यक्ति जगन्नाथ पंडित २७
,, जयसिंह ३८
,, जामसाहेब १२८
,, टिळक १३,१६
,, तुळशीदास ४१,८४
,, तेलंगस्वामी ७९
,, त्र्यंबकशास्त्री ८८
,, दादा साठे ५
,, दामोदर गुरु ८९
,, ध्रुव डॉ. २५
,, नरेन्द्र देव ११९,१४०
,, नाना फडणवीस ४४,४७
,, नारायणभट्ट ३३,८७
,, पराडकर बाबूराव १०७
,, भास्करानंद ४०,७९,८०
,, मालवीयजी १८,२६,२९,६५
९४, ९८, १२४, १२८,
१३०, १३५–१४०.
,, मैत्रा एस्. के. ११९
,, रणजितसिंह ३४
,, राधाकृष्णन् डॉ. १४०
,, रामस्वामी सी. पी. १४०
,, रामानंद ८३
,, वल्लभाचार्य ८३
,, शंकराचार्य ८३
,, शिंदे ४६
,, शिवप्रसाद गुप्ता १०४
,, श्रीसमर्थ १, ७९, ८७
वाहनें ५२

व्यास काशी ३०
शिवपूर ५७
शिवाजीचा पुतळा ९९
शिष्टाचार १४१
शृंगारी एकादशी ११७
शेती ६६
संक्रान्ति १३१
सज्जनगड १,१५
संन्यासी १६३
सरबतें १५१
सरस्वतिभवन ९१
संस्कृत विश्वविद्यालय ९१
साखरचित्रें ७०
सांड १६१
सारनाथ ६२, ८०
सिकरौल ५१
सीढी ( शिड्या ) १६२
सुंगधी व्यवसाय ६५
सुवर्णमंदिर ३४
सोवळें-ओवळें १४९
स्त्रियांची रहाणी १५५
स्थानकें काशीचीं ५१
स्वागतविधि १४६
हनुमज्जयन्ती ४१,१०२,१७०
हरताळका १३०
हवापाणी ५४, ७३
हिंदी १०६
हिंदुविश्वविद्यालय ९४–१०४
होळी ११५–१२०,१३१

REFBK-0010799

REFBK-0010799